**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

**पृ.शी.** : राज्यातील कायदा व सुव्यवस्था बिघडलेली असणे, एसटी कर्मचाऱ्यांचा संप मिटविण्यात सरकारला आलेले अपयश, ओबीसी आरक्षणाशिवाय निवडणुका घेणे, टीईटी व अन्य स्पर्धा परिक्षेत झालेले घोटाळे.

**मु.शी.** : राज्यातील कायदा व सुव्यवस्था बिघडलेली असणे, एसटी कर्मचाऱ्यांचा संप मिटविण्यात सरकारला आलेले अपयश, ओबीसी आरक्षणाशिवाय निवडणुका घेणे, टीईटी व अन्य स्पर्धा परिक्षेत झालेले घोटाळे या विषयावर सर्वश्री प्रवीण दरेकर, भाई गिरकर, प्रसाद लाड, चंद्रशेखर बावनकुळे, सुरेश धस, डॉ. परिणय फुके, सदाभाऊ खोत, विनायक मेटे, डॉ. रणजित पाटील, प्रवीण पोटे-पाटील, महादेव जानकर, रणजितसिंह मोहिते-पाटील, ॲड निरंजन डावखरे, ॲड. निलय नाईक, चंदुभाई पटेल, गोपिचंद पडळकर, रमेशदादा पाटील, रामराव पाटील, प्रवीण दटके, रामदास आंबटकर, रमेश कराड, अमरिशभाई पटेल, वि.प.स. यांचा प्रस्ताव

(प्रस्ताव पुन: प्रस्तुत झाला.)

श्री. गोपिचंद पडळकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदया, नियम २६० अन्वयेच्या प्रस्तावावर चर्चा सुरु आहे. मी काल कायदा व सुव्यवस्थेच्या

असुधारित प्रत

श्री. गोपिचंद पडळकर ....

विषयावर काही गंभीर विषय आपल्यासमोर मांडले आहेत. एखाद्या गुन्हेगाराने गुन्हा करणे आणि त्याला पोलिसांनी पाठिशी घालणे हे प्रकार नेहमी होत राहतात. परंतु पोलिसच जर गुन्हा करीत असतील आणि त्या पोलिसांना त्यांचे वरिष्ठ अधिकारी किंवा राज्याचे माननीय गृहमंत्री पाठबळ देत असतील, त्यांच्याकडे कानाडोळा करीत असतील तर ही गोष्टी अत्यंत गंभीर आहे. मी जे विषय मांडत आहे त्या संदर्भात त्या लोकांच्या वैयक्तिक तक्रारी आहेत. माननीय गृहमंत्र्यांनी या विषयावर उचित कारवाई करणे अपेक्षित आहे. आपल्याला या सर्व सुरस कथा माध्यमांतून ऐकायला मिळतात, त्या गंभीरतेने घेण्यासारख्या आहेत.

सभापती महोदया, मागच्या १५-२० दिवसांपूर्वी पिंपरी-चिंचवड येथे एक घटना घडली आहे. माननीय गृहमंत्र्यांना त्या बाबतीत पत्रकारांनी प्रश्न विचारला तेव्हा मला हे माहीत नाही असे म्हणून ते हसले. त्यांना त्यातील खरी गोष्ट समजलेली होती. वर्तमानपत्रात त्याबाबत बातमी आली. आम्ही ते सर्व वाचले की, ३ आरोपींचा पोलिसांनी पाठलाग केला. त्या आरोपींनी पोलिसांवर गोळीबार केला. प्रत्युत्यरादाखल पोलिसांनी त्या आरोपींवर गोळीबार केला आणि त्यानेही ते आरोपी ऐकले नाहीत म्हणून वरिष्ठ अधिकाऱ्यांनी एक झाड उपटून काढले, त्या आरोपींवर फेकले, मग ते आरोपी पडले आणि पोलिसांनी त्यांना पकडले. आपण ही गोष्ट खोलात जावून तपासली पाहिजे. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी जर खरोखर झाड उचलून त्या आरोपींवर फेकले असेल तर त्यांचे आपण कौतुक केले पाहिजे. जमिनीतून मुळासकट उचलून त्या आरोपींवर झाडे फकले. आम्ही यामध्ये खोलात जावून माहिति घेतली किंवा ती चर्चा ऐकली तर समजले की, ते ३ आरोपी सांगवी पोलीस स्टेशनमध्ये हजर होण्यासाठी आले होते आणि असे असताना तेथील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी त्यांना गाडीमध्ये घालून बाहेर जाऊन हे सर्व षडयंत्र रचले गेले. मला या विषयात हा आक्षेप घ्यायचा आहे की, आपण चौकशी करुन याचा तपास केला पाहिजे. सरेंडर झालेले आरोपी पोलीस स्टेशनमध्ये नेऊन, गाडीमधून नेऊन जर बनाव करीत आहात तर

असुधारित प्रत

श्री. गोपिचंद पडळकर ....

त्यांच्या हातामध्ये हत्यारे कोणी दिली, ती हत्यारे नेमकी कोणी आणली याचा तपास झाला पाहिजे. ती हत्यारे कशा पध्दतीने त्यांच्याकडे दिली, कोणी गोळीबार केला, ते झाड उचलून, उपटून, काढून त्यांच्यावर टाकले का या सर्व विषयांच्या खोलात जावून तपास करणे गरजेचे आहे. आपण तो तपास करावा. माननीय गृहमंत्री या गोष्टीबाबत काय सूचना देत आहेत की त्यांना पाठिशी घालत आहेत हे मला माहीत नाही. पण सभागृहामध्ये एखादे सन्माननीय सदस्य जेव्हा विषय मांडतात तेव्हा तो विषय सत्य मानायचा असतो.

सभापती महोदया, मी मागे एकदा नोटा छपाईच्या मशिनच्या संदर्भातील विषय मांडला होता आणि माननीय मंत्र्यांनी त्या विषयात .... मला खरे तर तुमच्याकडून अपेक्षा होती. आपले आजोबा या राज्यात गृहमंत्री होते, त्यांचे फार मोठे काम आहे. नोटा छापण्याच्या मशिनसारखा विषय देशाच्या विरोधातील आहे, देशद्राहाचा आहे. तुम्ही त्यामध्ये किमान चौकशी केली पाहिजे होती. तुम्ही उलट आम्हालाच वेगळ्या पध्दतीने मार्गदर्शन करीत असाल तर ते चांगले नाही. आम्ही पुन्हा पुन्हा तो विषय सभागृहात आणणार आहोत.

सभापती महोदया, मागच्या अधिवेशनाच्या वेळी माननीय मंत्र्यांनी सभागृहात माझे नाव घेतले होते. आपण सभागृहाची परवानगी घेतली होती का याची देखील मला माहिती पाहिजे. मी तशा पध्दतीचे पत्र देखील आपल्याकडे दिले आहे. मी काल जेव्हा नाव घेतले तेव्हा मला सूचना दिली गेली. परंतु अशा पध्दतीने जर होत असेल तर कोणीच चुकीच्या पध्दतीने करता कामा नये. माझ्यावर कलम ४२० चा गुन्हा दाखल होणार असे कलम ४२० चा गुन्हा दाखल होण्यापूर्वी सभागृहात मांडले गेले होते.

असुधारित प्रत

**उप सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना एवढ्यासाठी थांबविते की, रेकॉर्डवर अयोग्य गोष्ट जाऊ नये. आपल्याला अवगत असेल आणि नसेल तर मी सांगू इच्छिते की, ज्यावेळी एखादे सन्माननीय सदस्य एखाद्या सरकारसंदर्भात किंवा कोणत्याही गोष्टीच्या संदर्भात प्रश्न मांडतात, लक्षवेधी सूचना मांडतात, तेव्हा त्याचे उत्तर देताना जर त्याचा तपशील मांडण्यासाठी त्या माननीय मंत्र्यांना .... ते त्यांचे कर्तव्यच आहे. त्यांनी तुमचे नाव घेतले म्हटल्यावर, त्यांना जी काही वस्तुस्थिती अवगत आहे ती त्यांनी मांडली आणि त्याबाबत तुमचा आक्षेप असेल तर तुम्ही नंतर निवदेनाद्वारे किंवा परत चर्चेत तुमचे म्हणणे त्याच वेळी मांडू शकला असता. तुमच्या प्रश्नाशी संबंधित ते बोलत असतील किंवा लक्षवेधी सूचना किंवा अंतिम आठवडा प्रस्ताव किंवा नियम २६० चा प्रस्ताव असेल तर त्यामध्ये सरकारला उत्तर देण्यासाठी सभागृहाची परवानगी लागत नाही किंबहुना उत्तर देणे संसदीय आयुध आहे.

श्री. गोपिचंद पडळकर : सभापती महोदया, विषय तो नाही. त्यांनी उत्तर देताना माझे नाव घेऊ द्यावे, पण मी कशा पध्दतीने गुन्हेगार आहे असे सांगताना तुमची परवानगी घेणे अपेक्षित आहे असे माझे त्या विषयासंदर्भात म्हणणे आहे. माझ्यावर कलम ४२० चा गुन्हा दाखल झाला.

श्री. शंभूराज देसाई : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री. गोपिचंद पडळकर ज्या गोष्टीचा उल्लेख करीत आहेत त्या संदर्भात मी सांगू इच्छितो की, मागच्या अधिवेशनात आलेल्या एका लक्षवेधी सूचना किवा प्रश्नाच्या संदर्भाने मी उत्तर देत होतो. सन्माननीय सदस्यांनी सांगली जिल्ह्यातील विषय त्यावेळी उपिस्थत केला होता, त्या विषयाला अनुसरुन त्या गुन्ह्यात जे आरोपी होते त्यांच्या अनुषंगाने मी सर्वच बाबतीतील त्या जिल्ह्यातील गुन्ह्यांसंदर्भातील विभागाकडून आलेली अधिकृत माहिती आपल्या अनुमतीने उत्तरामध्ये सांगितली आहे. सन्माननीय सदस्यांची अवहेलना करणे, त्यांचा जाणीवपूर्वक अवमान करणे .... राज्य शासनाच्या

असुधारित प्रत

श्री. शंभूराज देसाई ....

वतीने त्या लक्षवेधी सूचना किंवा प्रश्नाच्या अनुषंगाने असणारी सर्व वस्तुस्थिती सभागृहाच्या निदर्शनास आणणे हा सरकारचा प्रतिनिधी म्हणून माझे कर्तव्य आहे, त्या भावनेतून मी त्यावेळी त्याचा उल्लेख केला आहे.

**उप सभापती** : प्रश्नाच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांची परवानगी घ्यायचे ठरविले तर सरकारला काही मांडताच येणार नाही. त्यामुळे असा नियम नाही.

श्री. गोपिचंद पडळकर : सभापती महोदया, मी सदस्यांबाबत बोलत नाही. एखाद्याचे नाव घेताना सभागृहाची परवानगी घेतली का, तो नियम आहे, असे माझे म्हणणे होते.

**उप सभापती** : आपण थोडे समजून घ्यावे.

श्री. गोपिचंद पडळकर : सभापती महोदया, काही विषय मांडणे महत्त्वाचे आहे. परवाच्या दिवशी विधानसभेत रेकॉर्डिंग व्हायरल झाले. कसे प्लॅन केले जातात, कसे गुन्हे दाखल केले जातात हे पहा. माझ्यावर कलम ४२० चा गुन्हा दाखल होणार हे अधिवेशात येथे सांगितले होते. तेव्हा काही विषय नव्हता. माझ्या विरोधात कोणातही तक्रार अर्ज नव्हता. ८ दिवसांनंतर माझ्यावर कलम ४२० चा गुन्हा दाखल होत आहे. दिनांक २३.०३.२०११ ला मी एक जमीन खरेदी केली आहे. आता त्या जमिनीमध्ये माझी शेती आहे. ४/५ हजार आंब्याची झाडे आहेत. तेथे द्राक्षाची बाग आहे. मी स्वत: तेथे राहत आहे. सन २०११ नंतर सन २०२२ पर्यंत मी व्यवस्थित रीतसर खरेदी केलेला दस्त असताना देखील माझ्यावर गुन्हा दाखल होत आहे माननीय मंत्र्यांना विनंती आहे की, ज्यांनी माझ्यावर गुन्हा दाखल केला आहे, त्यांच्याकडे कोणत्या पक्षाचे पदाधिकारी १५ दिवस येत होते याचे रेकॉर्ड तुम्ही काढले पाहिजे. कारण त्यांना या कामासाठी कोणी प्रवृत्त केले हे समजले पाहिजे. ६ महिन्यांपूर्वी त्या व्यक्तिला कोरोना झाला. माझे देखील फोन कॉल तपासावे. माझ्या

असुधारित प्रत

श्री. गोपिचंद पडळकर ....

फोनवर त्यांचा फोन येत आहे की, मला कोविड झाला आहे, मला बेड उपलब्ध होत नाही, तुम्ही मला मदत करावी. मी त्यांना मदत करीत आहे. त्यांना ॲडमिट करीत आहे. रोज डॉक्टरांशी बोलत आहे माझे आणि त्यांचे एकदम चांगले संबंध आहेत. मात्र नंतर काही पदाधिकारी त्यांना येऊन भेटत आहेत, त्यांना काही अमिष दाखवित आहेत आणि माझ्यावर गुन्हा दाखल करीत आहेत. मी सर्व सविस्तर कागदपत्रे तपास अधिकारी डीवायएसपी यांच्याकडे दिली आहेत. मला त्याबाबत काही म्हणायचे नाही. पण हे कोण प्लॅन करीत आहे, हे प्लॅन करण्यासाठी एका माननीय मंत्र्यांनी त्यांचा शासकीय पीए तेथे नेमलेला आहे. त्याचे माझ्याकडे काही डिटेल्स आलेले आहेत. त्या शासकीय पीएने कोणाला बोलावून घेतले ? तेथे एक दुसरे अधिकारी आहेत, ते श्री. सुधीर भालेराव एसआयडीला डीवायएसपी आहेत. त्या अधिकाऱ्यांनी काही लोक रोज बोलावून घेणे, त्यांनी काही माननीय मंत्र्यांना जावून सांगणे की, यांच्यावर बरोबर गुन्हे दाखल करतो. तेथे एसपी, ॲडिशनल एसपी, तेथे नव्याने दिलेले पीआय श्री. नेमाणे किंवा तेथील नोटा छपाईच्या मशिनसंदर्भात ५० लाख रुपये घेतात, ते एपीआय श्री. सुधीर पाटील आहेत.

नंतर श्री. खर्चे ....

असुधारित

श्री.गोपिचंद पडळकर....

मंत्री महोदयांना मला विनंती करायची आहे की, मी सर्व सविस्तर पुरावे त्यांच्याकडे देणार आहे. या सर्व प्रकरणाची चौकशी झाली पाहिजे. दुसरा विषय अतिशय गंभीर आहे. कोल्हापूर, पुणे, सातारा, सांगली व सोलापूर या जिल्ह्यातील गोरगरीब लोकांचे पैसे महिन्याला १५ टक्के व्याज देतो असे सांगून काही कंपन्या गुंतवणूक करीत आहेत. एक लाख रुपये गुंतविले तर तुम्हाला महिन्याला १५ हजार रुपये व्याज मिळेल. अशा प्रकारे हजारो कोटी रुपये काही कंपन्यांनी गोळा केले आहेत. या कंपन्यांना कोण पाठीशी घातले त्याबाबत मी एक घटना आपणाला सांगतो. इतर कंपन्याबाबत सन्माननीय सदस्य श्री.सदाभाऊ खोत त्यांच्या भाषणात माहिती देणार आहेत. मी जो मुद्दा मांडतो त्याकडे मंत्री महोदयांनी गांभीर्याने लक्ष द्यावे अशी माझी विनंती आहे. दिनांक २२ ऑक्टोबर, २०२१ रोजी महात्मा गांधी पोलीस स्टेशन मिरज, पी.आय.श्री.फडणीस यांनी ५० ते ६० पोलीस कंपनीच्या अध्यक्षांच्या घरी पाठवून सायंकाळी पाच वाजता त्यांना उचलून आणले होते. त्यांना रात्री साडेअकरा ते बारावाजेपर्यंत ठेवले. कंपनीच्या अध्यक्षांकडे त्यांची अशी मागणी होती की, ३ कोटी रुपये आम्हाला द्या. मी जे सांगत आहे त्याबाबत दिनांक २२ ऑक्टोबर, २०२१ रोजीची सीसीटीव्ही फुटेज आपण पाहू शकता. पोलीस स्टेशनमध्ये त्या अध्यक्षाला कशासाठी आणले होते, सहा तास त्याची नेमकी कोणती चौकशी केली. चौकशी केल्यावर त्यांना सोडून का देण्यात आले. तीन कोटी रुपयांचे डील ठरल्यानंतर दुसऱ्या दिवशी पैसे द्यायचे होते. या विषयाबाबत तेथील मंत्री महोदयांनी लक्ष घातल्यानंतर ते प्रकरण ३५ लाख रुपयांवर मिटविण्यात आले. त्यानंतर अनेक पुढारी त्या अध्यक्षांना फोन करतात की, आम्हाला पैसे पाहिजेत. ४०० ते ४५० कोटी रुपये गोळा केलेल्या कंपनीचा अध्यक्ष तथा मालक दुबईला पळून गेला. त्यामुळे ज्या गोरगरीब लोकांनी पैसे गुंतविले त्यांचे पैसे कोण देईल. याबाबत शासन तपास करणार आहे काय ? हा सर्व पैसा गोरगरीबांचा असल्यामुळे याचे उत्तर मंत्री महोदयांनी दिले पाहिजे.

असुधारित प्रत

श्री.गोपिचंद पडळकर....

सभापती महोदया, तेथील एस.पी. अत्यंत खालच्या पातळीवर जाऊन काम करीत आहेत. मी कोर्टाची ऑर्डर वाचून दाखविणार आहे.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.गोपिचंद पडळकर आता आपणाला बोलून १२ मिनिटे झाली आहेत, आपण काल देखील भाषण केले आहे. दोन्ही बाजूकडील सन्माननीय सदस्यांना या प्रस्तावावर बोलायचे आहे. आपण आपले भाषण दोन मिनिटांत आटोपते घ्यावे.

श्री.गोपिचंद पडळकर : सभापती महोदया, मी अतिशय गंभीर बाब आपल्या निदर्शनास आणून देत आहे. जे एस.पी. आमच्यावर कारवाई करीत आहेत त्याबाबत माननीय न्यायालयाने एक ऑर्डर काढली आहे. हा पोलीस अधिकारी इतक्या खालच्या पातळीवर जाऊन काम करीत असताना विरोधी पक्षातील आमदारांना अत्यंत वाईट पध्दतीने वागणूक दिली जात आहे. माननीय न्यायालयाच्या ऑर्डरमध्ये असे नमूद केले आहे की, "The applicant further stated in the application that, at about 10.30 pm witness No. 2,3 and watchman of hotel Prashad Tathe were closing the main gate of hotel at that time two police constable came on the Motorcycle and they blow horn. Hence, watchman open the main gate. The police constable asked to watchman whether the hotel closed. Then watchman answered as Yes and thereafter police claimed two water bottle. Watchman took the two bottle of water and went towards hotel manager Shri Devare. Shri Devare told to bring the amount for water..." दोन पाण्याच्या बाटल्यांचे पैसे घेऊन ये ओ मॅनेजरने त्यांना सांगितले आहे.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्यांनी आपल्या भाषणाचा समारोप करावा.

असुधारित प्रत

श्री.गोपिचंद पडळकर : सभापती महोदया, मी एक महत्वाचा विषय मांडत आहे, दोन पाण्याच्या बाटल्यांचे पैसे आणा असे पोलिसांनी मॅनेजरला सांगितले व त्या कंपनीच्या मालकाला मारहान करण्यात आली. माननीय न्यायालयाच्या ऑर्डरमध्ये पुढे असे नमूद केले आहे की, "Accused taken away the harddisk of CCTV footage, Rs. 2,40,000/-. Harddisk in computer in the office and important documents of the hotel." हे कोण घेऊन जाते. "Äccused threatened to kill and beat to hotel manager Gautam and them. They beat to Deva like animal. " Shri Dikshit kumar Gedam.." जे आमचे एस.पी.आहेत त्यांना दोन पाण्याच्या बाटल्यांचे पैसे द्यावे लागतात म्हणून ते त्यांना मारहान करतात. त्यांना जीवे मारण्याची धमकी देतात. असे कोर्टाचे आदेश आहेत.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य आपले भाषण थांबवित नसल्यामुळे मी पुढील सदस्यांचे नाव पुकारते व त्यांचा माईक बंद करण्यात यावा असे निदेश देते.आता सन्माननीय सदस्य श्री.अमोल मिटकरी यांनी भाषणाला सुरुवात करावी.

---------

असुधारित प्रत

श्री.अमोल मिटकरी (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदया, नियम २६० अन्वये विरोधी पक्षानी मांडलेल्या प्रस्तावार मी बोलण्यासाठी उभा आहे आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबाबत मी आपले आभार व्यक्त करतो.

सभापती महोदया, विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांच्या त्यांच्या भाषणात सरकार विरोधी अनेक मुद्दे मांडण्याचा प्रयत्न केला. त्यावर कोणाचाही विश्वास असण्याचा प्रश्न उद्भवत नाही. सांगली येथील पुतळ्याचा विषय मांडला आहे. महिला अत्याचार, पब, हुक्का पार्लर, मुंबईत महिला कशा असुरक्षित आहेत. पोलिसांवर महाविकास आघाडी शासनाचा दबाव आहे, ड्रग्ज व अंमली पदार्थ वाढले आहेत, आरक्षण, एस.टी. कर्मचारी संप, आर्थिक विकास महामंडळ, सारथी संस्था असे अनेक विषय त्यांनी मांडले आहेत.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.अमोल मिटकरी आपण सदस्य आहात, प्रस्तावाबाबत आपण मुद्दे मांडावेत. उत्तर देण्याचे काम साधारणपणे सरकारचे मंत्री करीत असतात. जेथे तुम्हाला अत्यावश्यक आहे तेथे काही मुद्यांचा आपण उल्लेख करु शकता. काही प्रथा व परंपरा आपण समजून घेतल्या पाहिजेत.

श्री.अमोल मिटकरी : सभापती महोदया, महाविकास आघाडी शासनाने महिलांच्या सुरक्षेबाबत निर्णय घेतले आहेत. शक्ती सुधारणा विधेयकाला आपण स्वत: मार्गदर्शन म्हणून आहात. मी त्या समितीचा सदस्य आहे. महिला असुरक्षित आहेत असे विषय सभागृहात मांडण्यात आले आहेत. ज्यांनी आमच्यावर आरोप केले तर आप आदमी पक्षाचे दिल्लीचे आमदार श्री. कपिल मिश्रा यांनी त्यांच्या संसदीय भाषणात एक लिंक शेअर्स केली होती. ती लिंक महाराष्ट्राच्या तमाम तरुणांना मी सांगतो. "WWW.Youtube.comUNMNOODUX0" ही लिंक ओपन करावी व जे लोक बोलण्याचा प्रयत्न करीत आहेत त्यांना मी सांगतो. कबीर महाराज असे सांगतात की,

असुधारित प्रत

श्री.अमोल मिटकरी....

"बुरा जो देखन मैं चला,
बुरा न मिलिया कोय,
जो दिल खोजा आपना,
मुझसे बुरा न कोय."

ज्यावेळी एक बोट आपण दुसऱ्याकडे दाखवितो त्यावेळी चार बोटे आपणाकडे असतात. या सभागृहात शेतकऱ्यांबाबत बऱ्याच लोकांनी कळवळा व्यक्त केला. मागच्या सरकारच्या काळात माननीय श्री.देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना धर्मा बाबा पाटील हे ७० वर्षाचे वृध्द शेतकऱ्याने विष प्राशन करुन आत्महत्या केली होती. तलवारे नावाचा २५ वर्षाचा युवक "चला आणू या आपले सरकार" असे टी शर्ट धारण करुन आत्महत्या केली होती. शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबाव्यात हा प्रत्येक सरकारचा प्रयत्न असतो. त्यासाठी एखाद्याला वेठीस धरावे व कशा पध्दतीने बोलावे हे सभागृहातील काही सन्माननीय सदस्यांनी ठरविले पाहिजे.

सभापती महोदया, कायदा व सुव्यवस्थेबाबत अनेक सदस्य मोठमोठ्या गोष्टी करीत आहेत. सन्माननीय सदस्यांनी शेतकरी आंदोलनाचे दाखले दिले. सन्माननीय सदस्यांचे मी नाव घेणार नाही. माझ्याकडे एक प्रत आहे त्यामध्ये असे नमूद केले आहे की, सेक्शन ३९५,३२३,५०४,५०६ सखुबाई पांडुरंग थोरात यांच्या गळयातील ९० हजार रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने जबरीने तोडून नेले असा आरोप त्या सदस्यांवर असून त्यांच्यावर हे गुन्हे दाखल केले आतहे. तेच सदस्य आज कायदा व सुव्यवस्थेवर बोलायला लागले आहेत. महाविकास आघाडी शासनाने महिलांबाबत जे निर्णय घेतले त्यामध्ये महिलांविरुध्द घडणाऱ्या गंभीर गुन्ह्यांचा तपास करण्याकरिता राज्यातील ३० जिल्ह्यामध्ये इन्व्हेस्टिगेशन युनिट स्थापन करण्याकरिता प्रस्ताव पाठविण्यात आला. महिलांवरील अत्याचाराची प्रकरणे निकाली काढण्यासाठी २७ विशेष न्यायालये स्थापन करण्यात आली. प्रलंबित खटले तातडीने निकाली काढण्यासाठी २५ जलद गती न्यायालयास मान्यता दिली.

असुधारित प्रत

श्री.अमोल मिटकरी...

महिलांवरील अत्यांचार थांबविण्यासाठी शासनाकडून विविध उपाययोजना राबविण्यात येत असून प्रामुख्याने स्टॅण्डींग ऑर्डर ०३/२०१९ अन्वये कमिन्युटी पोलिसिंग ही योजना सर्व घटकांसाठी राबविण्यात आली. सर्व पोलीस स्टेशनमध्ये दामिनी पथक स्थापन करण्यात आले. या पथकामध्ये महिला पोलीस अंमलदार आपापल्या हद्दीत महिलांवरील अत्याचार रोखण्यासाठी दुचाकी किंवा चारचाकीमधून नियमित गस्त घालीत असतात. तसेच राज्यातील सर्व पोलीस स्टेशनमध्ये महिला पोलीस उपलब्ध आहेत. सोनसाखळी चोरी करणाऱ्या आरोपींना जास्तीत जास्त शिक्षा होण्यासाठी भारतीय दंड विधान ३७९ अ व ब या कलमांना मंत्रिमंडळाने मान्यता दिली. सदर नोटिफिकेशन भारत सरकारच्या मान्यतेसाठी पाठविण्यात आले आहे. बडी कॉप व पोलीस काका या योजनांच्या माध्यमातून महिलांचे संरक्षण व अडचणीच्या वेळी मदत पुरविली जाते. खास महिलांकरिता टोल फी हेल्पलाईन क्रमांक १००,१०३ १०९० तसेच मोबाईल ॲप बनविले आहेत.

या नंतर श्री.बोरले...

असुधारित प्रत

श्री.अमोल मिटकरी........

बसमध्ये व बस स्थानकांवर सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याबाबत कळविण्यात आले आहे. शासनाने बलात्कार व ॲसिड पीडित महिलांसाठी मनोधैर्य योजना लागू केलेली आहे. जिल्हा पातळीवर हुंडा प्रतिबंधक अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात आली आहे. महिला व मुलींच्या अनैतिक व्यापारास प्रतिबंध करण्यासाठी अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध समन्वय कक्षाची स्थापना करण्यात आलेली आहे. प्रत्येक पोलीस ठाण्यामध्ये एका अधिकाऱ्याला बाल कल्याण अधिकारी म्हणून नामनिर्देशित करण्यात आले आहे. आपल्याला असे किती तरी मुद्दे सांगता येतील. शासनाने शक्ती कायद्याविषयी अतिशय चांगली भूमिका घेतलेली आहे.

सभापती महोदया, छत्रपती शिवाजी महाराजांच्या बाबतीत उल्लेख करण्यात आला. अनेक लोक शिवाजी महाराजांचे नाव घेतात. छत्रपती शिवाजी महाराजांविषयी जे वक्तव्य करण्यात आले त्याचे काही लोकांनी मूक समर्थन केले. कर्नाटक, बँगलोर येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतीमेची विटंबना झाल्यानंतर आपण काहीही बोलावयाचे नाही ? माननीय राज्यपाल महोदयांच्या व्यक्तव्यावर काहीही बोलावयाचे नाही ? मात्र आम्ही छत्रपती शिवाजी महाराजांचे वारसदार कसे होतो, आमच्या काळात सरकारने प्रश्न कसे मार्गी लागले हे सांगण्याचा प्रयत्न केला जातो. छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने कर्जमाफी योजना लागू करण्यात आली. तत्कालीन सरकारच्या काळातील योजना फसव्या निघालेल्या आहेत. महाविकास आघाडी सरकारने महात्मा फुले कर्जमुक्ती योजना लागू करुन शेतकऱ्यांना मोठा दिलासा दिलेला आहे. सभागृहात शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर अनेक वेळा चर्चा होते. आपण नेत्यांनी केलेली स्टेटमेंट्स बघावित. मी त्या नेत्यांची नावे घेत नाही. ते आपल्याच पक्षाशी संबंधित आहेत. **** कहते है कि "किसान मरते हैं, मरने दो. हम क्या करें? रेल किराए महंगे हो गए. यह बड़ी नहीं, छोटी बात है. पेड़ पौधों को..... यापुढे एक शब्द आहे परंतु मी तो शब्द उच्चारणार नाही. निवडून दिले

---

**** शब्द मागे घेण्यात आले.

श्री.अमोल मिटकरी........

नाही तर एकही पैसा मिळणार नाही असे **** म्हणतात. (...अडथळा...) माझी चूक झाली. मी नाव मागे घेतो. मी कोणाचे नाव घेत नाही. परंतु त्यांनी तसे स्टेटमेंट केलेले आहे.

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदया, आपण अतिशय चांगल्या वातावरणात म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्तावावर चर्चा करीत आहोत.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्यांनी नाव मागे घेतलेले आहे.

श्री.अमोल मिटकरी : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री.चंद्रशेखर बानकुळे साहेब अनुभवी आहेत. आपल्याकडे शिष्टाचार आहे. आम्ही आपल्याकडून शिकत असतो. "किसान मरते हैं, मरने दो. हम क्या करें?" हे वाक्य कोणी कोणास म्हटले हे सन्माननीय सदस्य डॉ.रणजित पाटील यांना माहिती आहे. शेतकऱ्यांनी सरकारच्या भरवशावर बसू नये. चिमुरडीवर अत्याचाराच्या घटना साध्या असतात. जगाला विश्वबंधुत्वाची शिकवण देणारे स्वामी विवेकानंद आणि अंडरवर्ल्ड डॉन दाऊद इब्राहीम यांचा बुद्ध्यांक सारखाच आहे, असे देशाच्या मोठ्या नेत्याने म्हटले होते. ज्यावेळी सभागृहात दाऊद इब्राहीमचे फोटो लावलेले फलक फडकविले जातात त्यावेळी आमच्या मनात प्रश्नचिन्ह निर्माण होते. राज्यातील पवित्र मंदिर ज्याला विधिमंडळ म्हटले जाते त्या सभागृहात दाऊद इब्राहीमचे फोटो असलेले फलक फडकविण्यात आले. विधिमंडळाच्या पायऱ्यांवर दाऊद इब्राहीमचे फोटो फडकविण्यात आले. एका वरिष्ठ नेत्याने जगाला विश्वबंधुत्वाची शिकवण देणाऱ्या स्वामी विवेकानंद यांची तुलना थेट दाऊद इब्राहीम बरोबर केली. मुंबईत कोणीही पाच रुपात पोट भरु शकते असे सांगितले गेले. आपल्याला अशी अनेक उदाहरणे देता येतील.

सभापती महोदया, मी सभागृहाचा जास्त वेळ घेणार नाही. सभागृहात शेतकरी शेतकऱ्यांचे प्रश्न, कर्जमाफी इत्यादी विषयांवर चर्चा होते. परंतु रासायनिक खतांच्या

---

**** शब्द मागे घेण्यात आले.

श्री.अमोल मिटकरी........

दरवाढीबाबत कोणीही बोलयला तयार नाही. रासायनिक खतांच्या दरवाढीसाठी राज्य सरकार जबाबदार नसते. ती जबाबदारी केंद्र सरकारची असते. आपण सर्वांनी या संदर्भात गांभीर्याने चिंतन करण्याची आवश्यकता आहे. राज्यात महाविकास आघाडी सरकार सत्तेवर आल्यानंतर गडचिरोली येथे C-१६ पोलीस फोर्सने २७ नक्षलवादी मारले, ही अभुतपूर्व घटना आहे. माननीय नगरविकास मंत्री श्री.एकनाथ शिंदे साहेब गडचिरोली जिल्ह्याचे पालकंत्री आहे. पूर्वीच्या काळात स्व.आर.आर.पाटील साहेबांनी गडचिरोली जिल्ह्याचे पालकत्व स्वीकारले होते. गृह विभागाच्या माध्यमातून जवानांना विशेष अनुदान देण्याची योजना सुरु करण्यात आलेली आहे. आपल्या स्टूपगेट प्रकरण माहिति असेल. मला त्या विषयी बोलावयाचे नाही. स्टूपगेट प्रकरण, सोहरा बुद्दीन प्रकरण असेल, अनेक लोकांना राजाश्रय देऊन केंद्रात मोठी पदे मिळाली याबद्दल तुम्ही बोलणार आहात की नाही ? म्हणजे आपले झाकून ठेवायचे आणि इतरांविषयी सोईने बोलावयाचे अशी पद्धत विरोधी पक्षाकडून सुरु आहे त्यावर राज्यातील जनता विचार करीत आहे. राज्यात शेतकऱ्यांचे, विजेचे प्रश्न आहेत. काल विनाअनुदानित शाळेतील शिक्षकांच्या प्रश्नावर चर्चा झाली. या विषयांवर चर्चा करणे गरजेचे असताना चर्चा इतरत्र भरकटविली जाते. सभागृहाचे लक्ष विचलीत करुन महाविकास आघाडी सरकारला टार्गेट करुन विधानसभेत झालेल्या चर्चेतील उदाहरणे देऊन सभागृहाचा वेळ वाया घालविण्याचे काम सुरु आहे. राज्यात महाविकास आघाडी सरकार चांगल्या पद्धतीने काम करीत आहे. नवाझ शरीफ यांच्या वाढदिवसाच्या दिवशी कोणी केक कापला हे राज्यातील जनतेला माहिती आहे. काही लोकांनी तर आम्ही युक्रेन, रशिया युद्ध ६ तास थांबविल्याचा कांगावा केला. दाऊदला विदेशात जाण्यासाठी मदत करणारे लोक ज्यावेळी दाऊद विरोधात बोलू लागतात त्यावेळी सर्व सामान्य जनतेच्या मनात अनेक शंका निर्माण होतात. म्हणजे विश्वास किती ठेवावा असा प्रश्न राज्यातील जनतेच्या मनात निर्माण झालेला आहे. मी शायर मिर्झा गालिब यांनी लिहिलेच्या चार ओळी वाचून माझे भाषण संपविणार आहे.

असुधारित प्रत

श्री.अमोल मिटकरी........

" अंधेरे चारों तरफ सायं सायं करने लगे,
चिराग हाथ उठाकर दुआएं करने लगे,
सलीका जिनको सिखाया था हमने चलने का,
वो लोग आज हमें दाए-बाए करने लगे.
मेरी कोई खता तो साबित कर,
जो बुरा हूं बुरा साबित कर,
तुम्हें चाहा है कितना तुम क्या जानों,
चल, मैं बेवफा सही, तु अपनी वफा तो साबित कर."

सभापती महादया, आपण मला बोलण्याची परवानगी दिली त्याबद्दल मी आपले आभार मानून माझे दोन शब्द संपवितो.

-------

असुधारित प्रत

श्री.अंबादास दानवे (औरंगाबाद तथा जालना स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदया, आपण मला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्तावावर बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी सर्वप्रथम आपले आभार मानतो.

सभापती महोदया, कायदा व सुव्यवस्थेवर बोलताना अनेक मुद्दे मांडण्यात आले. परंतु या निमित्ताने महाराष्ट्र राज्य गुंडांचे राज्य आहे की काय, दरोडेखोरांचे राज्य आहे की काय असे सांगण्याचा प्रयत्न करण्यात आला. मला असे वाटते की, ही एक प्रकारे महाराष्ट्राची बदनामीच आहे. आपण गृह विभागाच्या माध्यमातून अतिशय प्रभावी योजना राबविण्यात येत आहेत हे सुद्धा लक्षात घेतले पाहिजे. राज्य शासनाने राज्यातील सर्व पोलीस ठाणे सायबर ठाणे करण्याचा संकल्प केलेला आहे. हा अतिशय महत्वपूर्ण निर्णय आहे. एका बाजूला पोलिसांना चांगले म्हणायचे आणि दुसऱ्या बाजूला कायदा व सुव्यवस्थेचा बोजवारा उडाल्याचे सांगावयाचे अशी दुटप्पी भूमिका सभागृहात मांडण्यात आलेली आहे. पोलिसांसाठी विशेषत: महिला पोलिसांसाठी ८ तासाची ड्युटी असावी असा निर्णय राज्य शासनाने घेतलेला आहे. मला असे वाटते की, त्या निर्णयाची अंमलबजावणी सुद्धा सुरु झालेली आहे. कायदा व सुव्यवस्थेवर बोलताना मी काही घटनांचा उल्लेख करणार आहे. आमच्या भागातील आमदार महोदयांनी असे म्हटले होते की, भारतीय जनता पक्षाला मतदान करावे अन्यथा तुम्हाला गावात राहू देणार नाही. भारतीय जनता पक्षाचा आमदार जनतेला अशा प्रकारे धमकी देतो.

यानंतर श्री.सांगळे......

असुधारित प्रत

श्री.अंबादास दानवे....

आणि दुसऱ्या बाजुला याच पक्षातील लोक कायदा व सुव्यवस्थेविषयी बोलतात. आपण याची दखल घेतली पाहिजे. विविध ठिकाणी वेगवेगळया भूमिका मांडत असताना भारतीय जनता पार्टीच्या जिल्हाध्यक्षांच्या जागेवर सुरु असलेल्या जुगार अड्डयावर छापा सत्तेचेही जुगारी ताब्यात. आपण काल सदनामध्ये बीडमधील कायदा व सुव्यवस्थेसंबंधी चर्चा केली. परंतु सदरहु घटना बीडमधील असून ती मी सदनाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो.

सभापती महोदया, परवा कोणताही संबंध नसताना मुंबई महानगरपालिकेच्या भ्रष्टाचाराविषयी विविध भूमिका मांडण्यात आल्या. या गोष्टी कथित आहेत. ऑगस्ट महिन्यात ॲन्टी करप्शन ब्युरोने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील भारतीय जनता पार्टीचे स्थायी समितीचे सभापती यांना त्यांच्या कार्यालयात लाच घेताना पकडले. एका बाजूला कायदा व सुव्यवस्था व भ्रष्टाचारावर बोलायचे आणि दुसऱ्या बाजूला आपल्याच पक्षातील लोक ॲन्टी करप्शन ब्युरोच्या जाळयात लाच घेताना पकडले जातात. ते आरोपी आहेत असे मी म्हणणार नाही. हा फक्त आरोप आहे. सभापती महोदया, आपण या गोष्टीची दखल घेण्याची आवश्यकता आहे. तसेच आपल्या सदनातील सन्माननीय सदस्यांविषयी असे म्हटले आहे की, इनामी जमिनीमध्ये एक हजार कोटी रुपयांचा गैरव्यवहार. मी या विषयी जास्त बोलणार नाही. परंतु अशा घटना घडत आहेत. ज्याप्रमाणे इतर आरोपांबाबत चर्चा होत असते त्याप्रमाणे या आरोपांवर देखील सदनामध्ये चर्चा झाली पाहिजे. भारतीय जनता पार्टीतील माजी सन्माननीय सदस्य असलेल्या एका सदस्यांना कुख्यात माफिया इकबाल मिर्चीच्या कंपनीकडून १० कोटी रुपयांची देणगी मिळाली. सदनामध्ये सर्व गोष्टीची चर्चा होऊ शकते. त्याप्रमाणे या प्रकरणी चौकशी होण्यास काय अडचण आहे ?

सभापती महोदया, कोविडवर चर्चा करीत असताना लोक मरतात व लोकांना कशा प्रकारे त्रास होत आहे ? याबाबत काही सन्माननीय सदस्यांनी सांगितले. परंतु भारतीय जनता पार्टीचे नागपूरमधील आमदार कोविड पॉझीटिव्ह असताना देखील आंदोलनामध्ये सहभागी झाले होते. त्यामुळे कोविड वाढत असल्यामुळे लोक मरत

श्री.अंबादास दानवे....

आहेत अशा गोष्टी करीत असताना दुसरीकडे कोविड पॉझीटिव्ह असून देखील आमदार आंदोलनामध्ये सहभागी होत असल्यास याबाबतची आपण दखल घेतली पाहिजे. कोविडबाबत सांगायचे झाल्यास मुंबई उच्च न्यायालयाने असे वक्तव्य केलेले आहे की, "The Maharashtra Government was pioneer in tackling the Covid19 during the second wave." उच्च न्यायालय तसेच न्याय व्यवस्थेपेक्षा कोणीही मोठे असू शकत नाही. एका बाजूला सत्ताधारी पक्षाला जाणीवपूर्वक बदनाम करण्याचा प्रयत्न करायचा, खोटे आरोप करायचे. मला असे वाटते की, नाकाने कांदे सोलण्याचा हा प्रकार आहे. या सर्व गोष्टींमध्ये विविध केंद्रीय यंत्रणाचा देखील उल्लेख करण्यात आला आहे. आज देशामध्ये १३ नेत्यांच्या मागे केंद्रीय यंत्रणा लागली आहे. त्यात पश्चिम बंगालमधील ६ नेते व उर्वरित नेते महाराष्ट्रातील आहेत. त्यात दुसऱ्या कोणत्याही पक्षांचा व भारतीय जनता पार्टीच्या नेत्यांचा मुळीच समावेश नाही. अशा प्रकारे केंद्रीय यंत्रणा काम करीत असल्यासंबंधी काल कोणी तरी वक्तव्य केले होते. जे लोक भारतीय जनता पार्टीच्या वैचारिक विरोधात लढा देत आहेत त्यांच्या मागे केंद्रीय यंत्रणांचा ससेमिरा लावला जातो असा माझा आरोप आहे. एका बाजूला कोणताही माणूस येतो व आरोप करतो. त्याबाबत चौकशी केली जाते. प्रत्यक्षात विधानसभेचे माननीय विरोधी पक्षनेते यांनी स्वत: सदनामध्ये एका केंद्रीय मंत्र्याबाबत आरोप केलेले आहेत. भारतीय जनता पार्टीच्या एका नेत्याने यासंबंधी स्वत: केंद्रीय यंत्रणाकडे स्वत: कागदपत्रे दिलेली आहेत. परंतु त्यावर सदनामध्ये चर्चा होत नाही, त्याबाबत केंद्रीय यंत्रणा कोणताही तपास करीत नाही. ४ महिन्यांपूर्वी एक व्यक्ती आरोप करते आणि त्यासंबंधी तपास केला जातो. आपण यासंबंधी लक्ष देण्याची गरज आहे.

सभापती महोदया, आरोग्य व्यवस्थेमध्ये केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने देश पातळीवर सर्व्हे केला होता त्यात पहिल्या स्थानी केरळला ७४.६५ गुण, दुसऱ्या स्थानी आंध्र प्रदेशला ६५.३१ गुण आणि तिसऱ्या स्थानी महाराष्ट्राला ६४.५३ गुण देण्यात आले. अशा प्रकारे देशात महाराष्ट्र आरोग्य व्यवस्थेमध्ये तिसऱ्या स्थानावर

असुधारित प्रत

श्री.अंबादास दानवे....

आहे. सभापती महोदया, गुजरातमध्ये करोनामुळे १० हजार लोकांचा बळी जातो आणि ८२ हजार अर्जदारांना त्याची मदत केली जाते. याबाबत कोणीही चर्चा करीत नाही. गुजरामध्ये स्टेट बँक ऑफ इंडियाच्या २८ बँकांना २२,८४२ कोटी रुपयांचा गंडा घालण्याचा प्रकार घडला. याबाबत कोणीही बोलत नाही, सर्व मूग गिळून गप्प बसतात. याउलट सदनामध्ये लहान विषय मांडले जातात.

सभापती महोदया, देश पातळीवर कायदा व सुव्यवस्थेबाबत गुन्हेगारीला प्रतिबंध करण्यासंबंधी केंद्र सरकारकडून सर्वोत्कृष्ट पोलीस स्टेशनचा सन्मान केला जातो. त्यात महाराष्ट्रातील तब्बल ५ पोलीस स्टेशन्सचा समावेश आहे. अशाप्रकारे महाराष्ट्रातील संभाजी नगर येथील वाळुंज पोलीस स्टेशन, यवतमाळ येथील बाभुळगाव पोलीस स्टेशन, जालना येथील सेवली पोलीस स्टेशन, सोलापूर येथील जोडभावे पोलीस स्टेशन आणि अहमदनगर येथील राजुर पोलीस स्टेशन यांचा सर्वोत्कृष्ट पुरस्कारामध्ये समावेश आहे. अशा प्रकारे आपला महाराष्ट्र प्रगती आणि विकासाच्या दिशेने चांगल्या प्रकारे पुढे जात आहे. परंतु ज्या लोकांना सत्ता मिळाली नाही ते महाराष्ट्राला जाणीवपूर्वक बदनाम करण्याचा प्रयत्न करीत आहेत असे माझे स्पष्ट मत आहे.

सभापती महोदया, छत्रपती शिवाजी महाराज यांच्याविषयी, मराठा आरक्षणाविषयी बोलले गेले. परंतु या संदर्भात फक्त आरोप करायचे म्हणून करण्यात आले. मराठा आरक्षणाविषयी विधिमंडळाला कोणतेही अधिकार नसताना त्याबाबत कोणीही बोलत नाही. संसदेमध्ये यासंबंधी कायद्यात व घटनेत दुरुस्ती होणे आवश्यक आहे. याबाबत केंद्र शासनाने कार्यवाही केली पाहिजे असे सर्वोच्च न्यायालयाने सांगितले आहे. परंतु त्याकडे दुर्लक्ष करुन महाराष्ट्राला सातत्याने आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले जात आहे. संसदेने आरक्षणासंबंधी घटना दुरुस्ती करण्याची गरज आहे. सदर आंदोलनामध्ये ज्या मराठी बांधवांनी बलिदान दिले त्यांच्या वारसांना नोकऱ्या देण्याचे व त्यांच्या कुटुंबांना १० लाख रुपयांची मदत देण्याचे काम राज्य शासनाने केले आहे. सन्माननीय सदस्यांनी सन २०११ मधील प्रकरणाविषयी आता

असुधारित प्रत

श्री.अंबादास दानवे....

का तपास केला जातो ? अशी भूमिका मांडली. सभापती महोदया, ५ लाख रुपयांच्या प्रकरणामध्ये ३० वर्षांनंतर तपास होत असल्यास सन २०११ मधील प्रकरणासंबंधी आता तपास का होऊ शकत नाही ? एका बाजूला छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा जोतिबा फुले, सावित्रीबाई फुले यांच्या बाबतीत वेगवेगळे उद्गार काढायचे तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांचा अवमान केला जातो आणि त्यासंबंधी सदनामध्ये भारतीय जनता पार्टीकडून साधा निषेध देखील व्यक्त केला जात नाही. अशा प्रकारे येथे चुकीच्या भूमिका घेतल्या जात आहेत. या सर्व परिस्थितीमध्ये महाराष्ट्राचे सरकार अतिशय प्रभावीपणे काम करीत आहे. एसटी आंदोलनाबाबत अनेक आरोप करण्यात आले. एसटी आंदोलनामधून आपले दोन नेते बाहेर का पडले ?

यानंतर श्री.गागरे....

असुधारित प्रत

श्री.गोपिचंद पडळकर : सभापती महोदय, एस.टी. संपाच्या विषयामध्ये सरकारकडून आम्हाला जेव्हा आम्हाला आवाहन केले, तेव्हा सरकारशी आम्ही चर्चा केली. तुम्ही एका बाजूला म्हणत होता की, मी गोपीचंद पडळकर व सन्माननीय सदस्य श्री.सदाभाऊ खोत हे एस.टी. कर्मचाऱ्यांची माथी भडकावत आहेत. दुसऱ्या बाजूला आम्ही जेव्हा सरकारबरोबर चर्चेला बसलो, सहकार्य करण्याची भूमिका घेतली, तर तुम्ही विचारता की, बाहेर का पडला. म्हणजे तुम्ही या विषयी दुटप्पी भूमिका घेणे चुकीचे आहे. चुकीचे पटलावर येत असल्याने मी आता हे सभागृहाला सांगितले आहे.

**उप सभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री.गोपिचंद पडळकर यांना सांगू इच्छितो की, आज याबाबतची तुमची भूमिका स्पष्ट होणार आहे.

श्री.गोपिचंद पडळकर : सभापती महोदय, आम्ही का बाहेर पडलो हे चुकीचे सांगितले जात आहे.

श्री.अंबादास दानवे : सभापती महोदय, मी दोन सदस्यांचे किंवा कोणत्याही सन्माननीय सदस्यांचे नाव घेतलेले नाही. त्यामुळे मनाला लावून घेण्याचे काही कारण नाही. एकीकडे केंद्र सरकार एअर इंडियासारखी कंपनी १८ हजार कोटीमध्ये विकत आहे. सरकारी कंपनी विकली जाते व एकीकडे एसटीकरीता वेगळी मागणी केली जाते, या भूमिकासुध्दा दुटप्पी आहेत असे माझे म्हणणे आहे.

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते हे मजूर नसल्याबाबत सहकार खाते सिध्द करते व गुन्हा दाखल केला जातो. एकीकडे आपणच चुकीचे काम करायचे व आपणच कायदा व सुव्यवस्थेविषयी बोलायचे. मला वाटते की, या भूमिका अतिशय दुटप्पी आहेत. देशाच्या उत्पन्नात महाराष्ट्राचा वाटा ३८ टक्के आहे. बरेच लोक म्हणाले की, केंद्र सरकारने हे केले, ते केले. परंतु आर्थिक बाबीमध्ये १०० रुपयांपैकी ३८ रुपये एकटया महाराष्ट्राचे आहेत त्यामुळे महाराष्ट्राला कोणी देत असेल कोणी उपकार करीत नाही. खरे तर तो महाराष्ट्राचा अधिकार आहे. यापेक्षा जास्त मिळायला पाहिजे हा महाराष्ट्राचा अधिकार आहे. परंतु केंद्रीय यंत्रणासुध्दा महाराष्ट्रावर अन्याय करण्याची भूमिका घेत आहे. मी जास्त बोलणार नाही. नियम

श्री.अंबादास दानवे.....

२६० च्या प्रस्तावावर एक विषय सांगतो. शासनाचा महसूल बुडवून बीएचआर पतसंस्थेची मालमत्ता अवसायानात संगनमत करुन बोगस खरेदी करुन ठेवीदाराची एका माजी मंत्री महोदयांनी फसवणूक केली आहे असा त्यांच्यावर आरोप आहे. कायदा व सुव्यवस्थेविषयी बोलत असताना एक बोट दुसरीकडे दाखवले तर चार बोटे आपल्याकडे आहेत याचे भान आपण ठेवावे अशी विनंती करतो व थांबतो. धन्यवाद, जयहिंद, जय महाराष्ट्र.

असुधारित प्रत

## सभागृहाच्या कामकाजासंबंधी

**उप सभापती** : मी गृहराज्यमंत्री महोदयांना सांगू इच्छिते की, सन्माननीय सदस्य श्री.गोपिचंद पडळकर, श्री.अंबादास दानवे अशा अनेक सन्माननीय सदस्यांनी काही प्रकरणांचा उल्लेख केलेला आहे. तुमच्या उत्तरात तुम्ही याबाबत सांगू शकला तर उत्तमच आहे. जरी एखाद्या प्रकरणाचा उल्लेख झाला नाही तर सन्माननीय सदस्यांना लेखी उत्तरे देऊन तशी चौकशी किंवा योग्य ती कार्यवाही आपण करावी.

सभागृहात मला दोन घोषणा करावयाच्या आहेत, सावित्रीबाई फुले यांची आज पुण्यतिथी आहे. आता सकाळी १०.५५ वाजता आपण १५ मिनिटांकरीता सभागृहाचे कामकाज थांबवू. पुष्पहार अर्पण करुन परत सर्वांनी सभागृहात यायचे आहे. त्यानंतर सध्या सुरु असलेला प्रस्ताव पुढे चालू राहील.

तसेच दुसरी बाब अशी की, काही वरिष्ठ सदस्य विचारतात की, प्रस्तावावरील चर्चेत त्यांचे नाव आहे का. याबाबत मी सांगू इच्छिते की, पक्षाकडून नावे येतात, त्याच क्रमाने आम्ही ती नावे स्वीकारत असतो. यानंतर सन्माननीय सदस्य श्री. सुरेश धस, श्री.भाई गिरकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.सदाशिव खोत असा क्रम दिलेला आहे, दोन्ही बाजूचे सदस्य बोलतील. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीकडून सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.अनिकेत तटकरे, श्री.संजय दौंड यांची नावे आहेत, त्यापैकी श्री.अमोल मिटकरी यांचे भाषण झाले आहे. शिवसेनेकडून सन्माननीय सदस्य श्री.अंबादास दानवे व श्री.नरेंद्र दराडे अशी दोन नावे आहेत. तसेच सन्माननीय सदस्य श्री.सुरेश धस यांचेही नाव आहे.

डॉ.बालाजी तांबे : सभापती महोदय, मलाही बोलायचे आहे.

**उप सभापती** : मी आपणास सांगू इच्छितो की, आपले नाव लेखी स्वरुपात देण्यात यावे म्हणजे यादीमध्ये समाविष्ट करता येईल. आता सन्माननीय सदस्य श्री.चंद्रशेखर बावनकुळे यांनी सुरुवात करावी.

-------

अस्वाक्षरित प्रत

श्री.चंद्रशेखर बावनकुळे (नागपूर स्था.प्रा.सं.) : सभापती महोदय, नियम २६० अन्वये प्रस्ताव माननीय विरोधी पक्ष नेते श्री. प्रवीण दरेकर यांनी या सभागृहात चर्चेला आणलेला आहे यावर बोलण्यासाठी मी उभा आहे. या चर्चेला सरकारकडून उत्तर आले पाहिजे, या अपेक्षेने मी मांडत आहे. आपण पाहिले की, विधानसभा सभागृहात परवा दिवशी माननीय विरोधी पक्ष नेते श्री.देवेंद्र फडणवीस यांनी काही पेन ड्राईव मा.अध्यक्ष यांचेमार्फत सरकारला दिले. अडीच वर्षाच्या या सरकारच्या काळात आमच्याविरुध्द काही करु शकले नाही, म्हणून षडयंत्र सुरु आहे. त्या षडयंत्राचा संपूर्ण लेखाजोखा पुराव्यासह माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी दिलेला आहे. अनेक सदस्यांचा उल्लेख आहे, त्यात माझ्याही नावाचा उल्लेख आहे. पहिल्यापासून आमची भूमिका आहे, मंत्री पदावर असताना किंवा सरकारमध्ये काम करीत असताना, ज्या खात्यात आपण काम करतो, त्यात काही चुका झाल्या असतील किंवा काही भ्रष्टाचार झाला. मागील दोन तीन वर्षात असा प्रयत्न झालेला आहे, तेव्हा मी सरकारला मिडीयातून व असेही सांगितले होते की, सरकारजवळ अँटी करप्शन ब्युरो, एसआयटी अशा सर्वच यंत्रणा असतात, सरकारने त्याचा योग्य वापर करुन झालेला भ्रष्टाचार शोधला पाहिजे. ज्याने भ्रष्टाचार केला त्याला जेलमध्ये टाकले पाहिजे. पण अडीच वर्षाच्या कार्यकाळात तुमच्याकडे काही येत नाही. म्हणून मग असे षडयंत्र केले जाते की, त्यात पुरावे तयार करण्यापासून सुरुवात करायची. आमची मागणी आहे की, माननीय विधानसभा विरोधी पक्ष नेते यांनी जो पेन ड्राईव विधानसभा सभागृहात माननीय अध्यक्षांना दिलेला आहे. गृहखात्याने इमानदारीने त्याबाबत चौकशी केली पाहिजे. आम्ही तर सीबीआय चौकशीची मागणी केलेली आहे. महाराष्ट्र शासनाने स्वत: चौकशी केली नाही किंवा चौकशीला बगल दिली तर आम्ही उच्च न्यायालयात जाऊ किंवा वर जाऊ. पण त्या संपूर्ण प्रकरणाची सीबीआय चौकशी झाली पाहिजे, अशी मागणी सभागृहात करतो. तातडीने त्या संपूर्ण प्रकरणाबाबत माननीय गृहमंत्री यांनी सांगितले की, आम्ही याचे योग्य उत्त्र देऊ. मी माननीय गृहराज्यमंत्री महोदयांना विनंती करतो की, या सभागृहात आपण उत्तर दिले पाहिजे. जेणेकरुन आम्हालाही माहिती होईल की, सरकारकडे काय माहिती आहे. माननीय विरोधी पक्ष नेते यांनी या प्रकरणाची संपूर्ण माहिती आपणासही दिलेली

असुधारित प्रत

श्री.चंद्रशेखर बावनकुळे .....

आहे. त्याप्रमाणे तुम्ही हे प्रकरण सीबीआयला देणार आहात की फॉरेन्सीक लॅबकडून तपासणार आहात, तुमची काय भूमिका असणाार आहे, हे या सभागृहाला कळाले पाहिजे ही आमची भूमिका आहे.

सभापती महोदय, ओबीसी आरक्षणाबाबतचा महत्वाचा प्रश्न या प्रस्तावात आहे. अर्धा प्रस्ताव ओबीसीच्या विषयावर आहे. मी सभागृहाला सांगू इच्छितो की, ओबीसीच्या राजकीय आरक्षणावर घाला घालण्यात आला आहे. मी राजकीय हेतूने आरोप करीत नाही. पण संपूर्ण प्रकरणाबाबत मी मंत्री होतो तेव्हा व आताही सरकारमध्ये नसतानाही सर्वोच्च न्यायालयात इंटरव्हेन्शनमध्ये मी आहे. मी मागील सरकारमध्ये मंत्री असताना या प्रकरणाचा फॉलोअप उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयात केला आहे. मला या संपूर्ण घटनाक्रमावर राजकीय बोलणार नाही.

यानंतर श्रीमती नाफडे .....

असुधारित प्रत

श्री.चंद्रशेखर बावनकुळे.......

सभापती महोदया, या संपूर्ण ओबीसी समाजाच्या आरक्षणाचा बट्ट्याबोळ महाविकास आघाडी सरकारच्या दुर्लक्षपणामुळे झालेला आहे. महाविकास आघाडी सरकारने ओबीसी आरक्षणाला गांभीर्याने घेतलेले नाही. याबाबत मी आता सभागृहात सविस्तर माहिती सांगणार आहे. ओबीसी आरक्षणाचा प्रश्न निर्माण झाला त्यावेळी सर्वप्रथम २०१८ मध्ये वाशिमचे काँग्रेसचे नेते, माजी आमदार गौडी यांचा मुलगा श्री.विकास गौडी,नागपूरचे काँग्रेसचे नेते श्री.बाबा आष्टणकर, भंडाऱ्याचे काँग्रेसचे नेते श्री. रमेश डोंगरे हे तिघेही उच्च न्यायालयात गेले. या तिघांनी असे म्हटले की, महाराष्ट्रात १९९४ पासून जे ओबीसी आरक्षण दिलेले आहे, ते चुकीचे आहे, नियमबाहय आहे. ओबीसीला जे २७ टक्के आरक्षण मिळत होते, ते नियमाबाहय आहे, असे या तिघांनी म्हटलेले आहे. या तिघांनी यासंदर्भातील एक ॲफिडेव्हिट बनवून नागपूर उच्च न्यायालयात केस दाखल केली. हे सर्व सर्वप्रथम नागपूर उच्च न्यायालयापासून सुरु झाले होते.

**उप सभापती :** क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या पुण्यतिथी निमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्याकरिता सभागृहाची बैठक पंधरा मिनिटांकरिता तहकुब करण्यात येत आहे.

सन्माननीय सदस्य श्री.चंद्रशेखर बावनकुळे ऑन लेग राहतील.

( सभागृहाची बैठक सकाळी १०.५१ ते ११.०६ पर्यंत स्थगित झाली. )

-----------

असुधारित प्रत

**( स्थगितीनंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

**पृ.शी.** : राज्यातील कायदा व सुव्यवस्था बिघडलेली असणे, एसटी कर्मचाऱ्यांचा संप मिटविण्यात सरकारला आलेले अपयश, ओबीसी आरक्षणाशिवाय निवडणुका घेणे, टीईटी व अन्य स्पर्धा परीक्षेत झालेले घोटाळे

**मु.शी.** : राज्यातील कायदा व सुव्यवस्था बिघडलेली असणे, एसटी कर्मचाऱ्यांचा संप मिटविण्यात सरकारला आलेले अपयश, ओबीसी आरक्षणाशिवाय निवडणुका घेणे, टीईटी व अन्य स्पर्धा परीक्षेत झालेले घोटाळे या विषयावर सर्वश्री प्रवीण दरेकर, भाई गिरकर, प्रसाद लाड, चंद्रशेखर बावनकुळे, सुरेश धस, डॉ. परिणय फुके, सदाभाऊ खोत, विनायक मेटे, डॉ. रणजित पाटील, प्रवीण पोटे-पाटील, महादेव जानकर, रणजितसिंह मोहिते-पाटील, ॲड निरंजन डावखरे, ॲड. निलय नाईक, चंदुभाई पटेल, गोपिचंद पडळकर, रमेशदादा पाटील, रामराव पाटील, प्रवीण दटके, रामदास आंबटकर, रमेश कराड, अमरिशभाई पटेल, वि.प.स. यांचा प्रस्ताव

(प्रस्ताव पुन: प्रस्तुत झाला.)

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (नागपूर स्था.प्रा.संस्था ) : सभापती महोदया, नियम २६० अन्वयेच्या प्रस्तावावर चर्चा सुरु आहे.

सभापती महोदया, काँग्रेसचे तीन सन्माननीय सदस्य होते. नागपूरचे सन्माननीय सदस्य श्री. बाबा आष्टनकर, भंडाऱ्याचे सन्माननीय सदस्य श्री. रमेश डोंगरे आणि वाशिमचे सन्माननीय सदस्य श्री. गवळी यांचा मुलगा श्री. विकास गवळी या मान्यवरांनी माननीय उच्च न्यायालयात घेतली. त्यांनी माननीय न्यायालयात असे सांगितले होते की, महाराष्ट्राला १९९४ मध्ये दिलेले २७ टक्के आरक्षण योग्य नाही, ओबीसीला दिलेले आरक्षण योग्य नाही आणि ते कमी केले पाहिजे. यासंदर्भात सन २०१० मध्ये माननीय

अप्रमाणित

श्री. चंद्रशेखर बावनकुळे......

श्री. के कृष्णमुर्ती यांच्या घटनापीठाने सन २०१० मध्ये असा निर्णय दिला होता की, त्याप्रमाणे आरक्षण मिळणार नाही. सन २०१० ते सन २०१४ या कालावधी काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे सरकार होते. त्यानंतर भारतीय जनता पार्टीचे सरकार आले होते. सन २०१० मधील निकाल हा त्या सरकारला कन्व्हे झाला नाही आणि याही सरकारला कन्व्हे झाला नाही. त्यावेळी आमचे सरकार असताना सन २०१८ मध्ये पिटीशन दाखल करण्यात आले. सन २०१८ मध्ये पिटीशन दाखल करण्यात आले. त्यात आरक्षण दिलेले असून, ते चुकीचे दिले असे सांगितले होते. हे सरकार समोर आले. त्यावेळी आम्ही माननीय न्यायालयात योग्य पध्दतीने आमची बाजू मांडली आणि उच्चस्तरीय वकील दिले होते. माननीय उच्च न्यायालयाने असे म्हटले होते की, या विषयासंदर्भात राज्य शासनाने निर्णय घ्यावा. माननीय उच्च न्यायालयाने सरकारची बाजू ऐकून घेतल्यानंतर त्यात त्यांचे समाधान झाले नाही. मी मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, तीनही मान्यवरांनी माननीय सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. त्या ठिकाणी केस सुरु झाली. त्यावेळी माननीय श्री. देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री होते. त्यावेळी मी स्वत:, सन्माननीय सदस्य सर्वश्री डॉ. संजय कुटे, राम शिंदे आणि सन्माननीय सदस्या श्रीमती पंकजा मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली एक कमिटी घटित केली. त्यानुसार माननीय सर्वोच्च न्यायालयात राज्य शासनाने आपली योग्य पध्दतीने बाजू मांडली पाहिजे याकरिता उच्चस्तरीय वकील देऊन त्यांनी आपली बाजू मांडावी असे सर्वानमुते निश्चित करण्यात आले होते. मी स्वत: वेळोवेळी माननीय सर्वोच्च न्यायालयात केसच्या वेळी हजर राहत होतो. माननीय सर्वोच्च न्यायालयात केस दाखल झाली त्यावेळी आपले म्हणणे लवकरात लवकर कळवावे असे सांगण्यात आले. दिनांक ३१ जुलै, २०१९ रोजी एक वटहुकूम काढला होता. त्यावेळी माननीय श्री. देवेंद्र फडणवीस, संबंधित माननीय महाधिवक्ता आणि आम्ही सर्वांनी रात्रंदिवस अभ्यास केल्यानंतर माननीय राज्यपाल महोदयांची स्वाक्षरी घेतल्यानंतर एक अध्यादेश निर्गमित केला होता. त्यानंतर माननीय सर्वोच्च न्यायालयात सदरहू वटकुकूम सादर केला. त्यात असे म्हटले होते की, १९९४ ला ओबीसी समाजाला दिलेले आरक्षण योग्य असून, ते कायमच राहिले पाहिजे. अशी

वटहुकूमात तरतुद केली होती. त्यावेळी माननीय सर्वोच्च न्यायालयाने वटहुकूमास मान्यता दिली होती. माननीय सर्वोच्च न्यायालयाने असे म्हटले होते की, ठीक आहे. या संदर्भात राज्य सरकारने निर्णय घेतला आहे. पण ही केस अशीच पुढे चालू राहील. त्यावेळी ज्या निवडणुका लागलेल्या होत्या, त्या ओबीसी आरक्षणाने घ्याव्यात अशी सूचना केली होती.

यानंतर श्री. कांबळे....

असुधारित प्रत

श्री. चंद्रशेखर बावनकुळे ....

निवडणुका ओबीसी आरक्षणाने घ्याव्यात असा आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. दिनांक ३१ जुलै, २०१९ च्या माननीय श्री. देवेंद्र फडणवीस सरकारच्या वटहुकूमाद्वारे आम्हाला रिलिफ मिळाला. विकास गवळी याने थांबलेच नाहीत. त्यांनी पुन्हा, पुन्हा न्यायालयात पिटिशन्स केल्या आणि सांगितले की, हा वटहुकूमच चुकीचा आहे. सर्वोच्च न्यायालयाने ऐकले नाही. दिनांक १३.१२.२०१९ रोजी नवीन सरकार आल्यावर सर्वोच्च न्यायालयाने पहिला निकाल दिला आणि त्यामध्ये स्पष्ट सांगितले की, आता वटहुकूमाद्वारे ज्या निवडणुका झाल्या आहेत त्या झाल्या आहेत. त्या वटहुकूमला ६ महिने झाले आहेत. त्याला मुदतवाढ द्यायची की नाही याबाबत नवीन सरकारमधील माननीय मंत्री श्री. छगन भुजबळ, माननीय मंत्री श्री. विजय वडेट्टीवार, माननीय श्री. नाना पटोले या सर्वांना आम्ही भेटलो. माझ्या सोबत सन्माननीय सदस्य ॲड आशिष जयस्वाल हे देखील होते. आम्ही त्यांना सांगितले की, हा वटहुकूम रद्द होऊ देऊ नका. या वटहुकूमला पुन्हा जीवंत ठेवावे. पण दुर्दैवाने दिनांक ३१ जनेवारी, २०२० ला तो वटहुकूम रद्द झाला. त्याला कोणी जीवंत ठेवले नाही. कोणाचे लक्ष राहिले नाही.

सभापती महोदय, दिनांक १३.१२.२०१९ ला सर्वोच्च न्यायालयाने असे म्हटले की, आता ज्या निवडणुका झाल्या आहेत त्या झाल्या आहेत. ओबीसी आरक्षणाने झाल्या आहेत. दिनांक १३.१२.२०१९ ला सर्वोच्च न्यायालयाने सांगितले की, के.कृष्णमूर्ती यांनी सन २०१० ला दिलेला निकाल राज्य सरकाने फॉलो करावा. त्या निकालात स्पष्ट सांगितले होते, के.कृष्णमूर्ती यांनी म्हटले होते की, राज्याला ओबीसी संदर्भातील अधिकार आहेत. ते अधिकार केंद्र सरकारला नाहीत. पुढे असे म्हटले होते की, ओबीसीला आरक्षण देण्याकरिता ओबीसी आयोग तयार करावा. आयोग तयार करुन स्टॅटिस्टिकल इम्पिरिकल डेटा राज्य सरकारने तयार करावा. राज्य सरकारने मागासलेपण जाहीर करावे. राज्य सरकाने आरक्षण देताना ५० टक्क्यांच्या वर जावू नये याची काळजी घ्यावी. एससी, एसटीला जनसंख्येप्रमाणे

अप्रकाशित प्रत

श्री. चंद्रशेखर बावनकुळे ....

द्यावे आणि उरलेले आरक्षण ओबीसीला द्यावे. सर्वोच्च न्यायालयाने इतके स्पष्ट म्हटले आहे. दिनांक १३.१२.२०१९ ला सर्वोच्च न्यायालयाने निकाल दिला होता, तेव्हा ओबीसी माननीय मंत्री श्री. विजय वडेट्टीवार, माननीय मंत्री श्री. छगन भुजबळ या सर्वांना आमची विनंती होती की, दिनांक १३.१२.२०१९ च्या निकालाप्रमाणे तुम्ही जावे, त्याशिवाय सर्वोच्च न्यायालय ऐकणार नाही. राज्य सरकार दिनांक १३.१२.२०१९ च्या निकालाप्रमाणे गेले असते तर तेव्हाच ओबीसी आयोगाचे गठण झाले असते. ओबीसी आयोगाचे गठण करुन ओबीसी आयोगाला लागणारे मानव संसाधन, पैसा उपलब्ध झाला असता.

सभापती महोदय, माझा दावा आहे की, दिनांक १३.१२.२०१९ पासून ६ महिन्यांच्या आतमध्ये इम्पिरिकल डेटा, स्टॅटिस्टिकल डेटा मिळाला असता. तो तयार करण्याकरिता ६ महिन्यांच्या वर कालावधी लागत नाही. छोट्या ग्रामपंचायती इम्पिरिकल डेटा तयार करुन राज्य ओबीसी आयोगाला देऊ शकतात. एखाद्या ग्रामपंचायतीमध्ये ग्रामसेवक, तलाठी, अंगणवाडीसेविका, आशासेविका यांना सांगितले की, तुम्ही डेटा तयार करुन द्यावा तरी होऊ शकतो. एससी, एसटीचा डेटा तयार करायचा नाही. कारण तो सेन्ससमध्ये आला आहे. ओबीसीचा डेटा तयार करायचा होता. ग्रामपंचायतीला सांगितले की, तुम्ही ओबीसीचा डेटा पाठवा तर साध्या टॅक्स रजिस्टरवरुन स्टॅटिस्टिकल डेटा निघू शकतो. अमुक गावात किती ओबीसी घरे आहेत, त्यांचा गुणाकार, त्यांच्या घरांतील लोकसंख्या, त्या गावातील लोकसंख्या पाहून सर्वांच्या सह्या घेऊन, तहसीलदारांची, जिल्हाधिकाऱ्यांची सही घेऊन डेटाला ओबीसी आयोगाकडे पाठविता येते. ओबीसी आयोग त्याला मान्यता देऊन काम करु शकते. ग्रामपंचायत ओबीसीचा इम्पिरिकल डेटा तयार करु शकते हे वारंवार सरकारला सांगितले. काही ग्रामपंचायतींनी २० दिवसांत हा डेटा तयार केला. परंतु तो काही नियमाप्रमाणे नव्हता. ग्रामपंचायतीला काही कोणती सूचना दिली नव्हती. ग्रामपंचायतीने स्वत: पुढाकार घेतला आणि सांगितले की, आम्ही तयार करुन देतो. राज्य सरकारने आम्हाला सूचना करावी.

श्री. चंद्रशेखर बावनकुळे ....

सभापती महोदय, राज्य सरकारचे चालत नसेल तर ओबीसी आयोगाच्या अधिकार होता. ओबीसी आयोग गठीत न करणे आणि त्यांनी, ओबीसी आयोगाने खाली कार्यवाही पूर्ण करणे हे काही भाग आहेत. कोणीही खाली सूचना दिल्या नाहीत. एखाद्या म्युनिसिपल कॉर्पोरेशनमध्ये इम्पिरिकल डेटा, स्टॅटिस्टिकल डेटा तयार करायचा असेल तर वॉर्डवाईज टॅक्स रजिस्टर आहे. एखाद्या नगरपालिकेचा डेटा तयार करायचा असेल तर नगरपालिकेचे वॉर्डवाईज टॅक्स रजिस्टर आहे. सर्वोच्च न्यायालयाने जनगणना म्हटलेली नाही. सर्वोच्च न्यायालयाने स्टॅटिस्टिकल इम्पिरिकल डेटा राज्य सरकारने तयार करावा असे म्हटले होते. माझा दावा आहे की, मराठा आरक्षणाच्या वेळी माननीय श्री. देवेंद्र फडणवीस सरकार असताना ३ महिन्यांच्या आत मराठा आरक्षणाचा डेटा राज्य सरकारने तयार केला होता. ३ मोठ्या एजन्सी नेमल्या होत्या. त्या आयोगाकडे पाठविल्या होत्या. मराठा आरक्षणाचा सर्वोच्च न्यायालयाचा निकाल वाचावा. सर्वोच्च न्यायालयाने सरकारने जो डेटा तयार केला त्याला मराठा आरक्षणाच्या डेटाला चॅलेंज केलेले नाही. मराठा आरक्षण वेगळ्या विषयावर चॅलेंज झाले आहे. त्याचा निकाल वेगळ्या विषयावर आला आहे. त्यांनी डेटाबाबत कोणतेही ऑब्जेक्शन घेतलेले नाही. ओबीसी समाजाचा तसाच डेटा तयार करण्यासाठीचा संपूर्ण अधिकार राज्य सरकारचा होता. दिनांक १३.१२.२०१९ च्या निकालाप्रमाणे ते होते. पण दुर्दैव असे आहे की, दिनांक १३.१२.२०१९ पासून दिनांक ४ मार्च, २०२१ पर्यंत राज्य सरकारने कोणतीही कार्यवाही केली नाही. राज्य सरकारचे वकील बसून रहायचे. सर्वोच्च न्यायालयात बोलायला तयार नाहीत. परिस्थिती अशी होती की, तेथे कोणीही लक्ष देत नव्हते. दुर्दैवाने असे सांगावेसे वाटते. माननीय मंत्री श्री. छगन भुजबळ यांच्या राजकीय ओबीसी संघर्षाबाबत कोणाला शंका घेण्याचे कारण नाही. माननीय मंत्री श्री. विजय वडेट्टीवार यांच्याबाबत शंका घेण्याचे कारण नाही. कोणाबद्दलही शंका घेण्याचे कारण नाही. माननीय मंत्री श्री. छगन भुजबळ समता परिषेदेचे मोर्चे काढत होते. माननीय मंत्री श्री. विजय वडेट्टीवार ओबीसी समाजाची मोठी संमेलने घेत होते.

असुधारित प्रत

श्री. चंद्रशेखर बावनकुळे ....

आमचा त्याबाबतही आक्षेप नाही. सरकारने त्याचे क्रेडिट नक्की घेतले पाहिजे होते. सरकारला वाटत होते की, उद्या जर आपण जिंकलो तर हे क्रेडिट आम्हालाच मिळाले पाहिजे. आमचे त्या संदर्भात दुमत नाही. हे तुमच्या काळात झाले असते आणि सरकारला क्रेडिट मिळाले असते तर आम्ही अभिनंदनच केले असते आणि करु. पण दु:ख या गोष्टीचे आहे की, ओबीसी समाजाचा डेटा दिनांक ४ मार्च, २०२१ पर्यंत १९ महिने हे सरकार करीत नाही. दिनांक ४ मार्च, २०२१ ला पुन्हा सर्वोच्च न्यायालयात नवीन आदेश आला आणि सांगितले की, तुम्ही हे काम १९ महिने देऊनही केले नाही.

सभापती महोदय, दिनांक ४ मार्च, २०२१ ला सर्वोच्च न्यायालयाने पुन्हा आदेश दिला की, तुम्ही के. कृष्णमुर्तींच्या निकालाप्रमाणे इतके दिवस वागला नाही, किमान पुढे तरी ज्या निवडणुका लागणार आहेत त्या निवडणुकांपूर्वी के. कृष्णमूर्ती यांचा निकाल फॉलो करा आणि इम्पिरिकल डेटा तयार करा. राज्य सरकारमधील लोक असे म्हणायचे की, केंद्र सरकाने डेटा दिला पाहिजे. के. कृष्णमुर्ती यांच्या निकालामध्ये, दिनांक ४ मार्च, २०२१ च्या निकालामध्ये, दिनांक १३.१२.२०१९ च्या निकालामध्ये, सर्वोच्च न्यायालयाच्या सन २०१० च्या निकालामध्ये असे ठरले आहे की, ओबीसीला आरक्षण द्यायचे असेल तर ओबीसीचा डेटा राज्य सरकारनेच तयार करायचा आहे. सेन्ससचा डेटा ओबीसी आरक्षणासाठी कामाचा नाही असे सर्वोच्च न्यायालयाने सांगितले आहे. माझ्याकडे सर्वोच्च न्यायालयाचे सर्व निकाल असून ते मी माननीय सभापती यांच्याकडे देणार आहे. सर्वोच्च न्यायालयाचे सर्व निकाल असे असताना राज्य सरकार केंद्र सरकारच्या नावाने का ओरडत होते, टाईमपास का करीत होते, ओबीसी समाजाला का फुटबॉल करीत होते, त्या समाजाला का मूर्ख बनवित होते हा प्रश्न सर्वांच्या मनात होता.

सभापती महोदय, दिनांक ४ मार्च, २०२१ ला सर्वोच्च न्यायालयाने निकाल दिल्यावरही निवडणुका आल्या. मागच्या निवडणुकीच्या वेळी जवळपास २५ टक्के

श्री. चंद्रशेखर बावनकुळे ....

निवडणुका नगरपालिका, नगरपंचायती यांच्या झाल्या, त्यामध्ये सुध्दा राज्य सरकारची भूमिका संदेहास्पद राहिली. ओबीसी आयोग नेमला गेला. महत्त्वाचा विषय आहे.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्यांनी वेळेची मर्यादा पाळली नाही तर मागे बसणाऱ्या सन्माननीय सदस्यांना कधीही बोलायला मिळत नाही.

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदय, आपण सभागृहात ओबीसी समाजाला न्याय देऊ शकलो नाही तर योग्य होणार नाही. आम्हाला समजले पाहिजे. सर्वोच्च न्यायालयाचे निकाल वारंवार येत आहेत. राज्य सरकारची भूमिका संदेहास्पद आहे. आता ओबीसी आयोग नेमला गेला. तुम्ही त्याला ४३५ कोटी रुपये दिले नाहीत. ओबीसी आयोगाला मानव संसाधन दिले नाही. दिनांक ४ मार्च, २०२१ नंतर ओबीसी आयोग नेमला गेला. मग दिनांक १३.१२.२०१९ नंतर का नेमला नाही ? आता नेमला गेला आहे. दिनांक ४ मार्च, २०२१ नंतर ओबीसी आयोग नेमलस गेल्यानंतर तुम्ही आता तरी ४३५ कोटी रुपये का दिले नाहीत, आता तरी बजेटमध्ये रिफ्लेक्ट होणार आहे का याबाबत समजले पाहिजे.

सभापती महोदय, ओबीसी आयोगाला मानव संसाधन दिले नाही. ओबीसी आयोगाचे सदस्य राजकीय नेमण्यात आले. सर्वोच्च न्यायालयाने आक्षेप घेतला. परवाचा निकाल तर वेगळा आहे. सर्वोच्च न्यायालयाने या सरकारला काय बोलावे ? सर्वोच्च न्यायालयाने स्ट्रिक्चर्स पार्स केले की, .... ओबीसी समाजाला खऱ्या अर्थाने नागविण्याचे, फुटबॉल करण्याचे काम, त्या समाजाला कोणामुळे आरक्षण मिळाले नाही तर ते राज्यकर्त्यांमुळे मिळाले नाही असा माझा स्पष्ट आरोप या सरकारवर आहे. आताही माझी सरकारला विनंती आहे. अजुनही काही बिघडलेले नाही. आपण परवा कायदा केला, कायदा एकमताने मंजूर केला. कायदा केल्याने सर्वोच्च न्यायालय काय करेल, सर्वोच्च न्यायालयात काय भूमिका राहील हे मला माहीत नाही. आपण राज्य निवडणूक आयोगाचे अधिकार काढले. पण पुढे

श्री. चंद्रशेखर बावनकुळे ....

काय होईल हे मला माहीत नाही. प्रश्न असा आहे की, बजेटमध्ये ४३५ कोटी रुपयांची तरतूद करुन किती दिवसांत .... कारण तुम्ही जरी कायदा केला असेल तरी त्या कायद्याने होणार नाही. तुम्हाला त्याने फक्त ५-६ महिने वेळ मिळू शकतो. पण तुम्हाला ६ महिन्यांत किमान इम्पिरिकल डेटा तयार करावा लागेल. के. कृष्णमुर्ती निकाल फॉलो करावा लागेल. के. कृष्णमुर्ती निकालावर ट्रिपल टेस्ट करावी लागेल. ओबीसी आयोग गठीत करुन त्यांच्या माध्यमातून स्टॅटिस्टिकल डेटा तयार करावा लागेल. सभागृहात अजुनही स्पष्ट होत नाही की, राज्य सरकारची नेमकी भूमिका काय आहे आणि किती दिवस लागणार आहेत.

नंतर श्री. खर्चे ....

असुधारित प्रत

श्री.चंद्रशेखर बावनकुळे...

सभापती महोदया, ओबीसीबाबत कसा कसा खेळ झाला व राज्य सरकारला आपले काम कसे करता आले नाही याबाबत मला आपल्या माध्यमातून सरकारला सर्व सविस्तर माहिती सांगायची आहे. माझ्या मनात अशी शंका आहे की, ओबीसी गरीब समाजाच्या जागा सर्वसाधारण करुन त्या जागांवर श्रीमंत व धनदांडग्या लोकांना निवडून आणण्याचे षडयंत्र राज्य सरकारच्या माध्यमातून सुरु होते. ज्यांच्या मनात हे षडयंत्र होते ते पूर्ण झाले असे दिसून येते. राज्य सरकारला ओबीसीबाबत काही चांगले करायचे असेल तर अजूनही काही बिघडले नाही. त्यासाठी मी माननीय मंत्री श्री.छगन भुजबळ व माननीय मंत्री श्री.विजय वडेट्टीवार व ग्रामविकास मंत्री महोदयांना विनंती करतो. कायदा केल्यावर राज्य सरकार किती दिवसात इम्पिरिकल डाटा तयार करणार आहे. के. कृष्णमुर्ती २०१० किती दिवसात फॉलो करणार आहात. ट्रीपल टेस्ट करुन ओबीसी समाजाचा जिल्हावाईज, तालुकावाईज व ग्रामपंचायतवाईज डेटा तयार होत नाही तोपर्यंत ओबीसी समाजाचा सरपंच होणार नाही.ओबीसी समाजाचा सदस्य होणार नाही. ओबीसी समाजाचे नेतृत्व तयार होणार नाही. ग्रामपंचायत सदस्य झाला तर तो जिल्हा परिषद सदस्य होईल. जिल्हा परिषद सदस्य झाला तर तो आमदार होईल. आमदार झाला तर तो खासदार होईल. मी दोन वेळा ओबीसी समाजातून जिल्हापरिषदेवर सदस्य म्हणून निवडून आलो. त्यामुळे मी आमदार होऊ शकलो व मला विधानसभेत आता आले. असे प्रकार सुरु असतील तर ओबीसी नेतृत्व कसे काय तयार होईल ? सरकारला माझी विनंती आहे की, के.कृष्णमुर्ती किती दिवसात फॉलो करणार आहात. इम्पिरिकल डेटा किती दिवसात तयार करण्यात येणार आहे. याबाबत स्पष्टता किती दिवसात आणण्यात येईल. के.कृष्णमुर्ती फॉलो करण्याचा कालबध्द कार्यक्रम या सभागृहात सादर केला पाहिजे. असे आपण केले तर सरकारच्या मनात ओबीसी समाजाला आरक्षण देण्याची इच्छा आहे असे मी समजेल. कायदा करुन ओबीसी समाजाला फायदा होणार नाही. ओबीसी समाजासाठी के.कृष्णमुती फॉलो करावे लागेल. किती दिवसात हे करण्यात येईल हे सभागृहात तारीखवाईज सांगावे लागेल तरच ओबीसी समाजाला न्याय मिळू शकेल.

असुधारित प्रत

श्री.चंद्रशेखर बावनकुळे...

सरकारने उत्तर देतांना या सर्व बाबींची स्पष्टता करावी अशी मी विनंती करतो व माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

-------

असुधारित प्रत

श्री.शशिकांत शिंदे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदया, विरोधी पक्ष नेत्यांनी नियम २६० अन्वये मांडलेल्या प्रस्तावावर मी माझे विचार मांडण्यासाठी उभा आहे.

सभापती महोदया, आजच्या राजकीय परिस्थितीमध्ये वेगवेगळ्या प्रकारचे आरोप व प्रत्यारोप पाहिल्या नंतर राज्यपाल महोदयांच्या अधिकारापासून भ्रष्टाचाराच्या व्याख्येपर्यंत चिंतेची बाब निर्माण झाली आहे. पूर्वी राजकीय आरोप एकमेकांवर होत होते व ते तेवढ्यापुरतेच होते. आता राजकारणातील आरोपाचा स्तर अतिशय खालच्या पातळीवर गेला आहे. एखाद्याचे राजकीय जीवन उद्ध्वस्त करायचे, एखाद्याचे कुटुंब उद्ध्वस्त करण्याचा राजकीय निर्णय घ्यायचा असा प्रकार आता राजकीय स्थितीत दुर्देवाने पाहावयास मिळतो. केंद्राच्या यंत्रणेपासून राज्याच्या यंत्रणेपर्यंत एखाद्याच्या विरोधात वापर करण्याचे आव्हान करायचे व त्या पद्धतीने कारवाई होण्याचे चित्र देशात व काही राज्यात पहावयास मिळते. त्याचे प्रत्यंतर महाराष्ट्रात दिसत आहे, महाराष्ट्र राज्य त्याला अपवाद ठरले नाही. यामध्ये फक्त राजकारणी मंडळी टारगेट होतात. प्रशासनातील अधिकाऱ्यांवर आरोप होतो व त्यांच्यावर कोणतीही कारवाई होत नसल्याचे दिसून येते. विरोधी किंवा सत्तारुढ पक्ष राजकारणाच्या फायद्यासाठी लोकप्रतिनिधींवर व कार्यकर्त्यांवर अवलंबून असतो. वेगवेगळे आरोप करण्यात येतात व त्यानंतर चौकशी करण्यात येते. कोर्टात ती व्यक्ती निर्दोष सिध्द होईपर्यंत दुर्देवाने त्याला त्या फेऱ्यातून जावे लागते. याची सत्यता आपणाला पडताळून पहावी लागते. माननीय मंत्री श्री.नवाब मलिक यांच्या विषयबाबत मी जास्त विश्लेषण करणार नाही. गेल्या अनेक वर्षा पूर्वीची केस बाहेर काढल्यानंतर ती कोर्टात सिध्द होईल किंवा नाही हा वेगळा भाग आहे. श्री.एकनाथ खडसे किंवा विरोधी व सत्ताधारी पक्षातील काही सदस्य असतील त्यांच्यावर जेव्हा असे आरोप केले जातात त्यावेळी पोलीस यंत्रणा किंवा केंद्राच्या प्रशासकीय यत्रंणेकडून कारवाई होते. या कारवाईतून ते निर्दोषत्व सिध्द करेपर्यंत त्याला व त्याचा कुटुंबाला अग्निपरीक्षेतून जावे लागते हे महाराष्ट्राने पाहिले आहे. ही कारवाई कोठपर्यंत होईल याबाबत आज कोणतीही शाश्वती देता येत नाही. हे प्रकार वाढत चालल्यामुळे सर्वांच्या मनात चिंता व द्वेष भावना वाढीस लागली आहे. असे चित्र

असुधारित प्रत

श्री.शशिकांत शिंदे...

दुर्देवाने पहावयास मिळते. या प्रस्तावत असे नमूद केले आहे की, कायदा व सुव्यवस्थेवरील लोकांचा विश्वास उडत चालला आहे. याला कोण कारणीभूत आहे याचा शोध घेतला तर आपणच प्रशासकीय यत्रणेच्या माध्यमातून आपल्या राजकीय प्रतिमेला तडा देत आहोत. यामध्ये राजकीय प्रतिनिधी, लोकप्रतिनिधी व प्रशासनातील यंत्रणांना राजकारणासाठी वेगळ्या बॉक्समध्ये उभे करतो. सामान्य जनतेसमोर आम्ही भयानक चित्र निर्माण करतो त्यामुळे लोकप्रतिनिधी, प्रशासनातील अधिकारी किंवा केंद्रीय यंत्रणा यांच्यावरील विश्वास उडत चालला आहे असे पहावयास मिळते. आरोप प्रत्यारोप होत असतात एखाद्या लोकप्रतिनिधीचा त्यामध्ये सहभाग असल्याचे सिध्द होईपर्यंत त्याच्या कुटुंबाला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करणे हे बरोबर नाही त्यांचा काहीही संबध नसतो. आपण ज्यावेळी एक बोट दुसरीकडे दाखवितो तर कधी तरी त्याचे फासे उलटे पडले तर त्याचा त्रास आपणाला होतो. जे अधिकारी तक्रार करतात ते आज कोर्टाच्या बाहेर आहेत. ज्यांच्यावर तक्रार करण्यात आली ते तुरुंगात आहेत. हा विसंवाद आम्हाला अजूनही समजून आला नाही. आरोप प्रत्यारोप करीत असताना शासनाच्या व चर्चेच्या माध्यमातून नियमावली किंवा कारवाई करण्यासंदर्भातील भूमिका स्पष्ट करणे गरजेचे आहे. लोकप्रतिनिधी व सरकारच्या हातातून ही यंत्रणा जाऊन ती प्रशासनाच्या हातात गेली तर तेथे भ्रष्टाचार व कायदा व सुव्यवस्थेचे प्रश्न निर्माण होऊ शकतात. त्यामुळे यांच्यात एकवाक्यता नाही हेच भ्रष्टाचारी आहेत, मग आपण यांचे का ऐकायचे अशी परिस्थिती निर्माण होते. लोकप्रतिनिधी हे कामाच्या संदर्भात कोठे गेले तर तो अधिकारी असा विचार करतो की, यांना सहकार्य करायचे किंवा नाही. काल विधानसभेत काही आरोप प्रत्यारोप झाले पेनड्राईव्ह दिला १३२ तासांची व्हीडीओ क्लीप करण्यात आली. त्यावर आज गृहमंत्री महोदय खुलासा करतील. मी देखील काही दिवसांनंतर एक पेनड्राईव्ह देणार आहे. काही महिन्यापूर्वी मागच्या अधिवेशनात माझ्यावर शौचालयासाठी महिन्याला दोन लाख रुपयांच्या उत्पन्नासाठी एक कोटी रुपये दिले जातात असा आरोप करण्यात आला आहे. राजकीय मंडळी काम करतात तेव्हा आरोप प्रत्यारोप होत असतात. हे आरोप करीत

असुधारित प्रत

श्री.शशिकांत शिंदे...

असताना राजकारणाची पातळी किती खाली जाते याची माहिती मला झालेली आहे. आरोप करीत असताना त्यामध्ये किती तथ्य आहे, रस्त्याच्या कामात भ्रष्टाचार झाला किंवा कोठे भ्रष्टाचार झाला ते सांगण्यात येते. परंतु शौचालयाच्या कामात भ्रष्टाचार झाला ही माहिती पहिल्यांदा आली आहे. यासंदर्भातील पेनड्राईव्ह मी काही दिवसानंतर देणार आहे. त्यातील सत्य काय आहे ते मी सर्वांच्या समोर आणणार आहे. राजकारणाची पातळी इतक्या खालच्या पातळीवर गेली आहे.

या नंतर श्री.बोरले...

असुधारित प्रत

श्री.शशिकांत शिंदे...........

कोर्टाकडून कायदेशीर आदेश प्राप्त झाल्यानंतर तो राग मनात ठेऊन याचिकाकर्ता तशा प्रकारचा आरोप करतो, पोलीस त्याची चौकशी करीत आहेत. परंतु त्या याचिकाकर्त्याला मंत्रालयासमोर आत्महत्या करण्यासाठी प्रवृत्त करण्याची प्रवृत्ती मी राजकारणात पहिल्यांदा बघितली. मी आपल्याला या संदर्भात पुरावे देईन. त्याने तेथे जाऊन विष प्राषण करावे, तो मेला किंवा नाही याची खात्री करण्याचा प्रयत्न करण्यात आला आणि तो मेला असता तर आमच्या सारख्या कार्यकर्त्याला, लोकप्रतिनिधींना अडकविण्याचे षडयंत्र होते. शेवटी सत्य हे सत्य असते. मी त्याच दिवशी सांगितले होते की, एक दिवस सत्य बाहेर येईल. दुर्दैव म्हणजे हॉस्पिटलमध्ये ॲडमिट असताना देखील पत्रकारांपासून एक यंत्रणा काम करीत होती. ती यंत्रणा काहीही करुन आमच्या लोकांना अडकविण्याचा प्रयत्न करीत होती. दुर्दैवाने त्यांना यश आले नाही. ते कोर्टात केस विथ्ड्रॉ करण्यासाठी गेले. त्यांनीच वकील दिले होते, त्यांच्या पाठीमागे कोण आहेत ती नावे कळलेली आहेत. त्यावेळी कोर्टाने आदेश दिला होता. आता त्यांची एसीबी मार्फत चौकशी सुरु आहे. मी त्या संदर्भात बोलणार नाही. एखादी व्यक्ती २५-३० वर्षे राजकारणात काम करते, मग ती व्यक्ती कोणत्याही पक्षाची असो, ती व्यक्ती राजकारणात इतकी वर्षे काम करीत असताना अशा प्रकारे खालच्या पातळीवर जाऊन राजकारण करणे बरोबर नाही. एखादी व्यक्ती मयत झाली तर त्याच्या मढ्यावरचे लोणी खाण्याचा प्रयत्न करणे ही प्रवृत्ती राजकारणात वाढीस लागलेली आहे, असे दुर्दैवाने सांगावेसे वाटते. कदाचित मी अधिवेशन संपण्यापूर्वी तो पेनड्राईव्ह देईन. बऱ्याच लोकांची नावे बाहेर आलेली आहेत. आपल्याला ते सत्य कळेल. राज्यात कायदा व सुव्यवस्था निर्माण होण्याठी शासनाचा प्रशासनावर वचक असला पाहिजे. दुर्दैवाने केंद्र शासनाच्या आशीर्वादाने प्रशासनातील काही अधिकारी आपले ऐकत नाहीत हे सुद्धा राज्य शासनाने बघितले आहे. माननीय राज्यपालांचे अधिकार अबाधित आहे. परंतु ज्यावेळी कोर्ट खंत व्यक्त करते त्यावेळी दुर्दैवाने सांगावेसे वाटते की, महाराष्ट्र शासनाला काम करताना केंद्र व इतर क्षेत्रातून अडविले गेले तर शासनाने कशा प्रकारे काम करावे याचे उत्तर मिळणे गरजेचे आहे. मी इतर

असुधारित प्रत

श्री.शशिकांत शिंदे...........

गोष्टींविषयी जास्त बोलणार नाही. लोकशाहीच्या माध्यमातून सत्ता येते व जाते. परंतु रोज राज्याला बदनाम केले जाते. राज्यात भ्रष्टाचार होत आहे, कायदा व सुव्यवस्थेचे प्रश्न निर्माण झालेले आहेत असे सांगितले जाते. मी आकडेवारी देणार नाही. मी आपल्या राज्यातील गृह विभागाची संरक्षणाबाबतची आकडेवारी व इतर राज्यातील आकडेवारीबाबत बोलणार नाही. भारतीय जनता पक्षाची सत्ता असलेल्या राज्यात किंवा बाजूच्या राज्यात काय सुरु आहे याबाबत मी विश्लेषण करणार नाही. माझी या निमित्ताने विनंती आहे की, शासनाचा प्रशासनावर अंकुश असला पाहिजे. राज्याचे अधिकार राज्याचेच आहेत आणि केंद्राचे अधिकार केंद्राचेच आहेत. परंतु केंद्र शासनाच्या अधिकारांचा उपयोग करुन राज्य अस्थिर करण्याचा प्रयत्न झाला तर आपल्या सर्व लोकप्रतिनिधींच्या हातातून हे काम जाईल आणि राज्यात वेगळ्या प्रकारची अस्थिरता निर्माण होईल.

सभापती महोदया, मघाशी मराठा, ओबीसी आरक्षणाचा विषय मांडण्यात आला. आपण काल या संदर्भात दोन्ही सभागृहात ठराव संमत केला. सन्माननीय सदस्य श्री.चंद्रशेखर बावनकुळे, माननीय अन्न व नागरी पुरवठा मंत्री श्री.छगन भुजबळ साहेब या संदर्भात तळमळीने काम करीत आहेत. आपण सर्वच यासाठी तळमळीने काम करीत आहोत. जोपर्यंत ओबीसी आरक्षणाबाबत निर्णय होत नाही तोपर्यंत निवडणुका पुढे ढकलण्यात याव्यात असा आपण निर्णय घेतलेला आहे. सुप्रीम कोर्टाने वेगळा निर्णय दिलेला आहे. सुप्रीम कोर्टाने दिलेल्या निर्णयाबाबत निवडणूक आयोग कोणती भूमिका घेते हा महत्वाचा प्रश्न आहे. ओबीसी डेटा संदर्भात निर्णय होत नाही तोपर्यंत निवडणुका पुढे ढकलण्याबाबत केंद्र शासनाकडून हस्तक्षेप करता आला तर त्यासाठी आपण पुढाकार घेणे गरजेचे आहे. केंद्र शासनाने डेटा दिला किंवा नाही याबाबत मी केंद्र शासनावर आरोप करणार नाही. आपण मघाशी सांगितले की, ओबीसी नेतृत्व उभे राहिले नाही. राज्यात मोठे ओबीसी नेतृत्व उभे राहिले, त्यांनी महाराष्ट्र गाजविल्याचा इतिहास आहे. शेवटी माणूस कर्तृत्वाने

असुधारित प्रत

श्री.शशिकांत शिंदे...........

मोठा होतो. माणूस जातीवरुन मोठा होत नाही. सन्माननीय सदस्य श्री.चंद्रशेखर बावनकुळे साहेब त्यांच्या कर्तृत्वामुळे मोठे झालेले ओहत. आम्हाला त्यांच्या जातीचा व कर्तृत्वाचा अभिमान आहे. मी त्या संदर्भात बोलणार नाही. शासनाने मराठा, धनगर आरक्षणाबाबत निर्णय घ्यावा, अशी लोकांची भावना आहे.

सभापती महोदय, एसटी कर्मचाऱ्यांचा प्रश्न अनेक महिन्यांपासून प्रलंबित होता. माननीय सभापती, माननीय उप सभापतींनी पुढाकार घेऊन काल या संदर्भात बैठक आयोजित केली. त्यातून चांगला मार्ग निघेल अशी अपेक्षा आहे. राज्य शासनाने निर्णय घेतल्यानंतर काय करावयाचे हे एसटी कर्मचाऱ्यानी ठरवायचे आहे. राज्य शासनाने निर्णय जाहीर केल्यानंतर एसटी कर्मचाऱ्यांनी तो निर्णय मान्य केला तर राज्यातील लालपरी पुन्हा रुळावर येईल.

सभापती महोदय, परीक्षा घोटाळ्याविषयी बोलले गेले. त्यामध्ये सरकारचा किती हात आहे यापेक्षा अधिकाऱ्यांचा किती हात आहे हे दिसून येते. हे आताच झाले असे नाही. ते अनेक वर्षांपासूनचे आहे की, ते कळतच नव्हते. आपण एखाद्या अधिकाऱ्यावर विश्वास ठेवून त्याला सांगतो की, हे काम तू करुन घ्यावे. परंतु तो काय करतो हे नंतर कळते. म्हणून आपण सर्वांनी एकत्र येऊन महाराष्ट्र राज्याची शान वाढवावी. आपण छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव घेतो. छत्रपती शिवाजी महाराजांविषयी कोण काय बोलते ? महाराष्ट्र जोतिबा फुले, सावित्रीबाई फुले यांची कर्मभूमी आहे. आज सावित्रीबाई फुले यांची पुण्यतिथी आहे. खरे म्हणजे कोणी अपशब्द उच्चारले तर त्याचा किती निषेध करावा, विरोध करावा असा विषय आहे. शेवटी मी एवढेच सांगू इच्छितो की, शाहू, फुले, आंबेडकर व छत्रपती शिवाजी महाराजांचा महाराष्ट्र पूर्वीप्रमाणे स्वाभिमानाने उभा करावयाचा असेल तर लोकप्रतिनिधी व शासन यांच्याकडे अधिकार असले पाहिजेत असा निर्णय घेणे गरजेचे आहे. परंतु प्रशासन जर तुमच्या डोक्यावर बसले तर कोणाचीही किंमत राहणार नाही, एवढे सांगून मी माझे भाषण पूर्ण करतो.

-------

असुधारित प्रत

श्री.सुरेश धस (उस्मानाबाद-बीड-लातूर स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदया, विरोधी पक्षनेते व इतर सन्माननीय सदस्यांनी म.वि.प. नियम २६० अन्वये जो प्रस्ताव मांडलेला आहे त्यावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदया, कायदा व सुव्यवस्थेबाबत मी गृहराज्यमंत्री महोदयांना विनंती करणार आहे. बीड जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्थेबाबत विधानसभा व विधानपरिषदेच बरीच चर्चा झालेली आहे. मी त्याची पुनरावृत्ती करणार नाही. कोरोना काळात ढाब्यांच्या संख्येत मोठ्या प्रमाणावर वाढ झालेली आहे. आमच्या भागात ड्युप्लीकेट दारु मोठ्या प्रमाणावर आढळून येते. काही लोक बाहेरुन दारु न आणता त्यांच्याकडे असलेल्या मशिनरीचा वापर करुन ड्युप्लीकेट दारु तयार करुन हॉटेल व ढाब्यांना पुरवठा करतात. याबाबत पोलिसांकडे जे इनपुट्स असतील, सर्वच पोलीस त्यासाठी सपोर्ट करतात अशातला भाग नाही. परंतु जी माहिती असेल त्या लोकांवर कारवाई करण्यात यावी. सुवर्णकार समाजातील श्री.मंगेश लोळके, श्री.गणेश बेद्र व त्यांच्या सहकाऱ्यांनी माननीय गृहमंत्री महोदयांकडे निवेदन दिलेले आहे. त्या निवेदनात पोलीस स्टेशन निहाय कोणत्या ठिकाणी कोणत्या घटना घडलेल्या आहेत याबाबत माहिती नमूद आहे. शासनाने या संदर्भात कार्यवाही करावी, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदया, सायबर क्राईम संदर्भात केवळ सत्ताधारी पक्षातील लोकांवर टिकाटिप्पणी झाल्यानंतर ॲक्शन घ्यायची आणि समोरच्या बाकावरील लोकांविषयी काहीही लिहिले तरी ॲक्शन घेतली जात नाही असे दिसून येते.

यानंतर श्री.सांगळे......

असुधारित प्रत

श्री.सुरेश धस....

यासंबंधी सांगायचे झाल्यास माजी मुख्यमंत्री तसेच त्यांच्या कुटुंबातील व्यक्तींवर खालच्या पातळीवर टीका केली व त्याबाबत तक्रारी दिल्यानंतर देखील त्याबाबत कोणतीही कारवाई केली जात नाही अशी महाराष्ट्रात परिस्थिती आहे.

सभापती महोदया, एसटीच्या संदर्भात माननीय परिवहन मंत्री सातत्याने सांगत असतात की, एसटी संपामुळे महामंडळाचे ७०० ते ८०० कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे. परंतु त्याऐवजी जनतेचे किती कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे, याबाबत विचार होण्याची आवश्यकता आहे. यापूर्वी लोकांचा २०० रुपयांमध्ये प्रवास होत होता. आता त्याकरिता ४०० रुपये खर्च करावे लागतात. दिवाळी सणाच्या वेळी भाऊबीज निमित्त गरिबांच्या बहिणी-भावडांना एकमेकांच्या घरी जाता आले नाही. माझी परिवहन मंत्र्यांना विनंती आहे की, मंत्री महोदयांनी एसटी कर्मचाऱ्यांसाठी सातवा वेतन आयोग किंवा त्याच्या आसपास जाण्याचे आश्वासन दिल्यास तसेच संपामुळे ज्या कामगारांवर कारवाई करण्यात आली होती अशा कामगारांना पुन्हा कामावर घेण्याचे आश्वासन दिले तर हा प्रश्न सुटू शकतो.

सभापती महोदया, मराठा आरक्षणासंबंधी सांगायचे झाल्यास आजच्या आज आरक्षण द्यावे असे आम्ही म्हणणार नाही. आरक्षणासंबंधी सध्या काय झाले आहे हे आपण सर्वांनी पाहिले आहे. मागील सरकारच्या काळात आरक्षणाच्या अनुषंगाने काही सोईसुविधा देण्यात आल्या होत्या. ६०० कोर्सेसच्या शैक्षणिक फीच्या बाबतीत शासनाने निर्णय घेऊन शिक्षणासंबंधी काही सुविधा देणे आवश्यक आहे. होस्टेलची सुविधा पूर्वीपासून उपलब्ध असून त्यामध्ये राहण्यासाठी कोणी येत नाहीत. त्यामुळे फक्त होस्टेलपुरती मागणी मंजूर करुन आम्ही अमुक सुविधा दिल्या असे कोणी सांगू नये. सभापती महोदया, मराठा समाजासाठी मेडीकल, इंजिनियरिंग तसेच इतर कोर्सेसच्या फी संबंधी शासनाने तातडीने निर्णय घ्यावा अशी माझी शासनाला विनंती आहे.

श्री.सुरेश धस....

सभापती महोदया, ओबीसी आरक्षण झाल्याशिवाय राज्यात निवडणुका होता कामा नये. निवडणुका लढवित असताना आम्हाला अनेक लोकांची नाराजी ओढवून निवडणुका लढवाव्या लागत आहेत. या संदर्भात राज्याने एकमताने कायदा मंजूर केलेला आहे. त्या संदर्भात पुढे का घडते, ते आपण बघू या.

सभापती महोदया, धनगर समाजाच्या बाबतीत शासनाने २२ सुविधा लागू केलेल्या आहेत. त्याकरिता बजेटमध्ये तरतूद व्हावी अशी माझी विनंती आहे. महाराष्ट्रातील परीक्षा घोटाळयांमुळे महाराष्ट्राची मान खाली झुकली असल्याचे चित्र दिसून येत आहे. टीईटी, गट-क, गट-ड इत्यादी परीक्षांमध्ये मोठे घोटाळे झाले आहेत. एमपीएससीचा स्पर्धा परीक्षेचा पेपर फुटला. अशी परिस्थिती राहिल्यास गरीब घरातील मुले कशासाठी १८ ते २० तास अभ्यास करतील ? ७८०० पेक्षा जास्त शिक्षक पैसे देऊन टीईटी परीक्षा पास झालेले आहेत. त्यांच्यावर तातडीने कारवाई करुन त्यांना घरी पाठविले पाहिजे. परीक्षांमध्ये सातत्याने घोटाळे होत आहेत. त्यात मुद्रणालयापासून ऑपरेटिंग असल्याशिवाय ही गोष्ट साध्य होऊ शकत नाही....

**उप सभापती** : आता सकाळचे ११.४५ वाजले आहेत. काल गटनेत्यांची बैठक झाली होती. त्यात घेतलेल्या निर्णयानुसार आता सदनाची विशेष बैठक स्थगित होत आहे. सदनाची नियमित बैठक दुपारी १२.०० वाजता भरेल.

सोमवार, दिनांक १४ मार्च, २०२२ रोजी अपूर्ण राहिलेल्या म.वि.प. नियम २६० अन्वयेच्या प्रस्तावावर चर्चा व मंत्री महोदयांचे उत्तर होईल. सन्माननीय सदस्य श्री.सुरेश धस आपण या प्रस्तावावर ऑनलेग आहात.

( सभागृहाची बैठक सकाळी ११.४५ ते दुपारी १२.०० वाजेपर्यंत स्थगित झाली.)

-------

यानंतर श्री.गागरे....

असुधारित प्रत

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे

**मालेगाव (जि.नाशिक) तालुक्यातील अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांच्या नुकसान भरपाईच्या रकमेत गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(१) * ११९७० श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.संजय दौंड, श्री.अरुण लाड, श्री.राजहंस सिंह, श्री.रमेश कराड, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रामदास आंबटकर, डॉ.परिणय फुके, श्री.प्रवीण दटके, श्री.रमेशदादा पाटील, डॉ.रणजित पाटील :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगाव (जि.नाशिक) तालुक्यात माहे जून ते सप्टेंबर, २०२० मध्ये झालेल्या अतिवृष्टीत पिकांच्या झालेल्या नुकसान भरपाईपोटी शेतकऱ्यांना रुपये ४४ कोटीची आर्थिक मदत देण्यात आल्याचे दिनांक २ जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाशिक जिल्ह्यातील मालेगांव तालुक्यात अतिवृष्टी झालेली नसतानाही शेतकऱ्यांना नुकसान भरपाईची रक्कम वाटप करण्यात आली असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अतिवृष्टीच्या आर्थिक मदतीचे वाटप करतांना ज्या शेतकऱ्यांना नुकसान होऊनही मदत मिळाली नाही अशा शेतकऱ्यांनी केलेल्या तक्रारीनुसार शासनाने या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी त्रिस्तरीय चौकशी समिती गठीत केली होती, हे ही खरे आहे काय तसेच चौकशी समितीने प्रशासनाला आपला अहवाल सादर केला आहे काय,

(४) असल्यास, सदर चौकशी समितीने त्या संदर्भातील कागदपत्राची पडताळणी केली असता त्यामध्ये ४४ कोटी ऐवजी ८९ कोटी रुपयांचा आर्थिक घोटाळा झाला असल्याचे समितीच्या अहवालावरुन माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.११९७० .....

आढळून आले, त्यानुषंगाने चौकशी समितीने आपला अहवाल तातडीने शासनास सादर करुन ज्या शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळाली नाही त्या शेतकऱ्यांना मदत मिळण्याबाबत तसेच सदर आर्थिक गैरव्यवहारामध्ये दोषी असणाऱ्या संबंधितांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विजय वडेट्टीवार :** (१) खरे आहे.

(२) खरे आहे.

(३) खरे आहे.

अद्यापपर्यंत सदर समितीचा चौकशी अहवाल शासनास सादर करण्यात आलेला नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५), (३) व (४) सदर प्रकरणाकरिता अपर जिल्हाधिकारी, मालेगाव यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे. समितीने सादर केलेल्या प्राथमिक अहवालाच्या आधारे प्रस्तुत प्रकरणातील दोषी अधिकारी व कर्मचारी यांचेविरूध्द प्रशासकीय कारवाई जिल्हाधिकारी, नाशिक यांच्यास्तरावर सुरू करण्यात आली आहे. तसेच, समितीचा अंतिम अहवाल प्राप्त झाल्यानंतर देय असलेल्या बाधित शेतकऱ्यांना मदत देण्याची कार्यवाही करण्यात येईल.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.अमोल मिटकरी : सभापती महोदय, शेतकऱ्यांचा अत्यंत महत्वाचा हा विषय आहे. खरे आहे असे उत्तरामध्ये म्हटलेले आहे. मी मंत्री महोदयांना विचारु इच्छितो की, अतिवृष्टी झालेली नसतानाही मालेगाव तालुक्यातील शेतकऱ्यांना नुकसानभरपाई वाटप करण्यात आल्याची सदर घटना आहे. ४४ कोटी रुपयांचा घोटाळा ८९ कोटीवर पोहचल्याचे लक्षात आले हे खरे आहे का. घोटाळा झाल्याचे उत्तरात खरे आहे असे म्हटले आहे. याबाबत समिती गठीत केली आहे का, याचा अहवाल शासनास सादर करण्यात आला नाही, तो किती कालावधीत सादर होणार, अप्पर जिल्हाधिकारी मालेगाव यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.११९७० .....
श्री.अमोल मिटकरी.....

आली, समितीने सादर केलेल्या प्राथमिक अहवालाच्या आधारावर प्रस्तुत प्रकरणातील दोषी अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कारवाई सुरु आहे, परंतु याबाबत अंतिम अहवाल तातडीने सादर करुन बाधीत शेतकऱ्यांना लवकरात लवकर मदत मिळेल काय. त्याचप्रमाणे दिनांक २८ डिसेंबर व माहे जानेवारी २०२२ रोजी व त्या दरम्यान विदर्भातील अकोला, वाशिम, बुलढाणा, अमरावती, वर्धा, भंडारा, गोंदिया, यवतमाळ जिल्हे व  मराठवाडयातील औरंगाबाद, जालना तसेच अहमदनगर जिल्हयांसह श्रीरामपूर तालुक्याला अवकाळी व गारपिटीचा मोठा तडाखा बसला व मोठया प्रमाणावर शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. अशा शेतकऱ्यांचे पंचनामे झाले आहेत काय, त्यांना मदत मिळाली आहे का. तसेच अनेक शेतकरी पीक विम्यापासून वंचित आहेत, यांच्या बाबतीत शासनाने कार्यवाही करुन विमा कंपन्यांना निर्देश दिले आहेत का?

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, हे खरे आहे की, मालेगाव तालुक्याचा प्रस्ताव खालून आला होता. नुकसान न होताच तो प्रस्ताव आलेला होता. तहसिलदार, बीडीओ, कृषी अधिकारी पंचनामे करतात व जिल्हाधिकारी यांचे मार्फत प्रस्ताव शासनाकडे येतो. निकषात बसत असेल तर आपण मदत देतो. हा प्रस्ताव त्या निकषात बसवून पाठविला गेला. नंतर तक्रारी झाल्या व आम्ही चौकशीचे आदेश दिले. मुळात तक्रारीत नमूद केल्यानुसार ज्यांचे नुकसान झाले नाही त्यांना पैसे मिळाले, ज्यांचे नुकसान झाले त्यांना मिळाले नाही. असे चौकशीमधून प्राथमिकदृष्ट्या निष्पन्न झाले आहे व आमच्या लक्षात आलेले आहे. मी या निमित्ताने सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, ही चौकशी आम्ही एक महिन्यात पूर्ण करु. ज्या लोकांना पात्र असून पैसे मिळाले नाहीत त्या सर्वांना एक महिन्याच्या आत जे एसडीआरएफच्या निकषात बसणारे आहेत त्या सर्व शेतकऱ्यांना एक महिन्याच्या मदत केली जाईल. मी तसे खाली आदेशही दिलेले आहेत. हे करण्यामागचे कारण

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.११९७०

श्री.विजय वडेट्टीवार.....

काय होते, भूमिका काय होती. खालच्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचे आश्वासन मी देत आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी सांगितले की, त्यांच्यावर कारवाई करणार आहेत, पण मी सांगू इच्छितो की, ते निर्दोष असतील तर परत येतील. कारण हा विषय गंभीर आहे.

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, अनेक लोकप्रतिनिधींना असे वाटत आहे की, आमच्या भागात पैसे मिळाले नाहीत. एका ठिकाणी दिले गेले तर आम्हाला का मिळाले नाही, असा लोकप्रतिनिधींचा सूर आहे. मी नक्की सांगतो की, पहिल्यांदा एक महिन्यात चौकशी होऊ द्यावी. यामागील कारण शोधले गेले पाहिजे की, तो अहवाल कशाच्या आधारावर पाठवला गेला आहे. आम्ही खाली चौकशीचे आदेश दिलेले आहेत, समिती गठीत केलेली आहे व त्याबाबत कोणत्याही परिस्थितीमध्ये कारवाई करु.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी मान्य केले आहे की, यामध्ये गैरप्रकार झालेला आहे. आपल्या सर्व यंत्रणेकडून ज्या शेतकऱ्यांना नुकसानभरपाई द्यायची नव्हती त्यांना ४४ कोटी रुपये दिले गेले आहेत. असे असतानासुध्दा मंत्री महोदय सांगतात की, त्यांची चौकशी समिती गठीत केलेली आहे. या प्रकरणी त्यांच्यावर कारवाई करण्यास एक महिना लागेल असे सांगत आहेत. सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी सांगितल्याप्रमाणे व्हायला पाहिजे. मंत्री महोदय मान्य करतात की, यामध्ये गैरव्यवहार झालेला आहे. गरीब लोक व शेतकऱ्यांचे ४४ कोटी रुपये ज्यांना गरज नसताना दुसऱ्याच्या खिशात कोणाच्या चुकीमुळे गेले आहेत, म्हणजे हा सुनियोजित व संघटीत गुन्हा झालेला आहे. अशा प्रकारच्या अधिकाऱ्यांना पाठीशी घालण्याचे कारण काय. समितीचा अहवाल महिनाभराने येईल, आमची काही हरकत नाही. तोपर्यंत ज्या लोकांच्या चुकीमुळे हा

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.११९७०.....

डॉ.रणजित पाटील .....

प्रकार घडला आहे, त्यांना त्यांच्या कर्तव्यापासून किमान समितीचा अहवाल येईपर्यंत दूर ठेवणार का ?

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, थोडीशी दुरुस्ती अशी आहे की, ६५ मी.मी.पाऊस व ३३ टक्के पेक्षा अधिकचे नुकसान हा निकष आहे. प्राथमिक चौकशी आले आहे की, नुकसानीचे प्रमाण बरोबर आहे. परंतु ६५ मी.मी.च्या वर पाऊस पडला पाहिजे, हे दोन्ही निकष एसडीआरएफप्रमाणे पूर्ण झाले पाहिजेत. पण यापैकी एकच निकष पूर्ण झालेला आहे. शेवटी हे पैसे शेतकऱ्यांच गेलेले आहेत. हे पैसे व्यापाऱ्यांच्या किंवा इतरांच्या खिशात गेलेले नाही. जे पात्र शेतकरी होते तो आकडा फार मोठा नाही, त्यांची रक्कम ६ कोटीच्या जवळपास आहे. जे पात्र आहेत त्यांची माहिती आम्ही तपासून मागितली आहे. जे पात्र शेतकरी लाभापासून वंचित राहिले आहेत त्यांना महिनाभरात मदत करीतच आहोत. तारांकित प्रश्नाचा रोख पाहिला तर हे खरे आहे, सन्माननीय सदस्य डॉ.रणजित पाटील यांनी ते वाचले तर त्यांच्या लक्षात येईल. पैसे शेतकऱ्यांकडे गेले परंतु त्यांनी एकच निकष पूर्ण केला आहे, अधिकाऱ्यांना वाटले की, ३३ टक्क्याच्या वर नुकसान आहे. म्हणजेचे ते निकषात बसतात, खालून प्रस्ताव सकारात्मक आला होता, त्यानुसार आम्ही पैसे दिलेले आहे. कोणावरही अन्याय होऊ नये हे पाहिले जाईल. एक महिन्याच्या आत चौकशी करुन अहवाल आल्यास कोणालाही पाठिशी घालण्याचा प्रश्न नाही, त्यांच्यावर कारवाई केली जाईल.

श्री.अमोल मिटकरी : सभापती महोदय, संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करणार का याबाबत आजच्या आज सभागृहात उत्तर द्यावे. आज तो निर्णय झाला पाहिजे की, चौकशी होईपर्यंत त्यांना कर्तव्यापासून दूर ठेवावे किंवा त्यांना निलंबित करावे, अशी माझी मागणी आहे.

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, ठीक आहे.

अस्सुधारित

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये इतर मागासवर्गीयांच्या आरक्षणाकरिता ओबीसी इम्पिरिकल डाटा जमा करण्याबाबत

**(२) * १२७३३ श्री.प्रविण दरेकर, श्री.गोपिचंद पडळकर, डॉ.रणजित पाटील, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके, श्री.सुरेश धस, श्री.प्रसाद लाड, श्री.निलय नाईक, श्री.प्रवीण दटके, श्री.रमेशदादा पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.नागोराव गाणार, श्री.रामदास आंबटकर :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ओबीसी प्रवर्गाला आरक्षण मिळण्यासाठी ''ओबीसी इम्पिरिकल डाटा'' गोळा करण्याची जबाबदारी राज्य शासनाने राज्य मागासवर्ग आयोगाकडे दिली असून ओबीसी प्रवर्गाचा सामाजिक, आर्थिक व जातीनिहाय जनगणनेचा इम्पिरिकल डाटा उपलब्ध नसल्याने शासनाने प्रशासकीय यंत्रणा वापरुन जातीनिहाय जनगणना करावी, यासाठी राज्य मागासवर्ग आयोगाने माहे ऑगस्ट, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान शासनास ठराव सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमधील इतर मागासवर्गीय उमेदवारांसाठी राखीव असलेल्या २७ टक्के जागांवर निवडणूक घेण्यास मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ६ डिसेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास स्थगिती दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात ओबीसींना राजकीय आरक्षण दिल्याशिवाय कोणतीही निवडणूक घेऊ नये अशी मागणी विविध जिल्ह्यातील सामाजिक संघटनांनी तहसिलदार, उपविभागीय अधिकारी, जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात केली असल्याचे माहे जानेवारी, २०२२ च्या पहिल्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्य मागासवर्ग आयोगाने इम्पिरिकल डाटा गोळा करण्यासाठी मनुष्यबळ व इतर साधनसामुग्रीसाठी ४३५ कोटी रुपये निधीची मागणी माहे जुलै, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान केली असताना शासनाने ५ कोटी रुपये मंजूर केल्याचे

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१२७३३.....

श्री.प्रवीण दरेकर .....

माहे डिसेंबर, २०२१ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून सदरील अपुरा निधी व मनुष्यबळाची व्यवस्था नसल्याने आयोगाकडून ओबीसीची माहिती जमा करण्याचे काम सुरु करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन आयोगाला मागणीप्रमाणे मनुष्यबळ व निधी उपलब्ध करुन देण्याबाबत तसेच इम्पिरिकल डाटा गोळा करुन अंतिम अहवाल प्राप्त होण्यासाठी किती कालावधी अपेक्षित आहे, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विजय वडेट्टीवार :** (१) प्रशासकीय यंत्रणा वापरुन जाती-निहाय जनगणना करण्याबाबत राज्य मागासवर्ग आयोगाने शासनास ठराव सादर केल्याची बाब खरी नाही.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) व (५) आयोगास स्थानिक स्वराज्य संस्थांमधील आरक्षणाच्या अनुषंगाने विशिष्ट कामकाजाकरिता रुपये ५ कोटी इतका निधी आकस्मिकता निधीतून उपलब्ध करुन देण्यात आला. तद्नंतर सन २०२१-२०२२ च्या विधानमंडळाच्या तिसऱ्या अधिवेशनात रुपये ४३५ कोटी इतकी आर्थिक तरतूद पुरवणी मागणीद्वारे मंजूर करण्यात येवून त्यातून आकस्मिकता निधीच्या रकमेची प्रतिपूर्ती करण्यात आलेली आहे. आयोगास कार्यालयीन कामकाजाकरिता रुपये ८४.१८ कोटी इतका निधी शासन निर्णय दिनांक ०३/०२/२०२२ अन्वये उपलब्ध करुन देण्यात आलेला असून सदर कामकाजासाठी लागणारा अधिकचा निधी आयोगास आवश्यतेनुसार उपलब्ध करुन देण्यात येईल. बाहयस्त्रोतयंत्रणेद्वारे कंत्राटी मनुष्यबळ घेण्यास व त्यासाठी लागणारा निधी उपलब्ध करुन देण्याकरिता कार्यवाही करण्यात येत आहे. महाराष्ट्र अध्यादेश क्र. ३ संदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १६/१२/२०२१ रोजी दिलेल्या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर आयोगाच्या कार्यकक्षेत शासन अधिसूचना दिनांक २७/१२/२०२१ अन्वये सुधारणा करण्यात आलेली असून त्यानुसार आयोगाचे कामकाज सुरु आहे. (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

ता.प्र.क्र.१२७३३....

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदय, ओबीसीबाबत हा महत्वाचा प्रश्न आहे. जून २०२१ मध्ये आयोग गठीत केला. आयोगाने शासनाकडे साधारणपणे ४३५ कोटीची मागणी केली होती. ८४ कोटीचा निधी ३ फेब्रुवारी रोजी दिला गेला, ९ महिने शासनाने आयोगाला निधीच दिला नाही. परत आपण उत्तरात सांगितले आहे की, विलंब झाला नाही व प्रश्न उदभवत नाही. किती चुकीचे उत्तर येथे दिलेले आहे. पहिल्या प्रश्नाच्या उत्तरात आपण कबूलही केलेले आहे की, अशा प्रकारचा शासनाचा ठराव आयोगाने सादर न केल्याचे खरे नाही. दोन्ही उत्तरामध्ये आपण ॲक्सेप्ट केलेले आहे. मी मंत्री महोदयांना विचारु इच्छितो की, एवढया उशीरा निधी देण्याचे कारण काय, विलंबाची कारणे काय, प्रशासकीय यंत्रणा वापरुन जातीनिहाय जनगणना करण्याबाबत राज्य मागासवर्ग आयोगाने शासनाला ठराव सादर केला नाही असे लेखी उत्तर दिलेले आहे. शासनाने दिलेले उत्तर तांत्रिक स्वरुपाचे आहे.

सभापती महोदय, जातीनिहाय गणना करण्याबाबत मागसवर्ग आयोगाने शासनाशी चर्चा केली होती काय, तशा प्रकारचे पत्र किंवा प्रस्ताव पाठविला होता काय, सरकारने जी कागदपत्रे आयोगाला पुरवली त्यामध्ये राजकीय मागासलेपणाची माहिती आयोगाला दिली नाही हे खरे आहे का. अंतरीम अहवाल सादर करायलाही आयोगाने विरोध केला होता पण शासनाने आयोगाला बाध्य केले नाही हे खरे आहे का ?

यानंतर श्रीमती नाफडे....

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१२७३३..............

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय,पहिला प्रश्न असा होता की, मागासवर्गीय आयोगाचे गठन झाल्यानंतर निधीसाठी उशिर का झाला ? टीओआर तयार करत असताना त्यामध्ये स्पष्ट सांगितले होते की, तीन गोष्टींवर मागासवर्गीय आयोगाने काम करायचे आहे. त्या आयोगाला डेडिकेटेड आयोग म्हणून तेवढे अधिकार द्यायचे, असे ठरले होते. ओबीसीचा आयोग असला तरीही तेवढयापुरतेच त्यांना अधिकार देण्यात येतील. टर्म्स ऑफ रेफरन्समध्ये त्यांच्या या अधिकारांची नोंद केली गेली होती. त्यांचा प्रस्ताव ४२७ कोटी रुपयांचा या स्कोपच्या बाहेर जाऊन आला होता. महाराष्ट्रातील सबंध जनगणना जातनिहाय अशा प्रकारची करायची, असा यामध्ये उल्लेख होता, याकरिता शासनाने त्याकरिता निधी उपलब्ध करुन दिला नाही. त्यांच्या प्राथमिक गरजेकरता जे काही ५ कोटी रुपये लागत होते, ते त्यांना शासनाकडून उपलब्ध करुन देण्यात आले होते.

( विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात. )

खरे तर आपण काय म्हणत होता की, त्याचा मराठीत अनुवाद केला तर नाही... (अडथळा)

**सभापती :** सन्माननीय सदस्यांनी उत्तर ऐकून घ्यावे.

( विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात. )

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, मला माझे उत्तर....(अडथळा) त्यामुळे याकरिता उशिर होण्याचे कारण जर असेल तर त्यामध्ये त्यांनी जातनिहाय जनगणनेची मागणी केलेली आहे. आपल्याला सर्वांना माहिती आहे की, लोकसभेमध्ये माननीय मंत्रीमहोदयांनी जातनिहाय जनगणनेला परवानगी दिली जाणार नाही. यापूर्वी देखील सन २०११ मध्ये जातनिहाय जनगणना झालेली आहे. या संदर्भात आता आपण याच्या खोलात जाण्याची गरज नाही. यासंदर्भात आणखी

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१२७३३.............

श्री.विजय वडेट्टीवार.....

कोणत्या विषयात जाण्याची गरज नाही. आपण जे म्हणालात की, या संदर्भात मागासवर्गीय आयोगांच्या संदर्भात उशिर होण्याचे कारण काय ? खरे तर उशिर होण्याला कारण असे आहे की, त्यांनी जर त्या टीओआरच्या फ्रेममध्ये काम केले असते तर उशिरही झाला नसता. आयोगाचे आणि सर्वांचे एकमत असे झाले की, आम्ही जातनिहाय जनगणनाच करणार नाही. त्याची आवश्यकताही नव्हती, आज जी परिस्थिती उद्भवली, त्याकरिता अनेक गोष्टींमध्ये ते एक कारणही असू शकते. मी माननीय विरोधी पक्ष नेत्यांना याबाबत आज या ठिकाणी एवढेच सांगू शकतो की, आता शासन या विषयाबाबत बरेच पुढे गेलेले आहे. त्यांना निधी उपलब्ध करुन दिलेला आहे, आज देखील तो निधी त्यांच्याजवळ आहे, त्यावर कोणतीच कार्यवाही झालेली नाही. जवळ जवळ शासनाने त्यांना ८७ कोटी रुपयांचा निधी दिलेला आहे. मी सभागृहाच्या माध्यमातून एवढेच सांगू इच्छितो की, याबाबत नवीन निर्णय घेतलेला आहे, त्या समितीचे गठन आज होत आहे, याकरिता डेडिकेटेड आयोग म्हणून देण्यात आलेला होता, त्या आयोगाकडून अधिकार काढून श्री.जयंत बाँठिया, सनदी अधिकारी मुख्य सचिव, श्री.महेश झगडे, श्री. अमित पटेल, टाटा इन्स्टिटयूट ऑफ सोशन सायन्सेसकडून श्रीमती शालिनीताई भगत हे आहेत. आय.टी. विभागाने श्री.नरेश गिते या सर्व पाच लोकांची कमिटी करुन आम्ही त्यांना डेडिकेटेड म्हणून पूर्ण अधिकार आज देणार आहोत. मागासवर्गीयांचा पॉलिटिकल बॅकवर्डनेस जो आहे, तोच त्या संदर्भातील टीओआर मध्ये टाकलेला आहे. हा विषय तेवढयापुरताच मर्यादित आहे. सन्माननीय सदस्यांनी जो दुसरा प्रश्न उपस्थित केलेला आहे. हे करत असताना इम्पिरिकल डेटाकरिता पॉलिटिकल बॅकवर्डनेसची माहिती दिली नाही. खरे म्हणजे, माझ्याकडेही याबाबतचे पत्र आहे. तेथील श्री.देशमुख नावाचे सचिव आहेत, त्यांच्याकडे पेनड्राईव्ह मध्ये माहिती आहे. ती माहिती आता पाठवू का म्हणून आमच्या काही.....अडथळा....मागसवर्गीय आयोगाच्या सदस्यांना सांगतात की, आता आपण दुरुस्त करुन पाठवू या का ? आता पाठवून काय उपयोग आहे ?

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१२७३३.............

श्री.विजय वडेट्टीवार.....

त्यांनी जाणुन बुजून....(अडथळा) मी काल रोजीच पत्र सीएस यांना दिलेले आहे की, त्या देशमुखांची तेथून हकालपट्टी करावी. आता त्यांची बदली झालेली आहे, त्यांना तेथून काढावे, असे मी सांगितलेले आहे. जो रिपोर्ट तयार करत असताना सदस्यांनी सांगितले एक आणि देशमुखांनी लिहिले दुसरेच ! यामध्ये पत्र जे आहे.....(अडथळा)

( विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात. ) मी जबाबदारीने बोलत आहे. माझ्याकडे जे पत्र...जी प्रेस नोट देशमुखांनी काढली होती.... त्या प्रेस नोटमध्ये त्यांनी सांगितलेले आहे की.....(अडथळा) मला बोलू द्या !

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, माझी हरकत आहे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, माझी हरकत आहे.

**सभापती :** प्रश्नाला हरकत घेता येत नाही. याकरिता मी कोणालाही संधी देणार नाही. सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे आपण खाली बसावे.

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, देशमुख नावाच्या गृहस्थाकडे ती माहिती उपलब्ध करुन दिली. ती माहिती...(अडथळा).... ओ, साहेब, (अडथळा) ती माहिती आयोगापुढे सदस्य सचिवांनी ठेवली नाही. हे त्यांनी मान्य केलेले आहे. त्यावर शासन म्हणून आम्ही कारवाई करीत आहोत. मी काल तसे कारवाई करा म्हणून पत्रही दिलेले आहे, त्याची बदली झालेली आहे. हे जाणुनबुजून केलेले आहे. (अडथळा)... आणि म्हणून आपण जे म्हणालात्.....( अडथळा)

**सभापती :** सन्माननीय सदस्यांनी शांत बसावे. सर्वप्रथम माननीय मंत्री महोदयांचे उत्तर तरी पूर्ण होऊ द्यावे. उगाच याबाबत तीव्र भावना करुन घेऊन नका, आपल्या सर्वांना आरक्षण व आरक्षणाची माहिती पाहिजे. यावर आपण सर्वजण एकमताने एकमेकांबरोबर सहमत आहोत, त्यामुळे तो काही विषय नाही.

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१२७३३.............

**सभापती.....**

उगाच आरडाओरड करु नये. याबाबत शासनाचे जे धोरण आहे, ते नीट समजून घ्यावे, अशी माझी सदनाला विनंती आहे.

( विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात. )

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांचे लेखी उत्तर आणि आता सभागृहात त्यांनी पुन्हा पुन्हा दिलेले उत्तर गंभीर आहे, ते त्यांना मागे घ्यावे लागेल. देशमुखांवर कारवाई झालीच पाहिजे, तो वेगळा प्रश्न आहे, तो छोटा प्रश्न आहे. मूळ प्रश्नाला उत्तर काय दिलेले आहे ? सरकारने नऊ महिने घालविलेले आहेत, यावर उत्तर सरकारने काय दिलेले आहे की, जातनिहाय जनगणना करण्यासाठी त्यांनी निधी मागितला म्हणून आम्ही तो दिला नाही. यावर केंद्र शासनाचे उदाहरण सांगितले जात आहे. अनेक राज्यांनी स्वत: सांगितले की, आम्ही आमच्या खर्चाने ओबीसींची जातनिहाय जनगणना करु. असे असताना आज सरकार सांगत आहे की, आम्ही जात जनगणना करणार नाही. लाज वाटते की, आज अशा पध्दतीचे उत्तर जे ओबीसींचे प्रतिनिधीत्त्व करतात,...(अडथळा) माझे म्हणणे आहे की, माननीय मंत्री यांनी उत्तर मागे घ्यावे आणि सरकारने भूमिका स्पष्ट करावी की, जातनिहाय जनगणनेसंदर्भात तुमची भूमिका काय आहे ? आणि ती जर शासन सांगणार नसेल तर हा दगाफटका सरकारकडून झाला, असाच त्याचा निष्कर्ष निघतो, याकरिता हे सभागृहात दिलेले उत्तर मागे घेतले पाहिजे.

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय,हा विषय ओबीसीच्या पॉलिटिकल रिझर्व्हेशनचा होता. या संदर्भातील टीओआरच्या संदर्भातच याचा स्कोप होता. जातनिहाय जनगणना हा विषय दोन वर्षांपासून पडून होता. खरे तर घराघरात जाऊन एकमेकांचे तोंड पाहून ते करणे शक्य नव्हते. खरे तर दोन वर्षांमध्ये कोणतीच...(अडथळा).... मला उत्तर तर पूर्ण करु द्यावे.....

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१२७३३..............

**सभापती :** सन्माननीय मंत्री महोदयांना उत्तर तर पूर्ण देऊ द्यावे. सन्माननीय सदस्यांनी शांतपणे बसावे. अशा प्रकारे आरडाओरडा करुन प्रश्न सुटणार आहेत का ?

( विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात. )

श्री.कपिल पाटील (माईक बंद) : सभापती महोदय, उत्तर काय द्यावे, हा अधिकार संपूर्णपणे मंत्रीमहोदयांचा व शासनाचा आहे, त्यावर माझा आक्षेप असण्याचे कारण नाही. परंतु मला एवढेच सांगायचे आहे की, दोन उदाहरणात त्यांनी केंद्र शासनाचा हवाला दिलेला आहे. केंद्र शासनाने जातनिहाय जनगणना करुन अहवाल दिला नाही. बौध्द समाजाच्या संदर्भात वेगळा रकाना का करण्यात आला ? त्यामुळे सन २०११ मध्ये आणि आता शासनाने नऊ महिने वाया घालविले. नऊ महिने याकरिता शासनाने निधी दिला नाही. आता याची जबाबदारी केवळ आयोगावर टाकून शासन मोकळे होत आहे. याबाबतची प्रशासकीय विलंबाची जबाबदारी आयोगावर जरुर टाका. परंतु शासनाने लेखी उत्तर दिलेले आहे. पुन्हा पुन्हा मी शांतपणे मंत्रीमहोदयांचे उत्तर ऐकत होतो. मंत्रीमहोदय तीन वेळा बोलले की, जातनिहाय जनगणना मी करणार नाही. ती जनगणना मागितली तरीही, त्याकरिता मी पैसे देणार नाही. हे स्पष्टपणे त्यांनी सांगितलेले आहे, हे तीनदा माननीय मंत्रीमहोदय स्पष्टपणे बोललेले आहेत, आवश्यकता भासल्यास, आपण हे रेकॉर्ड काढून तपासून पाहावे. हे उत्तर माननीय मंत्रीमहोदयांनी मागे घेतले पाहिजे. ओबीसींची जातनिहाय जनगणना झालीच पाहिजे, ती जातनिहाय जनगणना करण्यात येणार आहे का ? हा माझा मुद्दा आहे.

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, माझे उत्तर तरी पूर्ण होऊ द्यावे, आयोगाकडे डेडिकेटेड आयोग म्हणून जे काम सोपविले होते, जो टीओआर दिला होता, तो केवळ ओबीसींच्या पॉलिटिकल बॅकवर्डनेसकरिता होता. ट्रिपल टेस्टमध्ये जे होते, ते आपल्याला माहिती आहे की, आपण आयोग नेमलेला आहे, हे सर्व आपल्याला माहिती आहे. तुम्ही जे म्हणत आहात ना ! ओबीसींची स्वतंत्र जनगणना करायचा विषय वेगळा आहे.

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१२७३३.............

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, मंत्रीमहोदयांना उत्तर मागे घेण्यास सांगावे, माननीय मंत्री महोदयांनी दिलेले उत्तर मागे घेण्यात यावे.

**सभापती :** मंत्रीमहोदयांना उत्तर देताना डिस्टर्ब करुन आपले प्रश्न सुटणार आहेत का ? आपल्यालाच यातील कळते असे नाही, आम्हालाही यामध्ये इंटरेस्ट आहे.

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, हा विषय वेगळा मांडावा, त्यावर नक्की उत्तर देण्यात येईल. ओबीसींची जनगणना झाली पाहिजे, अशा सर्वांच्या भावना आहेत. त्या भावना असताना त्यांनी हा मुद्दा वेगळा मांडावा. आता हा ..(अडथळा).....माझे उत्तर पूर्ण झाल्यानंतर ....अडथळा..... हा विषय मी मंत्री म्हणून बोलत आहे. मंत्री म्हणून माझी सामुहिक जबाबदारी आहे. ज्यावेळी ४३५ कोटी रुपये मागितले, त्यावेळी त्यांनी जनगणनेचा उल्लेख केला होता, ते मी सांगितले. त्यावेळी त्याला वेळ लागणार होता, उशिर लागणार होता, आम्ही नवीन टीओआर दिला होता, दोन महिन्यांनी तीन टीओआर दिले होते. त्यांना याकरिता टर्म्स ऑफ रेफरन्स एकूण तीन वेळा दिला होता. या स्कोपच्या बाहेर जाऊ नका असे सांगितले होते. आयोगांच्या काही सदस्यांची अशी भूमिका होती की, जनगणना केल्याशिवाय ओबीसींचा बॅकवर्डनेस तपासता येणार नाही. याकरिता आयोगाबरोबर दोन-तीन वेळा चर्चा झाली. त्यांना सांगितले गेले की, पहिल्यांदा हे ओबीसींचे आरक्षण टिकले पाहिजे, याकरिता हे सर्व केले पाहिजे, तातडीने त्यांना आम्ही प्रशासकीय कामाकरिता पाच कोटी रुपये दिले होते. मागील वेळी मराठा समाजाच्या....(अडथळा) मला माझे उत्तर पूर्ण करु द्यावे...

( विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात. )

ता.प्र.क्र.१२७३३.............

**सभापती :** मंत्रीमहोदयांना उत्तर देताना डिस्टर्ब करुन आपले प्रश्न सुटणार आहेत का ?

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, ओबीसींबाबत जो निर्णय घ्यायचा आहे, तो सामुहिक निर्णय घ्यायचा आहे, हा निर्णय मी एकटयाने घेण्याचा निर्णय नाही. हा निर्णय घेण्याकरिता आम्ही कॅबिनेटपुढे जाऊ.

यानंतर श्री.सोनावणे......

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१२७३३...

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी दिलेले उत्तर मागे घ्यावे, अशी माझी त्यांना विनंती आहे.

श्री. विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, मी या प्रश्नासंदर्भात संबंधित मंत्री महोदयांना विचारुन, चर्चा करुन.... कॅबिनेट पुढे जावे लागेल. चर्चा झाल्यानंतर या प्रश्नाचे उत्तर दिले जाईल.

**सभापती** : ठीक आहे. सदरहू प्रश्न आरक्षित ठेवण्यात येत आहे. आता पुढील प्रश्न चर्चेला घेण्यात येईल.

--------

असुधारित प्रत

श्री. भाई गिरकर : सभापती महोदय, कोकणाला ७२० कि.मी. लांबीचा समुद्रकिनारा लाभलेला असून, त्या ठिकाणी धुप प्रतिबंधकाचा प्रश्न आहे. दर वर्षी कोकणात चक्रिचादळ येते. पावसामुळे समुद्रकिनाऱ्यालगत असणारे सर्व बंधारे वाहून जातात. यासाठी माननीय श्री. शरदचंद्र पवार यांच्या नेतृत्वाखाली एक समिती घटित करण्यात आली होती. त्यासाठी आवश्यक तो निधी मंजुर केला होता. मंत्री महोदय "करणार" असे उत्तर देत आहे. आता कोकणातील लोकांची घरे आणि शेती उद्धस्त होत आहेत. हे बंधारे केव्हा बांधणार आणि त्यासाठी अर्थसंकल्पात निधी मंजुर केलेला आहे काय असा माझा प्रश्न आहे.

श्री. विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, कोकणाला सातत्याने चक्रिवादळ, अतिवृष्टी, आपत्ती आणि सायक्लॉनचा सामना करावा लागत आहे. त्यासाठी आमच्या विभागाने कायमस्वरुपी उपाययोजना करण्याचा निर्णय घेतला. कॅबिनेटमध्ये त्याला मान्यता मिळालेली आहे. ३२०० कोटी रुपयांचा खर्च केला जाणार आहे. राज्य शासनाच्यामाध्यमातून...कॅबिनेटचा निर्णय दिनांक २३ सप्टेंबर, २०२१ मध्ये झालेला आहे. दिनांक १० नोव्हेंबर, २०२१ रोजी जीआर काढला होता.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझी मंत्री महोदयांनी विनंती आहे की, त्यांनी "कॅबिनेट" असा शब्दप्रयोग करण्याऐवजी "मंत्रिमंडळ" असा शब्दप्रयोग करावा.

श्री. विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, पुढील ४ वर्षाच्या कालावधीत हा प्रकल्प आपल्याला पूर्ण करावयाचा आहे. राज्य शासनाच्यामाध्यमातून १२०० कोटी रुपये आणि पंधराव्या वित्त आयोगाकडून २ हजार कोटी रुपयांचा निधी मिळणार असून, त्यामध्ये धुपप्रतिबंधक..... प्रशासकीय मान्यतेसाठी सदरहू प्रस्ताव वित्त विभागाकडे आहे. उद्या शुक्रवार, दिनांक ११ मार्च, २०२२ रोजी राज्याचा अर्थसंकल्प सादर सभागृहात केला जाणार आहे. माननीय मंत्री महोदयांनी असे सांगितले आहे की, दोन ते चार दिवसांमध्ये आम्ही त्यांना परवानगी देणार आहोत. हा प्रस्ताव १५ ते २० दिवसांपूर्वीच पाठविलेला आहे. पूर्णत: धुपप्रतिबंधक बंधारे, भूमिगत विद्युतवाहिन्या, चक्रिवादळ येत असल्यामुळे केंद्र आणि निवारा केंद्र बांधावयाची आहेत. या प्रस्तावास कॅबिनेटची मान्यता मिळाल्यानंतर लगेचच

असुधारित प्रत

ता.प्र.क्र. ११७९२.....

श्री. विजय वडेट्टीवार....

संबंधित विभागाच्या निविदा काढल्या जाणार आहेत. मंत्रिमंडळाने सदरहू प्रस्तावास मान्यता दिल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत या कामाला लवकरात लवकर सुरुवात केली जाईल.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, एकूण किती बंधारे बांधण्याचा प्रस्ताव आहे. रायगड जिल्ह्याला २४० कि.मी. लांबीचा समुद्रकिनारा लाभलेला आहे. आतापर्यंत किती कामाचे एस्टिमेट तयार केले ? दुसऱ्या चक्रिवादळामुळे धुपप्रतिबंधकाचे नुकसान झालेले आहे. कोकणाला ७२० कि.मी.चा समुद्रकिनारा लागून असल्यामुळे किती बंधारे बांधण्याचे प्रस्तावित आहे ?

श्री. विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, धुपप्रतिबंधक बंधारे बांधले जाताना समुद्रकिनाऱ्यावरील भरतीचे किंवा सायक्लॉनचे पाणी आतमध्ये येते. त्यासाठी बांध बाधले जाणार आहेत. सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड, ठाणे आणि पालघर जिल्ह्याचे सर्व्हेक्षण पूर्ण झालेले आहे. या ५ जिल्ह्यांमध्ये बंधाऱ्यांची आवश्यकता आहे. त्यासंदर्भातील प्रस्ताव हा साधारणपणे १४०० कोटी रुपयांचा आहे. १४०० कोटी रुपयांमध्ये एस्टिमेटनुसार ज्या जिल्ह्यांना जेवढे बंधारे आवश्यक आहे, तेवढे बंधारे बांधले जातील. कोणत्या जिल्ह्यात किती बंधारे बांधले जाणार आहेत ही माहिती आता तरी माझ्याकडे नसल्यामुळे ती माहिती मी सभागृहाच्या पटलावर ठेवल्यानंतर सन्माननीय सदस्यांना लेखी स्वरुपात देणार आहे.

श्री. अनिकेत तटकरे : सभापती महोदय, गेल्या दोन वर्षापासून कोकणावर नैसर्गिक आपत्ती येत आहे. तोक्ते किंवा निसर्ग चक्रिवादळाच्या वेळी जुन्या झाडांचे अतोनात नुकसान झालेले आहे. अनेक झाडे ही वन विभागाच्या हद्दीत होती. आज ती त्या ठिकाणी आलेल्या चक्रिवादळामुळे पडलेली आहेत. त्या ठिकाणी पुरक लागवडीसाठी उपाययोजना केल्या जातील काय ? बंधारे बांधत असताना अनेक ठिकाणी वन विभागाची अडचण येणार असल्यामुळे वनविभाग आणि इतर संबंधित विभागाची एकत्रिपणे बैठक आयोजित करुन मार्ग काढला जाईल काय ?

असुधारित प्रत

ता.प्र.क्र. ११७९२.....

श्री. विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, शासन म्हणून संबंधित विभागाची मदत घेतली जाणार आहे. कोणतीही अडचण येणार नाही. प्रत्येक जिल्ह्यातील जिल्हाधिकाऱ्यांनी प्रस्ताव दिलेला आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत डीडीएमच्या माध्यमातून सर्व्हेक्षण केल्यानंतरच आवश्यक असलेल्या ठिकाणी बंधारे बांधावेत किंवा बांध बांधावा म्हणून जर प्रस्ताव आला आणि अशा वेळी इतर विभागांची आवश्यकता असेल तर त्यांची परवानगी घेतली जाईल. यामध्ये कोणतीही अडचण येणार नाही.

श्री. प्रसाद लाड : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांच्या उत्तरात स्पष्टता नाही. ३३०० कोटी रुपयांमध्ये प्रत्येक जिल्ह्यात किती बंधारे बांधले जाणार याचे उत्तर मंत्री महोदयांनी दिलेले नाही. प्रत्येक जिल्ह्याला किती निधी देणार, एस्टिमेट केव्हा करणार याबाबतचा प्रोग्राम आणि प्लॅन देण्याची आवश्यकता आहे. मंत्री महोदयांनी असे सांगितले आहे की, समुद्रकिनाऱ्यावरील लाटांना दगड टाकून अडविले जाणार आहे. पण कोकणातील लहान शेतकऱ्यांच्या शेतात पाणी शिरते. खाड्यांच्या माध्यमातून पाणी शिरते. त्यामुळे जमीन खारी होते. त्यामुळे लहान बंधाऱ्यांसाठी तरतूद केली जाईल काय की केवळ फक्त मोठेच बंधारे उभे केले जाणार आहेत असा माझा प्रश्न आहे. मागील तोक्ते वादळात आणि निसर्ग चक्रिवादळात लहान शेतजमिनी खरडून गेल्या होत्या. मनरेगाच्या १०० टक्के निधीपैकी केवळ १० टक्केच निधी खर्च होतो अशी माहिती रत्नागिरी जिल्हाधिकारी यांनी मला दिलेली आहे. मनरेगाचा निधी उपलब्ध आहे. त्यानुसार मंत्री महोदय कार्यवाही करतील काय ?

श्री. विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, खार जमिनी आहेत अशा ठिकाणी धुपप्रतिबंधक बंधारे बांधावयाचे आहेत. त्यासाठी आमचा विभाग कार्यरत आहे. यासाठी मागील वर्षी कोरोनाच्या काळात अर्थसंकल्पात तुटपुंजा निधी मिळाला होता. यावेळी सर्व्हेक्षणासाठी ३५ कोटी रुपये आणि उर्वरित कामांसाठी ११४ कोटी रुपये अशा पध्दतीने तो प्रस्ताव आमच्या विभागाकडे आहे. बजेट मिळाल्यानंतर त्या

असुधारित प्रत

ता.प्र.क्र. ११७९२.....

श्री. विजय वडेट्टीवार....

प्रस्तावास मान्यता दिली जाईल आणि त्यानंतर लहान बंधाऱ्यामुळे ५ हजार ५०० हेक्टर जमीन अफेक्टेडे झालेली असल्यामुळे ती दुरुस्त करण्याचे काम त्यामध्ये घेण्यात आलेले आहे.

श्री. रमेश पाटील : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी धुपप्रतिबंधक बंधाऱ्याच्या संदर्भात उत्तर दिलेले असून, ते खरे आहे. अनेक वर्षे होऊनसुध्दा या धुपप्रतिबंधक बंधाऱ्याविषयी चर्चा होत आहे. सन २०२१ मध्ये त्याला आर्थिकदृष्टया मंजुरी दिलेली आहे. आम्ही ज्यावेळी किनारा अभियंता आणि पथन विभागाकडे जातो त्यावेळी त्यांचे म्हणणे असे होते की, जोपर्यंत आमच्या विभागाला आर्थिकदृष्टया निधी मिळत नाही, तोपर्यंत आम्ही ॲक्शन घेऊ शकत नाही.

यानंतर श्री. बोर्डे....

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.११७९२....

श्री.रमेशदादा पाटील....

या कामासाठी अर्थसंकल्पात किती कालावधीत तरतूद करणार आहात ? अनेक वर्षांपासून त्या ठिकाणचे धूप प्रतिबंधक बंधारे तुटलेले असून त्यांची दुरुस्ती करावयाची बाकी आहे. तसेच काही ठिकाणी नवीन धूप प्रतिबंधक बंधारे करावयाचे आहेत. धूप प्रतिबंधक बंधाऱ्याअभावी सागरी किनाऱ्यावरील पाचही जिल्ह्यातील मच्छीमार समाजाची घरे उद्‌ध्वस्त झालेली आहेत. चक्री वादळामुळे पुन्हा नुकसान होऊ नये म्हणून पावसाळ्यापूर्वी आवश्यक ती आर्थिक तरतूद करुन धूप प्रतिबंधक बंधाऱ्याच्या निर्मितीस सुरुवात करण्यात येईल काय ?

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, १४०० कोटी रुपयांच्या धूप प्रतिबंधक बंधारे निर्मितीचा कार्यक्रम एक वर्षासाठी नव्हे तर चार वर्षासाठी राबवायचा आहे. यासाठी आवश्यक तेवढा निधी उपलब्ध आहे. १५ व्या वित्त आयोगातील १३०० कोटी रुपये उपलब्ध आहेत. राज्य सरकार प्रती वर्षी ३०० कोटी रुपये प्रमाणे चार वर्षात १२०० कोटी रुपये देणार आहे. यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. या कामासाठी जेवढ्या निधीची आवश्यकता आहे तेवढा निधी मिळालेला आहे. एकंदरीत या कामासंदर्भातील निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर ही कामे लगेच सुरु करण्यात येतील.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वेंगुर्ला तालुक्यात समुद्रमार्ग ही ग्रामपंचायत आहे. या गावात धूप प्रतिबंधक बंधारा नसल्यामुळे मागच्या काळात या गावचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. त्या गावच्या लोकांची खूप दिवसांपासून धूप प्रतिबंधक बंधाऱ्याची मागणी आहे. समुद्रमार्ग येथे धूप प्रतिबंधक बंधारा करण्यासाठी तेथील लोकांकडून मागील तीन वर्षापासून सातत्याने प्रस्ताव सादर करण्यात येत आहेत. मी स्पेसिफिक विचारतो की, नवीन धूप प्रतिबंधक बंधाऱ्यांचे नियोजन करीत असताना समुद्रमार्ग ग्रामपंचायतीत धूप प्रतिबंधक बंधारा करण्यात येईल काय ? सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नानुसार एकूण किती बंधारे घेण्यात येणार आहेत या बाबतची माहिती पटलावर ठेवण्याचे मंत्री महोदयांनी

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.११७९२....

श्री.विनायक मेटे....

सांगितलेले आहे. एकंदरीत या संपूर्ण बंधाऱ्यांच्या कामांसाठी १४०० कोटी रुपये खर्च येणार असल्याचे मंत्री महोदयांनी सांगितले आहे. मी स्पेसिफिक विचारतो की, मंत्री महोदयांना एकूण किती बंधारे बांधायचे आहेत हे माहीत नसताना या कामासाठी १४०० कोटी रुपये खर्च येईल हे कशाच्या आधारावर सांगत आहेत ?

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, सबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी पाठविलेल्या एकूण प्रस्तावाच्या अनुषंगाने किती खर्च अपेक्षित आहे हे मी सांगितले आहे. विभागाने प्रत्येक जिल्हाधिकाऱ्यांकडून प्रस्ताव मागितले होते. समुद्रकिनाऱ्याची एकूण लांबी गृहीत धरुन त्यावर किती धूप प्रतिबंधक बंधारे बांधावयाचे आहेत हे ठरते. सन्माननीय सदस्यांनी समुद्रमार्ग येथील धूप प्रतिबंधक बंधाऱ्याबाबत विचारणा केली. परंतु तो बंधारा इंग्रज काळातील खाजगी बंधारा नसावा. तो शासकीय बंधारा असेल तर नक्की दुरुस्ती करता येईल. जर नवीन बंधारा बांधावयाचा असेल तर ती बाब तपासून आवश्यकता असेल तर त्या संदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

------------

असुधारित

**धनगर समाजाला आरक्षणाचा लाभ देण्याबाबत**

**(४) * ११८४७ श्री.सदाशिव खोत, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.महादेव जानकर, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, श्री.सुरेश धस, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, डॉ.परिणय फुके, श्री.प्रसाद लाड, डॉ.रणजित पाटील, श्री.निलय नाईक, श्री.रमेशदादा पाटील, अॅड.निरंजन डावखरे, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धनगर समाजाला आरक्षण मिळावे व ते कायद्याच्या कसोटीवर टिकावे याबाबत अभ्यास करण्याचे काम "टिस" या संस्थेला देण्यात आले असून त्यानुषंगाने सदर संस्थेने शासनास अहवाल सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धनगर समाजाच्या अनुसूचित जातीच्या निकषांबाबत अद्यापही मा.महाधिवक्ता यांचे अभिप्राय प्राप्त झाले नसून महाधिवक्ता यांचे अभिमत घेवून आरक्षणाचा निर्णय होईपर्यंत आदिवासी विकास विभागामार्फत सुरु असलेल्या अनुसूचित जातीसाठीच्या योजनांचा लाभ धनगर समाजातील बांधवाना लागू करण्याचा निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०१९-२०२० मध्ये आदिवासी समाजाच्या विकासासाठी ज्या योजना राबविल्या जातात त्याच धर्तीवर धनगर समाजाच्या विकासासाठी २२ योजना राबविण्यासाठी रुपये १०० कोटी एवढा निधी घोषित करण्यात आला होता. त्यानुषंगाने २२२५६८२१ व २२२५६८३७ या दोन लेखा शिर्षाखालील प्रत्येकी २५० कोटी प्रमाणे रुपये ५०० कोटी अशी तरतूद केली होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर योजनांसाठी सन २०१९-२०२० या वित्तीय वर्षासाठी ५०० कोटी, सन २०२०-२०२१ या वर्षासाठी रुपये ५१५०.०४ लक्ष एवढी अर्थसंकल्पात तरतूद केली असली तरीही उक्त तरतूदीपैकी ४९.५० लक्ष इतका निधी वितरित केला तसेच सन २०२१-२०२२ या वित्तीय वर्षात रुपये ८५ कोटी ३ हजार इतकी तरतूद करुनही अद्याप वितरित करण्यात आली नसल्यामुळे धनगर समाजास आदिवासी विकास समाजाप्रमाणे देण्यात येणाऱ्या २२ योजनांच्या लाभापासून वंचित रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

ता.प्र.क्र.११८४७....

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने धनगर समाजास आरक्षण देण्याबाबत तसेच आदिवासी समाजाप्रमाणे देण्यात येणाऱ्या २२ योजनांचा लाभ धनगर समाजास मिळणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विजय वडेट्टीवार :** (१) होय.

(२) होय.

(३) होय.

शासन निर्णय दिनांक ०७ ऑगस्ट, २०१९ अन्वये, आदिवासी विकास विभागाच्या धर्तीवर, भज-क प्रवर्गातील धनगर समाजासाठी १३ योजना राबविण्याचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

(४) सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षात रुपये ८५ कोटी ३ हजार इतकी तरतूद अर्थसंकल्पित करण्यात आलेली आहे. सदर योजनेंतर्गत असलेल्या धनगर समाजाच्या विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमांच्या नामांकित निवासी शाळेत प्रवेश देण्यासंबधी ५,५०० इतकया विद्यार्थी संख्येस सन २०२१-२०२२ या शैक्षणिक वर्षात मान्यता देण्यात आली आहे.

तसेच, धनगर समाजातील बांधवाना १०,००० घरे बांधून देणेबाबतच्या योजनेंतर्गत निधी वितरणाबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे.

तसेच, इतर योजनांबाबत सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांच्याकडून प्रस्ताव सादर करण्यास्तव कार्यवाही चालू आहे.

(५) मा.मंत्रिमंडळ उपसमितीने दिलेल्या निर्देशानुसार “टिस” या संस्थेने दिलेला अहवाल मा.महाधिवक्ता यांच्याकडे अभिप्रायार्थ सादर करण्यात आलेला आहे. अभिप्राय अदयाप अप्राप्त आहेत.

शासननिर्णय दिनांक ०७ ऑगस्ट, २०१९ अन्वये, आदिवासी विकास विभागाच्या धर्तीवर, भज-क प्रवर्गातील धनगर समाजासाठी १३ योजना राबविण्याचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.११८४७....
श्री.विजय वडेट्टीवार....

सभापती महोदय, या प्रश्नाच्या लेखी उत्तरामध्ये थोडीशी दुरुस्ती असून ती आपल्या अनुमतीने सन्माननीय सदस्यांना वितरित करण्यात आलेली आहे.

**सभापती** : ठीक आहे.

श्री.सदाभाऊ खोत : सभापती महोदय, माननीय श्री.देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना आदिवासी समाजाला ज्या योजना लागू आहेत त्या धनगर समाजाला लागू करण्यात येतील असा निर्णय घेण्यात आला होता. त्यावेळी मंत्रिमंडळातील माननीय मंत्री श्री.महादेवराव जानकर यांनी अभ्यास करुन धनगर समाजाला वेगवेगळ्या योजना लागू केल्या होत्या. परंतु त्यानंतर अनेक योजना केवळ कागदावरच राहिल्याचे दिसून येत आहे. इंग्रजी माध्यमांच्या नामांकित निवासी शाळांमध्ये ५५०० विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याच्या पलीकडे दुसरी कोणतीही योजना अस्तित्वात आहे किंवा तिला मोठ्या प्रमाणात निधी दिल्याचे दिसून येत नाही. मी स्पेसिफिक विचारतो की, मेंढपाळांना पावसाळ्याच्या काळात चार महिन्यांसाठी प्रती महिना ६ हजार रुपये चराई भत्ता देण्याचा निर्णय घेण्यात आला होता हे खरे आहे काय, असल्यास, हा निधी मेंढपाळांना वितरित करण्यात आला आहे काय ? धनगर समाजाच्या विद्यार्थी-विद्यार्थीनींसाठी प्रत्येक जिल्ह्यात वसतिगृह सुरु करण्यासाठी मुंबई, नागपूर, पुणे, औरंगाबाद, अमरावती या महसुली विभागासाठी १५० कोटी रुपये देण्याचे नियोजित केले होते, परंतु हा निधी अद्याप दिला नाही हे खरे आहे काय ? युपीएससी व एमपीएससीची तयारी करीत असलेल्या विद्यार्थ्यांना ४ लाख रुपये देण्याचे ठरले होते, परंतु हे पैसे सुद्धा त्यांना देण्यात आलेले नाहीत हे खरे आहे काय ? शेळी-मेंढी महामंडळाला मागील सरकारने १ हजार कोटी रुपये देण्याचा निर्णय घेतला होता. मी विचारु इच्छितो की, या सरकारच्या काळात त्या महामंडळाला किती निधी देण्यात आला आणि त्याचा धनगर समाजाला किती लाभ मिळाला ?

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.११८४७....
श्री.सदाभाऊ खोत....

सभापती महोदय, डोंगर-दऱ्यात राहणाऱ्या धनगर समाजाला राज्य सरकारकडून मोठ्या अपेक्षा आहेत. परंतु या राज्य सरकारच्या दिरंगाईमुळे त्यांचे राजकीय आरक्षण धोक्यात आलेले आहे. आदिवासी समाजाला जे आरक्षण आहे ते आरक्षण धनगर समाजाला देण्यात येईल असे सांगून आपण ढोल वाजवून व खांद्यावर घोंगडी टाकून येथे आलात. परंतु त्या बाबतीत अद्यापपावेतो कोणताही निर्णय घेतलेला नाही. मी विचारु इच्छितो की, धनगर समाजासाठी सुरु करण्यात आलेल्या २३ योजनांपैकी सद्य:स्थितीत किती योजना सुरु आहेत आणि त्यापैकी किती योजनांना निधी दिला आहे ?

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, हे खरे आहे की, मागच्या सरकारच्या काळात १ हजार कोटी रुपये देण्याची घोषणा झाली होती. विधानसभा निवडणुकीच्या एक महिन्यापूर्वी ही घोषणा करण्यात आली होती. त्या संदर्भातील शासन निर्णय दिनांक ८ ऑगस्ट, २०१९ रोजी काढण्यात आला. सप्टेंबर महिन्यामध्ये विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागली. त्यापूर्वी १ हजार कोटी रुपयांची घोषण केली गेली, परंतु त्या अनुषंगाने एकही शासन निर्णय काढण्यात आला नव्हता किंवा त्याला लेखाशीर्षही नव्हते. १ हजार कोटी रुपयांपैकी ५०० कोटी रुपयांची घोषणा सभागृहात करण्यात आली होती. परंतु पुरवणी मागण्यांमध्ये त्या बाबत कोणताही उल्लेख करण्यात आला नव्हता. ती केवळ घोषणा होती. निवडणुकीनंतर आमचे महाविकास आघाडीचे सरकार आले आणि त्यानंतर कोरोनाचे संकट आले. आपल्याला कल्पना आहे की, कोरोना संकटामुळे जुन्या योजनांसाठी निधी नव्हता. परिणामी नवीन योजना कार्यान्वित करताना नक्कीच अडचणी होत्या.

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.११८४७....
श्री.विजय वडेट्टीवार....

सभापती महोदय, ज्या १३ योजना आहेत त्या बाबतीत योजनानिहाय माहिती मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो. पहिली योजना भटक्या जमाती क वर्गातील धनगर समाजातील मॅट्रीकोत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना नवी मुंबई, नाशिक, औरंगाबाद, पुणे, नागपूर व अमरावती या महसुली विभागाच्या ठिकाणी वसतिगृह निर्माण करण्यासाठी त्यावेळी १ हजार रुपयांची तरतूद करण्यात आली होती. या वसतिगृहासाठी चारही ठिकाणी जागा उपलब्ध करुन देण्याची आमची तयारी झालेली आहे. जिल्हाधिकाऱ्यांकडून तशा प्रकारचे प्रस्ताव मागितले आहेत. केंद्र सरकारकडे सुद्धा प्रस्ताव पाठविला. निधीसंदर्भात जे प्रमाण ठरलेले आहे त्यानुसार केंद्र सरकारने काही निधी द्यावा आणि राज्य सरकारने काही निधी द्यावा, असे अपेक्षित होते. परंतु केंद्र सरकारने निधी दिला नाही, ही वेगळी बाब आहे. परंतु आता धनगर समाजाच्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहाकरिता चारही ठिकाणी जागा उपलब्ध झालेली आहे. परंतु केवळ धनगर समाजासाठीच वसतिगृह सुरु करावे काय असा विषय पुढे आला. त्यामध्ये इतर क, ड वर्गाचा समावेश करावा काय यावर चर्चा झाली. त्यासाठी निधीची आवश्यकता होती. परंतु आम्ही ओबीसी वसतिगृह म्हणून काही टोकन प्रोव्हीजन करीत आहोत. धनगर समाजाला ५० टक्के निधी दिला तर उर्वरित ५० टक्के इतरांना देण्याची आमची चर्चा झाली असून शासन निर्णय काढण्याची तयारी आहे. तसेच दुसरी योजना भटक्या जमाती क वर्गातील धनगर जमातीतील वसतिगृहापासून वंचित असलेल्या विद्यार्थ्यांना आदिवासी विभागाच्या स्वयंयोजनेच्या धर्तीवर स्वतंत्र योजना कार्यान्वित करणे ही होती. या अनुषंगाने वित्त विभागाने शासन निर्णय काढलेला आहे. या वर्षी या योजनेसाठी १२.५० कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. तिसरी योजना भटक्या जमाती प्रवर्गातील धनगर समाजाच्या गुणवंत विद्यार्थ्यांना नामांकित इंग्रजी माध्यमाच्या शाळेत प्रवेश

असुधारित प्रत

देण्याबाबतची होती. त्यानुसार नामांकित शाळा निश्चित होऊन ५५०० विद्यार्थ्यांचे प्रवेश सुरु आहेत. नंतर श्री.कांबळे.....

असुधारित प्रत

श्री. विजय वडेट्टीवार ....

विद्यार्थ्यांना रेसिडेन्शिअल स्कूलमध्ये प्रवेश सुरु आहे. आपण शाळा करीत नाही. सीबीएसई व इंग्रजी माध्यमांच्या नामांकित शाळा आहेत, तेथे धनगर समाजाच्या मुलांना प्रवेश देतो. आम्ही यावर्षी या संदर्भात पाहत आहोत. मंत्रिमंडळापुढे प्रस्ताव आहे. १० हजार संख्या आहे. आता साडे पाच हजार घेतले आहेत. पुन्हा साडे पाच हजार आहेत. आपण ऐकावे की, पुन्हा साडे पाच हजार विद्यार्थी वाढविण्याचा प्रस्ताव वित्त विभागाकडे पाठविलेला आहे. सर्व गुणांवर आहे. ५० हजार रुपये, ६० हजार रुपये, ७० हजार रुपये असे यामध्ये आहे. साडे पाच हजार विद्यार्थी आहेत आणि पुढे ती संख्या वाढवित आहोत. अहिल्याबाई होळकर घरकुल योजना बेघरांसाठी राबवायची होती. आम्ही यावर्षी ४२०० संख्या पाहत आहोत. १० हजार घरकुले बांधून द्यायची होती. ४२०० ची यादी तयार आहे. आपल्याला पाहिजे त्यावेळी ती यादी घेऊ. ४२०० चा प्रस्ताव आला आहे. ११८८ लोकांना मंजूर केले आहे. बाकी छाननीमध्ये आहेत.

सभापती महोदय, भटक्या जमाती, अल्पसंख्याक समाजासाठी आवश्यक असलेल्या परंतु अर्थसंकल्पीत निधी उपलब्ध नसलेल्यांना योजना राबविण्यासाठी न्युक्लिअस बजेट. आपण हे विद्यार्थी महाज्योतिला दिले आहेत आणि त्यासाठी ६ कोटी १६ लाख रुपये आहेत. योजना क्रमांक ५ , क्रमांक ६, क्रमांक ९ या सर्वांसाठी साडे सहा कोटी रुपये असून विद्यार्थ्यांना युपीएससी, एमपीएससी जेई, नीट, ट्रिपल-ई, बँकिंग व्यवस्था, पोलीस प्रशिक्षण यासाठी साडे सहा कोटी रुपये महाज्योतिच्या माध्यमातून आहेत. आपल्याकडे स्वतंत्र काही नाही. महाज्योतिच्या माध्यमातून धनगर समाजाच्या मुलांना पीएचडीपासून सर्व ठिकाणी प्रवेशासाठी दिले आहेत आणि त्यासाठी लागणारा खर्च ६ कोटी ७० लाख रुपये आहे. सातवा मुद्दा असा आहे की, केंद्र सरकारच्या स्टॅण्ड अप इंडिया योजनेंतर्गत नवउद्योजकांना सहाय्य करण्यासाठी मार्जिन मनी. आम्ही व्हीजेएनटी महामंडळाकडून धनगर समाजासाठी मार्जिन मनी देण्यासाठी प्रस्ताव मागितला आहे. अद्याप एकही प्रस्ताव

असुधारित प्रत

श्री. विजय वडेट्टीवार ....

संचालकांकडून आलेला नाही. संचालकांना सूचना दिलेल्या आहेत. त्यांनी त्यांच्या स्तरावर पत्रव्यवहार केला आहे. सहायक संचालकांकडे जाहिराती देखील दिल्या आहेत. आम्ही त्यासाठी सुध्दा ५ कोटी रुपयांची टोकन तरतूद करुन ठेवली आहे. मी स्पर्धा परीक्षा, क्रमांक ८ चे सांगितले आहे. क्रमांक ९ मध्ये आपण बेरोजगार युवकांना स्पर्धापरीक्षा आणि शुल्क आर्थिक सवलतीचे सांगितले. क्रमांक १० भटक्या जमाती क प्रवर्गातील धनगर समाजाच्या सभासदांच्या सहकारी सूत गिरण्यांना भांडवल उपलब्ध करुन देण्याबाबत आहे. हा प्रस्ताव वित्त विभागाकडे आहे. प्रस्ताव पाठवून एक महिना झालेला आहे. बजेटमुळे तो प्रस्ताव थांबलेला आहे. मी काल सचिवांशी बोललो की, या संदर्भातील प्रस्तावाला मान्यता द्यावी म्हणजे आम्हाला शासन निर्णय काढून पूर्ण धोरण ठरवून करता येईल. आम्ही त्यांच्या मान्यतेसाठी पाठविले आहे. प्रस्तावाला मान्यता मिळाल्याबरोबर हे देखील आम्ही लागू करु. राहिलेले ३ विषय माझ्याशी संबंधित नाहीत. त्यांचा संबंध पशुसंवर्धन विभागाशी आहे. मी माहिती घेतली आहे. तीनही योजनांचे शासन निर्णय त्यांनी काढले आहेत. मी मागच्या १५ दिवसांपूर्वी सही करुन दिली. शेळी-मेंढी वाटप व प्रशिक्षणासाठी ४३ कोटी रुपयांच्या प्रस्तावावर मान्यता झालेली आहे. मी सही करुन तो प्रस्ताव त्यांच्याकडे पाठविला आहे. वित्त विभागाची परवानगी मिळून पैसे आले की, पशुसंवर्धन विभाग त्यावरील अंमलबजावणी करणार आहे. बाकीचे दोन प्रश्न कृषी व पदुम विभागाकडे आहेत. त्यांनी त्या विषयी शासन निर्णय काढलेले आहेत. ते विषय हाताळत आहेत.

श्री. महादेव जानकर : सभापती महोदय, मागच्या सरकारच्या काळात धनगर समाजासाठीच्या २२ योजनांपैकी १३ योजना मान्य करण्यासाठी परवानगी दिली होती. शेवटी माननीय मंत्री म्हणाले ते बरोबर आहे. शेवटी त्या काळात आचारसंहितेच्या अगोदर १ हजार कोटी रुपयांची तरतूद केली होती. माझी त्यांना विनंती आहे की, यातील बऱ्याचशा योजना अशा आहेत की त्यांचे आम्ही टोकन देखील काढले होते. काही ठिकाणी हजार रुपये, काही ठिकाणी बाराशे रुपये होते. २

असुधारित प्रत

श्री. महादेव जानकर ....

दिवस मंत्रालय सुरु करुन या योजनांचा शासन निर्णय काढण्यात आला होता. परंतु दुर्दैव असे की, आचारसंहिता असल्यामुळे ती अंमलबजावणी करता आली नाही. आपल्याला विनंतीपूर्वक सांगणे आहे की, यातील काही शासन निर्णयांमध्ये त्रुटी आहेत. उदाहरण म्हणजे महाज्योतितून विद्यार्थ्यांना वसतिगृह द्यायचे होते. आम्ही डेअरी विभागाच्या माध्यमातून ४० हेक्टरच्या जागा माझ्याच काळात ॲलॉट केल्या होत्या. परंतु त्यासाठी २ अधिवेशने होऊन देखील जे बजेट करायला पाहिजे होते ते केले नाही त्याबाबत खेद वाटतो. बजेटमध्ये तरतूद केली पाहिजे होती. वसतिगृहाचे काम आज सुरु झाले असते. अमरावती, पुणे, मुंबई या सर्वच ठिकाणच्या डेअरी विभागाच्या जागा ॲलॉट करुन दिल्या होत्या. वसतिगृहाची तरतूद लवकरात लवकर व्हावी. दुसरी गोष्ट म्हणजे शेळी-मेंढी विकास आहे. आपण महाज्योतितून हा पैसा देत आहोत.

सभापती महोदय, आपण शेळी-मेंढी विकास महामंडळाला १०० कोटी रुपये पैसे दिले आणि त्यातून धनगर समाजाच्या मुलांना जर योजना लागू केली तर अतिशय चांगले होईल. आमची तशी योजना होती. आता तुम्ही महाज्योतिमध्ये घेतले आहे, त्याबाबत दुमत नाही. माझ्या मते पदुमकडे घेतले आहे. पदुमचे २ शासन निर्णय काढताना त्यात एक असे अडचणीचे ठरले आहे की, १२५ सहकारी संस्था महिला बचत गटाच्या स्थापन केलेल्या आहेत. तुमच्या काही अधिकाऱ्यांनी चुकीचा शासन निर्णय काढला आहे. मी काढलेला वेगळा होता आणि आताचा वेगळा शासन निर्णय आलेला आहे. शासन निर्णयामध्ये थोडासा बदल करावा अशी विनंती आहे. त्या शासन निर्णयामध्ये असे आहे की, सहकारी संस्था तसेच शंभर टक्के अनुसूचित जाती, जमाती, दिव्यांग सदस्य असणाऱ्या संस्थांना ८०:२० या प्रमाणात व्यवसााय करण्याकरिता कर्ज उपलब्ध होऊ शकते आणि याकरिता अर्जदारास सहकारी संस्थेचे संचालक मंडळ किंवा वैयक्तिक सदस्यांनी बँक ठेवीच्या स्वरुपात हमी देणे. ते शक्य नाही. सरकारने हमी घेतली तरच गरीब लोकांना त्याचा फायदा होऊ शकेल. नाही

असुधारित प्रत

श्री. महादेव जानकर ....

तर एकही संचालक डीसीसी बँकेत जाणार नाही. आम्ही अशा १२५ संस्था २ महिन्यांत तयार केल्या होत्या. माझी विनंती आहे की, त्यामध्ये थोडा बदल केला तर या संधी या समाजाला नक्कीच मिळतील आणि समाजाचे भले होईल.

सभापती महोदय, दुसरी गोष्ट म्हणजे वसतिगृहाबाबत सारखे सांगत आहात की, या समाजाच्या मुलांना इंग्रजी माध्यामंना दिले. ती रक्कम तोकडी पडत आहे. आपण ती वाढविणार आहात का ? धनगर समाजाच्या मुलांना उद्योगपती बनविण्याचे ठरवित आहोत. आपण त्यासाठी अण्णासाहेब पाटील महामंडळाच्या धर्तीवर शेळी विकास महामंडळाला पैसे दिले, ऊस तोड कामगार महामंडळाला पैसे दिले तशा प्रकारची २० लाख रुपयांची तरतूद बिनव्याजी दिली तर त्या समाजातील लोक कामगार बनण्यापेक्षा तेथे उद्योगपती वाढतील. आपण त्याबद्दल निर्णय घ्यावा अशी मी विनंती करतो.

श्री. विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, मार्जिन मनीचा विषय आहे. आम्ही त्याबात कार्यवाही करीत आहोत. आम्ही ओबीसी महामंडळ किंवा व्हीजेएनटी महामंडळ यांच्या माध्यमातून नक्की या ठिकाणी सांगणार आहोत की, त्यांचे प्रस्ताव मागविले आहेत. पैसे आल्याबरोबर त्यांना मार्जिन मनी उपलब्ध करुन देऊ. आपण वसतिगृहाच्या संदर्भात निधी वाढविण्याबाबत सुतोवाच केले. आपण एका मुलामागे ७० हजार रुपये नामांकित शाळेत देत आहोत. एक नंबरची शाळा असेल तर शाळेला गुणांकनावर आधारीत पैसे देतो. ८० टक्के गुण असतील तर ७० हजार रुपये, ६० ते ८० टक्के गुण असतील तर ६० हजार रुपये, ५० टक्के गुण असतील तर, विद्यार्थीसंख्या .... त्या भागात दुसरी शाळा उपलब्ध नसेल तर ५० हजार रुपये आहेत. आपण नामांकित शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना ५० हजार रुपये, ६० हजार रुपये, ७० हजार रुपये असे पैस देत आहोत. सूत गिरणीच्या संदर्भात काही चुकीचे झाले असेल तर मी त्या विभागाशी चर्चा करुन तुम्हालाही बोलावून घेऊन काही प्रश्न

श्री. विजय वडेट्टीवार ....

चर्चेतून सुटून त्यातून झालेली चूक दुरुस्त करता येऊ शकत असेल तर नक्की करु.

श्री. गोपिचंद पडळकर : सभापती महोदय, माझे माननीय मंत्र्यांना काही स्पेसिफिक प्रश्न आहेत. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, वसतिगृहाच्या बाबतीत आम्ही जमीन उपलब्ध करुन दिली आहे. जमीन उलपब्ध करुन दिलेली असताना विभागीय ठिकाणी म्हणजे मुंबई, अमरावती, नागपूर, पुणे, औरंगाबाद येथे वसतिगृहे करण्याच्या टेंडरची घोषणा कधी करणार आहात ? ज्या मुलांना वसतिगृहांमध्ये प्रवेश मिळत नाही, महसूल, जिल्हा व तालुका अशा ठिकाणी प्रत्येक विद्यार्थ्याला निधी देण्याची घोषणा केली आहे. आपण त्याची अंमलबजावणी कधी करणार आहात, किती तरतूद करणार आहात ? धनगर समाजातील लोकांना दरवर्षी १० हजार घरे देण्याचे मान्य केले असताना त्यामध्ये जाचक अट टाकली आहे की, ते बेघर व भूमिहिन असावेत. धनगर समाज हा रानावनात राहणारा समाज आहे, त्यांची २-४ एकर नापीक जमीन आहे. आपण ती अट काढून टाकावी. आपण दरवर्षी १० हजार घरे देणार होतो. सन २०१९-२० ला निर्णय झाला आहे. सन २०१९-२०, सन २०२०-२१, सन २०२१-२२ हा अनुशेष राहत आहे. आपण तो अनुशेष भरुन काढणार आहात का ?

नंतर श्री. खर्चे ....

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.११८४७....

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, त्यावेळी शासन निर्णय काढताना केंद्र शासनाच्या बाबू जगजीवनराम या योजनेतून ही वसतिगृहे बांधावीत असा निर्णय घेण्यात आला होता. त्यानंतर केंद्र शासनाकडे दोन वेळा प्रस्ताव सादर करण्यात आले. त्यानंतर काही त्रृटी काढण्यात आल्या त्याची पूर्तता केल्यावर प्रस्ताव सादर करण्यात आले व त्यानंतर पुन्हा त्रृटी काढण्यात आल्या असून त्याची पूर्तता करण्याचे काम सुरु आहे. नाशिक, औरंगाबाद व नागपूर येथे शासकीय दूध योजनेची जागा मिळालेली आहे. आता केंद्र शासनाची वाट न पाहता ७२ वसतिगृहे बांधण्याचा निर्णय घेतला असून अंतिम मान्यता झालेली आहे. पुढील सत्रात ती सुरु करण्यात येणार आहेत. वसतिगृहांची संख्या वाढवून धनगर समाजाचा त्याच समावेश करायचा काय किंवा त्यांच्यासाठी वेगळी वसतिगृहे बांधायची याबाबत आपण चर्चा करु. धनगर समाजाला न्याय देतांना कोणतीही अडचण येता कामा नये.

सभापती महोदय, १० हजार घरकुलांबाबत जी अट आहे ती कमी करायला पाहिजे. भूमिहीन बेघर हा शब्द काढून अल्पभूधारक हा शब्द तेथे नमूद करण्यात येईल व त्यांना ती घरकुले मिळायला पाहिजेत. अनुशेषाबाबत मी असे सांगू शकतो की, दोन वर्षे कोणत्याही विभागाला पैसे मिळाले नाहीत. कोरोना काळात सर्व विभागाचा २५ ते ४० टक्के निधी कपात करण्यात आलेला आहे याची आपणा सर्वांना माहिती आहे. या वर्षापासून या कामांची सुरुवात केली आहे. जेवढे प्रस्ताव येतील त्या १०० टक्के प्रस्तावांना मान्यता देण्यात येईल. सन्माननीय सदस्यांनी सांगायचे की हे प्रस्ताव आले त्यामध्ये अल्पभूधारक अशी सुधारणा करुन जे प्रस्ताव देतील त्या सर्वांना घरे देण्यात येतील.

श्री.सदाभाऊ खोत : सभापती महोदय, इंग्रजी नामांकित माध्यमिक निवासी शाळांमध्ये विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याबाबत निर्णय घेतला व त्यासाठी निधी दिला ही बाब चांगली आहे. निवासी शाळांसाठी ५० हजार व ७० हजार रुपये फी अनुदान देण्यात येते. ज्या चांगल्या नामांकित शाळा आहेत त्यांना इतक्या रकमेत तेथील विद्यार्थ्यांना प्रवेश मिळत नाही किंवा अशा शाळा शासनाकडे प्रस्ताव सादर करीत

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.११८४७....

श्री.सदाभाऊ खोत....

नाहीत. माझी विनंती अशी आहे की, ती रक्कम वाढविली पाहिजे. नामांकित शाळांची फी एक ते दीड लाख रुपये आहे. ही रक्कम वाढविण्याबाबत मंत्री महोदय फेरविचार करतील काय ?

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, आदिवासी विभागाने ही योजना ज्या पध्दतीने राबविली त्या पध्दतीने व त्या जीआरचा आधार घेऊन ही योजना राबविण्यात येत आहे. यामध्ये कोणताही बदल केलेला नाही. ही रक्कम कमी पडते हे मान्य आहे, ज्या चांगल्या नामांकित शाळा आहेत तेथे वसतिगृहे नाहीत. निवासी शाळा नाहीत, त्या डे बार्डींगच्या आहेत, ज्या निवासी शाळा आहेत तेथे काही थोड्या फार उणिवा आहेत. आता प्रस्ताव खूप आले आहेत. १० हजार मुलांना त्या शाळा प्रवेश देऊ शकतील.आपण जो कोटा ठरविला तो पूर्ण झाला आहे. १० हजार अतिरिक्त मुलांचे प्रस्ताव मागवित असताना उद्देश असा होता की, साडेपाच हजार मुले धनगर समाजाची व साडेचार हजार मुले विविध समाजातील क गटात मोडणाऱ्या मुलांचा समावेश करायचा आहे.

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी मघाशी सांगितले की, वसतिगृहांची बांधकामे कालबध्द कार्यक्रम तयार करुन पूर्ण करणार आहेत. सन्माननीय सदस्य श्री.महादेव जानकर हे मंत्री असताना या जागा घेण्यात आल्या आहेत. वसतिगृहे बांधण्यासाठी निधीची तरतूद करण्यात आली आहे काय असेल तर तो निधी किती आहे. तरतूद केली नसेल तर आताच्या बजेटमध्ये तरतूद करावी अशी माझी विनंती आहे. प्रवेशासाठी जागा कमी आहेत असा विषय मांडण्यात आला. कॉन्व्हेंट ह्या मोठ्या शाळा आहेत त्यांच्या खर्चाप्रमाणे व इन्फ्रास्ट्रक्चर प्रमाणे त्यांना त्या जागा कमी पडतात. त्यांच्या जागा वाढविण्यासाठी काय भूमिका घेण्यात येणार आहे. ओबीसी व अण्णासाहेब पाटील महामंडळाकडून २५ लाख रुपयांपर्यंतचे कर्ज उद्योग व व्यवसायासाठी दिले जाते. धनगर समाजाच्या मुलामुलींना व्यवसाय

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.११८४७....

श्री.प्रवीण दरेकर....

करण्यासाठी २५ लाख रुपये कर्जाच्या व्याजाची प्रतीपूर्ती करुन धनगर समाजाच्या मुलामुलींना कर्ज देण्यासंदर्भात शासन निर्णय घेणार आहे काय ?

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, त्यावेळेस तीन ठिकाणी जागा मिळाल्या होता. केंद्र शासनाच्या बाबू जगजीवनराम घरकुल योजनेसाठी प्रस्ताव पाठविण्यात आले होते. त्यात काही त्रुटी काढण्यात आल्या त्याची पूर्तता केल्यावर पुन्हा प्रस्ताव पाठविले आहेत. त्यानंतर त्रुटी काढल्यावर पुन्हा पूर्तता करुन प्रस्ताव पाठविण्यात आले आहेत. त्यास अद्याप मान्यता मिळालेली नाही. म्हणून ओबीसी मुलांच्या वसतिगृहामध्ये या मुलांचा समावेश करण्याचे ठरविले आहे. रक्कम वाढविण्याबाबत आदिवासी विकास विभागासोबत चर्चा करुन चांगल्या शाळेसाठी अधिक निधी देता येईल काय याबाबत विचार करण्यात येईल. या कामांसाठी निधीची तरतूद करण्यात आली आहे. जीआर काढण्यात आला म्हणजे निधीची तरतूद करण्यात आली. एका वसतिगृहासाठी २० कोटी रुपये केंद्र शासनाकडून अपेक्षित आहेत. यामध्ये २५ टक्के हिस्सा राज्य शासनाचा व ७५ टक्के हिस्सा केंद्र शासनाचा असतो. बांधकामासाठी केंद्र शासन पैसे देते. वसतिगृह चालविण्याचा खर्च राज्य सरकारला करावा लागतो.

श्री.महादेव जानकर : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी १० हजार घरासंदर्भात जी अट होती ती काढली त्याबाबत मी मंत्री महोदयांचे अभिनंदन करतो.

------

असुधारित प्रत

**बोधीवृक्ष शिक्षण व बहुउद्देशीय संस्था, शेगाव (जि.बुलढाणा)**
**शाळेच्या हस्तांतरणाबाबत**

**(५) * १२७४६ डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सामाजिक न्याय विभागाच्या दिनांक २९ ऑक्टोबर, २०२० रोजीच्या शासन निर्णयानुसार एकूण ८ केंद्रिय आश्रमशाळांना मान्यता दिली असून सामाजिक न्याय विभागाने सादर केलेल्या प्रस्तावामध्ये बोधीवृक्ष शिक्षण व बहुउद्देशीय संस्था, शेगाव (जि.बुलढाणा) या संस्थेच्या दोन शाळांना मान्यता देण्यात आली असल्याचे माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बोधीवृक्ष शिक्षण व बहुउद्देशीय संस्था, शेगाव (जि.बुलढाणा) ही संस्था नियमबाह्य पध्दतीने कै.बाजीराव पाटील वाचनालय ताकविकी (जि.उस्मानाबाद) या संस्थेला हस्तांतरित करण्यात आली असून सदर शाळेच्या हस्तांतरणाबाबतची चौकशी आयुक्त, समाज कल्याण विभाग यांचेमार्फत करुन संबंधितांवर गुन्हे दाखल करण्यात यावे अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शाळा हस्तांतरणाबाबत दोषी असणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
**श्री.धनंजय मुंडे :** (१) नाही. दिनांक २९ ऑक्टोबर, २०२१ च्या शासन निर्णयान्वये एकूण ८ आश्रमशाळांना मान्यता देण्यात आली असून यामध्ये बोधीवृक्ष शिक्षण व बहुउद्देशिय संस्था शेगाव (जि.बुलढाणा) संचलित एका आश्रमशाळेचा समावेश आहे.
(२) नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१२७४६....

डॉ.परिणय फुके : सभापती महोदय, या प्रश्नाला जे लेखी उत्तर दिले ते चुकीचे आहे. बोधीवृक्ष शिक्षण व बहुउद्देशीय संस्था, शेगांव जि.बुलढाणा ही संस्था नियमबाह्य पध्दतीने कै.बाजीराव पाटील वाचनालय ताकविकी, जिल्हा उस्मानाबाद या संस्थेला हस्तांतरित करण्यात आली असून सदर शाळेच्या हस्तांतरणाबाबतची चौकशी आयुक्त, समाज कल्याण विभाग यांचेमार्फत करुन संबंधितांवर गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी लोकप्रतिनिधींनी केली आहे काय ? या प्रश्नाला 'नाही' असे उत्तर देण्यात आले आहे. मी स्वत: या संस्थेबाबत तक्रार केली आहे. दिनांक १८ जानेवारी २०२२ रोजी मंत्री महोदयांकडे सविस्तर तक्रार दाखल केली आहे. याबाबत मंत्री महोदय संबंधितावर गुन्हा दाखल करुन कारवाई करतील काय ?

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, बोधीवृक्ष शिक्षण संस्थेसंदर्भात हा प्रश्न आहे. हे खरे आहे की, पहिले उत्तर आम्ही 'नाही' म्हणून दिले आहे. याचे कारण असे आहे की, प्रश्नामध्ये विचारताना सामाजिक न्याय विभागाच्या दिनांक २९ ऑक्टोबर, २०२० रोजीच्या शासन निर्णयानुसार परवानगी मिळाली आहे काय तर तसे नसून बोधीवृक्ष शिक्षण संस्थेला सन २०२१ मध्ये परवानगी मिळालेली आहे. त्यासाठी हे क्रमांक एक च्या प्रश्नाला 'नाही' उत्तर देण्यात आले आहे. सन २०२१ रोजी ८ संस्थांना कायम विना अनुदानित म्हणून मंजूरी देण्यात आली त्यामधील चार क्रमांकावर बोधीवृक्ष शिक्षण व बहुउद्देशीय संस्था, शेगांव जिल्हा बुलढाणा या शाळेचे नाव आहे. त्याच प्रमाणे क्रमांक पाच वर बोधीवृक्ष शिक्षण व बहुउद्देशीय संस्थेचे नाव होते ते बुलढाणा जिल्ह्यातील मोताळा ही संस्था आहे. बोधीवृक्ष शिक्षण संस्थेच्या संचालक मंडळाने मोताळ्याची शिक्षण संस्था बदलून कै.बाजीराव पाटील वाचनालय ताकविकी यांना हस्तांतर व स्थलांतर करण्याचा ठराव दिला. ही कार्यवाही होत असताना त्यावेळी कोणत्याही लोकप्रतिनिधीचे कोणतेही पत्र आलेले नव्हते. संस्थेने जो ठराव दिला त्यानुसार हस्तांतर व स्थलांतर झाले आहे. हे स्थलांतर सामाजिक न्याय विभागाने केले आहे. याबाबत लोकप्रतिनिधी यांनी लेखी तक्रार केली असेल

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१२७४६....

श्री.धनंजय मुंडे....

व यामध्ये चुकीचे काही झाले असेल तर चौकशी करुन या शाळेची परवानगी रद्द करता येईल.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

----------

या नंतर श्री.बोरले...

असुधारित प्रत

**पृ.शी.:** लेखी उत्तरे
**मु.शी.:** तारांकित प्रश्नोत्तराची यादी सभागृहासमोर ठेवणे.

**उप सचिव (श्री.तारवी) :** सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने दिनांक ३ मार्च, २०२२ रोजीची तारांकित प्रश्नोत्तरांची यादी सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : दिनांक ३ मार्च, २०२२ रोजीची तारांकित प्रश्नोत्तरांची यादी सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

( प्रेस : येथे सोबत जोडलेली यादी छापावी.)

------

असुधारित प्रत

**पृ.शी./मु.शी :** कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

श्री.शंभुराज देसाई (वित्त राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "महाराष्ट्राची आर्थिक पाहणी सन २०२१-२०२२ हे प्रकाशन" सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : प्रकाशन सभागृहासमोर ठेवण्यात आले आहे.

--------

श्री.दत्तात्रय भरणे (पशुसंवर्धन राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ मर्यादित, पुणे यांचा सन २०१९-२०२० या वर्षाचा एक्केचाळीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

--------

श्री.संजय बनसोडे (संसदीय कार्य राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना - महाराष्ट्र व राज्य रोजगार हमी योजना या योजनांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

--------

श्री.संजय बनसोडे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांचा सन २०१९-२०२० या वर्षाचा प्रशासन अहवाल" सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

असुधारित प्रत

--------

**पृ.शी./मु.शी.** : नियम ९३ अन्वये सूचना.

**सभापती** : माझ्याकडे आज गुरुवार, दिनांक १० मार्च, २०२२ रोजी म.वि.प. नियम ९३ अन्वये प्राप्त झालेल्या सूचनांपैकी मान्य करण्यात आलेल्या सूचना सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आल्याचे मी घोषित करतो.

(प्रेस : येथे नियम ९३ च्या सूचना जोडाव्यात.)

-------

असुधारित प्रत

**पृ.शी./मु.शी.** : विद्यार्थ्यांची शाळांकडून हॉल तिकिटसाठी अडवणूक केली जात असणे याबाबत ॲड.निरंजन डावखरे, वि.प.स. यांनी नियम ९३ अन्वये दिलेली सूचना.

श्री.बच्चू कडू (शालेय शिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, नियम ९३ अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी आपल्या अनुमतीने सूचना क्रमांक १ चे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

--------

असुधारित प्रत

ॲड.निरंजन डावखरे : सभापती महोदय, शाळेची फी भरल्यानंतरच परीक्षेचे हॉल तिकीट दिले जाईल असे विद्यार्थ्यांना व पालकांना सांगितले जाते. त्यामुळे संस्था व पालकांमध्ये तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. माझा स्पेसिफक प्रश्न असा आहे की, संस्था विद्यार्थ्यांचे हॉल तिकीट अडविणार नाही, पालकांना दिलासा मिळेल या संदर्भात शासनाने कायदा केलेला आहे काय ? तसेच, कोरोनामुळे संस्थांचे आर्थिक नुकसान झालेले आहे, संस्थांवर आर्थिक भार पडलेला आहे. विद्यार्थ्यांची फी थकलेली असेल तर शासन संस्थांना मदत करणार आहे काय ?

श्री.बच्चू कडू : सभापती महोदय, या संदर्भात माझ्याकडे देखील तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. विद्यार्थ्यांनी परीक्षा फी किंवा शिक्षण शुल्क भरले नाही म्हणून काही शाळांनी परीक्षेचे हॉल तिकीट देण्यास नकार दिला होता. मुख्याध्यापक किंवा प्राचार्य विद्यार्थ्याने फी भरलेली नसल्यामुळे परीक्षचे हॉल तिकीट देत नसेल तर आपण त्यासाठी पर्यायी व्यवस्था केलेली आहे. सन्माननीय सदस्य ॲड.निरंजन डावखरे यांची म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना प्राप्त झाल्यानंतर मी लगेच शिक्षण आयुक्तांबरोबर संपर्क साधला, सचिवांबरोबर चर्चा केली. मुख्याध्यापक विद्यार्थ्याने शाळेची फी भरली नाही म्हणून परीक्षेचे हॉल तिकीट देत नसेल तर शिक्षण निरीक्षक, शिक्षण उप निरीक्षक, शिक्षण प्रमुख, शिक्षणाधिकारी, प्रशासन अधिकारी पर्यायी व्यवस्था म्हणून परीक्षेचे हॉल तिकीट देऊ शकतील. आपल्याला परीक्षेचे हॉल तिकीट मिळेल किंवा नाही या चिंतेमुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून आपण प्रथमच अशी पर्यायी व्यवस्था केलेली आहे. परीक्षेचे हॉल तिकीट मिळाले नाही असे कोठेही आढळून आले तर मुख्याध्यापकाशिवाय इतरही लोकांची स्वाक्षरी घेऊन विद्यार्थ्याला परीक्षेसाठी बसता येईल, अशी पर्यायी व्यवस्था करण्यात आलेली आहे. तसेच, कोरोना काळात ज्या शाळांचे नुकसान झाले त्यांना अनुदान देता येईल काय याबाबत दुसरा प्रश्न विचारण्यात आलेला आहे. मागील ५०-६० वर्षात प्रथमच अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. मागील ५० वर्षात शाळांनी फी कमी करावी असे आपण म्हटले नाही. जेवढी पाहिजे तेवढी फी घ्यावी. ७५ टक्के शाळा अशा आहेत की, ज्यांनी शिक्षण शुल्क अधिनियमानुसार फी आकारलेली

श्री.बच्चू कडू.......

नाह. उलट जास्त फी आकारलेली आहे. आपल्याकडे या संदर्भात पाहिजे तेवढे अनुभव आहेत. आपण या संदर्भात कारवाई करणार आहोत. त्यामुळे वेगळे अनुदान देण्याची आवश्यकता पडणार नाही.

-------

असुधारित प्रत

**राज्यातील जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (डायट) कर्मचाऱ्यांचे वेतन नियमित करण्याबाबत पॉईंट ऑफ इन्फर्मेशन**

श्री.किरण सरनाईक : सभापती महोदय, राज्यातील जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (डायट) कर्मचाऱ्यांचे वेतन नियमित करण्याबाबत या विषयाकडे मी पॉईंट ऑफ इन्फर्मेशनच्या माध्यमातून शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो.

सभापती महोदय, राज्यातील शालेय शिक्षणाचा कणा समजला जाणाऱ्या जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (डायट) मधील अधिकारी व कर्मचाऱ्यांचे गेल्या दोन वर्षांपासून पगार नियमितपणे होत नाहीत. त्यामुळे सदर कर्मचारी मोठ्या आर्थिक अडचणीत सापडलेले आहेत. सदर कर्मचारी शिक्षण आयुक्त कार्यालयासमोर साखळी उपोषणास बसलेले आहेत. राज्याच्या इतिहासात पहिल्यांदाच राजपत्रीत अधिकाऱ्यांना वेतनासाठी उपोषणास बसण्याची वेळ आलेली आहे. हे सर्व अधिकारी शासनाचे नियमित कर्मचारी असून त्यांची निवड महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत झालेली आहे. त्यामुळे डायट मधील अधिकारी व कर्मचाऱ्यांना नियमित पगार करणे ही शासनाची जबाबदारी आहे. मागील ५ महिन्यांपासून सदर कर्मचाऱ्यांना वेतन मिळाले नसल्यामुळे बँकांचे गृह कर्ज, शैक्षणिक व वाहन कर्जाचे हप्ते थकीत झालेले आहेत. घर कसे चालवावे असा प्रश्न या अधिकाऱ्यांसमोर निर्माण झालेला आहे. शासनाने उपरोक्त अधिकारी/कर्मचाऱ्याचे नियमित वेतन सुरु करण्यासाठी योग्य ती कार्यवाही करावी. मागील ५ महिन्यांपासून त्यांना वेतन मिळालेले नाही. त्यांना तातडीने वेतन देण्यात यावे, अशी माझी विनंती आहे.

श्री.बच्चू कडू : सभापती महोदय, आम्ही या संदर्भात आज बैठक आयोजित केली असून हा विषय निकाली काढण्याचा प्रयत्न केला जाईल.

**सभापती** : मंत्री महोदय, सदर बैठकीसाठी सन्माननीय सदस्यांना देखील निमंत्रित करावे.

श्री.बच्चू कडू : सभापती महोदय, होय.

--------

असुधारित प्रत

**मुलीला गुंगीचे औषध देऊन तिच्यावर अत्याचार करण्यात आल्याबाबत पॉईंट ऑफ इन्फर्मेशन**

श्री.विलास पोतननीस : सभापती महोदय, चेंबूर येथील कुंटनखान्यातून पीडित १७ वर्षीय मुलीची सन २०१९ मध्ये सुटका करण्यात आली होती. मागील वर्षभरापासून या मुलीला गुंगीचे औषध देऊन एका नराधमाकडून तिच्यावर अत्याचार करण्यात आले. सदर घटनेचे चित्रीकरण करुन त्या मुलीला धमकावून वेश्या व्यवसायात ढकलण्यात आल्याची गंभीर बाब समुपदेशनातून उघडकीस आली आहे. या नराधमाने तिच्या तीन लहान बहिणींवर देखील अत्याचार केले. या प्रकरणी आरसीएफ पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. सदर प्रकरणी शासनाने तत्काळ निवेदन करावे, अशी माझी विनंती आहे.

**सभापती** : शासनाने निवेदन करावे, नोंद घ्यावी.

--------

असुधारित प्रत

**नागपूर येथील क्रेटा कॉलनीत अर्भक आढळून आल्याबाबत**

**पॉईंट ऑफ इन्फर्मेशन**

श्री.प्रवीण दटके : सभापती महोदय, काल नागपूर येथील क्रेटा कॉलनीतील उकीरड्यावरील कचरा वाहून नेताना सॉलिड वेस्ट मॅनेजमेंटच्या ट्रकमध्ये ६ अर्भक आढळून आलेली आहेत. आर्वी येथे दोन महिन्यापूर्वी अशी घटना घडली होती. बीड जिल्ह्यात सुद्धा काही दिवसांपूर्वी अशी घटना घडली होती. राज्यात वारंवार अशा प्रकारच्या घटना घडत आहेत. हॉस्पिटलवर कोणाचेही नियंत्रण नाही. शासनाने याबाबत निवेदन करावे, अशी माझी विनंती आहे.

**सभापती :** शासनाने निवेदन करावे.

-------

असुधारित प्रत

**कोरोना काळात निर्बंध मोडल्यामुळे दाखल करण्यात** आलेल्या

**गुन्ह्यांबाबत पॉईंट ऑफ इन्फर्मेशन**

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, कोरोना संकटाला दिनांक २२ मार्च, २०२२ रोजी दोन वर्षे पूर्ण होतील. कोरोना काळात अनेक वेळा लॉकडाऊन घोषित करण्यात आले. कोरोना काळात शासनाकडून अनेक निर्बंध लादण्यात आले होते. कोरोना काळात तरुण उमेदवार, तरुण मुले, कॉलेजमधील मुले-मुली परीक्षेसाठी, औषधे आणण्यासाठी किंवा दवाखान्यात जाण्यासाठी घराबाहेर पडले होते. परंतु त्यांच्यावर निर्बंध मोडल्यामुळे गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. ते पोलीस गुन्हे नाहीत. परंतु त्यांच्यावर गुन्हे दाखल झालेले आहेत. त्यामुळे त्यांना नोरीसाठी किंवा शिक्षणासाठी अर्ज करताना अडचण येते. माननीय गृहमंत्री महोदय या संदर्भात झालेल्या बैठकीस उपस्थित होते. या संदर्भात चर्चा झालेली आहे. माननीय गृह राज्यमंत्री सभागृहात उपस्थित आहे.

यानंतर श्री.सांगळे.......

असुधारित प्रत

श्री.विक्रम काळे....

माननीय गृह राज्यमंत्री यांनी या बाबतीत सविस्तर निवेदन करावे. तसेच त्यांच्यावरील सर्व गुन्हे मागे घ्यावेत जेणेकरुन विद्यार्थी व उमेदवारांना कोठेही अर्ज करताना त्रास होणार नाही. अधिवेशन संपूण्यापूर्वी शासनाने यासंबंधी कार्यवाही करावी.

श्री.शंभुराज देसाई : सभापती महोदय, या संदर्भात सरसकट गुन्हे मागे घेणे अशक्य आहे. परंतु ही बाब तपासून घेतली जाईल. तसेच अशा प्रकारे गुन्हे मागे घेण्याचे अर्ज आल्यास त्याबाबत जिल्हा पोलीस अधीक्षकांना मेरिटवर निर्णय घेण्याच्या सूचना दिल्या जातील. खरोखर कोविड नियम मोडले नसतील व रास्त कारणासाठी कोणी बाहेर पडले असतील कारण त्यावेळी काही मुले जाणीवपूर्वक घराबाहेर जात होती. पोलिसांनी त्यावेळी त्यांना प्रतिबंध देखील केला होता. या संदर्भात आपल्याला प्रत्येक केस स्वतंत्रपणे तपासून घ्यावी लागेल.

----------

असुधारित प्रत

विधानपरिषद सदस्यांना विकास निधीमिळण्याबाबत पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशन

श्री.नरेंद्र दराडे : सभापती महोदय, राज्यामध्ये विविध कामे करण्यासाठी विधानसभा सदस्यांना विकास निधी दिला जातो. त्याप्रमाणे विधानपरिषद सदस्यांना देखील विकास निधी मिळावा अशी मी आपल्याला विनंती करतो.

-------

असुधारित प्रत

**पृ.शी.** : अल्पसंख्याक समाजाचे प्रश्न सोडविणाऱ्या विविध महामंडळांमध्ये मोठया प्रमाणात पदे रिक्त असणे

**मु.शी.** : अल्पसंख्याक समाजाचे प्रश्न सोडविणाऱ्या विविध महामंडळांमध्ये मोठया प्रमाणात पदे रिक्त असणे यासंबंधी डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अमरनाथ राजुकर, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.राजेश राठोड, डॉ.सुधार तांबे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

डॉ.वजाहत मिर्झा (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम १०१ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय अल्पसंख्याक मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" राज्यातील अल्पसंख्यांक समाजाच्या हक्क व सर्वांगीण प्रगतीसाठी राज्यात अल्पसंख्यांक विकास विभाग कार्यरत असणे, अल्पसंख्याक समाजाचे प्रश्न सोडविण्यासाठी विविध समित ीच्या, मंडळे कार्यरत असल ी तरी तेथे पूर्णवेळ अधिकाऱ्यांची पदे अनेक महिन्यांपासून रिक्त असणे, यामुळे सदर विभागाचे कामकाज इतर अधिकाऱ्यांना अतिरिक्त कार्यभार सोपवून सुरू असणे, मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळ येथे व्यवस्थापकीय संचालक नसणे, वक्फ बोर्ड व अल्पसंख्यांक आयोग येथे कर्मचाऱ्यांची कमतरता असणे, तसेच महाराष्ट्र राज्य हज कमिटी मध्ये १० पदे मंजूर असूनही फक्त ४ कर्मचारीच कार्यरत असणे, येथील कर्मचाऱ्यांना ६ व्या वेतन आयोगाची थकबाकी व ७ व्या वेतन आयोगाच्या शिफारशी नुसार वेतन व निवृत्तीचे लाभ मिळालेले नसणे, तसेच अल्पसंख्या ंक विकास विभागाच्या दिनांक १२ ऑक्टोबर, २००९ रोजीच्या अधिसूचनेनुसार हज कमिटीतील कार्यरत कर्मचाऱ्यांना लाभ न मिळणे, हज कमिटीत २९ वर्षे सेवा केलेले सहाय्यक पदावरील एका कर्मचाऱ्याचा कोविड-१९ मुळे २०२० मध्ये मृत्यू झालेला असूनही अद्यापही त्यांच्या कुटुंबियांना कुठलाही मोबदला शासनाकडून मिळालेला नसणे, दरवर्षी १० हजार पेक्षा जास्त यात्रेकरू हज यात्रेस जात असताना फक्त ४

असुधारित प्रत

डॉ.वजाहत मिर्झा...

कर्मचाऱ्यांवर त्यांच्या व्यवस्थेचा भार असणे, तेलंगणा राज्यात दरवर्षी ४ हजाराच्या आसपास हज यात्रेकरू असताना येथील हज कमिटीत १४२ कर्मचारी कार्यरत असणे, अल्पसंख्यांकांचा सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व सांस्कृतिक अशा प्रकारे सर्वसमावेशक उत्कर्ष, अल्पसंख्यांकांच्या हक्काचे संरक्षण हे सच्चर कमिटीच्या शिफारशीनुसार मुख्य उद्दिष्ट असणे, परंतु विभागातील बहुतांश पदे रिक्त असून त्यातील विविध मंडळे, समित्या, आयोगाच ा अपुरा कर्मचारी वर्ग व निधी अभावी अवस्था खूपच बिकट झालेली असणे, केंद्राकडून मिळणाऱ्या अनुदानाची प्रकरणे देखील प्रलंबित असणे, तरी राज्यातील अल्पसंख्यांक समाजाच्या विकासासाठी असलेल्या सर्व योजनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याची व येथील रिक्त पदे तातडीने भरण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

डॉ.विश्वजीत कदम (अल्पसंख्याक विकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

----------

असुधारित प्रत

डॉ.वजाहत मिर्झा : सभापती महोदय, अल्पसंख्याक समाजाचे प्रश्न सोडविण्यासाठी राज्यात विविध समित्या व महामंडळे कार्यरत आहेत. त्यात मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग, महाराष्ट्र राज्य हज समिती, महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकरण किंवा ऊर्दु ॲकेडमी असो यांचा समावेश आहे. परंतु तेथे पूर्णवेळ अधिकारी/कर्मचारी नसल्यामुळे त्यांच्या कामकाजात बाधा येत आहे. शासनाने अतिरिक्त कार्यभार दिलेले अधिकारी/कर्मचारी त्या महामंडळाचा कारभार करीत आहेत. विशेषत: मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळामध्ये ७५ पैकी फक्त ५० कर्मचारी कार्यरत आहेत. तेथील व्यवस्थापकीय संचालकांचे पद देखील रिक्त आहे. सदर महामंडळामार्फत विद्यार्थ्यांना शैक्षणिक कर्ज देण्याचे अतिशय महत्त्वाचे काम केले जाते. सदर महामंडळामध्ये कंत्राटी कर्मचारी कार्यरत असून तेथे कमी प्रमाणात कर्मचारी असल्यामुळे कामकाज करीत असताना मोठा त्रास होत आहे. उत्तर प्रदेशनंतर सर्वात जास्त हज यात्री महाराष्ट्र राज्य हज समितीमार्फत जात असतात. तेथे १० कर्मचाऱ्यांची पदे मंजूर असून त्यापैकी फक्त ४ कर्मचारी कार्यरत आहेत. सदर कर्मचाऱ्यांना सहाव्या वेतन आयोगानुसार वेतन मिळत असून अद्याप त्यांना सातवा वेतन आयोग लागू केलेला नाही. परिणामी त्यांना कमी वेतन मिळत असल्यामुळे त्रास सहन करावा लागत आहे. शासनाने महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळामध्ये १७० कर्मचाऱ्यांची पदे भरण्यास शासनाने परवानगी दिली याबद्दल मी महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचा अध्यक्ष या नात्याने शासनाचे आभार व्यक्त करतो. कर्मचाऱ्यांची पदे भरणार असल्यास ती किती दिवसांमध्ये भरली जाणार आहेत ?

डॉ.विश्वजीत कदम : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी अनेक विषयासंबंधी प्रश्न विचारलेले आहेत. अल्पसंख्याक विभागामध्ये मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग, महाराष्ट्र राज्य हज समिती असे ४ विभाग आहेत. त्यात काही संस्था स्वायत्त आहेत. महाराष्ट्र राज्य हज समितीमध्ये ११ कर्मचाऱ्यांपैकी ४ कर्मचारी नेमले गेले आहेत. आमच्या मुस्लीम बांधवांचे हज येथे दौरे जात असतात त्यावेळी जशी आवश्यकता लागते तशी या समितीच्या माध्यमातून ८ ते ९

असुधारित प्रत

डॉ.विश्वजीत कदम......

कर्मचाऱ्यांची नेमणूक केली जाते. सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केल्याप्रमाणे महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाकरिता यापूर्वी १०७ कर्मचाऱ्यांना मान्यता देण्यात आली होती. त्यापैकी वक्फ मंडळाने ३५ कर्मचारी नेमले होते. त्यापैकी काही कर्मचारी येत्या काही दिवसांमध्ये सेवानिवृत्त होत आहेत. फेब्रुवारी, २०२२ मध्ये शासनाने महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाकरिता १७९ पदांना मान्यता दिली आहे. येत्या काही दिवसांमध्ये महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळामार्फत सदर पदे भरण्यासाठी लवकरात लवकर भरती प्रक्रिया सुरु केली जाईल. अल्पसंख्याक विभागामध्ये १४ कर्मचारी आहेत त्यापैकी १२ कर्मचारी पूर्णवेळ काम करीत आहेत. मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळामध्ये १५७ कर्मचारी आहेत. त्यातील ४४ पदे कंत्राटी पद्धतीने काम करीत आहेत. तेवढया कर्मचाऱ्यांमध्ये महामंडळाचे कामकाज व्यवस्थितपणे सुरु आहे. परंतु आवश्यकतेनुसार जास्त कर्मचारी भरायचे असल्यास कर्मचाऱ्यांची पदे भरण्याची प्रक्रिया येणाऱ्या दिवसांमध्ये सुरु केली जाईल.

श्री.अमरनाथ राजुरकर : सभापती महोदय, राज्यात विविध समाजांकरिता बार्टी, सारथी व महाज्योती संस्था काम करीत आहेत. त्याच धर्तीवर अल्पसंख्याक समाजाकरिता एखादी संस्था स्थापन करुन आपण त्यांना न्याय देणार आहात का ?

डॉ.विश्वजीत कदम : सभापती महोदय, मी सुरुवातीलाच सांगितले होते की, महाराष्ट्रातील मुस्लीम बांधवांचे प्रश्न सोडविण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जातात. त्यासाठी सरकार तत्पर आहे. मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग, महाराष्ट्र राज्य हज समिती असो, मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, सदर ४ मंडळांकरिता आवश्यक ती आर्थिक तरतूद आहे. त्यांच्या माध्यमातून मुस्लीम समाजाचे प्रश्न सोडविण्याची भूमिका अतिशय चांगल्या प्रकारे पार पाडली जात आहे. या व्यतिरिक्त भविष्यात आणखी काही करायचे असल्यास त्याबाबत सन्माननीय सदस्यांसमवेत चर्चा करुन योग्य तो निर्णय घेतला जाईल.

असुधारित प्रत

डॉ.सुधीर तांबे : सभापती महोदय, सच्चर समितीने अल्पसंख्याकांच्या शिक्षणाबद्दल गंभीर चिंता व्यक्त केली आहे. अल्पसंख्याक संस्थांना यापूर्वी पायाभूत सुविधांसाठी दिली जाणारी २ लाख रुपयांची शैक्षणिक मदत आता बंद करण्यात आली आहे. सदर सुविधा पुन्हा सुरु केली जाणार आहे का ? अल्पसंख्याक समाजातील मुलांना दिली जाणारी २५ हजार रुपयांची शैक्षणिक शिष्यवृत्ती अतिशय कमी आहे. वैद्यकीय शिक्षण किंवा इंजिनियरिंगचे शिक्षण असो, तेवढीच शिष्यवृत्ती दिली जात आहे. ही शिष्यवृत्ती संबंधित अभ्यासक्रमानुसार दिली पाहिजे. या संदर्भात शासनाने पुनर्विचार करण्याची आवश्यकता आहे. अशा प्रकारचा पुनर्विचार केला जाणार आहे का ?

डॉ.विश्वजीत कदम : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.सुधीर तांबे यांनी शैक्षणिक शिष्यवृत्तीच्या रकमेसंबंधी प्रश्न उपस्थित केला आहे. ही वस्तुस्थिती आहे की, वेगळया अभ्यासक्रमांकरिता वेगळी फी असते. शिष्यवृत्तीच्या रकमेमध्ये वाढ करण्यासंबंधी आम्ही माननीय मंत्री महोदयासमवेत चर्चा केली होती. मागील २ वर्षे करोनाच्या पार्श्वभूमीवर शासनाला यात वाढ करता आली नाही. येत्या काळात आम्ही यासंबंधी निश्चितपणे योग्य तो निर्णय घेऊ. तसेच या संदर्भात आम्ही ५० हजार रुपयांपर्यंत शिष्यवृत्ती वाढविण्याचा प्रस्ताव तयार केलेला आहे.

डॉ.सुधीर तांबे : सभापती महोदय, पायाभूत सुविधांसाठी अल्पसंख्याक समाजाला मिळणारी शैक्षणिक सुविधा बंद आहे. ती पुन्हा सुरु करणार आहात का ?

डॉ.विश्वजीत कदम : सभापती महोदय, पायाभूत सुविधांसाठी मिळणारी शैक्षणिक सुविधा ५ वर्षांपासून बंद आहे. येत्या काळात आम्ही त्यासंबंधी निश्चितपणे चांगला निर्णय घेऊ.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.वजाहत मिर्झा यांनी चांगला प्रश्न उपस्थित केला आहे. सदरहू महामंडळांमध्ये मोठया प्रमाणात भरती होत असते. त्यानंतर त्यांची आर्थिक कुवत राहत नाही. त्यांच्या कामाकाजानुसार स्टाफ पॅटर्न ठरवून तेथील स्टाफ भरण्यासंबंधी नियोजन करणार आहात का ?

यानंतर श्री.गागरे.....

श्री.विश्वजित कदम : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाबाबत मी सांगू इच्छितो की, शासनाने त्या त्या विभागाचा आकृतीबंध निश्चित केलेला आहे. फक्त त्या आम्ही गाईडलाईन्स दिलेल्या आहेत. म्हणून वक्फ बोर्डाच्या बाबतीत मागील महिन्यात १७९ पदे भरण्याचे आम्ही सुचवले आहे व त्यास शासनाने मान्यताही दिलेली आहे. पद भरती प्रक्रियेत शासनाचे प्रतिनिधीही समाविष्ट असतात त्यामुळे योग्य पध्दतीने ही कार्यवाही केली जाईल.

डॉ.वजाहत मिर्झा : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.बालाजी तांबे यांनी उल्लेख केलेला आहे की, सच्चर समितीच्या शिफारशीनुसार कार्यवाही करणार का. सच्चर समितीने शिफारस केली होती. पंतप्रधान योजनेत १५ कलमी कार्यक्रमात असा उल्लेख होता की, प्रत्येक जिल्हयात जिल्हास्तरीय अल्पसंख्याक कल्याण समितीची नियुक्ती करावी किंवा गठण करावे. एकाही जिल्हयात अशी समिती अद्याप तयार व कार्यरत नाही. ही समिती आपण लवकर गठीत करणार का, मंत्री महोदयांनी सातव्या वेतन आयोगाबाबत काहीच सांगितले नाही. हज कमिटी किंवा अल्पसंख्याक आयोगाच्या कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग अद्याप लागू करण्यात आलेला नाही. जिल्हास्तरीय अल्पसंख्याक कल्याण समितीचे गठण करणार का ?

श्री.विश्वजित कदम : सभापती महोदय, सातव्या वेतन आयोगाबाबत सांगू इच्छितो की, आता कंत्राटी सोडून जे इतर कर्मचारी आहेत त्यांना सहाव्या वेतन आयोगानुसारच पगार दिला जातो. सातव्या वेतन आयोगाची शिफारस केलेली आहे. येणाऱ्या दिवसात त्याबाबत कार्यवाही होईल.

----

अस्सुधारित प्रत

**पृ.शी.** : नागपूर येथील जिल्हा व सत्र न्यायालयाच्या नवीन इमारतीचे रखडलेले काम

**मु.शी.** : नागपूर येथील जिल्हा व सत्र न्यायालयाच्या नवीन इमारतीचे रखडलेले काम यासंबंधी श्री.अभिजित वंजारी, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.अभिजित वंजारी (नागपूर विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी नियम १०१ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय विधी व न्याय मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"नागपूर येथील नागपूर जिल्हा व सत्र न्यायालयाच्या नवीन इमारतीचे काम गेली तीन वर्षापासून रखडले असल्याचे माहे डिसेंबर, २०२१ दरम्यान निदर्शनास येणे, नागपूर जिल्हा व सत्र न्यायालयाची जुनी इमारत जीर्ण होणे, त्यामुळे नव्या इमारतीची मागणी सन २००८ पासून होणे, सुरुवातीला या नव्या इमारतीचा प्रस्तावित खर्च ८० कोटी रुपये असणे, मात्र दप्तर दिरंगाईने हा खर्च वाढत जाणे व तब्बल १० वर्षांनी सन २०१८ मध्ये नव्या इमारतीला मंजूरी मिळणे, नव्या इमारतीसाठी ९६ कोटी रुपयांची अर्थसंकल्पात तरतूदही करण्यात येणे, या इमारतीच्या कामाला सुरुवात होऊन तीन वर्षांचा कालावधी उलटूनही अद्याप काम अपूर्ण असणे, या इमारतीचे काम तातडीने पूर्ण करावे अशी येथील जनतेची मागणी असतानांही त्यावर कार्यवाहीस शासनाकडून होत असलेला विलंब, परिणामी येथील जनतेत पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, त्यामुळे शासनाने याबाबत करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

श्रीमती आदिती तटकरे (विधी व न्याय राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

असुधारित प्रत

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

----------

असुधारित प्रत

श्री.अभिजित वंजारी : सभापती महोदय, नागपूरच्या जिल्हा व सत्र न्यायालयाबाबत माझी ही लक्षवेधी सूचना आहे. न्यायालयाच्या नवीन विस्तारीत इमारतीत तळमजला अधिक ९ मजल्याची ही इमारत आहे. २६ कोर्ट हॉल या इमारतीत आहेत पण याकरीता अधिक निधीची आवश्यकता आहे, याचे कारण असे आहे की, नागपूरमध्ये डिस्ट्रीक्ट बार असोसिएशनमध्ये ७५०० पेक्षा जास्त वकील रजिस्ट्रर्ड आहेत, त्यांच्याशिवाय नागपूर जिल्हयात व नागपूर विभागातील सर्व जिल्हे व तालुक्यातून लोक नागपूरच्या जिल्हा व सत्र न्यायालयात येत असतात. गडचिरोली, गोंदिया, भंडारा, चंद्रपूर, वर्धा इत्यादी जिल्हयातून लोक येतात. याशिवाय अमरावती विभागातील शहरे व तालुकास्तरावरुन लोक मोठया प्रमाणावर नागपूरमध्ये येतात. या सर्व वकीलांची कोणत्या प्रकारची सोय होत नाही. सध्याच्या स्थितीत नागपूर सत्र न्यायालयासमोर एक किलोमीटरपर्यंत पार्कींगची लाईन लागते. म्हणून माझी मागणी आहे की, सत्र न्यायालयाची विस्तारीत इमारत तयार होत आहे, त्याला अॅडीशनल १३ कोटी रुपयांची मागणी या लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून करीत आहे. याचे कारण असे आहे की, नागपूर सुधार प्रन्यासच्या काही इमारतींमध्ये ॲटोमाईज पध्दतीची पार्कींग निर्माण केली आहे, त्याच धर्तीवर या ठिकाणी ॲटोमाईज पध्दतीच्या पार्कींगची आवश्यकता आहे. त्याशिवाय जिल्हा सत्र न्यायालयाच्या इमारतीमध्ये सध्या वातानुकुलीत व्यवस्था नाही याकरीता अतिरिक्त निधीची गरज आहे. यामुळे वकील व न्यायाधिशांची सोय व्हावी. हा निधी शासनाने लवकरात लवकर उपलब्ध करुन द्यावा. २००८ पासून लोकांची व वकीलांची मागणी आहे की, इमारत पेंडींग आहे, याबाबत लवकरात लवकर पुर्तता करावी अशी विनंती आहे.

श्रीमती आदिती तटकरे : सभापती महोदय, नागपूरमधील जिल्हा व सत्र न्यायालयाची जुनी इमारत आहे. या इमारतीस हेरीटेज दर्जा आहे. त्यामुळे या इमारतीचे विस्तारीकरण करणे शक्य नव्हते. २०१० मध्ये विस्तारीकरण किंवा नव्याने जी जागा नागपूर जिल्हा न्यायालयाने प्रस्तावित केली व त्याचा प्रस्ताव तयार करण्यात आला. पूर्वीच्या कालावधीत २०१० मध्ये ३५ कोटीच्या इमारतीस प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली होती. पण उच्च न्यायालयाने सुधारीत प्रशासकीय

श्रीमती आदिती तटकरे.....

मान्यतेसाठीचा प्रस्ताव सादर केला. जवळपास ९२ ते ९३ कोटीची सुधारीत मान्यता दिल्यानंतर याचे काम सुरु आहे. याला ९२.२५ कोटी रुपये विभागाकडून उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. नव्याने सुरु असलेल्या इमारतीचे ८० कोटीचे काम झालेले आहे. २०१० मध्ये नवीन इमारतीसाठी प्रस्ताव तयार करण्यात आला होता. यामध्ये फक्त सहा बाबींचा समावेश होता. आता न्यायालयाची नवीन इमारत आपण उपलब्ध करुन देत आहोत, त्यात जवळपास १६ बाबींचा समावेश आहे. जेणेकरुन अद्यावत पध्दतीची जिल्हा न्यायालयाची इमारत त्या निमित्ताने उपलब्ध होईल. १३ कोटीचे काम प्रलंबित आहे हे सुध्दा लवकरात लवकर मार्गी लागण्याच्या दृष्टीकोनातून सार्वजनिक बांधकाम विभाग व विधी व न्याय विभाग अशा यंत्रणांची संयुक्त बैठक अधिवेशन संपण्यापूर्वी घेण्यात येईल, जेणेकरुन हे काम पूर्ण होईल. या व्यतिरिक्त उर्वरित व वाढीव कामासाठी प्रस्ताव दिला जाईल त्याला देखील शासनाच्या माध्यमातून निधी उपलब्ध करुन दिला जाईल.

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदय, २०१६ मध्ये नवीन प्रशासकीय मान्यता दिली आहे व निधी दिलेला आहे याबद्दल काही शंका नाही. माझी माहिती अशी आहे की, जुन्या व नवीन इमारतीत फर्निचर व वातानुकुलीत करण्याचा निधी या प्रस्तावात नाही. आता मंत्री महोदयांनी निधी देण्याबाबत सांगितलेले आहे. इमारत उभी राहणार आहे, फर्निचर व उर्वरित कामाच्या एस्टीमेटला किती दिवसात मान्यता देणार, १३ कोटीचे जुने काम शिल्लक आहे. कोरोनाच्या काळात काम प्रलंबित राहिले हे मान्य आहे. पण किती दिवसात काम पूर्ण करणार, पुढील कामाला किती दिवसात मान्यता व निधी मिळणार आहे ?

श्रीमती आदिती तटकरे : सभापती महोदय, ३५ कोटीचा जुना प्रस्ताव आला होता यामध्ये कोर्टाचा मुख्य मजला आहे, यामध्येच फक्त वातानुकुलीत व्यवस्था देण्यात आली होती. नव्याने आता जे काम सुरु आहे त्यात २६ कोर्ट हॉल आहेत त्यांना वातानुकुलित सुविधा दिली जाणार आहे. फर्निचरसुध्दा उपलब्ध करुन दिले जाणार आहे. फर्निचरच्या कामासाठी आता त्यांच्याकडे तीन कोटीचा निधी उपलब्ध

असुधारित प्रत

श्रीमती आदिती तटकरे .....

आहे. निधी उपलब्ध असल्याने काम प्रलंबित असण्याचे काही कारण नाही. याव्यतिरिक्त त्यांच्याकडून ॲडीशनल विद्युतीकरणासाठी व फर्निचरसाठी प्रस्ताव आला तर शासनाकडून निधी उपलब्ध करुन दिला जाईल.

श्री.अभिजित वंजारी : सभापती महोदय, नागपूर जिल्हा सत्र न्यायालयातील गर्दी लक्षात घेतली पाहिजे. कारण या इमारतीमध्ये १०० कोर्ट आहेत, जेएमएफसीचे १६-१७ कोर्ट आहेत, ज्युनियर डिव्हीजनचे १५-२० कोर्ट आहेत, सिनियर डिव्हीजनचे १८-१९ कोर्ट आहेत, सेशन कोर्ट ३५ ते ४० आहेत. फॅमिली कोर्ट आहेत. विद्यमान व नवीन अशा दोन्ही इमारतीमध्ये दुरुस्ती करुन वातानुकुलीत करण्याची माझी मागणी आहे.

श्रीमती आदिती तटकरे : सभापती महोदय, जुनी इमारतीला हेरीटेज दर्जा असल्याने तेथे विस्तारीकरण करु शकत नाही म्हणून नव्याने सत्र न्यायालय इमारतीचा प्रस्ताव पाठवला आहे. या व्यतिरिक्त आता ९३ कोटीची मान्यता दिलेली आहे. या व्यतिरिक्त जे प्रस्ताव जिल्हा न्यायालयाकडून उच्च न्यायालयामार्फत येतील त्यांना मान्यता दिली जाईल.

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदय, नवीन बांधकाम होत असलेली ग्रीन बिल्डींग व्हावी व यास सोलारवर कन्व्हेट करण्याचा प्रस्ताव होता. तो प्रस्ताव मान्य करावा.

**सभापती** : ग्रीन बिल्डींग ही चांगली कल्पना आहे.

श्रीमती आदिती तटकरे : सभापती महोदय, आपल्या माध्यमातून माहिती देऊ इच्छिते की, नवीन इमारतीत दोन मजले स्वतंत्र पार्कींगसाठी दिलेले आहेत. जेणेकरुन वाहनाच्या पार्कींगची गैरसोय नवीन इमारतीत होणार नाही. सोलारचा प्रस्ताव आला तर त्यासाठी लागणारा निधी उपलब्ध करुन दिला जाईल.

**सभापती** : व्हेरी गुड.

यानंतर श्रीमती नाफडे

असुधारित प्रत

**पृ.शी.** : कोरेगांव,जि.सातारा येथील एमआयडीसीद्वारे देगांव,जि.सातारा येथील शेतकऱ्यांच्या जमिनी औद्यागीक वसाहतीकरिता संपादित करण्यात येणे

**मु.शी.** : कोरेगांव,जि.सातारायेथील एमआयडीसीद्वारे देगांव,जि.सातारा येथील शेतकऱ्यांच्या जमिनी औद्यागीक वसाहतीकरिता संपादित करण्यात येणे यासंबंधी श्री.शशिकांत शिंदे,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. शशिकांत शिंदे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम १०१ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उद्योग मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" कोरेगाव (जि.सातारा) येथे महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाद्वारे देगांव ( ता.सातारा)येथील शेतकऱ्यांच्या जमिनी औद्योगिक वसाहतीसाठी संपादित करण्यात येणे, सदर जमीन संपादनानंतर महामंडळाकडून जमिनींच्या ७/१२ उताऱ्यांवर शिक्के मारण्यात येणे, त्यामुळे संबंधित सर्व शेतकऱ्यांना आर्थिक व्यवहार करताना बँक कर्जे व इतर बाबीसाठी अडचणी निर्माण होत असल्याच्या तक्रारी शेतकऱ्यांकडून करण्यात येणे, सदर शेतकरी हे अल्पभूधारक असल्याने व शेती हेच त्यांचे उदरनिर्वाहाचे साधन असल्याने त्यांचे जमिनीच्या ७/१२ उताऱ्यांवर महामंडळाकडून मारण्यात आलेले शिक्के उठविण्याची शेतकऱ्यांद्वारे अनेक दिवसांपासून मागणी करण्यात येणे, तथापि त्याबाबत अद्याप कार्यवाही न झाल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, शासनाने या प्रकरणी तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता व शासनाची भूमिका ."

श्र◌ीमती आदिती तटकरे ( उद्योग राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवत◌े.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

-------------

श्री.शशिकांत शिंदे : सभापती महोदय, मंत्रीमहोदयांच्या लक्षवेधीवरील लेखी उत्तराला माझी हरकत आहे. हे उत्तर त्यांनी पूर्ण दिलेले नाही. दोन उत्तरांमध्ये कमतरता आहे. एक तर अशा पध्दतीने आहे की, विधीमंडळामध्ये देखील संबंधित विषयावर चर्चा झाली होती. त्यानंतर याबाबत दोन्ही मंत्रीमहोदयांसमवेत बैठक झाली होती. या बैठकीमध्ये याबाबत योग्य निर्णय झाला होता. त्या निर्णयाचा आणि बैठकीचा लेखी उत्तरामध्ये उल्लेख केलेला नाही, हे मला दुर्दैवाने दाखवावे लागत आहे. मला वाटते की, शेवटची बैठक राज्य मंत्रीमहोदयांकडे झाली होती, त्यावेळी त्यांनी निर्णय दिला होता की, हे रद्द करण्यात यावे. त्याचाही या लेखी उत्तरामध्ये उल्लेख केला गेलेला नाही. त्याचा या ठिकाणी मी उल्लेख करीत आहे. विशेषत: विधानसभेमध्ये ज्यावेळी हा प्रश्न ज्यावेळी विचारला गेला होता, त्यावेळी त्या संदर्भात कारवाई करण्याचे आदेश दिले होते. आज मी या प्रश्नाच्या संदर्भात एवढे विचारु इच्छितो की,याच बाजूला बीव्हीजी ग्रुपचे फुड पार्क म्हणून १०० हेक्टरची जागा उपलब्ध करण्यात आली परंतु त्यालाही रिस्पॉन्स मिळाला नाही. ७० टक्क्यांपेक्षा जास्त बागायत क्षेत्र आहे. अल्पभुधारक म्हणून या ठिकाणी सर्व शेतकरी आहेत. २००९ पासून एकदा नव्हे तर तीनदा लोकप्रतिनिधी म्हणून मी यामध्ये बोलत होतो, तेव्हापासून आजपर्यंत पाच-सहा वेळा बैठका झालेल्या आहेत. त्यावेळी सर्व गावात बैठकांमध्ये याकरिता सर्वांनी विरोध केलेला होता. त्याचा उल्लेखही शासनाने केलेला आहे. आता एखादे वेळी शासनाच्या नवीन नियमाप्रमाणे स्थानिक शेतकऱ्यांचा विरोध असेल, शेतीसाठी उपलब्ध असलेली जमीन असेल तर तेथे कोणत्याही प्रकारचे औद्योगिक क्षेत्र उभारायचे नाही, असा नियम असताना देखील शासनाच्या उत्तरामध्ये सांगितलेले आहे की, २०१८ मध्ये बैठक झाली, त्यामध्ये विरोध झाला होता. त्यापूर्वीच्या बैठकीमध्ये देखील शेतकऱ्यांनी विरोध केला होता. शेवटी तरीही शासनाने म्हटलेले आहे की, सन २०२० मध्ये जी बैठक झाली होती, त्यातही विरोध झाला होता. आता आपण सांगत आहात की, जिल्हाधिकाऱ्यांसमवेत या संदर्भात बैठक घेण्याची सूचना केलेली आहे. जर चार-चार वेळा बैठक होऊन देखील याकरिता विरोधच झाला असेल तर मंत्रीमहोदयांकडून स्पष्ट शब्दात आदेश झाले असतील की, हे रद्द करण्यात यावे तर त्याची अंमलबजावणी करण्यासाठी

अप्रकाशित प्रत

श्री.शशिकांत शिंदे.....

अडचण काय आहे, यासंदर्भात उत्तर द्यावे की, हे रद्द करण्यात येणार आहे किंवा कसे, कारण काय होते की, त्यांना २००९ पासून कर्ज मिळत नाही. शिक्के पडल्यामुळे त्यांना कोणत्याही प्रकारची ॲक्टीव्हीटी करता येत नाही. शासन ताबडतोब हे रद्द करणार आहे का आणि त्यांचे हे शिक्के उठविण्यात येणार आहेत का ?

श्रीमती आदिती तटकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.शशिकांत शिंदे यांनी उल्लेख केल्याप्रमाणे एमआयडीसीच्या माध्यमातून साताऱ्याचे हे जे औद्योगिक क्षेत्र आहे, ते विकसित करण्यात आलेले आहे. टप्पा-१ आणि टप्पा-२ हे दोन्हीही विकसित केलेले औद्योगिक क्षेत्र आहेत, त्याला उत्कृष्ट रित्या प्रतिसाद मिळालेला आहे, यावर काही उद्योजकांची मागणी होत होती की, याचा विस्तार करण्यात यावा. त्यानुसार टप्पा-३ म्हणजे, सेझ-३ चे जे काही भूसंपादन आहे, त्या प्रक्रियेला विभागाच्या वतीने सुरुवात करण्यात आली होती. ही बाब खरी आहे की, त्याकरिता स्थानिक शेतकऱ्यांकडून विरोध झाला. तो तीव्र विरोध झाल्यानंतर एमआयडीसीच्या माध्यमातून शासनालाही प्रस्ताव पाठविण्यात आला की, सदर जागेसाठी शेतकऱ्यांचा विरोध असल्यामुळे यातून वगळून ती डिनोटिफाय करण्यात यावी. पुन्हा एकदा शासनाकडून सूचना देण्यात आली की, याकरिता प्रयत्न करण्यात यावे. कारण या जागेवर उद्योजकांची तशी मागणी आहे. त्यानंतर सन्माननीय सदस्यांनी देखील उल्लेख केल्याप्रमाणे सन २०२० मध्ये जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली लोकप्रतिनिधी आणि स्थानिक शेतकरी यांच्यासमवेत बैठक झाली. त्यामध्ये देखील याकरिता तीव्र विरोध झालेला आहे. सन्माननीय मंत्रीमहोदय, राज्यमंत्री म्हणून माझ्याही दालनात यासंदर्भातील बैठका झाल्या. त्यामध्ये देखील स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी शेतकऱ्यांनी या संदर्भातील मागणी केलेली आहे. त्यानुसार जिल्हाधिकाऱ्यांकडून या बाबतचा अंतिम अहवाल विभागाच्या माध्यमातून मागविण्यात येईल. यावर उच्चस्तरीय समितीमध्ये योग्य तो निर्णय याबाबत घेतला जाईल. याबाबत योग्य निर्णय आणि न्याय मागणीनुसार घेण्यात येईल.

अमुद्रित प्रत

**सभापती :** आपल्या जिल्हयात आज सुवर्णसंधी आहे ! माझ ऐकां तुम्ही, पुणे-अहमदनगर हा रस्ता एमआयडीसीत औद्योगिकदृष्टया फुल झालेला आहे. पुणे मुंबई रस्त्याची तर चर्चा करण्यात काही अर्थ नाही. पुणे-नाशिक रस्त्यावरील बऱ्याच औद्योगिक वसाहती आणि उद्योग तेथे स्थापन करुन झालेले आहेत. पुणे आणि कोल्हापूर येथे आता उद्योग यायचे राहिलेले आहे. पुणे, कोल्हापूरच्या आधी शिरवळपर्यंत सगळ फुल झालेले आहे. सन्माननीय सदस्य श्री.शशिकांत शिंदे आपण लोकप्रतिनिधी आहात. मी स्वत: पालकमंत्री असताना याबाबत आपण एक बैठक घेतली होती. त्यांचा याकरिता विरोध आहे, हे मलाही माहिती आहे. परंतु मला आपण विचाराल तर असे वाटते की, सातारा तालुक्याच्या आणि जिल्हयाच्या औद्योगिकरणाची ही सुवर्णसंधी आपण दवडू नये. माननीय मंत्री श्री.शंभुराजे देसाई ही संधी घ्यावी, असे मला वाटते. आपण सर्वजण व इतर जे कोणी याच्याशी संबंधित असतील त्यांना घेऊन एकदा याबाबत खरच प्रामाणिकपणे आपण पुन्हा एकदा प्रयत्न करु. सातारा तालुक्याच्या एमआयडीसीला मूर्त स्वरुप देण्याचा प्रयत्न करु. भूसंपादनाकरिता संबंधितांना मोबदला वाढवून द्या, स्पेशल पॅकेज द्या, काहीतरी करा परंतु हे यशस्वी करा, शेवटी आपलाच निर्णय यावर अंतिम असेल.

श्री.शशिकांत शिंदे : सभापती महोदय, मी कोणत्याही विकासाला विरोध करत नाही. परंतु माझी हरकत एवढीच आहे. आज या ठिकाणी आपल्या प्रयत्नातून खंडाळा, लोणंद येथे मोठया प्रमाणात एमआयडीसी आली. पुसेगाव, माण येथे आपण एमआयडीसी आणलेली आहे. अनेक ठिकाणी आपण एमआयडीसी करण्याचे प्रस्ताव दिलेले आहेत. मागणी १०० टक्के असेल तर माझी हरकत नाही. परंतु आज तेथील शेतकरी उद्ध्वस्त करायचा आणि विकास करायचा, हे मला मान्य नाही. ती जमीन आता शेतकऱ्यांची राहिली नाही. ती जमीन काही लोकांनी खरेदी केली असेल, आणि म्हणून केवळ त्याकरिता प्रकल्प आणण्याचा प्रयत्न होत असेल तर ते दुर्दैवाचे आहे. मंत्रीमहोदयांना मी विनंती करतो की, त्यांनी अर्धवट उत्तर दिलेले आहे. तुमच्यासमोर बैठक झाली आणि आपणच स्पष्ट शब्दात निर्देश दिले होते की, "या ठिकाणी डिनोटिफाय करावे". माझा विकासाला विरोध नाही. केवळ त्या शेतकऱ्यांचा विरोध एवढयाचसाठी आहे की, ते पूर्णपणाने अल्पभुधारक आहेत,

असुधारित प्रत

श्री.शशिकांत शिंदे.....

यामुळे ते पूर्णपणाने बेघर होतील, त्यांच्याकडे जमीन शिल्लक राहणार नाही. याबाबतचा शासनाचा कायदाच असा आहे की, शेतकऱ्यांचा विरोध असेल तर विरोध असतानाही पुन्हा पुन्हा तीन-चार वेळा याकरिता जबरदस्ती कशाकरिता आहे, हे मला कळत नाही. एमआयडीसीच्या बाबत डिमांड लेटर कुठे आहे, हेही मला दिसत नाही. उद्योगपतींनी मागणी केलेली आहे, असे दाखविले जात आहे. परंतु वस्तुस्थिती काहीतरी वेगळी आहे. माझी विनंती आहे की, याकरिता सातारा जिल्हयामध्ये पर्यायी जागा प्रचंड देता येऊ शकते. परंतु अल्पभूधारक शेतकऱ्यांनाच बेघर करायचे आणि त्या ठिकाणी विकास करायचा,हे योग्य नाही. कायदा असे म्हणतो की, जर स्थानिक शेतकऱ्यांचा विरोध असेल, जमीन सुपीक असेल तर त्या जमिनीचे संपादन करता येत नाही. याबाबत असा कायदा असतानाही तशा पध्दतीचे प्रस्ताव मागविले जातात. याबाबत शासनाने आदेश दिलेले असतानाही पुन्हा मंत्रीमहोदय बोलत आहेत की, मी प्रस्ताव मागवितो, हे चुकीचे आहे. शासनाने एकदा दिलेल्या निर्देशाप्रमाणे कारवाई करायलाच पाहिजे. शासन या संदर्भातील पूर्वी दिलेल्या निर्देशाप्रमाणे योग्य ती कारवाई करणार आहे का ?

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

श्रीमती आदिती तटकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.शशिकांत शिंदे यांना सांगू इच्छिते की, या संदर्भातील अंतिम अहवाल हा जिल्हाधिकाऱ्यांकडून त्वरित मागविला जाईल, या संदर्भातील उच्चस्तरीय बैठकीमध्ये हा प्रस्ताव एमआयडीसीच्या माध्यमातून विभागाकडून ठेवण्यात येईल. पूर्वीच उल्लेख केल्याप्रमाणे शेतकऱ्यांना किंवा स्थानिकांना हानी पोहोचवून टप्पा-३ चे भूसंपादन करण्याचा विभागाचाही मानस नाही. स्थानिकांना विश्वासात घेऊनच हे औद्योगिक क्षेत्र विकसित करण्याचा मानस असल्यामुळे त्याला तीव्र विरोध आहे, या भावनेची खऱ्या अर्थाने जाणीव विभागालाही आहे. या संदर्भातील लवकरात लवकर योग्य कारवाई करण्यात येईल.

असुधारित प्रत

**उप सभापती :** सन्माननीय सदस्य श्री.शशिकांत शिंदे आपली लक्षवेधी सूचना असली तरीही आपल्याला यावर पुन्हा प्रश्न विचारण्याची संधी नंतर देण्यात येईल. उर्वरित ज्या सन्माननीय सदस्यांना या प्रश्नाबाबत आस्था आहे, त्यांनाही यावर प्रश्न विचारण्याची संधी दिली पाहिजे.

श्री.महादेवराव जानकर : सभापती महोदय, देगाव एमआयडीसी ही सातारा एमआयडीसीला लागून आहे, तेथील शेतकऱ्यांचे क्षेत्र हे १०० टक्के बागायती आहे. जर शासनाला एमआयडीसी काढायचीच आहे, तर थोडस दुष्काळी भागाकडे ते गेले तर राज्याचा विकास चांगला होईल. एमआयडीसीकरिता दुष्काळी पट्टयातील माण, खटाव, कोरेगावमधील "वाटार" येथे यावे. आपल्याला पाहिजे तेवढी लॅण्ड तेथे एमआयडीसीकरिता उपलब्ध करुन देण्यात येईल. एमआयडीसी सातारा हे माझे आजोळ आहे. माझ्या मामाची याकरिता तेथे ५०० एकर जमीन गेलेली आहे. आता शेतकरी तेथील हवालदिल झालेले आहेत. मंत्रीमहोदयांनी यावर विचार करावा. तेथील भावना तीव्र आहेत. मी आठ दिवसापूर्वीच त्या गावात गेलो होतो. शासनाला तीच एमआयडीसी जर दुसरीकडे नेता आली तर फार चांगले होईल.

श्रीमती आदिती तटकरे : सभापती महोदया, सन्माननीय सदस्यांनी ज्या सूचना दिलेल्या आहेत, त्याप्रमाणे त्या संबंधित जागांचा फिजिबिलिटी रिपोर्ट तपासून योग्य तो निर्णय विभागाकडून घेण्यात येईल. यापूर्वी ज्याचा उल्लेख याठिकाणी केला गेलेला आहे,त्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांकडून या संदर्भातील त्वरित अहवाल मागवून उच्चस्तरीय समितीमध्ये योग्य तो निर्णय घेतला जाईल.

उप सभापती : सन्माननीय सदस्यांना मी बोलण्याकरिता संधी देते परंतु ज्या प्रश्नाचे चे उत्तर माननीय मंत्री महोदयांनी दिलेले आहे, तोच प्रश्न परत विचारु नये.

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदया, आपल्याला थोडसं या प्रकरणामध्ये लक्ष द्यावे लागेल. सन्माननीय सदस्य श्री.शशिकांत शिंदे एवढया तीव्रतेने याबाबत सांगत आहेत, तरीही यासंदर्भात एवढा आग्रह कशाकरिता व कोणाकरिता केला जात आहे ?

असुधारित प्रत

श्री. चंद्रशेखर बावनकुळे.......

कोणासाठी आणि कशासाठी आग्रह केला जात आहे ? राज्य सरकार आणि केंद्र शासनाचा असा नियम आहे की, इरिगेटेड जमीन असेल किंवा शेत जमीन असेल तर तो नियम रद्द केला पाहिजे. दुसरी बॅरलल जमीन पाहण्यात यावी. जिल्हाधिकाऱ्याकडून येणाऱ्या रिपोर्टची वाट कोणासाठी पाहता असा माझा प्रश्न आहे. माननीय मंत्री महोदयांनी सदनात डी-नोटिफाय करतो असा निर्णय जाहीर करण्याची आवश्यकता आहे. असे उत्तर अपेक्षित आहे. दुसरे कोणतेही उत्तर अपेक्षित नाही. डी-नोटीफाय करण्याचे आदेश माननीय मंत्री महोदयांनी दिले पाहिजेत आणि तसे आदेश दिले जातील काय ?

श्री. अनिकेत तटकरे : सभापती महोदया, सर्वात पहिल्याप्रथम मी उद्योग राज्यमंत्री महोदयांचे आभार व्यक्त करीत आहे.

सभापती महोदया, एमआयडीमधील सांडपाण्यासाठी १५२ कोटी रुपयांचा निधी मंजुर केला आणि त्या कामास कालच सुरुवात झालेली आहे. हा प्रश्न केवळ सातारा जिल्ह्यापुरता मर्यादित नाही. १९८० साली एमआयडीसीची स्थापना झाली होती. तेव्हापासून एमआयडीसीच्या लगत असलेल्या गावांमध्ये पेन्सिलच्या माध्यमातून नोंदी केलेल्या असून, त्या रद्द कण्याची आवश्यकता आहे. ४० ते ४५ वर्षापूर्वीची जुनी घरे आहेत. महाडचा प्रश्न देखील असाच आहे. तेथील अनेक शेतकरी गेल्या ३५ वर्षापासून मागणी करीत आहेत की, डी-नोटिफाय करावे. एकतर पेन्सिलने करण्यात आलेली नोंद रद्द करीत नाही आणि जमीन संपादित करीत नाही. यासंदर्भात ठोस निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. महिन्याभरात पेन्सिलने करण्यात आलेल्या नोंद रद्द करण्याची आवश्यकता आहे. अन्यथा गेल्या ४० वर्षापासून पेन्सिलने केलेल्या ज्या नोंदी आहेत, त्या खरेदी करण्यासाठी त्यांना सन २०१३ पासूनचा दर देऊन मदत करावी. त्यामुळे शेतकरी मोकळे होणार असल्यामुळे मंत्री महोदय त्या जमिनी संपादित करतील काय, जर करणार नसतील तर त्यावरील इंडस्ट्रिअल झोन डी-नोटिफाय करण्याचा निणर्य जाहीर करतील काय ?

असुधारित प्रत

श्री. सुभाष देसाई : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री. शशिकांत शिंदे यांनी लक्षवेधी सूचना उपस्थित केलेली आहे. शासनाचे असे धोरण आहे की, शेतकऱ्यांचा विरोध असेल तर ती जमीन संपादित करावयाची नाही. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी या धोरणासंदर्भात सर्व माननीय मंत्री महोदयांना स्पष्ट सूचना दिलेल्या आहेत. सातारा येथील संबंधित शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करण्यासाठी तीव्र विरोध आहे. हे वारंवार समोर आलेले आहे. त्यामुळे त्यासंदर्भातील वगळण्याची प्रक्रिया सुरु केली जाईल.

सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री. महादेव जानकर यांनी सांगितल्यानुसार विचार करण्याची गरज आहे. त्यांनी असे सांगितले होते की, सुपिक जमीन घेण्यापेक्षा नापिक जमिनी, उजाड जमिनी घेतल्या तर दोन्ही कामे होणार आहेत. त्यामुळे उद्योग येतील आणि शेतीही वाचणार आहे. अशा प्रकारचे शासनाचे धोरण आहे.

श्री. शशिकांत शिंदे : सभापती महोदया, माननीय मंत्री महोदयांनी नियमानुसार निर्णय घेतल्याबद्दल मी त्यांचा मनापासून आभारी आहे.

सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री. अनिकेत तटकरे यांनी एका प्रश्नाकडे माननीय मंत्री महोदयांचे लक्ष वेधलेले असून, त्याचे उत्तर दिलेले नाही. ज्यावर आपण पेन्स्लिने किंवा शिक्के मारलेले असल्यामुळे संबंधितांना कर्ज मिळत नाही. त्यामुळे त्यांना जमिनीचा व्यवहार करता येत नाही. ज्या जमिनी ताब्यात घेतल्या जाणार नाहीत, अशा ठिकाणी पेन्सिलच्या नोंदी किंवा शिक्क्यांवर मारण्यात आलेल्या नोंदी उठविण्यासंदर्भात मंत्री महोदय पॉलिसी निर्णय घेतील काय ? असे केले तर मुळ मालकांना अधिकार मिळणार आहे. अशा प्रकारचा निर्णय माननीय मंत्री महोदय घेतील काय ?

श्री. सुभाष देसाई : सभापती महोदया, माननीय राज्यमंत्री महोदयांनी हेच सांगण्याचा प्रयत्न केला होता की, ही वगळण्याची प्रक्रिया पूर्वी मंत्री महोदयांचा निर्णयाच्यावेळी होत होती. पण नंतरच्या काळात त्यामध्ये बदल झालेला आहे आणि वगळण्यासाठी अमुक एकरापेक्षा मोठे क्षेत्र असेल तर..... संबंधित सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक उच्चाधिकार समिती आहे. त्यांनी प्रस्तावात शिफारस करुन

श्री. सुभाष देसाई ......

पुढील कार्यवाहीसाठी शासनाकडे सादर करावयाचा आहे. असा टप्पा पूर्ण होण्याची गरज आहे. ही प्रक्रिया पूर्ण केली जाईल. परंतु, वगळण्याचा विरोध लक्षात घेऊन ती प्रक्रिया सुरु केली जाईल.

**उप सभापती** : ठीक आहे. आता पुढील लक्षवेधी सूचना चर्चेला घेण्यात येईल.

-------

असुधारित प्रत

**पृ. शी.** : मुरबाड तालुक्यातील बोगस डॉक्टर व तक्रारीची दखल न घेणाऱ्या आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करणे

**मु. शी. :** मुरबाड तालुक्यातील बोगस डॉक्टर व तक्रारीची दखल न घेणाऱ्या आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करणे या संबंधी सर्वश्री विलास पोतनीस, सुनिल शिंदे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. विलास पोतनीस (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम १०१ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय वैद्यकीय शिक्षण मंत्र्याचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यातील ग्रामीण भागात दिवसेंदिवस बोगस डॉक्टरांकडून रुग्णांवर करण्यात येत असलेल्या बेकायदेशीर वैद्यकीय उपचारांमुळे अनेक रुग्णांचे नाहक जात असलेले बळी, मुरबाड तालुक्यातील (जि.ठाणे) घसई प्राथमिक आरोग्य केंद्रात गेली अनेक वर्षे शिपाई म्हणून कार्यरत असलेल्या पांडुरंग घोलप यांनी सेवेतून निवृत्त झाल्यानंतर राजरोसपणे सुरु केलेला खासगी दवाखान्याचा बोगस धंदा, या बोगस डॉक्टर प्रकरणी नागरीकांनी वारंवार आरोग्य विभागाच्या प्रशासनाकडे तक्रारी करुनही या बोगस डॉक्टरावर कारवाई न झाल्याने दिनांक २४ व २६ जानेवारी, २०२२ रोजी घसईतील इंदिरानगर वाडीतील ५ निष्पाप रुग्णांचे गेलेले बळी, आरोग्य विभागाकडून तक्रारीच्या अनुषंगाने वेळीच कारवाई करण्यात न आल्याने मुरबाड तालुक्यातील गावांमध्ये पसरलेले भितीचे व चिंतेचे वातावरण, शासनाने याप्रकरणी तात्काळ चौकशी करुन संबंधित बोगस डॉक्टर व तक्रारीची दखल न घेणाऱ्या

आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता आणि शासनाची प्रतिक्रिया."

श्री. अमित देशमुख (वैद्यकीय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत

श्री. विलास पोतनीस : सभापती महोदया, ग्रामीण भागात बोगस डॉक्टरांचा सुळसुळाट झालेला आहे. एका आरोग्य केंद्रात शिपाई म्हणून निवृत्त झालेल्या शिपायाने आपल्या घरात बोगस डॉक्टरांचा धंदा सुरु केला होता. त्यामुळे अनेक लोकांचे त्याठिकाणी मृत्यू झाले आहेत. मी मंत्री महोदयांना तीन उप प्रश्न विचारणार आहेत.

सभापती महोदया, राज्यातील मेडिकल कौन्सिलचा कायदा फार जुना आहे. मेडिकल कौन्सिलला खूपच कमी अधिकार देण्यात आलेले आहेत. याऊलट दिल्लीतील मेडिकल कौन्सिलला पूर्ण अधिकार देण्यात आलेले आहेत. ते बोगस डॉक्टरांना पकडून पोलिसांच्या स्वाधीन करु शकतात. त्यामुळे राज्यातील बोगस डॉक्टरांवर चाप लावण्यासाठी दिल्लीच्या धर्तीवर महाराष्ट्रातील कायद्यात दुरुस्ती करुन मेडिकल कौन्सिलच्या अधिकारात वाढ करणार आहे काय ?

सभापती महोदया, शासन बोगस डॉक्टरांच्या शोध समितीच्या बैठकांबाबत नियमावली आखून देणार आहे काय आणि त्या समितीची दर महिन्याला किमान एक बैठक आयोजित करण्याचे बंधनकारक करणार आहे काय ?

सभापती महोदया, राज्यातील बोगस डॉक्टरांवर आळा घालण्यासाठी प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये अधिकृत वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्या नावांची यादी दर्शनी भाागात लावण्याबाबत तसेच प्रत्येक ग्रामसभेत अधिकृत वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्या नावाचे वाचन करणे बंधनकारक करणार आहे काय ?

श्री. अमित देशमुख : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री. विलास पोतनीस यांनी लक्षवेधी सूचनेद्वारे महत्वपूर्ण विषयाला वाचा फोडण्यासाठी प्रयत्न केलेला आहे. सभागृहात बोगस डॉक्टरांच्या संदर्भात अनेक वेळा प्रश्न उपस्थित करण्यात आलेले आहेत. तसेच अनेक वेळा चर्चा देखील उपस्थित करण्यात आलेल्या आहेत. विभागाच्यावतीने उत्तराची तयार केली जात असताना आणि मी माहिती विभागाच्यावतीने घेण्याचा कालपासून प्रयत्न करीत होतो. या प्रश्नाचे उत्तर वैद्यकीय शिक्षण विभागाने द्यावे की, गृह विभागाने द्यावे की, आरोग्य विभागाने द्यावे असा प्रश्न मलाही पडला होता. सन्माननीय सदस्यांनी यासंदर्भात सूचना करण्याची आवश्यकता आहे. विभागवार यावर नंतर सविस्तर चर्चा होणार आहे. त्यावेळी पुढे

श्री. अमित देशमुख......

कोणती दिशा ठरवायची आहे ते सर्वानुमते निश्चित केले जाणार आहे. सन्माननीय सदस्यांनी एनएमसीला अधिकार जास्त आहेत आणि एमसीआयला अधिकार कमी आहेत, असे सांगितले आहे. दिल्लीच्या धर्तीवर राज्यात अधिकारात वाढ करता येते किंवा कसे हे तपासून घेतले जाईल. अधिकारात वाढ करता येत असेल तर तशी वाढ केली जाईल. समित्या बोगस डॉक्टरांवर नियंत्रण किंवा बोगस डॉक्टर शोधून काढून त्यांच्या विरोधात कारवाई करीत आहेत. यासाठी शासनाने वेळोवेळी समित्या घटित केलेल्या आहेत. अशा समित्यांची महिन्यातून एकदा तरी नियमित बैठक व्हावी अशी अपेक्षा सन्माननीय सदस्यांनी केलेली आहे. या समित्या शहरात, नगरपालिका, तालुका आणि जिल्हास्तरावर कार्यरत आहेत. त्यांची पुनर्रचना करण्याची आवश्यकता आहे असे जाणवून येत आहे. नगरपालिकेत मुख्याधिकारी, महापालिकेतील आयुक्त आणि जिल्ह्यातील जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखील समिती कार्यरत आहे. त्यामध्ये दोन ते तीन अधिकारी कार्यरत आहेत. त्या ठिकाणी अशासकीय सदस्य नेमता आले आणि त्यांची व्याप्ती वाढविता आली आणि तालुकास्तरावर समित्या घटित करता आल्या.... सन्माननीय सदस्यांनी तिसरा प्रश्न उपस्थित केला असून, मी त्यास उत्तर देणार आहे. ग्रामपंचायतीमध्ये सर्व डॉक्टरांची नोंदणी आणि त्यांच्या यादीचे जाहीर वाचन किंवा ग्रामपंचायतीच्या ठिकाणी याद्या नोटीस बोर्डवर लावण्यासंदर्भात सूचना सन्माननीय सदस्यांनी केलेली आहे. त्यानुसार विभागाकडून एक परिपत्रक जारी केले जाणार आहे. जेणेकरुन ग्रामपंचायतींना भविष्यकाळात हे सर्व करता येईल. मी सन्माननीय सदस्यांच्या तीन प्रश्नांना उत्तरे दिलेली आहेत. त्यांचे समाधान झालेले असेल असे मी गृहीत धरतो.

यानंतर श्री. बोर्डे....

असुधारित प्रत

श्री.अभिजीत वंजारी : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री.विलास पोतनीस यांनी अतिशय चांगली लक्षवेधी सूचना उपस्थित केली आहे. मंत्री महोदयांनी या लक्षवेधी सूचनेला अतिशय समर्पक उत्तर दिलेले आहे. या अनुषंगाने मी केवळ एक सूचना करु इच्छितो. पूर्वीचे मेडीकल कौन्सिल ऑफ इंडिया व आताचे एनएमसी आणि आयुष यांच्या नियमावलीनुसार डॉक्टरांनी आपल्या क्लिनिक किंवा हॉस्पीटलमध्ये ठळकपणे दिसेल अशा ठिकाणी आपली डिग्री लावणे आवश्यक आहे. सन्माननीय सदस्य श्री.विलास पोतनीस यांनी सांगितले की, बोगस डॉक्टरांचा सुळसुळाट झालेला आहे. गावा-खेड्यांमध्ये हा प्रकार मोठ्या प्रमाणात असून बोगस बीएएमएस डॉक्टर मोठ्या प्रमाणावर आहेत. मी स्पेसिफिक विचारतो की, डॉक्टरांनी क्लिनिक किंवा हॉस्पीटलमध्ये दर्शनी भागावर आपली डिग्री लावण्याबाबतची अंमलबजावणी विभागाच्या माध्यमातून करण्यात येईल काय ?

श्री.अमित देशमुख : सभापती महोदया, सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्याच्या अनुषंगाने सांगू इच्छितो की, अशा प्रकारची कारवाई पूर्वीपासूनच एमसीआयकडून करण्यात येते. एमसीआयकडे महाराष्ट्रातील दीड लाख नोंदणीकृत डॉक्टर आहेत. एमसीआयने प्रत्येक डॉक्टरांना क्यूआर कोड सुद्धा दिलेला आहे. त्यांनी तो क्यूआर कोड क्लिनिक किंवा हॉस्पीटलबाहेर दर्शनी भागात लावणे बंधनकारक आहे. आता बहुतांश लोकांकडे स्मार्ट फोन आहेत. स्मार्ट फोनच्या माध्यमातून क्यूआर कोड स्कॅन केला तर तो डॉक्टर अधिकृत आहे की नाही, याची शहानिशा केली जाऊ शकते. एखाद्याकडे रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट किंवा क्यूआर कोड नसेल तर त्या डॉक्टरकडे जाण्याचे काही कारण नाही.

सभापती महोदया, ठाणे जिल्ह्यातील मुरबाड तालुक्याच्या घसई प्राथमिक आरोग्य केंद्रातील सेवानिवृत्त चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्याची त्या भागातील लोकांशी ओळख होती. तो कर्मचारी सेवेत असताना त्या भागातील लोक त्या प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारासाठी जात असत. त्या कर्मचाऱ्याची ओळख असल्यामुळे ते लोक उपचारासाठी त्याच्या घरी गेले. त्याने त्या लोकांवर काही उपचार केले अशी प्राथमिक माहिती पुढे येत आहे. दुर्दैवाने त्या उपचारात या निष्पाप लोकांचा मृत्यू

असुधारित प्रत

श्री.अमित देशमुख....

झाला. या घटनेचा तपास सुरु आहे. त्या कर्मचाऱ्याला अटक करण्यात आलेली असून तो कारागृहात आहे. अद्याप पोस्टमार्टेमचा रिपोर्ट येणे बाकी आहे. हे मृत्यू नेमके कशामुळे झाले या निष्कर्षाप्रत पोहचायचे आहे. मी मघाशी सांगितल्यानुसार वैद्यकीय शिक्षण विभागाच्या माध्यमातून बोगस डॉक्टरांवर सुरुवातीपासून कारवाई करण्यात येत आहे. परंतु मुरबाड येथे जो अनुचित वा दुर्दैवी प्रकार घडला तो खऱ्या अर्थाने गृह विभागाशी निगडित आहे. कारण त्या ठिकाणी चुकीचे इंजेक्शन दिल्यामुळे हे मृत्यू झाले आहेत. पोलीस या प्रकरणी चौकशी करीत आहे. सन्माननीय सदस्यांना मी पुनश्च सांगतो की, विभागाने प्रत्येक डॉक्टरांना क्यूआर कोड दिलेला असून, यामध्ये आणखी जाचक अटी कशा लागू करता येतील त्या दृष्टीने काम करण्याचे निश्चित केलेले आहे.

**उप सभापती** : मी मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून देते की, या लक्षवेधी सूचनेवर अनेक सन्माननीय सदस्यांना प्रश्न विचारावयाचे आहेत. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी क्रमनिहाय प्रश्न विचारुन त्याला आपण एकदम उत्तर दिले तर चालेल काय ?

श्री.अमित देशमुख : ठीक आहे.

डॉ.मनिषा कायंदे : सभापती महोदया, युक्रेनवरुन आलेल्या वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांचे कमीत कमी नुकसान होऊन त्यांना कशा पद्धतीने न्याय देता येईल यासाठी माननीय वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांनी काल बैठक घेतल्याबद्दल मी त्यांचे सर्वप्रथम अभिनंदन करते.

सभापती महोदया, जे बोगस डॉक्टर आढळतात त्यांची यादी वर्तमानपत्रात प्रसिद्ध झाली पाहिजे. मी स्पेसिफिक विचारते की, ज्याप्रकारे बोगस शाळांची यादी प्रसिद्ध केली जाते तशाच प्रकारे बोगस डॉक्टरांची यादी वर्तमानपत्रातून प्रसिद्ध

असुधारित प्रत

डॉ.मनिषा कायंदे....

करण्यात येईल काय, तसेच बोगस डॉक्टर शोधण्यासाठी विभागाकडे फ्लाईंग स्क्वॅड आहे काय, नसल्यास, त्याची निर्मिती करण्यात येईल काय ?

श्री.सुनील शिंदे : सभापती महोदया, मंत्री महोदयांनी या लक्षवेधी सूचनेला अतिशय सकारात्मक उत्तर दिलेले आहे. बोगस डॉक्टर सापडल्यानंतर त्याच्यावर कायदेशीर कारवाई करण्यासाठी न्यायालयात खटला दाखल करण्यात येतो. परंतु न्यायालयात कालबद्ध कालावधीत सुनावणी होऊन बोगस डॉक्टरांना शिक्षा होत नाही. मी स्पेसिफिक विचारतो की, अशा प्रकारचे खटले फास्ट ट्रॅक कोर्टात सुनावणीसाठी घेऊन बोगस डॉक्टरांना शिक्षा करण्यासाठी शासन विशेष कायदा करेल काय ?

श्री.अमोल मिटकरी : सभापती महोदया, माननीय विलासराव देशमुख मुख्यमंत्री असताना लातूर येथे जेव्हा शासकीय वैद्यकीय महाविद्यालय झाले होते त्याच वेळी अकोला शासकीय वैद्यकीय महाविद्यालय झाले होते. परंतु या महाविद्यालयाशी निगडित असलेले कर्मचारी फार मुजोर झालेले आहेत. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता किंवा अन्य अधिकारी यांच्याविरुद्ध वारंवार तक्रारी करुन सुद्धा त्यांच्यावर कोणतीच कारवाई होत नाही. त्यांच्या बद्दल तक्रारी आहेत, यु-ट्युबवर त्यांच्या व्हिडीओ क्लिप्स आहेत. परंतु काही स्थानिक आमदार किंवा जिल्ह्यातील काही लोकांमुळे हे लोक प्रचंड मुजोर झालेले आहेत. मी मंत्री महोदयांना विचारु इच्छितो की, अकोला शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचा विषय गांभीर्याने घेऊन, अधिवेशन संपल्यानंतर या विषयावर विस्तृत चर्चा करण्यासाठी वेळ देण्यात येईल काय ?

श्री.संजय दौंड : सभापती महोदया, एमबीबीएस, बीएएमएस, बीएचएमएस आणि युनानी या डीग्री घेतलेल्या डॉक्टरांना मेडीकल प्रॅक्टीस करण्याची परवानगी असते. परंतु इलेक्ट्रोपथी, नॅचरोपथी किंवा अनेक वर्षे कम्पाऊंडर म्हणून काम केलेले लोक ग्रामीण भागात बोगस डॉक्टर म्हणून काम करतात. डॉक्टरांना प्रॅक्टीस करायची

श्री.संजय दौंड .....

झाल्यास ग्रामपंचायत किंवा नगर पंचायत स्तरावर जागा लागते. क्लिनिक किंवा रुग्णालय सुरु करतेवेळी ग्रामपंचायतीच्या माध्यमातून परवानगी दिली जाते किंवा खाजगी लोक आपल्या मालकीची जागा देतात. मी विचारु इच्छितो की, अशा बोगस डॉक्टरांवर आळा घालण्यासाठी ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक किंवा जमीन मालक यांना जबाबदार धरण्यात येईल काय ? तसेच दुसरी बाब अशी की, जिल्ह्यामध्ये डीएचओ, टीएचओ आणि त्यांच्या अखत्यारीतील टीम बोगस डॉक्टरांची पाहणी करीत असते. मी नुकतीच माहिती घेतली असून बीड जिल्ह्यात ५४ बोगस डॉक्टरांवर कारवाई झालेली आहे. टीएचओ हे तालुका स्तरावर काम करतात. त्यांच्या अखत्यारीत सुद्धा टीम असते. या अधिकाऱ्यांना माहीत असताना वारंवार बोगस डॉक्टर आढळतात. त्यामुळे या अधिकाऱ्यांवर सुद्धा कारवाई करणार काय ?

श्री.नरेंद्र दराडे : सभापती महोदया, नाशिक जिल्ह्यात राजापूर येथे एका बोगस डॉक्टरवर कारवाई करण्यात आली. परंतु पोलीस विभागाचे म्हणणे आहे की, अशा बोगस डॉक्टरांवर कारवाई करण्यासाठी मंत्रिमंडळाच्या माध्यमातून कायदा करावा. मी स्पेसिफिक विचारु इच्छितो की, बोगस डॉक्टरांवर कारवाई करण्यासाठी कायदा करण्यात येईल काय ?

श्री.किरण सरनाईक : सभापती महोदया, जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी यांना जिल्हानिहाय बोगस डॉक्टरांचा अहवाल तयार करण्यास सांगितला तर संपूर्ण महाराष्ट्रातील बोगस डॉक्टरांची माहिती मिळू शकते. मी स्पेसिफिक विचारु इच्छितो की, या बोगस डॉक्टरांवर कारवाई करण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना जिल्हानिहाय अहवाल सादर करण्यास सांगितले जाईल काय ? कोरोना विषाणू पसरला होता त्या काळात अनेक बोगस डॉक्टरांनी लोकांची आर्थिक लूट केलेली आहे. अशा बोगस डॉक्टरांवर कारवाई करण्यात येईल काय ?

नंतर श्री.कांबळे.....

असुधारित प्रत

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदया, माननीय मंत्र्यांनी सांगितले आहे की, समित्यांची व्याप्ती वाढविणार आहोत. त्यांनी चांगली घोषणा केली आहे की, त्यामध्ये अशासकीय सदस्यांना घेऊ. बोगस डॉक्टरांना शोधणे व त्यांच्यावर कारवाई करण्याची समिती आहे, त्या समितीची बैठक होत नाही, असे त्यांनी सांगितले आहे. माझे या संदर्भात विनंतीपूर्वक सांगणे आहे की, ज्या विधानसभा मतदारसंघाचा तालुका असेल त्या विधानसभेच्या सन्माननीय सदस्यांना जर त्या समितीमध्ये अध्यक्षपद किंवा जे काही तुम्हाला द्यायचे असेल ते देण्याबाबत जर इन्व्हॉल्व्हमेंट केले तर यामध्ये अधिक न्याय मिळू शकेल. आपण याबाबतचा विचार करता येईल का ते पहावे.

श्री. रामदास आंबटकर : सभापती महोदया, मला एक सूचना करावीशी वाटते. आपण समित्यांची व्याप्ती वाढवित आहोत. आपण दोन वर्षांच्या मोठ्या त्रासातून बाहेर आलो आहोत. कोरोनाच्या काळात झालेल्या अनेक गोष्टी आपल्या लक्षात आहेत. आरोग्य सेवेत अनेक लूपहोल्स आहेत. अनेक डॉक्टर बोगस आहेत, अशांची चौकशी करीत असताना, सरकारने पूर्ण विचार करून यावर एक श्वेतपत्र जाहीर केले तर काही हरकत आहे का ? मी अशा श्वेतपत्राची मागणी करतो.

श्री. अमित देशमुख : सभापती महोदया, जवळपास सर्वच सन्माननीय सदस्यांनी लक्षवेधी सूचनेच्या चर्चेमध्ये सहभाग नोंदविलेला आहे. सन्माननीय सदस्या डॉ. मनिषा कायंदे यांनी मुद्दा उपस्थित केला की, बोगस डॉक्टरांची यादी वेळोवेळी प्रसिध्द करता येते का ते पहावे. ती चांगली सूचना आहे. जिल्ह्यांमध्ये या समित्या नियंत्रण करणार आहेत, त्या समित्या देखील महिन्याभरात बैठका घेतील. बैठकांमध्ये असे काही आढळले, बोगस डॉक्टर शोधून त्यांची यादी त्यांच्याकडे तयार झाली तर ती यादी देखील प्रसिध्द करण्याच्या सूचना आम्ही देऊ. आपल्याकडे फ्लाईंग स्क्वॉड्स आहेत. मात्र त्यांची जबाबदारी निश्चित करावी लागेल. पथके दिवसाला किती तपासण्या करतात, दिवसाला किती कार्यवाही करतात हे पाहून त्याची व्याप्ती, नियमितता अधिक प्रभावीपणे करण्याची आवश्यकता आहे. आम्ही

श्री. अमित देशमुख ....

या संदर्भात देखील उचित पावले उचलू. सन्माननीय सदस्य श्री. सुनील शिंदे यांनी सांगितले की, आपल्याला हा कायदा अधिक कडक करावा लागेल. हे खरे आहे. एखाद्यावर कारवाई करुन त्याला अटक केली तर त्याला लगेच जामीन मिळतो. न्यायालयीन प्रकरण चालत राहते. एखाद्या बोगस डॉक्टरमुळे एखाद्या रुग्णाचा मृत्यू होणार असेल किंवा इजा होणार असेल किंवा लाईफ थ्रेटनिंग अवस्था होणार असेल तर कायदा कडक करण्याबाबत देखील शासन विचार करेल. सन्माननीय सदस्य श्री. नरेंद्र दराडे यांनी सांगितले की, फास्ट ट्रॅक कोर्टमध्ये अशा केसेस चालवाव्यात. आम्ही त्याची सुध्दा शहानिशा करुन, तपासून हे करता आले तर ते देखील करण्याची आमची तयारी आहे.

सभापती महोदया, सन्मानीय सदस्य श्री. अमोल मिटकरी यांनी जीएमसी संदर्भात सांगितले. सदर प्रश्नाला धरुन त्यांचा प्रश्न नसला तरी त्यांनी एक मुद्दा उपस्थित केला आहे की, जीएमसीमध्ये वर्ग ३, वर्ग ४ कर्मचारी यांचा व्यवहार, वागणे उचित नाही. वर्ग १ ते ४ अशा सगळ्यांचे ओरिएन्टेशन करण्याची गरज आहे, लोकांशी, रुग्णांशी कसे वागावे, कसा व्यवहार असावा यासाठी त्यांना काही वेगळे मार्गदर्शन करण्याची आवश्यकता आहे असे दिसत आहे. विभागाच्या वतीने विद्यापीठाच्या मदतीने संचालनालयाच्या पुढाकाराने आम्हाला हे सर्व करता येणे शक्य आहे आणि आम्ही ते करु.

सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री. संजय दौंड यांनी ग्रामपंचायतीच्या परवानग्या असतात, तेथे जागामालक जागा देतो असे सांगितले. ही सूचना जरी चांगली असली तरी शासनाच्या नियमाच्या कक्षेत, वैद्यकीय शिक्षण विभागाच्या कक्षेत ती सूचना बसणे कठीण आहे. ग्रामसभेत डॉक्टर्स यादीचे वाचन, ती यादी ग्रामपंचायतीमध्ये नोंदून प्रसिध्द करणे येथपर्यंत निश्चित करता येईल. डीएचओ, टीएचओ हे देखील याबाबत नियंत्रण करतात. एखाद्या तालुक्यात, जिल्ह्यात बोगस डॉक्टरांचा सुळसुळाट अधिक वाढला असेल तर पहावे लागेल. सन्माननीय

असुधारित प्रत

श्री. अमित देशमुख ....

सदस्यांनी बीडसंदर्भात सांगितले. बीडमध्येच पहिल्यांदा सीएस व डीएचओ यांच्यावर कारवाई करावी लागेल. सन्माननीय सदस्यांनी येथे माहिती दिली आहे, त्यामुळे आम्ही अशा सूचना करु की, जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी यांना बोगस डॉक्टरांचा सुळसुळाट निदर्शनास आला असेल तर निश्चितपणे बीडपासून कारवाई सुरु करता येईल. सन्माननीय सदस्य श्री. किरण सरनाईक यांनी सीएस व डीएचओ यांच्याकडून बोगस डॉक्टर किती आहेत याचा अहवाल मागवून घ्यावा असे सांगितले. ही सूचना अतिशय महत्वाची आहे. आम्ही त्या दिशेने देखील पावले उचलू.

सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांनी चांगली कल्पना मांडली. ते म्हणाले की समित्यांची व्याप्ती करताना नियंत्रण करणाऱ्या समित्यांमध्ये विधानसभेच्या सन्माननीय सदस्यांना समितीचे अध्यक्ष किंवा सह अध्यक्ष किंवा जे काही असेल ते केले तर बरे होईल. मला वाटते की, ती सूचना चांगली आहे. सूचनेवर निश्चित विचार करण्यात येईल. समित्यांची पुनर्रचना करु, तेव्हा त्यामध्ये त्या सूचनेचा समावेश नक्की करु.

**उप सभापती** : उत्तम चर्चा झाली आहे. माननीय मंत्र्यांनी बरीच रोखठोक भूमिका घेतली आहे.

----

असुधारित प्रत

**पृ.शी.** : ऊस उत्पादक शेतकऱ्यांना दोन टप्प्यांत एफआरपी देणे.

**मु.शी.** : ऊस उत्पादक शेतकऱ्यांना दोन टप्प्यांत एफआरपी देणे यासंबंधी सर्वश्री. सदाभऊ खोत, गोपिचंद पडळकर, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. सदाभाऊ खोत (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम १०१ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"उसाची एफ.आर.पी. दोन टप्प्यात देण्याच्या राज्य शासनाच्या निर्णयाविरोधात शेतकरी संघटनांनी आंदोलनाची भूमिका घेतल्याचे माहे फेब्रुवारी, २०२२ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास येणे, शुगरकेन कंट्रोल ॲक्टनुसार शेतकऱ्यांना केंद्र सरकारने जाहीर केलेली एफ.आर.पी. ऊस कारखान्याला दिल्यानंतर १४ दिवसांच्या आत एक रकमी मिळाली पाहिजे असा कायदा असताना या कायद्याची पायमल्ली करण्याचे काम शासनाच्या दिनांक २१ फेब्रुवारी, २०२२ रोजीच्या शासन निर्णयामुळे होत असणे, राज्य शासनाने नव्याने काढलेल्या दिनांक २१ फेब्रुवारी, २०२२ रोजीच्या शासन निर्णयामुळे एफ.आर.पी. आता दोन टप्प्यांमध्ये ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मिळणार असणे, पहिला टप्पा हा पश्चिम महाराष्ट्र, खानदेश यासाठी १०% व दुसरा टप्पा मराठवाडा विदर्भासाठी ९.५% उताऱ्याचा असणे, शिवाय यातून तोडणी आणि वाहतूक खर्च वजा करावयाचा असणे, तर दुसरा हप्ता साखर कारखान्यांचा गाळप हंगाम संपल्यानंतर पंधरा दिवसांनी कारखाना देणार असणे, अनेक कारखान्यांनी केलेले जे खर्च आहेत ते सर्व खर्च वजा करून राहिलेले पैसे शेतकऱ्याला द्यायचे असणे, याचा अर्थ शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात नुकसान होणार असून या निर्णयामुळे शेतकऱ्यांमध्ये सरकारच्या प्रती निर्माण

श्री. सदाभाऊ खोत ....

झालेली संतापाची लाट, त्यामुळे शेतकऱ्यांना एक रकमी एफ.आर.पी. देण्याबाबत नवीन शासन निर्णयात सुधारणा करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. बाळासाहेब पाटील (सहकार मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(**प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत

श्री. सदाभाऊ खोत : सभापती महोदय, राज्यातील जवळपास ३० ते ३५ लाख ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या दृष्टीने हा अत्यंत जिव्हाळ्याचा व महत्त्वाचा प्रश्न आहे. एफआरपी दोन हप्त्यांमध्ये द्यावी असा अध्यादेश, परिपत्रक सहकार विभागाने, राज्य सरकारने आयुक्तांना पाठविले आहे. एफआरपीचा कायदा आहे. एफआरपी कायदा ऊस नियंत्रण आदेश, १९६६ नुसार कलम २-३ यामध्ये स्पष्ट आहे की, ऊस उत्पादक शेतकऱ्यांना त्यांचा ऊस गेल्यानंतर एफआरपी चौदा दिवसांच्या आत, असेल ती, एकरकमी मिळाली पाहिजे. केंद्र सरकारचा कायदा आहे. कायद्यामध्ये कोणत्याही प्रकारची दुरुस्ती झाली नाही. कोणतीही दुरुस्ती झाली नसताना राज्य सरकारने या संदर्भात एफआरपी एक टप्प्यात द्यावी की दोन टप्प्यांत द्यावी याबाबत साखर आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. ती अभ्यास समिती आहे. साखर आयुक्तांचा किती ऊस आहे हे मला माहीत नाही. अभ्यास समितीमध्ये विद्वान होते, ते कधी ऊसाला पाणी देण्यासाठी जात होते आणि कोणत्या शेतात ऊसाचे कोणते बियाणे लावायचे याची प्रमाणपत्रे सरकाने त्यांच्याकडून घेतली असतील. कारण शेतकऱ्यांपेक्षा ते लोक विद्वान होते, महान लोक होते. शेतकऱ्यांच्या प्रश्नावर समिती नेमली आणि त्यांना सांगितले की, एफआरपी कशी द्यायची हे सांगावे. पण यासाठी अभ्यास करण्याची काय गरज आहे ? अभ्यास गट नेमायचा होता तर तो शेतामध्ये राबणाऱ्या, काम करणाऱ्या शेतकऱ्यांचा नेमायला पाहिजे होता. मात्र त्यांचा अभ्यास गट नेमला नाही.

नंतर श्री. खर्चे ....

असुधारित प्रत

श्री.सदाभाऊ खोत.....

जे महिन्याला दीड लाख पगार घेतात असे पगारी बाबू एसीमध्ये बसून जे शेतकरी उन्हातान्हांत काम करतात त्यांच्यासाठभ एफआरपी किती द्यावी हे ठरवितात. उंटावरुन शेळी हाकणारे हे शहाणे सरकार एफआरपी दोन हप्त्यात द्या असे सांगते. हा प्रश्न महत्वाचा आहे, शेतकऱ्यांना एक रकमी एफआरपी मिळाली पाहिजे. एफआरपी हे शेतकऱ्यांच्या दृष्टीने कवच कुंडले आहेत. हे कवच कुंडले काढून घेण्याचे काम सरकारने केले आहे. पूर्वी एफआरपीचा बेस साडेआठ टक्के रिकवरीचा होता. तो बेस युपीए सरकारच्या काळात साडेआठचा साडेनऊ टक्के करण्यात आला. त्यामुळे शेतकऱ्यांना ३०० रुपये प्रति टन फटका बसला. माननीय पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी यांनी ९५०० कोटी रुपये देशाचा आयकर माफ करण्याचा निर्णय घेतला त्यावेळी माननीय श्री.देवेंद्र फडणवीस दिल्ली येथे गेले होते. त्यामध्ये महाराष्ट्राचा ७५०० कोटी रुपयांचा फायदा झाला. हा प्रश्न ३५ वर्षापासून प्रलंबित होता. एका बाजूला साखर कारखानदारीला उभारी देण्यासाठी केंद्र शासन इथेनॉलबाबत चांगले निर्णय घेत आहेत. त्यांचे दर वाढवून देत आहेत. हे सरकार महाराष्ट्रातील शेतकऱ्यांबाबत निर्णय घेत असताना एफआरपीचे तुकडे करण्याचा निर्णय घेतला आहे. शेतकऱ्यांना एक रकमी एफआरपी मिळाली तर शेतकरी त्यांचा खर्च भागवू शकतो. मुलांचे शिक्षण होऊ शकते. आम्ही एक रकमी एफआरपी का मागतो त्याचे कारण असे आहे की, साखर कारखान्यांनी एफआरपीचा एक हप्ता दिल्यावर दुसरा हप्ता देण्याची गॅरंटी नसते. दोन ते तीन वर्षे अनेक कारखांन्यांची पैसे दिले नाहीत. अनेक सन्माननीय सदस्यांना त्यांचा अनुभव आलेला आहे. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे एफआरपीचे १६५४ कोटी रुपये थकलेले आहेत. ही अतिशय गंभीर बाब आहे. शेतकऱ्यांना खर्चासाठी पैसे लागत नाहीत काय ? ज्या कारखान्यांनी शेतकऱ्यांचे एफआरपीचे पैसे दिले नाहीत त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली. ज्या कारखान्यांनी एफआरपीची रक्कम थकविली त्या कारखान्याच्या संचालक मंडळावर तसेच कारखाना मालकावर एफआयआर दाखल केला आहे काय ? त्यांची संपत्ती जप्त केली काय ? शेतकऱ्यांबाबत विचार करायला शासनाला वेळ नाही. एफआरपीचे दोन टप्पे करुन त्यांना लुटण्यासाठी समिती नियुक्त केली आहे. ज्या कारखान्यांनी

असुधारित प्रत

श्री.सदाभाऊ खोत....

एफआरपी का दिली नाही त्यासाठी तज्ज्ञ लोकांची समिती नियुक्त करायला पाहिजे होती. एफआरपीचे दोन टप्पे करण्यास महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचा विरोध आहे. अशा प्रकारे एफआरपीची मोडतोड करण्यात येत असेल तर येत्या गळीत हंगामात शेतकरी रस्त्यावर उतरुन आंदोलन करतील. साखर कारखान्याची धुरांडे आम्ही पेटवू देणार नाही. हा शेतकऱ्यांचा जीवन मरणाचा प्रश्न आहे.

सभापती महोदया, माझे सहकार मंत्री महोदयांना दोन प्रश्न आहेत. एफआरपी दोन टप्प्यात देण्याबाबत जे परिपत्रक काढण्यात आले त्याला शेतकऱ्यांचा विरोध आहे ते परिपत्रक रद्द करण्यात येईल काय ? ज्या कारखान्यांनी एफआरपी दिली नाही त्यांच्यावर फौजदारी कारवाई करण्यात येईल काय ? तिसरा प्रश्न अनेक साखर कारखान्यांनी शेतकऱ्यांच्या ट्रॅक्टरमध्ये १० टन ऊस असेल तर ८ टन ऊस आहे असे वजन दाखवितात. वजनात काटामारी मोठ्या प्रमाणात होते. तेथे ऑनलाईन वजन काटे बसविण्यात येतील काय ? हे वजन काटे बसविल्याशिवाय वजनातील घट व काटेमारी थांबणार नाही. सहकार मंत्री महोदयांना माझी विनंती आहे की, आपण कारखाना चांगला चालवित आहात. एफआरपी पेक्षा चांगला दर देत आहात. तुमच्या आजुबाजूला काय सुरु आहे याची आपणाला चांगली कल्पना आहे. एफआरपीचे दोन टप्पे करु नका. असे केले तर आपणाला शेतकऱ्यांचा शाप लागेल. हे सरकार शेतकऱ्याचे नाव घेते, शेतकऱ्याचे जाणते राजे आहेत असे सांगतात व शेतकऱ्यांच्या घरावर दिवसाढवळ्या दरोडा घालतात हे महाराष्ट्रातील ऊस उत्पादक शेतकरी कदापी सहन करणार नाही. दीड कोटी लोकांची रोजीरोटी साखर कारखानदारीवर अवलंबून आहे. त्यामुळे हा शासन निर्णय मागे घेण्यात यावा अशी माझी विनंती आहे.

श्री.बाळासाहेब पाटील : सभापती महोदया, या राज्यात सहकारी साखर कारखानदारी मोठ्या प्रमाणात निर्माण झाली. या कारखानदारीच्या माध्यमातून महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या आर्थिक जीवनात उन्नती झाली हे आपणाला मान्य करावे लागेल. त्याचप्रमाणे त्या भागात शिक्षणाच्या सुविधा निर्माण

असुधारित प्रत

श्री.बाळासाहेब पाटील....

करण्यात आल्या आहेत. अनेक मुले परदेशात गेली आहेत. कारखान्याच्या माध्यमातून चांगल्या प्रकारचे तंत्रज्ञान लोकांना देण्यात येते. त्यामध्ये पट्टा पध्दत असेल ड्रीपचा अवलंब केला पाहिजे. यासाठी मार्गदर्शन केले जाते. राज्यात दिवसेंदिवस ऊसाच्या क्षेत्रात वाढ होत आहे. त्यामुळे हेक्टरी उत्पादनात वाढ होत आहे. गेल्या अनेक वर्षापासून एक प्रघात होता की, कारखान्यात ऊस आल्यावर पहिला हप्ता एफआरपीचा दिला जात होता. दुसरा हप्ता जून महिन्यात देण्यात येत होता. त्याचे कारण असे होते की, जून महिन्यात पाऊस पडल्यानंतर पेरणीची गडबड असते, शेतकऱ्यांना बी-बियाणे व खतांसाठी पैशांची गरज असते. त्याचप्रमाणे त्या काळात शाळा सुरु होतात. शेतकऱ्यांच्या मुलांना शाळेत जाण्यासाठी पुस्तक व दप्तर लागते त्यासाठी त्या रकमेचा उपयोग होत होता. पुढील सीजन सुरु होण्यापूर्वी उर्वरित रक्कम देण्यात यावी अशी पध्दत होती. केंद्र शासनाचा कायदा आलेला आहे. १४ दिवसात एफआरपी देण्याची भूमिका घेण्यात आली. काही कारखान्यांनी एफआरपी दिली नाही ही बाब खरी आहे. अशा कारखान्यांवर शासनाने कायदेशीर कारवाई केली आहे. त्यांच्याकडील साखरेची पोती जप्त करण्यात आली. ती विकण्याची प्रक्रिया करण्यात आली. मागील दोन वर्षात एफआरपी देण्याचे प्रमाण वाढलेले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना दिलासा देण्याचे काम शासनाच्यावतीने सुरु आहे. पूर्वी असे होते की, गेल्या वर्षापर्यंत कारखान्यात आलेल्या ऊसाची रिकवरी व त्या वर्षात झालेला तोडणी व वाहतुकीचा खर्च गृहित धरला जात होता. निसर्ग सातत्याने बदलत असल्यामुळे एखाद्या वर्षी रिकवरी कमी असते तर कधी जास्त असते. गेल्या वर्षीच्या रिकवरीप्रमाणे यावर्षी दर देणे ते न्यायिकदृष्टया योग्य नव्हते. तोडणी व वाहतुकीचा खर्च पाहिला तर प्रत्येक वर्षात वाढ होत असते. डिझेल व वाहतुक खर्चाची वाढ होते. यावर्षी ज्यांच्याकडून ऊस घेण्यात आला त्यांना गेल्या वर्षीची तोडणी व वाहतूक खर्च द्यायचा म्हणजे यावर्षी ज्यांचा ऊस घेतला त्यांना त्यातून थोडी सूट मिळत होती. समजा गेल्यावर्षी एखादा कारखाना बंद असेल किंवा नवीन कारखाना सुरु झाला तर अशा प्रकरणात काय करायला पाहिजे हा प्रश्न निर्माण झाला आहे. समिती नियुक्त करण्याचा निर्णय सरकारने सुओमोटो घेतला असे सन्माननीय

श्री.बाळासाहेब पाटील....

सदस्यांनी समजू नये. केंद्र शासनाने २२ ऑक्टोबर,२०२० रोजी अधिसूचना काढली त्यानुसार सन २०१९-२० पासून राज्यातील साखर कारखान्यांनी गाळप कामांची एफआरपी जाहीर करण्याचे अधिकार संबंधित राज्य सरकारांना प्रदान केले आहेत. त्या अनुषंगाने ही समिती नियुक्त करण्यात आली आहे. या समितीमध्ये साखर आयुक्तांना सदस्य घेण्यात आले मॉरिटरींग करण्याची जबाबदारी त्यांची आहे. सर्व बाबी साखर आयुक्तांमार्फत पार पाडण्यात येते. या समितीमध्ये काही तज्ञ लोक घेण्यात आले. राज्य साखर कारखाना संघ, वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट व शेतकऱ्यांचे प्रतिनिधी त्या समितीमध्ये घेण्यात आले आहेत.

या नंतर श्री.बोरले...

असुधारित प्रत

श्री.बाळासाहेब पाटील......

माननीय मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली ऊस नियंत्रण समिती आहे. त्या समितीने हा निर्णय घेतलेला आहे आणि त्याप्रमाणे निर्णय जाहीर करण्यात आलेला आहे. मी सांगू इच्छितो की, एफआरपी दिल्यानंतर बँकांना अधिक व्याज द्यावे लागते आणि त्याचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष बोजा सहकारी कारखान्यावर पडतो. रक्कम उचलल्यानंतर त्याचे व्याज सुरु होते. पहिला हप्ता दिल्यानंतर दुसरा हप्ता देणे बंधनकारक आहे आणि त्या दृष्टीने हा निर्णय झालेला आहे. आपण सर्वांनी त्यासाठी सहकार्य कराल, अशी मला आशा आहे. कारण सहकारी साखर कारखानदारीमध्ये कधी तरी हा बदल करणे आवश्यक होते. आपण त्या दृष्टीने सहकार्य करावे, अशी माझी विनंती आहे.

श्री.गोपिचंद पडळकर : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री.सदाभाऊ खोत यांनी लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून जो विषय उपस्थित केला तो ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या दृष्टीने अत्यं महत्वाचा आहे. पश्चिम महाराष्ट्रातील अनेक कारखान्यांनी दोन-तीन वर्षे शेतकऱ्यांना बिले दिलेली नाहीत. शेतकरी आंदोलने करतात, मोर्चे काढतात. शेतकऱ्यांचा रोज आक्रोश सुरु आहे. परंतु शेतकऱ्यांना एकही रुपया मिळालेला नाही. आपण सांगितले की, ज्या कारखान्यांनी एफआरपी दिलेली नाही त्यांच्यावर कारवाई करण्यात आलेली आहे. एफआरपी दिली नाही म्हणून किती कारखान्यांवर कारवाई करण्यात आली, ती कारवाई नेमकी कोणत्या स्वरुपाची आहे हे राज्यातील जनतेला कळले पाहिजे. आपण सांगता की, केंद्र शासन शेतकऱ्यांच्या विरोधात आहे. आपण प्रत्येक वेळी केंद्र शासनाच्या विरोधात भूमिका मांडता. केंद्र शासनाने एक रकमी एफआरपी देण्याचा निर्णय घेतलेला असताना सुद्धा आपण त्यांचे दोन तुकडे का करीत आहात ? तत्कालीन मुख्यमंत्री स्व.वसंतदादा पाटील यांनी पंढरपूर येथील सहकारी साखर कारखाना लिक्विडेशनमध्ये निघाल्यानंतर तो कारखाना सुधाकर परिचारक यांना देण्याचे मान्य केले. त्यांनी सुधाकर परिचारक यांना विनंती केली की तुम्ही हा कारखाना खाजगी तत्वावर चालवावा. राज्यातील सर्व

श्री.गोपिचंद पडळकर......

सहकारी कारखान्यांनी आदर्श घ्यावी अशी ही गोष्ट आहे. सुधाकर परिचारक यांना खाजगी पद्धतीने दिलेला कारखाना सहकारी पद्धतीने सुरु केला, मला तो कारखाना खाजगी करावयाचा नाही असे त्यांनी सांगितले. आज तो कारखाना पहिल्या क्रमांकाने सुरु आहे. मागील दोन-तीन महिन्यांपूर्वी त्या कारखान्याला उत्कृष्ट कारखाना म्हणून पारितोषिक मिळाले. मग असे असताना आपण सहकारी चळवळीकडे लक्ष दिले पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री.सदाभाऊ खोत यांनी सांगितल्याप्रमाणे कारखान्यामध्ये काटामारी होते. माझी विनंती आहे की, आपण आमदारांची समिती नियुक्त करावी. जेणे करुन आमदारांना केव्हाही कारखान्यावर जाऊन वजन काटा तपासता येईल. कारण आपण जे अधिकारी तपासणीसाठी पाठविता ते मॅनेज होतात. दुसरे म्हणजे यावर्षी ऊसाचे अतिरिक्त ऊस उत्पादन झालेले आहे. सर्व लोकांची मागणी आहे की, आम्हाला टोळी द्यावी. अनेक कारखाने बंद आहेत. जे कारखाने सुरु आहेत त्यांना जेथून कमी दराने ऊस मिळतो तेथून ते प्रथम ऊसाची खरेदी करतात. ते शेतकरी त्यांचे सभासद नाहीत. नोंदणी केलेले सभासद वेगळे आहेत. समजा सांगली जिल्ह्यात कारखाना असेल आणि सोलापूर जिल्ह्यात कमी दराने ऊस मिळत असेल तर ते सांगली जिल्ह्यातून ऊस न घेता सोलापूर जिल्ह्यातून ऊस घेतात. मराठवाड्यात सुद्धा ऊसाचे अतिरिक्त उत्पादन झालेले आहे. पश्चिम महाराष्ट्रात सुद्धा तीच परिस्थिती आहे. सहकार मंत्री महोदयांनी राज्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना आश्वासित करावे. आपण तेथील संबंधित अधिकाऱ्यांना सूचना द्याव्यात. प्रत्येक शेतकऱ्याचा ऊस कारखान्यात कसा जाईल, कोणताही कारखाना बंद होणार नाही याबाबत आपण काळजी घेणार आहात काय ?

श्री.बाळासाहेब पाटील : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री.गोपिचंद पडळकर यांनी जो मुद्दा मांडला ती गोष्ट खरी आहे की, सहकारी साखर कारखानदारीमध्ये एक सायकल असते. एखाद्या वर्षी ऊसाचे उत्पन्न अधिक होते तर

असुधारित प्रत

श्री.बाळासाहेब पाटील......

एखाद्या वर्षी कमी उत्पादन होते. यावर्षी ऊसाच्या क्षेत्रात वाढ झाली असून हेक्टरी उत्पन्न मोठ्या प्रमाणावर वाढलेले आहे. त्यामुळे ऊसाचे गाळप करण्याचे मोठे आवाहन राज्यासमोर आहे. आम्ही व साखर आयुक्त प्रत्येक आठवड्याला आढावा घेतो. आम्ही ऊसाचे नियोजन करण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत. कृपा करुन कारखाने बंद करु नयेत अशा सूचना कारखान्यांना देण्यात आलेल्या आहेत. कार्यक्षेत्रातील ऊस तसाच ठेऊन बाहेरुन ऊस आणला जात असेल तर संबंधित कारखान्यावर सुद्धा कारवाई केली जाईल. सन्माननीय सदस्यांच्या भागातील दोन-तीन कारखाने बंद आहेत. त्यामुळे तेथे तशा प्रकारचा प्रश्न आहे. त्या संदर्भात सूचना दिल्या जातील. ऊस वजन काट्याबाबत सातत्याने बोलले जाते. वजन मापे व शेतकरी संघटनेचे प्रतिनिधी यांचा फ्लाईंग स्कॉड निर्माण करण्यात आलेला आहे. तो स्कॉड प्रत्येक कारखान्यामध्ये जाऊन वजन काटे तपासण्याचे काम करीत असतो. सन्माननीय सदस्य श्री.सदाभाऊ खोत यांनी एफआरपी संदर्भात प्रश्न उपस्थित केला होता. मी सांगू इच्छितो की, जवळपास शंभर टक्के एफआरपी दिलेले ६९ कारखाने आहेत, ८० ते ९९ टक्के एफआरपी दिलेले ६२ कारखाने आहेत, ६० ते ६९ टक्के एफआरपी दिलेले ३४ कारखाने आणि ० ते ५९ टक्के एफआरपी दिलेले २९ कारखाने आहेत. ज्यांनी एफआरपी दिलेली नाही त्यांच्यावर कारवाई करण्यात आलेली आहे. आपण साखरेची विक्री करुन शेतकऱ्यांना पैसे देऊन प्रश्न सोडविलेला आहे. परंतु कायदेशीर प्रश्न निर्माण झालेला आहे. ज्या बँकेने उचल दिलेली आहे त्या बँकांचे असे म्हणणे आहे त्यावर आमचा पहिला हक्क आहे. काही बँका कोर्टात गेलेल्या आहेत. शेतकऱ्यांना न्याय मिळावा, अशी शासनाची भूमिका आहे. अलीकडच्या काळात इथेनॉल संदर्भात पॉलिसी आलेली आहे. यावर्षी अंदाजे १० लाख क्विंटल ऊस इथेनॉलसाठी वापरण्यात येईल. आपल्याला इंधनाची गरज आहे. अनेक कारखान्यांनी पुढील वर्षी अशा प्रकारचे प्रकल्प हाती घेतलेले आहे. त्यासाठी केंद्र शासनाचे व राज्य शासनाचे सहकार्य आहे. भविष्यात साखरेचे उत्पन्न कमी होऊन इथेनॉल, को-जनचे उत्पन्न वाढले पाहिजे यासाठी राज्य शासन निश्चितपणे प्रयत्न करीत आहे.

असुधारित प्रत

श्री.शशिकांत शिंदे : सभापती महोदया, मंत्री महोदय उत्कृष्ट कारखानदार आहेत. ते चांगल्या प्रकारे कारखाना चालवित आहेत. मघाशी सांगितल्याप्रमाणे आपण नियम केल्यानंतर सुद्धा शेतकऱ्यांना न्याय मिळत नाही, ही वस्तुस्थिती आहे. ज्या ठिकाणी ऊसाचा दर कमी असतो किंवा यावर्षी ऊसाचे उत्पादन जास्त असल्यामुळे ज्या ठिकाणी कमी दरात ऊस मिळतो तेथील ऊस प्रथम घेतला जातो, ही वस्तुस्थिती आहे. शासनाने दर निश्चित केल्यानंतर कारखानदार त्या दराव्यतिरिक्त कमी दराने ऊस खरेदी करतात, ही देखील वस्तुस्थिती आहे. संबंधित शेतकऱ्यांवर अन्याय होणार नाही, जो दर निश्चित झालेला आहे त्यानुसार शेतकऱ्यांना दर मिळेल काय आणि यावर नियंत्रण ठेवण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात येणार आहे ? दुसऱ्या बाजूला आपण ऊस उत्पादन जास्त झाल्यानंतर ऊसापासून इतर उत्पादन निर्मिती करण्यासाठी प्राधान्य देत आहात. मध्यंतरीच्या काळात केंद्र शासनाने नियमावली जाहीर केलेली आहे. नवीन कारखानदारीसाठी २० किलो मीटरची अट आहे. परंतु इथेनॉल व इतर उत्पादनासाठी बंदी घालण्यात आलेली आहे, ही गोष्ट खरी आहे काय आणि त्याचे कारण काय आहे ?

श्री.बाळासाहेब पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.शशिकांत शिंदे यांनी सांगितल्याप्रमाणे जे कारखानदार स्वत:चे कार्यक्षेत्र सोडून बाहेरुन ऊस खरेदी करतील त्यांच्यावर निश्चितपणे कारवाई केली जाईल. दुसरे म्हणजे नवीन कारखाने काढण्यापेक्षा काही कारखान्यांनी विस्तार वाढ केलेली आहे. आम्ही विस्तार वाढ करताना त्यांच्या भागात एकंदरीत ऊसाचे उत्पादन किती आहे किंवा शेती खात्याकडून परवानगी घेऊन त्यासाठी परवानगी दिलेली आहे. मी स्वत: अनेक कारखान्यांना परवानगी दिलेली आहे. कारण मी त्यातून पोळून निघालो आहे. सन्माननीय सदस्यांनी माझा कारखाना चांगल्या प्रकारे सुरु असल्याबाबत उल्लेख केलेला आहे त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. परंतु सहकारी कारखानदारी सातत्याने अडचणीत येत आहे आणि त्यासाठी नैसर्गिक व इतर कारणे आहेत. आपण अनेक कारखान्यांना विस्तार वाढीसाठी परवानगी दिलेली आहे. भविष्यात जेवढे ऊस उत्पादन होईल त्याचे निश्चितपणे गाळप केले जाईल.

यानंतर श्री.सांगळे......

असुधारित प्रत

श्री.बाळासाहेब पाटील...

सन्माननीय सदस्यांनी हवाई अंतराची अट शिथील करण्यासंबंधी मागणी केली आहे. परंतु ही बाब शक्य नाही. तेथील प्रकल्प फिजीबल झाला पाहिजे. कधी जास्त ऊस व कधी कमी ऊस येणे ही सायकल असते. ऊस कमी आल्यानंतर तो गाळपासाठी बाहेर जातो. परंतु जास्त ऊस आल्यानंतर शेतकऱ्यांकडून दबाव आणला जातो की, तुम्ही आमचा ऊस गाळपासाठी घेतला पाहिजे. शासनाने यावर्षी ज्या प्रकल्पांना मंजुरी दिलेली आहे, ते प्रकल्प पुढील वर्षी सुरु होतील. त्यामुळे हा प्रश्न निर्माण होणार नाही.

श्री.सदाभाऊ खोत : सभापती महोदया, मंत्री महोदयांनी उत्तरात असे सांगितले की, आम्हाला केंद्र शासनाने कळविल्यामुळे ऊसाच्या बिलाचे दोन हफ्ते करीत आहोत. माननीय सहकार मंत्री त्यांच्या सोयीप्रमाणे उत्तर देत आहेत. दिनांक ८ ऑक्टोबर, २०२१ रोजी मी स्वत: माननीय केंद्रीय मंत्री श्री. पियुष गोयल साहेबांना भेटलो होतो. त्यावेळी त्यांनी असे सांगितले होते की, आम्ही एफआरपीमध्ये कोणत्याही प्रकारची मोडतोड करणार नाही. त्यावेळी त्यांनी दिलेले पत्र माझ्याकडे उपलब्ध आहे. मंत्री महोदय, मी सदर पत्र माननीय सभापती यांच्यामार्फत आपल्याला देतो. अशा प्रकारे केंद्र शासनाकडून एफआरपी ठरविली जाणार आहे. परंतु एफआरपी देण्याबाबत राज्य शासनाने निर्णय घेतला पाहिजे. गुजरात येथील घनदेवी साखर कारखाना ऊसाकरिता प्रती टन साडेतीन ते चार हजार रुपये दर देत आहे. त्याप्रमाणे शासनाने निर्णय घेतला पाहिजे. परंतु शासन आपल्या सोयीप्रमाणे त्या गोष्टीचा अर्थ लावून निर्णय घेत आहे. सभापती महोदया, पूर्वी एमएसपी होती. परंतु शेतकऱ्याला ऊसाचा पहिला हफ्ता दिल्यानंतर पुढील हफ्ता दिला जात नसल्यामुळे शेतकरी एकरकमी ऊस दराची मागू लागला. शेतकऱ्यांना १९६६ मधील शुगरकेन कंट्रोल ॲक्ट माहीतच नव्हता. दिनांक १२ डिसेंबर, २००२ रोजी आदरणीय श्री.शरद जोशी यांनी या संदर्भात दौंड येथे पहिली ऊस परिषद घेतली होती. बारामतीचे श्री.तौरे अण्णा ऊस परिषदेचे स्वागताध्यक्ष होते. त्या परिषदेमध्ये असा विषय उपस्थित झाला होता की, कायद्यानुसार ऊसाला अमुक दर मिळाला पाहिजे. तोपर्यंत आम्हाला देखील या

अप्रकाशित प्रत

श्री.सदाभाऊ खोत....

बाबतीत काही माहीत नव्हते. १९६६ मधील शुगरकेन कंट्रोल ॲक्टमध्ये संसदेमध्ये अद्याप कोणतीही दुरुस्ती किंवा बदल केली नाही. आमच्या बाजूने सदर कायदा आहे. अशा परिस्थितीत राज्य शासन यात बदल का करीत आहे ? आम्ही केलेल्या आंदोलनामध्ये त्यावेळी शिवसेना आमच्या समवेत होती. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे लोक हुशार आहेत. कारण तुमचे साखर कारखाने आहेत. राज्यात जवळपास १९० ते १९५ साखर कारखाने आहेत. तुम्ही हा बदल आपल्यासाठी तसेच कारखानदारांसाठी करीत आहात, शेतकऱ्यांसाठी आपण ही कार्यवाही केलेली नाही.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्यांनी आरोप प्रत्यारोप करु नये. स्पेसिफिक प्रश्न विचारावा.

श्री.बाळासाहेब पाटील : सभापती महोदया, सन्माननीय सदस्यांनी फक्त राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे साखर कारखाने असल्यासंबंधी आक्षेप घेतला आहे. मी त्यासंबंधी दुरुस्ती करतो. राज्यात राष्ट्रीय कॉंग्रेस, राष्ट्रवादी कॉंग्रेस, भाजप, शिवसेना तसेच सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील या सर्वांचे साखर कारखाने आहेत.

श्री.सदाभाऊ खोत : सभापती महोदया, शासन या संदर्भात जो निर्णय घेत आहे त्याला राज्यातील शेतकऱ्यांचा विरोध आहे. या बाबतीत कारखान्यातील संचालक मंडळाला निर्णय घेऊ द्यावा. शासनाने त्यात हस्तक्षेप करणे योग्य होणार नाही. ही बाब ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या विरोधात आहे. ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी लढा देऊन एफआरपी मिळवली आहे. त्याकरिता शेतकऱ्यांनी अनेक आंदोलने केली. त्यात अनेक शेतकऱ्यांचा बळी गेला. या संदर्भात ५-५ वर्षांपासून कोर्टात तारखा पडत आहेत. मला २५ तारखेला कोर्टात हजर रहायचे आहे. त्यामुळे तुम्ही आमच्या अन्नामध्ये कृपा करुन विष कालवू नका. सन्माननीय सदस्य श्री.शशिकांत शिंदे यांनी २० कि.मी. च्या हवाई अंतरासंबंधी प्रश्न विचारला होता. त्यावर मंत्री महोदयांनी असे उत्तर दिले की, जास्त कारखाने झाले आणि ऊस कमी पडल्यास कारखाने बंद पडतील. परंतु असे काही घडणार नाही. जे कारखाने चांगल्या रितीने चालविले जातील ते नेहमीच सुरु राहतील. उदाहरण सांगायचे झाल्यास एखाद्या गावात

असुधारित प्रत

श्री.सदाभाऊ खोत...

पिठाच्या गिरण्या असतात. ज्या गिरणीमध्ये धान्य बारीक दळून दिले जाते, गिऱ्हाईकांना उधार दिले जाते. त्या गिरणीमध्ये जास्त गिऱ्हाईक धान्य दळण्यासाठी जात असतात. हवाई अंतर किती असावे याबाबत राज्य शासनाने धोरण ठरविण्यासंबंधी सी.रंगराजन समितीने सांगितले आहे. राज्य शासनाने हवाई धोरण १५ कि.मी. वरुन २० कि.मी. पर्यंत वाढविले. ते अंतर काढणार आहात का ? कारखान्यांच्या शेजारी कारखाने झाल्यास काही हरकत नाही. जो कारखाना चांगला चालेल त्याच्याकडे शेतकरी आपला ऊस गाळपासाठी देतील. एखाद्या दुकानातील मालामध्ये खडे, वाळू मिक्स असल्यास त्या दुकानामध्ये माल घेण्यासाठी गिऱ्हाईक जाणार नाहीत. त्यामुळे ज्याच्या दुकानात चांगला माल मिळतो त्याच्याकडे गिऱ्हाईक माल घेण्यासाठी जातील. परंतु तुमचे असे आहे की, तुम्ही मालामध्ये खडे मिक्स करणार, वाळूही घालणार, तेलामध्ये पाणी मिक्स करणार आणि आमच्याकडेच शेतकऱ्यांनी आले पाहिजे असे सांगणार. ही बाब योग्य नाही. शेतकऱ्यांना या बाबतीत स्वातंत्र्य दिले पाहिजे. कारखानदारांनी वजन काटा तपासणी करण्यासाठी शेतकऱ्यांची समिती ठेवली आहे. कारखानदार वजन काटा तपासणी करण्यासाठी शेतकऱ्यांना कारखान्याच्या आवारात येऊ देणार नाही. शेतकऱ्यांनी बाहेरच्या काटयावर ऊसाचे वजन केल्यास कारखाने तो ऊस गाळपासाठी घेत नाहीत. कारखानदार खाली दांडके घेऊन बसलेले आहेत. शेतकऱ्यांना कारखान्यांच्या आत येऊ देत नाहीत. त्यामुळे ऑनलाईन वजन काटे झाले पाहिजेत अशी आमची मागणी आहे.

**उप सभापती** : मंत्री महोदय, हा विषय अतिशय गंभीर व महत्त्वाचा आहे. मंत्री महोदय, मी आपल्याला असे सुचवू इच्छिते की, २५ तारखेपर्यंत अधिवेशन असल्यामुळे आपण शेतकरी संघटनेसमवेत या विषयी एक बैठक घ्यावी. तसेच त्यावेळी शेतकरी संघटनाना मदत करण्यासाठी ज्या सन्माननीय सदस्यांना येण्याची इच्छा आहे त्यांना त्याकरिता मुभा द्यावी.

असुधारित प्रत

श्री.बाळासाहेब पाटील : सभापती महोदया, आपण दिलेल्या निदेशानुसार अधिवेशन काळात या संदर्भात बैठक घेतली जाईल. तसेच सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यासंबंधी मी सदनाला सांगू इच्छितो की, काही शेतकऱ्यांनी कारखान्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये लेखी दिलेले आहे की, आम्हाला ३ हफ्त्यांमध्ये ऊसाची रक्कम द्यावी. दुसरी बाब अशी आहे की, एफआरपीपेक्षा जास्त दर द्यावा असे एखाद्या कारखान्याला वाटल्यास त्याकरिता शासनाने त्यांना मुभा दिली आहे. त्यामुळे तेथे कोणताही प्रश्न येत नाही. तसेच सन्माननीय सदस्य वारंवार मागणी करीत आहेत की, कारखान्याबाबतची अट रद्द करावी. मी सन्माननीय सदस्य श्री.सदाभाऊ खोत यांना सांगू इच्छितो की, आपण त्या आंदोलनामधून पुढे आला आहात. आपण सदनामध्ये माननीय श्री.शरद जोशी यांच्या नावाचा उल्लेख केला. परंतु माननीय श्री.राजू शेट्टी यांच्या नावासंबंधी कोणताही उल्लेख केला नाही. ते अनेक वर्षांपासून आपले सहकारी होते. एखादा उद्योग फिजीबल झाला पाहिजे, तो व्यवस्थितपणे सुरु राहिला पाहिजे अशी आपण भूमिका घेतली पाहिजे. एखाद्या कारखान्याला ५ लाख टन ऊस गाळप करणे अपेक्षित असेल परंतु तेथे २ लाख टन ऊसाचे गाळप झाल्यास तो कारखाना तोटयात जाईल. मी आपल्याला माझा अनुभव सांगतो. जास्त ऊस उत्पादन झाल्यास शेतकरी आम्हाला फोन करुन विचारतात की, तुम्ही आमचा ऊस गाळपासाठी का घेत नाहीत ? आम्ही आपल्या कारखान्याचे सभासद आहोत. तसेच कमी ऊस उत्पादन झाल्यास शेतकरी ऊस गाळपासाठी बाहेर देतात. आम्ही त्यांना विचारतो की, ऊस देण्यासंबंधी काय झाले ? यावर ते आम्हाला सांगतात की, आम्ही फक्त ऊसाचा दर बघतो. त्यामुळे आपल्याला सर्व माहीत आहे की, तसे काही घडत नाही.

श्री.अंबादास दानवे : सभापती महोदया, एफआरपीच्या रास्त व किफायतशीर दरासंबंधी मी बोलणार आहे. सन्माननीय सदस्य श्री.सदाभाऊ खोत यांनी रंगराजन समितीचा उल्लेख केला. सदर समितीने केलेल्या शिफारशींपैकी आतापर्यंत किती शिफारशींची अंमलबजावणी करण्यात आली व त्याचे सध्या काय स्टेटस आहे ?

असुधारित

श्री.बाळासाहेब पाटील : सभापती महोदया, या संदर्भात मी बैठक घेणार आहे. त्या बैठकीला सन्माननीय सदस्य श्री.अंबादास दानवे यांना देखील बोलविण्यात येईल.

श्री.सदाभाऊ खोत : सभापती महोदया, राज्यात विशेषत: मराठवाडयात यावर्षी गाळपविना मोठया प्रमाणात ऊस शिल्लक राहण्याची शक्यता आहे. स्व.विलासराव देशमुख यांनी त्या काळात शेतकऱ्यांना प्रती हेक्टरी २५ हजार रुपये दर दिला होता. माझी अशी मागणी आहे की, आपण शेतकऱ्यांना किमान प्रती हेक्टरी ५० हजार रुपये दर द्यावा व त्यादृष्टीने पंचनामे करावेत.

श्री.बाळासाहेब पाटील : सभापती महोदया, स्व.विलासराव देशमुख यांनी त्या काळात राहिलेल्या ऊसाकरिता प्रती हेक्टरी २५ हजार रुपये दर दिला होता. तसेच राहिलेला ऊस पुढील वर्षी पुन्हा कारखान्यांना घ्यावा लागला होता. अशा प्रकारे मोठे चक्र सुरु होते. या संदर्भात बीड, जालना, परभणी, सातारा जिल्हयातील वाई परिसर व आटपाडी परिसरामध्ये हा प्रश्न निर्माण होत आहे. आम्ही या संदर्भात प्रत्येक आठवडयाला आढावा घेतो. आम्ही या संदर्भात नियोजन केलेले आहे.

यानंतर श्री.गागरे....

असुधारित प्रत

उप सभापती : सदरहू बैठक आपण कधी घेणार आहात?

श्री.बाळासाहेब पाटील : सभापती महोदया, पुढील आठवडयात बैठक घेण्यात येईल.

श्री.गोपिचंद पडळकर : सभापती महोदया, मंत्री महोदयांनी सांगितले की, काही शेतकऱ्यांनी लेखी दिले आहे की, तीन टप्प्यात एफआरपी देण्यात यावी. मी विनंती करतो की, अनेक कारखानदारांनी शेतीवर कर्ज काढलेले आहे. जे कारखाने बंद पडले ते सर्व शेतकरी देशोधडीला लागले आहेत. जे शेतकरी तुम्हाला लिहून देतील त्यांच्याबाबत तुम्ही घ्यायचा तो निर्णय घ्यावा. परंतु हा निर्णय दुसऱ्या शेतकऱ्यांना तुम्ही लिहून दिले म्हणून लागू करण्याचे काही कारण नाही, तसे काही करु नका.

**उप सभापती** : सदरहू लक्षवेधी सूचना संपलेली आहे. आज गुरुवार दिनांक १० मार्च, २०२२ रोजी मान्य केलेल्या म.वि.प.नियम १०१-अ अन्वये विशेष उल्लेख सूचना सभागृहाच्या पटलावर ठेवल्याचे मी घोषित करीत आहे.

आता दुपारी ३.१५ वाजेपर्यंत सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होत आहे.

(दुपारी २.४० ते ३.१५ वाजेपर्यंत मध्यंतर)

-------

असुधारित प्रत

**(मध्यंतरानंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती ( श्री.अमरनाथ राजुरकर ))**

**तालिका सभापती :** सभागृहाची बैठक अर्ध्या तासाकरिता स्थगित करण्यात येत आहे.

( सभागृहाची बैठक दुपारी ३.१५ ते ३.४५ वाजेपर्यंत स्थगित झाली.)

---------------

असुधारित प्रत

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदयांनी आज विधिमंडळात सावित्रीबाई फुले यांचा कार्यक्रम आयोजित केला आणि एक नवीन प्रथा सुरु केली त्याबद्दल मी आपले मनापासून आभारी आहे व आपले मनापासून अभिनंदन करीत आहे.

**उप सभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांना सांगू इच्छिते की, आज सावित्रीबाई फुले नसत्या तर आम्ही या ठिकाणी पोहचलो नसतो.

आता विधेयक क्रमांक-३ चर्चेला घेण्यात येईल.

-----

असुधारित प्रत

**पृ.शी.:** मुंबई महानगरपालिका महाराष्ट्र शिक्षण व रोजगार हमी (उपकर) आणि महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन (सुधारणा) विधेयक, २०२२

L.A.BILL NO. III OF 2022

(A BILL FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT, THE MAHARASHTRA EDUCATION AND EMPLOYMENT GUARANTEE (CESS) ACT, 1962 AND THE MAHARASHTRA (URBAN AREAS) PROTECTION AND PRESERVATION OF TREES ACT, 1975.)

श्री. संजय बनसोडे ( पर्यावरण व वातावरणीय बदल राज्यमंत्री ) : सभापती महोदय ा, मी आपल्या अनुमतीने विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन २०२२ चे वि.स.वि.क्रमांक ३ - मुंबई महानगरपालिका अधिनियम, महाराष्ट्र शिक्षण व रोजगार हमी (उपकर) अधिनियम, १९६२ आणि महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, २०७५ या ंत आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडतो.

**उप सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री. संजय बनसोडे : सभापती महोदय ा, मी आपल्या अनुमतीने विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन २०२२ चे वि.स.वि.क्रमांक ३ - मुंबई महानगरपालिका अधिनियम, महाराष्ट्र शिक्षण व रोजगार हमी (उपकर) अधिनियम, १९६२ आणि महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, २०७५ या ंत आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न प्रस्तुत झाला

असुधारित प्रत

**उप सभापती** : आता विधेयक विचारात घेण्यासंबंधीच्या प्रश्नावर चर्चा होईल. तद्नंतर माननीय मंत्र्यांचे उत्तर झाल्यानंतर विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकला जाईल.

आता सन्माननीय सदस्यांनी भाषणास सुरुवात करावी.

श्री. सुनील शिंदे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय ा,....

श्री. शशिकांत शिंदे : सभापती महोदया, माझा पॉईंट ऑफ इन्फर्मेशन आहे.

**उप सभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री. शशिकांत शिंदे यांना दोन मिनिटानंतर त्यांचा पॉईंट ऑफ इन्फमेशन मांडण्यासाठी परवानगी देणार आहे.

श्री. शशिकांत शिंदे : सभापती महोदया, सदरहू विधेयकाच्या अनुषंगाने संबंधित विभागाचे दोन्ही मंत्री महोदय सभागृहात नाहीत. आम्ही दिलेल्या सूचनेच्या अनुषंगाने कोणते मंत्री महोदय उत्तर किंवा विश्लेषण देणार आहेत असा माझा पॉईंट ऑफ इन्फर्मेशन आहे.

**उप सभापती** : ठीक आहे. मी माननीय मंत्री महोदयांना सभागृहात उपस्थित राहण्यासाठी निरोप देते.

श्री. संजय बनसोडे : सभापती महोदया, सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या सूचनांची मी नोंद घेणार आहे.

श्री. सुनील शिंदे : सभापती महोदया, या विधेयकाच्या संदर्भात तमाम मुंबईकराच्यावतीने...

श्री. विनायक मेटे : सभापती महोदया,....

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांनी खाली बसून घ्यावे. मी सन्माननीय सदस्य श्री. सुनील शिंदे यांना बोलण्याची परवानगी दिलेली आहे.

सन्माननीय सदस्य श्री. शशिकांत शिंदे यांनी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे तो बरोबर आहे. सन्माननीय सदस्य सदरहू विधेयकाच्या अनुषंगाने विचारविनिमय करीत असताना आपली भूमिका मांडण्याचा प्रयत्न करीत असतात. आपण विधेयक क्रमांक-३९ हे पहिल्याप्रथम चर्चेला घेऊन मंजुर करणार होतो. मंत्री महोदय हे विधानसभेत लक्षवेधी सूचनेला उपस्थित आहेत. सदरहू विधेयक नंतर चर्चेला घेऊन

**उप सभापती**.....

मंजुर करणार असतील तर मला कोणतीही अडचण नाही. त्यामुळे आता विधेयक क्रमांक-३९ हे चर्चेला घेण्यात येईल.

यानंतर श्री. बोर्डे....

असुधारित प्रत

**पृ.शी./ मु.शी.** : भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २०० अन्वये राज्यपालांच्या अधिसंमतीसाठी पाठविण्यात आलेले व राज्यपालांनी फेरविचारार्थ परत पाठविलेले सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३९- महाराष्ट्र सहकारी संस्था (तिसरी सुधारणा) विधेयक, २०२१ मधील खंड २२ बाबत म.वि.स. नियम १५३ अन्वये फेरविचार करणे.

श्री.बाळासाहेब पाटील (सहकार मंत्री) : सभापती महोदया, मी आपल्या अनुमतीने विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन २०२१ चे वि.स.वि. क्रमांक ३९ – महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक याबाबत राज्यपालांच्या संदेशानुसार विधेयकातील खंड २२ महाराष्ट्र विधानसभा नियम १५३ अन्वये फेरविचारार्थ घेण्यात यावा, असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदया, या राज्यात १९६० पासून सहकार चळवळ वाढीस लागली. २०१३ मध्ये ९७ वी घटना दुरुस्ती झाली. त्यानंतर सदरहू कलम वगळण्यात आले होते. कलम २६ मध्ये क्रियाशील सभासद आणि अक्रियाशील सभासद यांची व्याख्या आहे. त्याच पद्धतीने एकाच व्यक्तीला दोन ठिकाणी सभासद होता येणार नाही या बाबतच्या तरतुदीचा उल्लेख आहे. ९७ व्या घटना दुरुस्तीनुसार कलम ७३ (अ)(अ) मध्ये सदस्य संख्या २१ पर्यंत मयाादित केली होती. परंतु नंतर असे लक्षात आले की, राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये जास्त तालुके आहेत. त्या प्रत्येक तालुक्याला प्रतिनिधित्व मिळणे आवश्यक होते. त्यामुळे २१ असलेली सदस्य संख्या २५ पर्यंत करण्याचा अधिकार त्यात देण्यात आला. तसेच कलम ७३ (ब) मध्ये संस्थेच्या समित्यांवर विवक्षित जागा राखून ठेवणे, अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीचा एक सदस्य, इतर मागासवर्ग प्रवर्गाचा सभासद घेण्याची तरतूद आहे. दुसरा

श्री.बाळासाहेब पाटील....

विषय असा आहे की, कलम ७३ मध्ये महिलांसाठी ज्या राखीव संस्था आहेत त्यामध्ये १०० टक्के महिला सदस्य या संचालक असतात. अशा ठिकाणी कायद्यामध्ये सूट देण्याची तरतूद आहे. ज्या ठिकाणी १०० टक्के महिला सदस्य आहेत, त्या महिला संचालक होतील. या संदर्भात शासनाकडे अधिकार आहेत की त्या संस्थेला सूट द्यायची. त्या ठिकाणी केवळ महिला राहतील, तेथे कोणतीही आरक्षित जागा राहणार नाही. पूर्वी ही तरतूद होती. तसेच संस्थेचा कोणताही सभासद थकबाकीदार असेल आणि कलम ७९ किंवा ८८ अंतर्गत जबाबदार असेल तर.... तसेच दोन पेक्षा अधिक अपत्य असणाऱ्या व्यक्तींच्या बाबतीतील कलमात सरकारने यापूर्वी कधीही कोणाला सूट दिलेली नव्हती. त्यामुळे याचा गैरवापर होईल अशी काही लोकांना शंका आहे, परंतु अशी कोणतीही सूट दिली जाणार नाही. अशा प्रकारचे हे कलम आहे. आर्थिक वर्ष संपल्यापासून सहा महिन्याच्या आत वार्षिक सभा आयोजित करणे आवश्यक आहे. परंतु कोरोना परिस्थितीत किंवा कोल्हापूर, सांगली, कोकण या भागात महापूर किंवा नैसर्गिक आपत्ती आल्यानंतर वार्षिक सभा घेता आली नाही. अशा परिस्थतीत विहित कालावधीत वार्षिक सभा घेता आली नाही तर त्या ठिकाणी मुदतवाढ देण्याची तरतूद आहे. विशेष सर्वसाधारण सभा आयोजित करणे या बाबतची देखील तरतूद आहे. या माध्यमातून सहकाराला चालना देणे हा उद्देश आहे. कोरोना काळात मार्च महिना संपल्यानंतर चार महिन्यात ऑडीट करुन पुढील दोन महिन्यात वार्षिक सभा घेणे शक्य झाले नाही. जोपर्यंत सर्वोच्च न्यायालय ९७ वी घटना दुरुस्ती रद्द करीत नव्हते तोपर्यंत आपल्याला अडचणी होत्या. त्यासाठी आपल्याला निव्वळ कायद्यात बदल करावा लागला. ही वेळ पुन्हा भविष्यात येऊ नये म्हणून हे विधेयक या ठिकाणी मांडलेले आहे.

प्रश्न प्रस्तुत झाला.

असुधारित प्रत

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदया, ९७ व्या घटना दुरुस्तीनुसार केंद्र सरकारने देशात सहकाराचा कॉमन कायदा केला. मी या विषयाच्या बाबतीत परवासुद्धा सभागृहात बोललो होतो. माझी हरकत एवढीच आहे की, अशा प्रकारची सुधारणा आपणास कायद्याने करता येऊ शकते काय ? जर अशा प्रकारचा बदल करता येऊ शकत असेल तर ७३ व्या घटना दुरुस्तीनुसार जिल्हा परिषदांमध्ये जो बदल केला त्या ठिकाणी सुद्धा बदल करता आला पाहिजे. केंद्र सरकारने सहकाराच्या बाबतीत कॉमन कायदा केल्यामुळे राज्य सरकारला पुन्हा वेगळी तरतूद किंवा सुधारणा करण्याचा अधिकार नाही. केंद्राच्या कॉमन कायद्यास माझा विरोध नाही. परंतु आपण सहकार कायद्यात वेगवेगळ्या तरतुदी आणि सुधारणा करीत आहात. त्या करण्याचा आपल्याला अधिकार आहे काय ? माझा यास विरोध नाही. माझे एवढेच म्हणणे आहे की, जोपर्यंत माझ्या शंकांचे निरसन होत नाही तोपर्यंत हे विधेयक चर्चेला घेता येणार नाही.

सभापती महोदया, माझा व्यक्तिगत विरोध नाही. कारण सहकार ॲक्टचे लिंकींग जिल्हा परिषद ॲक्टशी आहे. या कायद्याच्या धर्तीवर जिल्हा परिषदांना सुद्धा सहा महिन्यांची मुदत वाढवून द्यावी अशी आम्ही मागणी करतो. तो आपल्याला अधिकार आहे. पण राज्यपाल महोदय सही करणार नाहीत, वगैरे वगैरे हा वेगळा मुद्दा आहे. आपले अधिकार आपण वापरले पाहिजेत. मी काल सुद्धा या बाबतीत बोललो, परंतु मला कोणी गांभीर्याने घेतले नाही. मी या विधेयकाची वाट पाहत होतो. राज्य सरकारला सहकाराच्या बाबतीत सुधारणा करता येते, मग जिल्हा परिषदांच्या बाबतीत का करता येत नाही, हा माझा प्रश्न आहे. या बाबतीत विधी व न्याय विभागाने किंवा संबंधित विभागाने मार्गदर्शन केले पाहिजे. त्यानंतरच हे विधेयक चर्चेला येऊ शकते. हा तांत्रिक मुद्दा आहे, त्यामुळे आपण अशा प्रकारची तरतूद करु शकत नाही. कोरोनाच्या काळात अस्तित्वात असलेल्या संचालक मंडळाला सहा महिन्यांची मुदतवाढ दिली. आम्ही त्याला त्यावेळी विरोध केला नाही. सहकार कायद्याप्रमाणे अशा प्रकारची मुदतवाढ जिल्हा परिषदांच्या बाबतीत का देऊ शकत नाही ? माझे एवढेच म्हणणे आहे की, मी जे मुद्दे उपस्थित केले त्या बाबत सभागृहाचे समाधान झाले पाहिजे. मंत्री महोदय, आपण जे करीत आहात ते

असुधारित प्रत

श्री.जयंत प्र.पाटील....

योग्य आहे. परंतु आपल्याला कायद्याने अशा प्रकारची सुधारणा करता येत नाही. मागच्या कालखंडात नागपूर अधिवेशनात माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार विधिमंडळाला कायदा करणे बंधनकारक असल्याचे विधी व न्याय विभागाने सांगितले होते. मी त्यावर आक्षेप घेऊन तीन दिवस ते विधेयक अडवून धरले होते. विधिमंडळ हे कायदेमंडळ असल्यामुळे उच्च न्यायालय, सर्वोच्च न्यायालय आपल्याला कायदे करण्याबाबत सुचवू शकत नाहीत. आपण विधिमंडळात जे कायदे करतो त्या आधारे उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयाने निकाल द्यावयाचा असतो. विधिमंडळाने कोणता कायदा करावा हे उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालय सांगणार असेल तर या विधिमंडळाचे अस्तित्वच राहणार नाही. या सभागृहात आणि आवारात आपण सुप्रीम आहात. माझी मागणी आहे की, या विधेयकात आपण स्पष्टता आणली पाहिजे. मी चुकीचे बोलत आहे हे जर आपण पटवून दिले तर मी माझे म्हणणे मागे घेईन. परंतु अमुक कायद्यानुसार अशा प्रकारचा बदल करु शकतो हे आपण आम्हाला पटवून द्यावे. जर बदल करता येत असेल तर जे कायदे केंद्र सरकारने आणले त्यात सर्वांमध्ये बदल केला पाहिजे. माझा जिल्हा परिषदांच्या बाबतीत आग्रह आहे. अधिवेशनाचे अजून दोन आठवडे बाकी आहेत. हा तत्त्वाचा आणि आपल्या अधिकाराचा प्रश्न आहे. जे अधिकार आपल्याला आहेत ते अधिकारच लोप पावत असतील तर ते आपल्या दृष्टीने योग्य नाही. त्यामुळे जोपर्यंत निर्णय होत नाही तोपर्यंत या विधेयकावर चर्चा करता कामा नये. जिल्हा परिषदेच्या बाबतीत अशा प्रकारे एकमताने निर्णय करावा लागेल. कारण कोणालाही निवडणुका नको आहेत. आता तर अनेक संस्था प्रशासकाच्या ताब्यात दिल्या जात आहेत. हजारो कोट्यवधी रुपयांचे बजेट असलेल्या मुंबई महानगरपालिकेवर प्रशासक नियुक्त करुन त्या एका व्यक्तीच्या ताब्यात देत आहात. असे झाले तर लोकशाही कशी राहील ? अशाचप्रकारे राज्यातील सर्व ३८ जिल्हा परिषदांचा कारभार आपण ३८ प्रशासकाच्या हाती देणार काय ? त्या ठिकाणी ४००-५०० लोकप्रतिनिधी काम करतात. एका विभागाला एक कायदा आणि दुसऱ्या विभागाला

असुधारित प्रत

श्री.जयंत प्र.पाटील.....

दुसरा कायदा करता येणार नाही. त्यामुळे माझी आग्रही मागणी आहे की, यामध्ये स्पष्टपता आणावयास पाहिजे.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत

श्री. जयंत प्र. पाटील ....

हे विधेयक येताना विधी व न्याय विभाग काय करीत आहे, आपले सचिव काय करीत आहेत ? आपले सचिव विधी व न्याय विभागाचे असतात. हे विधेयक आणताना विधी व न्याय विभागाने पाहिले पाहिजे होते. विधीमंडळाच्या सचिवांचे खाते काय करते ? आम्ही बोलायचे आणि ते करायचे नाही असे बरोबर होणार नाही. मी कायद्याचा पदवीधर नाही किंवा माझ्याकडे कोणतीही पदवी नाही. पण माझ्यासारखा एक सामान्य माणूस हे बोलतो मग आपले विधी व न्याय विभाग काय करीत आहे ? आपल्याला त्याबाबत सुस्पष्टता आणली पाहिजे. आमचे समाधान त्यांनी केले पाहिजे अशी माझी मागणी आहे. कोणाचा विरोध आहे का ते सांगावे.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. शशिकांत शिंदे यांचा हाच मुद्दा आहे की वेगळा मुद्दा आहे, आपल्याला सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी जो मुद्दा मांडला आहे, त्याच्याशी सुसंगत मुद्दा मांडावयाचा आहे का ? सन्माननीय सदस्यांनी मूलभूत मुद्दा मांडला आहे. ते विधेयकावर बोललेले नाहीत. त्यांनी असा प्रश्न उपस्थित केला आहे की, मूलभूतरित्या आपल्याला यावर अधिकार आहे की नाही किंवा तो असावा आणि त्याबाबत शासनाने स्पष्टीकरण द्यावे. तुमचा त्याच्याशी संलग्न मुद्दा आहे की तुम्हाला विधेयकावर बोलायचे आहे ?

श्री. शशिकांत शिंदे : सभापती महोदया, मला या संदर्भातच बोलायचे आहे.

**उप सभापती** : आपण जरुर बोलावे. सन्माननीय सदस्यांनी बोलावे, त्यानंतर माननीय मंत्र्यांनी शासनाची भूमिका स्पष्ट करावी. मग हे विधेयक चर्चेला घ्यायचे की नाही याबाबतचा आपण निर्णय करु, तोपर्यंत विधेयकावर बोलण्यापेक्षा सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी वैधानिक, घटनात्मक संदर्भात जो मुद्दा मांडला आहे, त्यावर बोलावे.

श्री. शशिकांत शिंदे : सभापती महोदया, मी सन २०२१ च्या वि.स.वि. क्रमांक ३९ वर सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी जो मुद्दा उपस्थित केला आहे,

असुधारित प्रत

श्री. शशिकांत शिंदे ....

त्यावर बोलत आहे. महत्त्वाच्या विषयाच्या संदर्भात मुद्दा उपस्थित केला आहे. मागच्या वेळी हे विधेयक विधानसभा व विधानपरिषद येथे मंजूर झाले होते. माननीय राज्यपालांकडे विधेयक मंजुरीला गेल्यानंतर आणि ते परत पाठविण्यात आल्यानंतर न्यायालयाचा देखील आदेश आला. न्यायालयाच्या सूचनेप्रमाणे असा कायदा करावा असा या विधेयकाचा मसुदा आहे. हा विषय अधिकाराचा येत आहे. मी बाकीच्या राजकारणावर बोलणार नाही. मध्यंतरी १२ सन्माननीय सदस्य निलंबित झाले, त्यानंतर तो सभागृहाचा, विधीमंडळाचा अधिकार की न्यायालयाचा अधिकार हा प्रश्न उपस्थित झाला. आता देखील या विधेयकाच्या संदर्भात हेच आहे. हे विधेयक येथे जरी मंजूर झाले तरी उद्या ते माननीय राज्यपालांनी मंजूर केले नाही तर ते माननीय राष्ट्रपतींकडे जाईल. न्यायालयाने निर्णय द्यावा की हा अधिकार आपला आहे हा सर्वात महत्त्वाचा मुद्दा आहे. घटनेनुसार कायदे बनविण्याचा अधिकार असेल आणि त्यामध्ये उद्या सर्वोच्च न्यायालय, उच्च न्यायालय यांचा हस्तक्षेप होऊ लागला तर या अधिकारांमध्ये कोणत्याही प्रकारे मुक्तपणे निर्णय घेता येणार नाहीत अशी शंका व्यक्त केली आहे. हा पॉलिसी निर्णय आहे. हे नुसते विधेयकापुरते नाही. विधीमंडळाच्या अधिकाराच्या संदर्भात हा निर्णय असल्यामुळे याबाबत एक विषय या विधेयकाच्या माध्यमातून उपस्थित केला आहे, त्याबाबत खुलासा होणे गरजेचे आहे. आपण हा निर्णय घ्याल, त्यावेळी भविष्य काळात ही लढाई होणार आहे. कोणी तरी न्यायालयात जाणार, पुन्हा न्यायालय त्यामध्ये हस्तक्षेप करणार, न्यायालयाचा आदेश आला की आपल्या आदेशाला बंधन पडणार का या सर्व गोष्टींचा निर्णय घेत असताना विचार करावा लागणार आहे. मघाशी सांगितले त्या विषयावर मी एवढेच सांगणार आहे की, यावर सरकारचे मत, भूमिका काय आहे, सभापती, अध्यक्ष, विधीमंडळाचा अधिकार काय आहे याचा खुलासा होणे गरजेचे आहे. त्यामुळे याचा खुलासा व्हावा.

असुधारित प्रत

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदया, विधेयक जनतेपर्यंत वेगळ्या अर्थाने चर्चेला गेले आहे. विधेयक माननीय राज्यपालांकडे मंजुरीसाठी जाण्यासाठी सभागृहाने विधेयक मंजूर केले, त्यावेळी आपण ही चर्चा केली नाही. सरकारने हा निर्णय घेतला आहे. कोरोना आला कळत-नकळत निर्णय घेण्याची परिस्थिती निर्माण झाली, त्यामध्ये निर्माण झालेले हे विधेयक आहे. माननीय राज्यपालांकडे मान्यतेसाठी विधेयक गेले, त्यावेळी माननीय राज्यपालांनी या संदर्भात काही सूचना करुन अथवा नियमात, कायद्यात बसत नाही म्हणून हे बदलले पाहिजे, अमुक केले पाहिजे ही उपसूचना पाठविली आणि सांगितले की, सुधारणा करुन आमच्याकडे परत पाठवा. मी सहज चौकशी केली तर ती माहिती मिळाली. माननीय मंत्र्यांनी ती माहिती सदनाला द्यायची आहे की, माननीय राज्यापालांनी विधेयकामध्ये तांत्रिक त्रुटी सुचवित असताना विधी व न्याय खात्याला बोलावून त्यांच्याशी चर्चा केली का, ती केली असेल, त्रुटी दाखविल्या असतील तर विधी व न्याय खाते कमी पडले होते का आणि हे करण्याकरिता विधी व न्याय खात्याला हे मान्य असेल किंवा नसेल तर, असे त्यांनी माननीय राज्यापालांना काही लेखी सांगितले आहे का की, आपण जे म्हणत आहात तसे नाही, हे बरोबर आहे आणि तरीही माननीय राज्यापालांनी पाठविले का ? लोकांमध्ये वाद निर्माण झाला आहे की, आपण करतो ते चुकतो किंवा माननीय राज्यपाल ते मुद्दाम अडवितात, असा वेगळ्या प्रकारे माननीय राज्यपाल व सरकार असा मुद्दा निर्माण झाला आहे. एक विषय झाल्यानंतर सहकार विधेयक परत पाठविले आहे. माननीय राज्यपालांनी नेमकी कोणती सूचना सांगितली होती, आपण त्याबाबत काय केले ? सन्माननीय सदस्यांचा तोच मुद्दा आहे. आपण सांगितले की, हा विधीमंडळाचा अधिकार आहे. फक्त त्याला माननीय राज्यपालांनी मान्यता देताना त्रुटी सांगितली आहे. आपण ती योग्य कशी आहे हे पाहून ते विधेयक परत जसेच्या तसे आणले आहे.

सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री. शशिकांत शिंदे म्हणाले ते बरोबर आहे. तोच वादाच मुद्दा आहे. त्यांनी त्रुटी सांगितली, ती मान्य नसल्यामुळे आपण हे विधेयक पुन्हा तसेच मंजूर करीत आहोत. माननीय राज्यपालांना ते मंजूर नसल्यामुळे

श्री. दिवाकर रावते ....

ते माननीय राष्ट्रपतींकडे जाणार आहे. शेवटी या विधेयकाचा उद्देश काय आहे ? माननीय राष्ट्रपतींनी देखील विचार करण्याकरिता विधेयक तसेच ठेवून दिले तर काय, त्यांच्याकडे देशाच्या पातळीवर कायदेशीर तज्ज्ञांची फौज आहे. एकाचे झाले की दुसऱ्याचे होते. त्यामुळे यामध्ये कित्येक महिने जातील. आपण येथे कायदा तयार करतो, तो अंमलात आणण्याकरिता नाईलाजाने अडचणी येतात आणि परिस्थिती तयार होते. हे विधेयक सहकाराचे आहे. प्रत्येक संस्थेचा यामध्ये संबंध येणार आहे. मला माननीय मंत्र्यांनी या संदर्भात सांगावे. सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी उपस्थित केलेला मुद्दा गंभीर आहे. विधीमंडळाचा संबंध आहे. विधेयक तातडीने मंजूर करण्यापेक्षा अधिवेशन दोन आठवडे चालणार आहे, त्यामुळे तो विषय नाही. ते आले पाहिजे. माननीय राज्यपालांनी जो मुद्दा उपस्थित करुन विधेयक परत पाठविले, तो मुद्दा टाळून आपण आमचे बरोबर आहे असे सांगत आहोत, तो मुद्दा काय होता व कसा चुकीचा होता हे सांगितले पाहिजे. राज्यभर चर्चा सुरु आहे. मात्र विधेयक कोणालाच माहीत नाही. विधेयकात आपला व त्यांचा वाद आहे असे वातावरण निर्माण झाले आहे. आपण सरकार म्हणून योग्य पध्दतीने पुढे जात आहोत हे माननीय मंत्र्यांनी सभागृहात विदित केले तर फार बरे होईल. धन्यवाद !

श्री. प्रवीण दटके : सभापती महोदया, विधेयक क्रमांक ३ व ३९ माझ्याकडे आहे. विधेयक क्रमांक ३ मध्ये उद्देश व कारणे स्पष्ट आहेत. विधेयक क्रमांक ३९ मध्ये उद्देश व कारणे नाहीत. नवीन सन्माननीय सदस्यांना याबाबत समजत नाही. त्यामुळे आम्ही हे कसे समजून घेऊ ? आम्ही नवीन सन्माननीय सदस्य आहोत. मी विधेयक वाचले आहे. कृपया माननीय मंत्र्यांना या संदर्भात सांगावे अशी माझी विनंती आहे.

श्री. अभिजीत वंजारी : सभापती महोदया, माझा देखील हाच मुद्दा आहे.

**उप सभापती** : मी स्पष्ट केले होते की, मांडलेल्या मूलभूत मुद्याबाबत बोलावे. तांत्रिक मुद्दे आहेतच.

श्री. बाळासाहेब पाटील : सभापती महोदया, हे विधेयक मागच्या अधिवेशनात विधानसभा व विधानपरिषदेने मंजूर केले होते आणि ते माननीय राज्यपालांकडे गेले होते. सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी मुद्दा उपस्थित केला आहे. राज्याच्या सूचीमधील सहकार विषय आहे. सुरुवातीला सांगितले आहे की, सन १९६० पासून सन २०१३ पर्यंतच्या सुधारणांची कार्यवाही सुरु होती. ९७ वी घटनादुरुस्ती आल्यानंतर हे बाजूला राहिले. पुन्हा आपण ॲड करीत आहोत. विधेयकामध्ये विशेष काही नाही. सान्माननीय सदस्य मघाशी म्हटले की, क्रियाशील व अक्रियाशील त्यामध्ये आहे की नाही ? ते त्यामध्ये आहे. आपण काही संस्थांच्या बाबतीत अवसायक नेमतो आणि १० वर्षांसाठी नेमतो.

नंतर श्री. खर्चे ....

असुधारित प्रत

श्री.विनायक मेटे : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांनी जे सांगितले तो मुद्दा महत्वाचा आहे. ७९ वी घटना दुरुस्ती केंद्र शासनाने केली त्यामध्ये राज्य शासनाला अधिकार आहेत काय ? हा खरा मूळ मुद्दा आहे. ते वारंवार सांगत आहेत की, विधी व न्याय विभाग काय करीत आहे. विधान मंडळ सचिवालय काय करीत आहे. याबाबत त्यांनी स्पष्टीकरण द्यावे. या विधेयकात आपण काय नमूद केले हा नंतरचा भाग आहे. हा बेसिक मुद्दा आपण अगोदर सांगितला पाहिजे. त्यानंतर या विधेयकावर चर्चा करता येईल. राज्य सरकारला तसा अधिकार असेल तर ७३ व्या घटना दुरुस्ती मध्ये सुधारणा करावी लागेल. तसे आपण करीत नाही. ते देखील आपणाला करावे लागेल. असे हे सर्व मुद्दे आहेत. जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका आहेत. यातील हे सर्व मूळ मुद्दे आहेत. याबाबत मंत्री महोदयांनी स्पष्टीकरण द्यायला पाहिजे. त्यानंतर विधेयकावरील चर्चेला सुरुवात करता येईल.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी एक वेगळा मुद्दा काढलेला आहे. त्याबाबत वेगळी चर्चा करावी लागेल. माझा मूळ मुद्दा हे विधेयक मांडता येते किंवा नाही असा आहे. तर माझे असे म्हणणे आहे की, हे विधेयक मांडता येत नाही. मंत्री महोदयांनी स्पष्टीकरण देऊन सांगितले की, विधेयक मांडता येते तर मी माघार घेईल. याबाबत मला जास्त ज्ञान नाही. विधिमंडळाचे हे वरिष्ठ सभागृह आहे. या सभागृहात वेगवेगळया स्तरातील सन्माननीय सदस्य आहेत. तेवढ्यासाठी वेगवेगळे मतदारसंघ तयार केले आहेत. आमच्या सारखे सामाजिक कार्यकर्ते आहेत, सहकार क्षेत्रातील आहेत, कोणी पदवीधर मतदारसंघातून निवडून आले आहेत. शिक्षकांचा मतदारसंघ आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांचा मतदारसंघ आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना संविधान तयार करताना या सभागृहापासून हीच अपेक्षा केली होती. विधानसभेतून मंजूर होऊन एखादे विधेयक व ठराव वरिष्ठ सभागृहात आल्यावर येथील सन्माननीय सदस्यांनी अभ्यास करुन ते पास करायचे आहे. हेच महत्वाचे काम या सभागृहाचे आहे. हेच आता लोप पावत असेल तर ते योग्य होणार नाही. मंत्री महोदय आपण हे विधेयक येथे मांडू शकत नाही. कायद्याप्रमाणे कार्यवाही करायला पाहिजे. कायदा हा दुधारी

असुधारित प्रत

श्री.जयंत प्र.पाटील....

असतो. आपण जर सांगितले की, हे विधेयक मांडता येते तर मी त्यासंदर्भात उद्या अशासकिय विधेयक आणेन. त्यावर आपण चर्चा करु. मंत्री महोदयांबाबत वाद नाही. आम्हीच सांगितले हे विधेयक घ्यावे. जयंत पाटील तेव्हा लबाडीने बोलत असतो हे आपण लक्षात ठेवावे. यामध्ये दोन अर्थ आहेत. त्यामुळे या पध्दतीने आपणाला काम करायला पाहिजे. यामध्ये मूळ मुद्दा हा विधिमंडळाच्या अस्तित्वाचा आणि हक्काचा व अधिकाराचा आहे. आम्हाला जे अधिकार आहे व जे अधिकार नाहीत ते आम्ही वापरावयास लागलो तर आम्हाला लोक म्हणतील हे बरोबर नाही तुम्ही सभागृहात काय काम करता ?

**उप सभापती** : मंत्री महोदयांना यावर काही बोलायचे आहे काय ?

श्री.बाळासाहेब पाटील : सभापती महोदया, सन २०१३ पर्यंत यामध्ये सुधारणा करण्यात आली होती. गुजरात सरकारने सन २०१३ मध्ये ही घटना अवैध ठरविली. सुप्रीम कोर्टाने २० जुलै रोजी तो निर्णय कायम केला. आपला तांत्रिक मुद्दा ठीक आहे. माझे म्हणणे असे आहे की, राज्य सूचीमध्ये सहकार आहे. त्यामुळे सहकाराचे विधेयक आणण्याचा अधिकार राज्य सरकारला आहे. **** त्यामुळे तांत्रिक मुद्दा आपण कशाला काढीत आहात.

**उप सभापती** : मंत्री महोदय, मी आता यामध्ये निर्णय देते. सभागृहात विधिमंडळाचे अधिकार व राज्य घटनेचे अधिकार संदर्भातील मुद्दा मांडण्यात आला आहे. विधानसभेत विधेयक मंजूर झाले म्हणून विधानपरिषदेत त्यावर चर्चा होऊ नये असे नाही. या सभागृहात अनेक ऐतिहासिक स्वरुपाची विधेयके मांडण्यात आली आहेत. थांबविण्यात आली आहेत, सरकारने बदल केले आहेत. सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांनी जे मुद्दे मांडले त्यानुसार यामध्ये उद्देश व हेतूवाक्य असायला पाहिजे ते नाही. ते त्यांनी निदर्शनास आणले आहे. त्याचे कारण काय असेल तर ते स्पष्ट करण्यात यावे. माननीय राज्यपाल यांच्याकडून हे विधेयक रिकन्सीडर करण्यासाठी आले आहे. यासंदर्भात काय कारणमिमांसा आहे, काय तर्कशास्त्र आहे

---

**** शब्द मागे घेण्यात आले.

असुधारित प्रत

उप सभापती....

ते मांडले असते तर चांगले झाले असते. सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते व सन्माननीय सदस्य श्री.शशिकांत शिंदे यांनी हे विधेयक आपणाला मांडता येते किंवा नाही याबाबत सरकारचे जे म्हणणे असेल ते उद्या सभागृहात मांडा त्यानंतर हे विधेयक चर्चेसाठी घेता येईल.

श्री.बाळासाहेब पाटील : सभापती महोदया, ठीक आहे, आपला अधिकार आहे, आपण सांगितल्या प्रमाणे या विधेयकावर उद्या चर्चा करु. मी मघाशी बोलतांना असे सांगितले की, **** ते शब्द मी मागे घेतो.

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदय, सरकारी पक्षातर्फे विधेयक मांडण्यात आले आहे तेव्हा या विधेयकावर बोलण्याचा पहिला अधिकार विरोधी पक्षाचा आहे. आपण सत्ताधारी पक्षातील सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी दिली आहे. विधेयकावर बोलण्यासाठी तरी हा नियम पाळला पाहिजे व पहिला अधिकार विरोधी सदस्यांना दिला पाहिजे. त्यानंतर सत्ताधारी बाजूच्या सदस्यांना बोलायला दिले पाहिजे.

**उप सभापती** : असा नियम नाही.

## एस.टी.कर्मचाऱ्यांच्या संपाबाबत

श्री.विनायक मेटे : सभापती महोदया, एक महत्वाची गोष्ट मी आपल्या निदर्शनास आणून देतो. महाराष्ट्रात एस.टी.कर्मचाऱ्यांचा संप अनेक दिवसापासून सुरु आहे. या विषयाबाबत माननीय सभापती यांच्या पुढाकाराने मंत्री महोदय व दोन्ही बाजूंकडील सन्माननीय सदस्यांच्या उपस्थितीत अतिशय सकारात्मक बैठक झाली. त्यातून एक मसूदा तयार करण्याचे ठरले. त्यासंदर्भातील निवेदन शासनाच्या वतीने अधिकृतपणे आज १२ वाजता माननीय मंत्री महोदय करणार होते. आता सव्वा चार वाजले आहेत. हे विधेयक झाल्यानंतर सभागृहाची बैठक संपेल किंवा कामकाज संपेल तेव्हा संपेल. आतापर्यंत तसा कोणताही निरोप आलेला नाही. आज ते निवेदन

असुधारित प्रत

**** शब्द मागे घेण्यात आले.

श्री.विनायक मेटे...

करण्यात येणार होते. शासन निवेदन करणार आहे किंवा नाही याबाबत आपण शासनाकडून माहिती घेऊन सदनाला द्यावी.

श्री.भाई गिरकर : सभापती महोदया, एस.टी.कर्मचाऱ्या संदर्भात जी बैठक झाली त्या बैठकीला आपण उपस्थित होता. आमची आपणाला विनंती आहे. त्या बैठकीला एस.टी.कर्मचारी व संघटनेचे प्रमुख उपस्थित होते. त्यांच्याकडून व्हॉटस्ॲपवर माहिती गेली असेल. आज निवेदन केले नाही तर त्यांचा आपल्यावर विश्वास राहणार नाही. ते लोक असे म्हणतील की, आम्हाला बोलावून फक्त आमच्या डोळ्याला पाने पुसण्याचे काम केले. सभागृहाच्या वतीने मी विनंती करतो की, आपण परिवहन मंत्री महोदयांना निरोप पाठवून लवकर निवेदन करायला सांगा.आज निवेदन केले नाही तर त्या लोकांचा आपल्यावरील विश्वास उडेल. हा संप अनेक दिवस चिघडला आहे. त्यामुळे अडचण निर्माण होतील.

**उप सभापती** : माननीय सभापती यांच्याकडे जी बैठक होते त्या बैठकीची माहिती सदनामध्ये आल्यावर त्यासंदर्भातील मी निदेश देणे उचित होणार नाही. तुमच्या ज्या भावना आहेत त्याच माझ्या भावना आहेत. माननीय सभापती ही चर्चा ऐकत आहेत. याबाबत योग्य त्या क्षणी योग्य तो निर्णय घेतील. विधेयक क्रमांक तीन मांडण्यात आलेले आहे. सन्माननीय सदस्य आहेत, संबंधित मंत्री महोदय आलेले आहेत. या विधेयकावर सन्माननीय सदस्य श्री.सुनील शिंदे ऑनलेग होते त्यांनी आता भाषणाला सुरुवात करावी.

------

अग्रिम प्रत

**पृ.शी.:** मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र शिक्षण व रोजगार हमी(उपकर) आणि महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन (सुधारणा) विधेयक

L.A.BILL NO. III OF 2022

(A BILL FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT, THE MAHARASHTRA EDUCATION AND EMPLOYMENT GUARANTEE (CESS) ACT, 1962 AND THE MAHARASHTRA (URBAN AREAS) PROTECTION AND PRESERVATION OF TREES ACT, 1975.)

(चर्चा पुढे सुरु......

श्री.सुनिल शिंदे : सभापती महोदया, सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३ वर मला बोलण्याची संधी दिली त्याबाबत मी आपले आभार मानतो. या विधेयकाबाबत अतिशय भावनापूर्वक आम्हाला बोलावेसे वाटते. शेवटी शिवसेना प्रमुखांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेत काम करीत असताना गिरणी कामगारांचा मुलगा म्हणून अनेक वर्षे वरळीच्या गिरण्यांच्या चाळीमध्ये आम्ही राहत होतो. आम्ही कधी तरी स्वप्न पाहत होतो की, या चाळीतून आम्ही मोठ्या घरात कधी राहायला जाऊ. मोठ्या घराबाबत आम्ही जेव्हा चौकशी करीत असू तेव्हा मोठ्या घरांना येणारी टॅक्स बिले पाहून आम्हाला घाम फुटत होता. कर्ज काढून आम्ही घर घेऊ परंतु मेन्टेनन्सचे पैसे आम्ही कसे देणार.

या नंतर श्री.बोरले...

असुधारित प्रत

श्री.सुनील शिंदे......

आम्ही या भीतीमुळे घर घेण्याची हिम्मत केली नाही. खऱ्या अर्थाने मुंबईकर या शासनाला आपले शासन का मानते, माननीय श्री.उद्धव ठाकरे साहेबांना आपले मुख्यमंत्री का मानते याचे हे ज्वलंत उदाहरण आहे. माननीय मुख्यमंत्री श्री.उद्धव ठाकरे साहेबांनी या विधेयकाच्या माध्यमातून तमाम मुंबईकरांना दिलासा दिलेला आहे. मी मागील टर्ममध्ये विधानसभेचा सदस्य होतो. त्यावेळी सुद्धा अशा प्रकारचे विधेयक मांडण्यात आले होते. परंतु त्यावेळी त्या विधेयकात ज्या तरतुदी होत्या त्यातील एक-दोन तरतूद वगळून मुंबईकरांच्या तोंडाला पाने पुसण्याचा प्रकार झाला होता. त्यावेळी मुंबईकर म्हणून मी समाधानी नव्हतो आणि मुंबईकर सुद्धा समाधानी नव्हते. परंतु खऱ्या अर्थाने या विधेयकाच्या माध्यमातून मुंबईकरांना दिलासा देण्याचे काम माननीय मुख्यमंत्री श्री.उद्धव ठाकरे साहेबांच्या नेतृत्वाखालील महाविकास आघाडी सरकारने केलेले आहे त्याबद्दल मी तमाम मुंबईकरांच्या वतीने त्यांचे अभिनंदन करतो.

सभापती महोदया, हे विधेयक अतिशय चांगले आहे. मुंबईकर या विधेयकाचे जोरदार स्वागत करतील. परंतु या विधेयकाच्या माध्यमातून काही शंका आहेत. मी मुंबई महानगरपालिकेचा देखील सदस्य आहे. मुंबई महानगरपालिकेत ठराव पारीत झाला होता की, मुंबईकरांना दिलासा देण्यासाठी किमान ५०० चौरस फुटाचे घर घेताना टॅक्समध्ये सवलत मिळाली पाहिजे. मुंबई महानगरपालिकेत तसा ठराव पारीत झाला होता आणि त्या अनुषंगाने हे विधेयक सभागृहात मांडण्यात आले आहे. विधेयकात ५०० चौरस फूट निवासी क्षेत्र असा उल्लेख आहे. म्हणजे नवीन घर घेताना ५०० चौरस फुटापेक्षा जास्त क्षेत्रफळ असेल तर टॅक्स भरावा लागणार आहे. मी या निमित्ताने शासनाला सूचना करीत आहे. मी चाळीमध्ये राहतो. माझा घर मालक मला प्रत्येक महिन्याला भाडे पावती पाठवितो. मग माझे घर १०० चौरस फूट, १२५ चौरस फूट किंवा २०० चौरस फुटाचे असेल. माझा घर मालक महानगरपालिकेच्या सर्व टॅक्सचा उल्लेख करतो. विविध टॅक्स भरुन म्हणजे २०, २५,

श्री.सुनील शिंदे......

३० किंवा ५० जे काही ओरीजनल भाडे असेल ते अधिक सर्व कर समाविष्ट करुन तो २५० रुपये, ३०० रुपये, ४०० रुपये किंवा ५०० रुपयांची बिले पाठवितो. मुंबईकरांच्या मनात शंका आहे की, सदर विधेयक संमत झाल्यानंतर घर मालक इतर सर्व टॅक्स वगळून जे ओरिजनल बिल असेल ते पाठविणार आहे काय ? याबाबत स्पष्टता होणे आवश्यक आहे. मी निवासी क्षेत्राविषयी बोलत आहे. घर मालक जी घर भाड्याची पावती देतो त्यामध्ये तो महानगरपालिकेचे टॅक्सेस समाविष्ट करुन बिल पाठवितो. भविष्यात टॅक्सेस वगळून ती बिले येणार आहेत काय ? या निमित्ताने या संदर्भात स्पष्टता व्हावी, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, सरकारच्या विशेष प्रयत्नांनी किंवा स्व.बाळासाहेब ठाकरे यांचे स्वप्न म्हणून त्यावेळी ४० लाख झोपडपट्टीवासीयांना मोफत घर देण्यासाठी एसआरए योजना लागू करण्यात आली. एसआरए योजनेंतर्गत अनेक घरे बांधण्यात आलेली आहेत. एसआरए योजनेंतर्गत २२५ चौरस फुटापर्यंत घरे बांधण्यात आलेली आहेत. भविष्यात एसआरए योजनेंतर्गत ५०० चौरस फुटापर्यंत घरे बांधण्यात येतील. आता फंजिबल एफएसआय गृहीत धरुन ४२५ चौरस फुटापर्यंत घरे बांधण्यात येतात. भविष्यात ती निश्चितपणे ५०० चौरस फुटापर्यंत जातील. एसआरए योजनेंतर्गत रिडेव्हलप होणारी घरे म्हणजे म्हाडाची एनओसी घेऊन जुन्या चाळीतून रिडेव्हलप होणारी घरे त्याशिवाय म्हाडाच्या सोडतीतून मिळणाऱ्या लाभार्थ्यांची घरे या सर्व घरांसाठी हा फायदा मिळणार आहे किंवा नाही याबाबत स्पष्टता व्हावी, अशी माझी मंत्री महोदयांना विनंती आहे.

सभापती महोदया, मुंबई शहरात रिडेव्हलपमेंट संदर्भात अनेक ठिकाणी रहिवाशांच्या बैठका होतात. मग एसआरए असेल किंवा म्हाडा असेल. त्या बैठकीसाठी सन्मान किंवा विश्वास म्हणून लोकप्रतिनिधींना बोलाविण्यात येते. आम्ही आमची इमारत किंवा स्लमचे रिडेव्हलपमेंट करीत आहोत, आपण कृपया या संदर्भात आम्हाला मार्गदर्शन करावे, अशी विनंती केली जाते. रहिवाशी आमच्याकडे

श्री.सुनील शिंदे......

विचारणा करतात की, विकासक मला ६५० चौरस फूटाचे घर देण्यास तयार आहे, कोणी सांगतो की विकासक ८०० चौरस फुटाचे घर देण्यास तयार आहे. कदाचित त्यावेळी आम्ही त्यांना सांगू की, शासनाने ५०० चौरस फुटापर्यंत कायदा केलेला आहे. त्यामुळे ५०० चौरस फुटापर्यंत टॅक्स नाही. परंतु मोठे घर घेतल्यानंर टॅक्स लागू आहे. माझे म्हणणे असे आहे की, समजा मला ५०० चौरस फुटापेक्षा जास्त म्हणजे ६०० किंवा ६५० चौरस फुटाचे घर मिळाले तर भविष्यात मला ५०० चौरस फूट वगळता वरचा जो २०० किंवा २५० चौरस फुटाचा एरिया असेल त्यावरच टॅक्स द्यावा लागेल की जो संपूर्ण ६०० ते ६५० चौरस फूट एरिया आहे त्यावर टॅक्स द्यावा लागेल याबाबत या विधेयकाच्या माध्यमातून स्पष्टता मिळावी, अशी माझी विनंती आहे. हे विधेयक संमत करताना या संदर्भात सुस्पष्टता येणे आवश्यक आहे. हे विधेयक अत्यंत चांगले आहे. मुंबईकरांमध्ये चांगला मेसेज गेला पाहिजे. परंतु याबाबत स्पष्टता केली नाही तर चुकीचा मेसेज जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. शासनाने या संदर्भात काळजी घ्यावी, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदया, या विधेयकाच्या निमित्ताने शासनाशासनातील फरक दिसून येतो. माझे शासन काय असते हे या विधेयकाच्या माध्यमातून तमाम मुंबईकरांना कळले आहे. या विधेयकासंदर्भात ज्या दोन-तीन छोट्या शंका आहेत त्या मी सभागृहासमोर मांडलेल्या आहेत. मंत्री महोदयांनी त्याबाबत खुलासा करावा, अशी विनंती करुन मी माझे दोन शब्द संपवितो.

---------

असुधारित प्रत

श्री.चंद्रशेखर बावनकुळे (नागपूर स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदया, वि.स.वि.क्र.३- मुंबई महानगरपालिका अधिनियम, महाराष्ट्र शिक्षण व रोजगार हमी (उपकर) अधिनियम, १९६२ आणि महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयकावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदया, विधेयकाच्या प्रकरण दोन मधील खंड २ मध्ये असे नमूद केले आहे की, "(१अ) अधिनियमाच्या या कलमामध्ये किंवा इतर कोणत्याही तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, १ जानेवारी २०२२ पासून, महानगरपालिका, ४६.४५ चौरस मीटर (५०० चौ.फूट) किंवा त्याहून कमी चटई क्षेत्र असलेल्या निवासी इमारतींवर किंवा निवासी गाळ्यांवर कलम १३९अ च्या पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मालमत्ता कराचा कोणताही कर घटक बसवणार नाही." तसेच, शिक्षण उपकर व वृक्ष उपकर बसविण्यात येणार नाही, असेही नमूद केले आहे. हे विधेयक अतिशय चांगले आहे. मुंबई शहरात ज्यांनी ५०० चौरस फुटापर्यंत घरे घेतलेली आहेत अशा आर्थिक दुर्बल लोकांना मदत करण्याची भूमिका आहे त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. कारण मुंबई महानगरपालिकेतील हजारो, लाखो कुटुंबांना याचा फायदा होणार आहे. या विधेयकाला कोणीही विरोध करण्याचे कारण नाही. दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य या विधेयकाच्या बाजेनेच आहेत. परंतु दोन-तीन बाबींविषयी खुलासा होणे अत्यंत गरजेचे आहे. आपण आज निर्णय घेत आहात तो मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या काळात मुंबई महानगरपालिकेवर सत्ता मिळविण्यासाठी जो जाहीरनामा तयार केला होता त्याचा हा भाग होता. आपण सन २०१७ पासून ही घोषणा केली होती. परंतु आपण दिनांक १ जानेवारी, २०२२ पासून हे लागू करणार असल्याचे सांगत आहात. सन २०१७ पासून आम्ही मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील ५०० चौरस फुटापर्यंतच्या आतील सर्व रहिवाशांना मालमत्ता कर, शिक्षण कर आणि वृक्ष कर लागू करणार नाही, अशी घोषणा करण्यात आली होती. परंतु आता आपण त्या घोषणेच्या विरुद्ध म्हणजे दिनांक १ जानेवारी, २०२२ पासून हे लागू करीत आहात. आपण सन २०१७ मध्ये

असुधारित प्रत

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.अमरनाथ राजूरकर)**

श्री.चंद्रशेखर बावनकुळे.......

घोषणा करुन हे लागू करण्याचा निर्णय घेतला होता किंवा जनतेला तसे आश्वासन दिले होते, त्या आश्वासनापासून आपण दूर जात आहात काय, अशी शंका माझ्या मनात आहे आणि तसे दिसत आहे. आपण सांगत आहात की, आम्ही ५०० चौरस फुटापर्यंतच्या घरासाठी हे लागू करीत आहोत. परंतु ही एक प्रकारची फसवणूक आहे. कारण तुम्ही सन २०१७ पासून हे लागू करणार होता. मग सन २०१७ पासून का लागू करण्यात येत नाही याबाबत स्पष्टता झाली पाहिजे.

यानंतर श्री.सांगळे.......

असुधारित प्रत

श्री.चंद्रशेखर बावनकुळे....

याबाबत शासनाने मुंबईकराना शब्द दिला असल्यामुळे आपण त्याबाबत स्पष्टीकरण दिले पाहिजे. मालमत्ता कर, शिक्षण उपकर, वृक्ष लागवड उपकर रद्द करीत असताना त्यामुळे पडणारा आर्थिक भुर्दंड शासन महानगरपालिकेला देणार आहे की, महानगरपालिका तो भुर्दंड स्वत: सहन करणार आहे, याबाबत स्पष्टीकरण आले पाहिजे. यापूर्वी महानगरपालिकेला मालमत्ता कर, शिक्षण उपकर, वृक्ष लागवड उपकरातून उत्पन्न मिळत होते. शासनाने अशा प्रकारे मुंबई महानगरपालिकेकरिता निर्णय घेतला असल्यामुळे महाराष्ट्रातील इतर जिल्हयांमधील महानगरपालिकांसंबंधी असा निर्णय का घेण्यात आला नाही ? मुंबईतील निवडणुका डोळयासमोर ठेवून मत मिळविण्यासाठी आपण हे सर्व करीत आहात का ? अशी शंका निर्माण होत आहे. नागपूर, औरंगाबाद, ठाणे, नांदेड, अहमदनगर महानगरपालिकांसाठी असा निर्णय केला जात नाही, तेथे आर्थिक दुर्बल घटकांमधील लोक राहत नाहीत का ? आज या विधयेकाच्या माध्यमातून जी सुधारणा करण्यात येत आहे. ती राज्यातील इतर महानगरपालिकांसाठी का नाही ? मुंबईचे समाधान झाले, मुंबईचे चांगले झाले. ही चांगली गोष्ट आहे. आम्ही या विधेयकाला संपूर्ण समर्थन देत आहोत. परंतु त्यामध्ये महाराष्ट्रातील उर्वरित महानगरपालिका वंचित का ठेवण्यात आल्या व त्यांच्या सुधारणासंबंधी सदनामध्ये विधेयक का आणण्यात आले नाही ?सरकार राज्य म्हणून काम करीत असल्यास त्यांनी सर्व महानगरपालिकांसंबंधी सुधारणा विधेयक आणावयास पाहिजे होते. सरकार राज्य नव्हे तर फक्त मुंबईकरिता काम करीत आहे का ? म्हणून माझी शासनाला विनंती आहे की, या विधेयकासोबत मुंबईप्रमाणे महाराष्ट्रातील सर्व महानगरपालिकांमध्ये ५०० चौरस फुटांपर्यंतच्या घरांसाठी असा नियम केला पाहिजे. मी माननीय राज्यमंत्री श्री.प्राजक्त तनपुरे यांना सांगू इच्छितो की, उद्या सदनाचे काम संपल्यानंतर आपण अहमदनगरला घरी जाणार तेव्हा तेथील लोक तुमच्याकडे विचारणा करतील की, आमच्या ५०० चौरस फुटांपर्यंतच्या घरांसाठी हा नियम का करण्यात आला नाही ? सभापती महोदया, शासनाने या संदर्भात फक्त मुंबईपुरता नव्हे तर राज्यातील संपूर्ण महानगरपालिकांसाठी हा निर्णय घ्यावा. माननीय तालिका सभापती नांदेड येथील आहेत. आज सदनात

श्री.चंद्रशेखर बावनकुळे....

आपल्या उपस्थितीमध्ये सदर विधेयक सदनामध्ये मंजुरीसाठी आले आहे. त्यामुळे नांदेडमधील लोक देखील या बाबतीत विचारणा करतील. आपण मुंबईकरांना फसवत आहात. विधेयकातमध्ये सन २०१७ पासून यासंबंधी कार्यवाही करण्यासंबंधी नमूद केले आहे. परंतु प्रत्यक्षात सन २०२२ पासून ही बाब लागू करीत आहात. मी या विधेयकासंबंधी ३ महत्त्वाच्या बाबी उपस्थित केलेल्या आहेत. माननीय मंत्र्यांनी त्यावर समर्पक उत्तर द्यावे अशी मी अपेक्षा करतो व याच ठिकाणी थांबतो.

--------------

असुधारित प्रत

श्री.शशिकांत शिंदे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदया, सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक ३ – मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र शिक्षण व रोजगार हमी (उपकर) आणि महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन (सुधारणा) विधेयकावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी उभा आहे.

सभापती महोदय, या विधेयकाच्या निमित्ताने मी राज्याचे माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री आणि शासनाचे मनापासून अभिनंदन करतो. सर्वसामान्य जनता १०० ते ३०० चौरस फुटाच्या घरामध्ये राहत आहे. त्यांना एसआरए किंवा विविध योजना असो, त्यातून त्यांचा पुनर्विकास होईल. आता शासनाकडून ५०० चौरस फुटांसंबंधी निर्णय झाला आहे. हजारो लोकांच्या संदर्भात हा निर्णय आहे. सध्या असलेली करोनाची परिस्थिती, वाढती महागाई असताना सर्वसामान्य व पगारदार नोकरासंबंधी शासनाने ऐतिहासिक निर्णय घेतल्याबद्दल मी सर्वप्रथम शासनाचे मनापासून अभिनंदन करतो, आभार व्यक्त करतो. आपण मुंबई महानगरपालिकेला सुट दिली आहे. काही दिवसांपूर्वी माननीय नगरविकास मंत्री श्री.एकनाथ शिंदे नवी मुंबई येथे आले होते. त्यावेळी त्यांनी असे सांगितले होते की, नवी मुंबई आणि ठाणे येथील ५०० चौरस फुटांपेक्षा कमी निवासी क्षेत्राला मालमत्ता करातून सुट देण्यासंबंधी त्यांनी पत्रकार व जनतेसमोर जाहीर केले होते. त्या बाबतीत येथे उल्लेख केला असता तर बरे झाले असते. राज्यात फक्त मुंबईमध्ये गरीब लोक राहतात असे नाही. अनेक जिल्हयांमध्ये अनेक ठिकाणी गरीब लोक राहतात. एसआरए योजना किंवा अन्य योजनांमध्ये त्यांचा पुनर्विकास होणार असल्यास त्यांच्याकरिता शासनाने मुंबईप्रमाणे निर्णय घेतल्यास तो एक चांगला निर्णय होऊ शकतो अशी माझी सूचना आहे. सभापती महोदय, मंत्री महोदयांनी नवी मुंबई व ठाणे यांच्याकरिता दिलेल्या आश्वासनाप्रमाणे किंवा जाहीर केलेल्या निर्णयासंबंधी यात उल्लेख व्हावा. त्याबाबत वर्तमानपत्रे व टीव्हीवर बातम्या आलेल्या आहेत. त्या संदर्भात कशा प्रकारचा निर्णय झाला आहे याबाबतीत सदनाला स्पष्ट माहिती मिळाली पाहिजे. एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

---------

असुधारित प्रत

श्री.प्रवीण दटके (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदया, सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक ३ – मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र शिक्षण व रोजगार हमी (उपकर) आणि महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन (सुधारणा) विधेयकावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी उभा आहे.

सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री.शशिकांत शिंदे यांच्याप्रमाणे मी देखील महानगरपालिकेचा सदस्य म्हणून येथे आलो आहे. या विधेयकावर सन्माननीय सदस्य सर्वश्री सुनील शिंदे, शशिकांत शिंदे तसेच चंद्रशेखर बावनकुळे यांनी आपापले विचार व्यक्त केलेले आहेत. संपूर्ण महाराष्ट्रात गरीब लोक राहत आहेत. या संदर्भात मुंबईने चांगली सुरुवात केली आहे. मी आपल्यामार्फत माननीय मुख्यमंत्री व माननीय नगरविकास मंत्री श्री.एकनाथ शिंदे यांचे मनापासून अभिनंदन करतो. परंतु माननीय मंत्री हे महाराष्ट्राचे मंत्री आहेत, मुंबईचे नाहीत. राज्यात २६ महानगरपालिका आहेत. माननीय मुख्यमंत्री श्री.उद्धव बाळासाहेब ठाकरे यांचे मन मोठे आहे. राज्यात अनेक ठिकाणी पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत हजारो घरे तयार होत आहेत. सर्वसामान्य लोक आता ५०० चौरस फुटांच्या घरामध्ये राहत आहेत. नागपूर शहरामध्ये दोन संस्था कार्यरत आहेत. त्यापैकी एनआयटी नावाच्या संस्थेकडे १९०० आणि ५७२ लेआऊट आहेत. तेथे ३५० ते ४०० फुटांचे देखील लहान ईडब्ल्युएसचे प्लॉटस आहेत. नागपूरच्या आऊटरमध्ये गरीब वर्ग राहतो. अमरावती, अकोला, चंद्रपूर अशाप्रकारे विदर्भातील सर्व महानगरपालिका असो, आता मोठया प्रमाणात नागरीकरण व शहरीकरण होत आहे, नगरपरिषदा वाढत आहेत. या लाभामध्ये फक्त मालमत्ता कर नाही तर त्यात शिक्षण कर, वीज, वृक्ष लागवड उपकर, मलजल कर यांचा समावेश आहे. मागील काळात मोठया प्रमाणात जेथे मीटर नसतील तेथील पाणी कर आहे. अशा करांमध्ये मोठया प्रमाणात वाढ झाली आहे. परंतु कोणत्याही महानगरपालिकेने करामध्ये एक रुपया देखील कमी केला नाही. आपण मायबाप सरकार आहात. कोणाला प्रिमीयममध्ये सुट दिली जाते. कोणाचे वीज बिल कमी केले जाते. परंतु महानगरपालिका क्षेत्रामध्ये राहणाऱ्या गरीब जनतेचा एक रुपया कर कमी करण्यात आला नाही. करोना काळात महानगरपालिका क्षेत्रांमध्ये राहणाऱ्या गरीब तसेच सर्वसामान्य लोकांनी महानगरपालिकेचा संपूर्ण टॅक्स

असुधारित प्रत

श्री.प्रवीण दटके....

प्रामाणिकपणे भरला व महानगरपालिकेला मदत केली. परंतु आज मुंबईकरिता एक न्याय आणि राज्यातील विविध महानगरपालिकांकरिता वेगळा न्याय मिळत असल्यास मी आपल्या मार्फत शासनाला विनंती करतो.

यानंतर श्री.गागरे....

असुधारित प्रत

श्री.प्रवीण दटके .....

सभापती महोदय, या टॅक्सचा फायदा महाराष्ट्राकरीता व्हावा असे आपण निदेश द्यावेत. मुंबई महानगरपालिका व नागपूर महानगरपालिकेचा वेगवेगळा कायदा आहे. नागपूर महानगरपालिकेकरीता काही वर्ष अगोदर वेगळा कायदा होता. माजी मुख्यमंत्री श्री.पृथ्वीराज चव्हाण असताना तो ॲबॉलीश झाला. नागपूरला सीएससीमधून काढून एमएमसी ॲक्टमध्ये आणले. या दोन्ही कायद्यात या विधेयकाप्रमाणे तसे बदल करुन आपण महाराष्ट्राच्या जनतेला यातून लाभ द्यावा व त्यांना मदत करावी एवढीच विनंती या विधेयकाच्या माध्यमातून सरकारला करीत आहे. आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपला आभारी आहे.

-------

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, खरे तर या विधेयक क्रमांक ३ वर मला बोलायचे नव्हते. पण सन्माननीय सदस्य श्री.चंद्रशेखर बावनकुळे यांनी चिमटा काढण्याचा प्रयत्न केला पण तो चिमटा नव्हता हे सांगण्यासाठी मी उभा आहे. त्यांनी बरोबर उल्लेख केला की, २०१७ पासून तुम्ही करणार होतात. त्यावेळी महानगरपालिकेच्या निवडणुकीत शिवसेना पक्षप्रमुख व विद्यमान मुख्यमंत्री महोदयांनी मुंबईकरांना शब्द दिला होता की, ५०० स्क्वेअरफुटापर्यंत कर कमी करण्यात येईल, त्याकरीता ठराव केला, प्रस्ताव आणला, स्थायी समितीत ठरले. हे केले तरी कायद्यात ते करावे लागते. त्यामुळे भाजपा शिवसेना युती होती, त्यावेळी करायचे होते पण जमले नाही. योगायोगाने नोव्हेंबरमध्ये हे सरकार आल्यावर मुख्यमंत्री महोदयांनी मुंबईकरांना जो शब्द दिला होता तो अंमलात आणण्याकरीता ताबडतोब विधेयक आणले. त्यांचा कर माफ केला. तांत्रिकदृष्टया अधिकारी करतात, या सभागृहाने त्यांचा मालमत्ता कर, ॲसेसमेंट टॅक्समध्येच बदल केला. विधेयकात म्हटल्याप्रमाणे अनेक कर आहेत. मलनिस:रण कर, मल कर, पाणी कर, शिक्षण कर असे वेगवेगळे कर आहेत. आपण कर माफ केल्यानंतरसुध्दा लोकांना मागणीपत्र किंवा बील येत होतो. त्यामुळे लोक म्हणत होते

श्री.दिवाकर रावते.....

की, ही आमची फसवणूक आहे का. हे तांत्रिकदृष्टया लक्षात आले तेव्हा हे विधेयक आणले व कर माफी केली. राहिलेल्या शिक्षण करासाठी हे विधेयक आहे. त्यामुळे राहिलेल्या उणीवा दूर करण्यासाठी हे विधेयक आणलेले आहे. त्यात काही तांत्रिक बाबी असतात. मुंबईत आता यामुळे शुन्य कर होणार आहे.

सभापती महोदय, यामध्ये शब्दप्रयोग असा केलेला आहे की, निवासी इमारती व निवासी गाळे आहेत. मुंबई शहरात ओनरशीप म्हटले की कळते, मालकीहक्क म्हटले तर कळत नाही. मालकीहक्काच्या गाळयाकरीता अशा प्रकारचा हा समज आहे. पण कायद्यातील शब्दप्रयोगाला महत्व असते. आपल्याला माहिती असल्याने आपण बारीकसारीक बघत असतो. पण निवासी इमारत व निवासी गाळे म्हणजे व्यापारी गाळे नाहीत. याचा अर्थ मुंबईतील जुन्या इमारतीतील रहिवाशी देखील यामध्ये येतात अशा यामध्ये उल्लेख आहे असे आमचे मत आहे. याचे स्पष्टीकरण मंत्री महोदयांनी करावे. याचा अर्थ असा आहे की, १६ हजाराच्या वर जुन्या इमारती आजही शिल्लक आहेत. रस्ता विकासाच्या आड येणाऱ्या अनेक लोकांकरीता आपण शासनाने भाडेपट्टयावर असे निवासी गाळे दिलेले आहेत. भाडे कसे असते ते सांगतो. १९५५ साली जे भाडे १० रुपये होते ते आता ८० ते ११५ रुपये झालेले आहे. मालकांची तक्रार आहे की, भाडे तसेच आहे. कर वाढत गेल्यामुळे भाडे वाढत गेलेले आहे. आता तुम्ही या निवासी गाळयावरील हे कर रद्द कराल त्यांना शुन्य कर येणार असेल तेव्हा इमारतीमध्ये भाडे पध्दतीने राहणारे जे भाडेकरु आहेत त्यांना मुळ भाडे भरावे लागेल, कर माफ होणार हा महत्वाचा मुद्दा आहे. त्याप्रमाणे १६५०० जुन्या इमारती किंवा मोडकळीस आलेल्या इमारती आहेत, त्या घरदुरुस्ती मंडळाच्या अंतर्गत येतात. यामध्ये लाखो भाडेकरु राहात आहेत, त्यांचा उपकर माफ होईल असे मला वाटत नाही. भाडेकरुकरीता नवीन इमारत बांधली व भाडयाने दिली, मालकी हक्काने दिली नाही, तरी त्यांना भाडे लागू पडेल पण कर लागू पडणार नाही अशा प्रकारची स्पष्टता आली पाहिजे. नाही तर आणखी एक नवीन विधेयक आणावे लागेल. मी सन्माननीय सदस्य श्री.चंद्रशेखर बावनकुळे यांना सांगू इच्छितो की,

श्री.दिवाकर रावते.....

यामध्ये कोणतीही फसवाफसवी नाही. माननीय मुख्यमंत्री यांनी दिलेला शब्द पाळला व कृतीत आणून दाखविला. राहिलेल्या उणीवा या विधेयकाद्वारे दूर करीत आहोत, म्हणून तुम्ही दिलेल्या पाठिंब्याचे मी स्वागत करतो, धन्यवाद.

--------

असुधारित प्रत

श्री.अभिजित वंजारी (नागपूर विभाग पदवीधर) : मुंबई महानगरपालिका अधिनियम व शिक्षण व रोजगार हमी अधिनियम व त्यात आणखी सुधारणा करण्यासाठी मांडलेल्या विधेयकावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, या विधेयकाच्या उद्देश व कारणामध्ये लिहिलेले आहे की, कोविड-१९ च्या सार्वत्रिक साथरोगामुळे मुंबई शहरातील अनेक व्यवसाय बंद झालेले आहे, अनेक लोकांना त्यांच्या नोकऱ्या व उपजिविकेची साधने गमवावी लागलेली आहेत. म्हणून मालमत्ता कर प्रदान करणे लोकांना अडचणीचे आहे. म्हणून ५०० चौरसफुटाचा कारपेट एरिया असलेल्या गाळेधारकांना मालमत्ता करामध्ये सुट देण्यात येत आहे. बाकीच्या सन्माननीय सदस्यांनी देखील अशाच प्रकारची भूमिका मांडली आहे. हा विषय केवळ मुंबई महानगरपालिकेपुरते मर्यादीत न ठेवता अशा प्रकारची योजना राज्यातील इतर महानगरपालिकांमध्ये लागू व्हावी, परंतु हा अधिकार राज्य शासनाला आहे का हा एक विषय आहे. शिवसेनेने किंवा मुख्यमंत्री महोदयांनी केलेली घोषणा होती कारण मुंबई महानगरपालिकेत शिवसेनेची एकहाती सत्ता आहे. शिवसेनेच्या माध्यमातून तो ठराव पारीत करण्यात आला. तो ठराव शासनाच्या मंजूरीकरीता पाठविण्यात आला. त्याचा आर्थीक भारसुध्दा मुंबई महानगरपालिकेकडून सहन केला जाणार आहे. परंतु ज्या पध्दतीने सन्माननीय सदस्य श्री.प्रवीण लटके यांनी मुद्दा मांडला आहे, ते नागपूर महानगरपालिकेचे माजी महापौर आहेत, विद्यमान नगरसेवकही आहे. त्यांनी सांगितले की, अशाच प्रकारची भूमिका नागपूरकरीता का घेतली जाऊ शकत नाही. मी विचारु इच्छितो की, ३ मार्चपर्यत नागपूर महानगरपालिकेमध्ये भारतीय जनता पार्टीच्या १०८ सदस्यांसह एकहाती सत्ता होती. मुंबई महानगरपालिकेबाबत मुख्यमंत्री महोदयांनी मालमत्ता करात सुट देण्याची घोषणा केली, त्यामुळे मुंबईकरांना दिलासा मिळेल. खरचं आपणास नागपूरकरांचा एवढा पुळका होता तर ३ मार्च पूर्वी तशा प्रकारची घोषणा महानगरपालिकेत ठराव करुन आपण का केली नाही.

असुधारित प्रत

श्री.प्रवीण दटके : सभापती महोदय, मी सांगू इच्छितो की, ३ मार्चच्या आधी नव्हेतर डिसेंबर महिन्यात सर्व पक्षांनी मिळून एकमताने ठराव केला व तो ठराव शासनाकडे पाठविला आहे. त्याचा फॉलोअप नगरविकास मंत्री महोदयांकडे केला आहे, आपल्या माहितीकरीता मी हे सांगत आहे.

------

यानंतर श्रीमती नाफडे

असुधारित प्रत

श्री.बाळाराम पाटील ( कोकण विभाग शिक्षक ):सभापती महोदय,विधेयक क्रमांक ३९ वर माझे विचार मांडण्याकरिता मी उभा आहे.

सभापती महोदय, या विधेयकामध्ये ज्या सुधारणा आज सुचित करण्यात आलेल्या आहेत, त्यांना निश्चिपणाने पाठिंबा देण्याकरिता मी उभा आहे. मुंबई, ठाणे, वाशीची चर्चा होत असताना शेजारी जी पनवेल महानगरपालिका स्थापन झालेली आहे, त्या पनवेल महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात ईडब्ल्यूएस आणि एलआयजीच्या जवळपास ९०,००० सदनिका सिडको आणि एमएमआरडीए यांच्या माध्यमातून बांधण्यात आलेल्या आहेत. मुंबईमध्ये सेवा देणारा कष्टकरी गोर-गरीब मजूर मुंबईत राहणे परवडत नाही म्हणून पनवेल महानगरपालिकेच्या क्षेत्रामध्ये खारघर, कळंबोली, कामोठा,खांदा कॉलनी, नवीन पनवेल अशा परिसरामध्ये राहत आहे. शासनाने जो निर्णय घेतलेला आहे, त्यामुळे मुंबईतील गोर-गरिबाला निश्चितपणाने दिलासा मिळणार आहे. परंतु मुंबईत राहणे परवडत नाही, याकरिता तो गोरगरीब मजूर पनवेलमध्ये राहायला जात आहे. मुंबईत राहणाऱ्या गरिबापेक्षाही गरीब असणाऱ्या या माणसाला देखील यातून दिलासा देणे, हे निश्चिपणाने आपल्या साऱ्यांनाच क्रमप्राप्त आहे. माझी अशी मागणी आहे की, मुंबईमध्ये जो निर्णय आपण घेतलेला आहे, तोच निर्णय पनवेल महानगरपालिकेच्या क्षेत्रातील,त्यासोबतच सर्व राज्यालाही लागू करावा, अशी सूचना मी करतो. या विधेयकातील दुरुस्तीचे मी स्वागत करुन माझे दोन शब्द पूर्ण करतो.

----------------

असुधारित प्रत

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

श्री.जयंत प्र.पाटील ( विधानसभेनेन निवडलेले): सभापती महोदया, विधेयक क्रमांक ३९ वर माझे विचार मांडण्याकरिता मी उभा आहे.

सभापती महोदया, पनवेल महापालिकेने हाऊस टॅक्स मोठया प्रमाणात वाढविलेला आहे. पनवेल महापालिकेमध्ये जी वस्ती झालेली आहे, त्यात जे लोक नव्याने तेथे राहायला आहे. ते प्रामुख्याने मुंबईच्या एसआरएमधून, झोपडपट्टीतून आलेले लोक आहेत. त्यांचे संरक्षण आज आम्ही करीत आहोत. आज तेथे मुंबईतून आलेले लोक आणि तेथील गावातील मूळ लोक यांना तेथे सामावण्याचा प्रयत्न आम्ही करीत आहोत. एवढी भरमसाठ घरपट्टी वाढविण्यात आलेली आहे की, ती भरण्याची त्याची कुवत नाही. मी चुकतही असेल कारण मी काही महापालिकेत काम करणारा कार्यकर्ता नाही. परंतु पनवेल महापालिकेला सिडकोचा देखील एन्जॉय मिळत आहे. जो पूर्वी नवी मुंबई महापालिकेला मिळत होता. या सिडकोचा देखील काही निधी तेथे वापरायला मिळत आहे. सिडको देखील तो निधी वापरत असते. नवी मुंबई आणि मुंबई येथे वेगळे काही झाले, असे नाही. एमएमआरडीएचा निधी आपल्याकडे येतो. पनवेल आज विकसित होत असताना जो गरीब माणूस आज आलेला आहे. ज्याने पाच लाख रुपयांचा फ्लॅट घेत असताना त्याचा पंच्च्याहात्तर टक्के पगार कर्जाच्या रिपेमेंटमध्ये जात आहे. बँकेच्या कर्जाच्या हप्त्यामध्ये त्याच्या पगाराचा पंच्च्याहात्तर टक्के भाग जात आहे. त्या उपर आता एवढी घरपट्टी वाढविलेली आहे की, त्याच्या हातात पगाराचा पैसाच राहत नाही. ते ऐकायला तयार नाहीत, बाकीचे काही होत नाही. या बाबत राज्य शासनाने हस्तक्षेप केला पाहिजे. त्या ठिकाणी फोरम आहे, नवीन लोक जे आलेले आहेत, त्यांनी हाऊसिंग फोरम वगैरे आदि बाबी चालू केलेल्या आहेत. खारघर फोरम, कामोठे फोरम अशा प्रकारचे विविध भागात फोरम चालविले जातात. त्या ठिकाणी रीना घरत या महोदया ज्या आहेत, त्या त्यांचे चांगले नेतृत्त्व करीत आहेत. त्या आमच्या विरोधक आहेत. परंतु हाऊसिंगचे काम करताना त्यांनी एवढे चांगले नेटवर्क करुन ते काम केलेले आहे. आपण मात्र याबाबत कोणाला विचारतच नाही. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर

असुधारित प्रत

श्री.जयंत प्र.पाटील

रावते हे मूळ मुंबईकर आहेत. परंतु आयुष्यात ते बिचारे काही मोठा फ्लॅट घेऊ शकले नाहीत. यांच्यापेक्षा ते जास्त पैसे कमावितात. त्यांच्यापेक्षा यांचे उत्पन्न जास्त आहे, "त्यांची आणि यांची" बरोबरी नाही, याचा कुठेतरी क्रायटेरिया ठरला पाहिजे. मोठया लोकांचे वेगळे आहे, छोटया वस्ती झालेल्या आहेत, त्यांचे वेगळे आहे. याबाबत एकदम कधी प्रॉब्लेम येणार आहे तर ते पुन्हा निघून जाणार आहेत. याचे सूत्र कुठे आहे, त्यांना हे परवडत नाही म्हणून ते विकणार. पुन्हा ते कर्जत आणि खोपोलीच्या खेडयात जाऊन राहणार, एवढे घेऊन त्यांच्या पुढील पिढीला याचा काहीच फायदा होणार नाही. याबाबत महापालिका प्रशासनाने यावर निर्देश ठेवले पाहिजेत. कोणती वस्ती कुठे आहे, मुंबईचे आपण शांघाय बनवायला निघालेला आहात, मुंबई खोपोलीपर्यंत आणि महाडपर्यंत नेण्यात येणार आहे. त्यावेळी काय होणार आहे ?

सभापती महोदय, रशियामध्ये मी गेलो असता तेथील मॉस्को हे सर्वात मोठे शहर आहे. मॉस्को शहराचे दुसरे टोक ५०० कि.मी.वर आहे. २००-३०० कि.मी. मी रेल्वेने जाण्याचा प्रयत्न केला. आम्ही तेथे सहा-सात दिवस होतो. तीच परिस्थिती आपल्या मुंबईची होणार आहे. मुंबईचे दुसरे टोक इकडे एवढया लांब होणार आहे, इकडून तिकडे जाताना आपल्याला दोन-तीन दिवस लागणार आहेत .

सभापती महोदय, ज्या छोटया महापालिका आहेत, मोठया महापालिका ज्या विकसित झालेल्या आहेत, त्या वेगळया आहेत. अकोला महानगरपालिकेकडे कर्मचाऱ्यांचे पगार द्यायला पैसे नाहीत. अकोला महापालिका ही राज्यातील सर्वात वाईट कारभार असणारी महानगरपालिका आहे.

सभापती महोदया, पनवेल महापालिकेबाबत राज्य शासनाने त्यांना योग्य मार्गदर्शन करुन सांगायला पाहिजे. तेथील जे फोरम आहेत, ते आमचे स्थानिक लोकांचे नाहीत. आपण मंत्री महोदयांनी स्वत: त्या फोरमला बोलवावे आणि त्यांच्यासमवेत चर्चा करावी मंत्रीमहोदय, आपल्याला नगरविकास खाते लहान वयात मिळालेले आहे, आपल्याला यातून बरेच काही शिकण्याची संधी मिळालेली आहे. आपण या संधीचे सोने करायला पाहिजे.

असुधारित प्रत

श्री.जयंत प्र.पाटील.....

लोकांना हे खाते मिळण्यात त्यांचे आयुष्य लोटले. आम्हाला सन्माननीय मंत्री महोदय श्री.अमित देशमुख यांचा अभिमान वाटतो.

सभापती महोदया, माझी एकच विनंती आहे की,विधेयकावर बोलताना आम्ही कितीही वेळ बोलू शकतो, त्याच वेळी आपण वेळ संपल्याची बेल वाजवतात. आम्ही या निमित्ताने विधेयकावर बोलताना वेगवेगळे विषय मांडू शकतो. याकरिता पनवेल महापालिकेच्या बाबत आमच्यासमवेत चर्चा करावी, तेथे फोरमच्या पदाधिकाऱ्यांना देखील बोलाविण्यात यावे, अशी मी माननीय मंत्री महोदयांना विनंती करत आहे. घरपट्टी कमी झाली पाहिजे, ही जी माझी मागणी आहे, त्याची पुर्तता शासनाने करावी, एवढी विनंती करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

-------------

असुधारित प्रत

श्री.विलास पोतनीस (मुंबई विभाग पदवीधर):सभापती महोदय, विधेयक क्रमांक ३९ वर माझे विचार मांडण्याकरिता मी उभा आहे.

सभापती महोदया, मंत्रीमहोदयांना माझी एकच विनंती आहे की, मुंबई महानगरपालिकेतून निवडून आलेले सन्माननीय सदस्य श्री.सुनील शिंदे, हे वरळी विधानसभा मतदारसंघामध्ये राहत आहेत, त्यांनी ही विधेयकावरील चर्चा सुरु केली. बीडीडी चाळीचा विकास म्हाडातर्फे होत आहे. ही जी मालमत्ता करमाफी आहे, जो विकास बीडीडी चाळीमध्ये होत आहे, त्यांना यातून सूट मिळणार आहे का, एवढीच मला माहिती पाहिजे. खरे तर त्यांना यातून सूट मिळाली पाहिजे, असे माझे म्हणणे आहे. बीडीडी चाळीला ही मालमत्ता कर माफीची सवलत मिळाली पाहिजे, एवढेच मला या विधेयकावर बोलताना म्हणायचे आहे. एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

यानंतर श्री.सोनावणे......

असुधारित प्रत

श्री. प्राजक्त तनपुरे : सभापती महोदया, मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीत ५०० स्क्वे.फुटाच्या ज्या मालमत्ता आहेत, त्यांचा संपूर्ण प्रॉपर्टी टॅक्स माफ करण्याचा हा निर्णय आहे. पूर्वी मुंबई महानगरपालिकेमध्ये एकूण ९ प्रकारचे टॅक्सेस लावले जात होते. त्यामध्ये सर्वसाधरणकर हा ०.११ टक्के, जलकर ०.२५ टक्के, जल लाभकर, मलनिस्सारणकर, मलनिस्सारण लाभकर, शिक्षण उपकर, राज्य शिक्षण उपकर, वृक्ष उपकर आणि पथकर आकारला जात होता. मुंबई महानगरपालिकेच्या क्षेत्रात मालमत्ता करासाठी ज्यांची नोंदणी झालेली आहे, असे ३५.२३ लाख युनिट्स आहेत. त्यांची वर्षभराची मागणी ही ६ हजार ४०० कोटी रुपये इतकी आहे. ५०० चौरस फुटाच्या आतील ज्यांचे क्षेत्र आहे अशी १६.१४ लाख युनिट्स आहेत. त्यांची वर्षभराची मागणी ही ४६२ कोटी रुपये इतकी आहे. ६ हजार ४०० कोटी रुपयांपैकी ४६२ कोटी रुपये या ५०० चौरस फुटाच्या आतील लोकांची आहे. दिनांक १० मार्च, २०१९ पासून शासनाने मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ मध्ये पूर्वी सुधारणा केली होती. त्यामध्ये सर्वसाधारण कर हा पहिला घटक आहे. हा कर पूर्वी माफ केला होता. उर्वरित कर लोकांना भरावे लागत होता. सन्माननीय सदस्यांनी सदरहू विधेयकाच्या अनुषंगाने मौलिक सूचना आणि विचार मांडलेले आहेत. सन्माननीय सदस्य श्री सुनील शिंदे, माजी मंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे, सन्माननीय सदस्य सर्वश्री शशिकांत शिंदे, दिवाकर रावते, प्रवीण दटके, जयंत प्र. पाटील आणि इतर सन्माननीय सदस्यांनी सदरहू विधेयकाच्या अनुषंगाने मौलिक सूचना आणि विचार मांडलेले आहेत. मी माननीय मुख्यमंत्री श्री. उद्धव बाळासाहेब ठाकेर यांचे मनापासून अभिनंदन करीत आहे. त्यांनी आतपपर्यंत मुंबई महानगरपालिकेचा आर्थिक कारभार व्यवस्थितपणे सांभाळलेला आहे, त्यामुळे आज हे शक्य होत असून, हे मला सांगण्यास अतिशय आनंद होत आहे. मुंबई महानगरपालिकेचा कारभार सुरु आहे. मुंबई महानगरपालिकेची आर्थिक स्थिती ही चांगल्याप्रकारे सांभाळली आहे. त्यामुळे हे शक्य होत आहे. काही सन्माननीय सदस्यांनी इतर महागनरपालिकांमध्ये असे झाले पाहिजे, अशी मागणी केलेली आहे.

श्री. प्राजक्त तनपुरे.....

स्थानिक स्वराज्य संस्थेमार्फत लोकांना पाणी, रस्ते, गटारे, मलनिस्सारण, सिव्हरेज, दिवाबत्ती या मूलभूत सोयीसुविधा दिलेल्या आहेत. प्रॉपर्टी टॅक्स हा त्यांच्या उत्पन्नाचा एक मोठा स्त्रोत आहे. अनेक नगरपालिका, महानगरपालिका आर्थिकदृष्ट्या.... मी गेल्या एक ते दोन वर्षापासून असे पाहत आहे की, अहमदनगरचा उल्लेख केलेला असून, ती भूषणावह गोष्ट नाही. अहमदनगर महानगरपालिकेची अशी परिस्थिती आहे की, २०० कोटी रुपयांचे विद्युत देयक थकलेले आहे. चालू विद्युत देयकावर नवीन योजना महावितरण कंपनीने सुरु केलेली आहे. अनेक महानगरपालिकेंचा आस्थापना खर्च ३५ टक्क्यांच्या आत असणे अपेक्षित असताना अनेक महानगरपालिकेंचा आस्थापना खर्च हा ७० टक्क्यांपेक्षा जास्त आहे. काही सन्माननीय सदस्यांनी अशी भावना व्यक्त केली की, हे राज्यात इतर ठिकाणी सुरु झाले पाहिजे. काही अडचण नाही. हे पाहत असताना त्या नगरपालिकेचा, महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती कशी आहे आणि हे माफ केल्यामुळे त्यांच्या परिस्थितीवर काय परिणाम होणार याचा विचार करण्याची आवश्यकता आहे. मुंबई महानगरपालिकेने हे कर माफ करीत असताना शासनाकडून मदत केली जाणार नाही असे सांगितले आहे. त्यांच्या सेल्फवर त्यांना ते करावे लागणार आहे. त्यांनी शासनाकडून आमचा एवढा कर कमी झाला म्हणून आम्हाला एवढी मदत करावी अशा प्रकारचा कोणताही प्रस्ताव मुंबई महानगरपालिकेने दिलेला नाही. त्यामुळे महानगरपालिकांकडून प्रस्ताव आले तर त्यांना मेरीटवर... मला असे वाटते की, मीरा-भाईंदर महानगरपालिकेकडून प्रस्ताव आलेला आहे. त्यांनी असे सांगितले आहे की, शासनाकडून आम्हाला अमुक इतका निधी हवा आहे. त्यामुळे इतर महानगरपालिकांचे प्रस्ताव आल्यानंतर त्यांच्या आर्थिक परिस्थितीवर काय परिणाम होईल हे तपासून निर्णय घेतला जाणार आहे. परंतु, आज या निर्णयामुळे मुंबई महानगरपालिका क्षेत्रात राहणाऱ्या जवळपास १६ लाख प्रॉपर्टीचे जे युनिट्स आहेत,

श्री. प्राजक्त तनपुरे.....

त्यांना हा मोठा लाभ होणार आहे. माननीय मुख्यमंत्री श्री. उद्धव बाळासाहेब ठाकेर यांनी असे आश्वासन दिले होते की, त्याची पूर्तता देखील होत आहे. मुंबई महानगरपालिने आतापर्यंत जी आर्थिक शिस्त पाळली आहे त्यामुळे हे शक्य झालेले आहे. कोणती ही ५०० चौरस फुटाच्या आतील प्रॉपर्टी असेल तर त्याला हा टॅक्स माफ होणार आहे. म्हणून सर्व सन्माननीय सदस्यांना सदरहू विधेयक ऐतिहासिक असल्यामुळे एकमताने मंजुर करावे असे मी आवाहन करीत आहे.

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदया, आम्ही असे म्हटले होते की, राज्यातील सर्वच महानगरपालिकांमध्ये आर्थिक दुर्बल परिवारातील मोठ्या प्रमाणावर ५०० चौरस फुटाच्या आतमधील लोक राहतात. मुंबई महानगरपालिकेकडे पैसे आहेत. त्यांना उत्पन्नाचे अनेक स्त्रोत आहेत. कोरोनाचे संक्रमणाचे कारण सांगितले. तसेच इंडस्ट्रिअल कारण सांगितले. आम्ही विधेयकाला समर्थन दिलेले आहे. विधेयकाचा उद्देश चांगला असल्यामुळे आम्ही त्याला समर्थनच दिलेले आहे. उर्वरित गरीब महानगरपालिकांकडे पैसे नाहीत. म्हणून तेथील आर्थिकदृष्ट्या दुर्बल लोकांना मदत करावयाची नाही काय ? मुंबई महानगरपालिकेकडे पैसे आहेत. म्हणून त्यांनी निर्णय घेतलेला आहे. इतर महानगरपालिकांनी प्रस्ताव पाठविल्यानंतर निर्णय घेतला जाणार आहे. अनेक महानगरपालिकेच्या क्षेत्रात राहणाऱ्या लोकांची टॅक्स भरण्यासारखी आर्थिक परिस्थिती नाही. कोरोनाच्या काळात अनेकांचे रोजगार गेलेले आहेत. त्यामुळे शासन मदतीची भूमिका का घेत नाही. आम्ही सरकारकडून मदत घेऊ. ५०० चौरस फुटाच्या आतमधील लोकांसाठी टॅक्समध्ये माफी द्यावयाची असेल तर ती संपूर्ण महाराष्ट्रात द्यावी आणि अशी कार्यवही करीत असताना मुंबई महानगरपालिकेकडे पैसे असल्यामुळे त्यांनी त्यांचा शेअर दिलेला आहे. उर्वरित शेअरची रक्कम राज्य शासनाने द्यावी. राज्यातील इतर महानगरपालिकांची आर्थिक परिस्थिती ठीक

असुधारित प्रत

नसल्यामुळे त्यांना मदत केली जात नाही. हा कोणता न्याय ? ही लोक नाहीत काय ? ही गरीब लोक नाहीत काय ? मी राजकारण करीत नाही.

**उप सभापती** : सदरहू विधेयकासंबंधी अनेक सन्माननीय सदस्यांनी मौलिक सूचना आणि विचार व्यक्त केलेले आहेत. त्यांनी विधेयकासंबंधी आपले मत काय आहे ते मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यानंतर माननीय राज्यमंत्री महोदयांनी सविस्तरपणे उत्तर दिलेले आहे.

श्री.प्राजक्त तनपुरे : सभापती महोदया, मी पुनश्च विनंती करतो की, सभागृहाने सदरहू विधेयक विचारात घ्यावे.

**उप सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडशः विचारात घेण्यात येईल.

खंड २ ते ५ (दोन्ही सम्मिलीत) विधेयकाचे भाग झाले.

खंड १, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. प्राजक्त तनपुरे : सभापती महोदया, मी आपल्या अनुमतीने सन २०२२ चे वि.स.वि.क्रमांक ३ संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**सभापती** : सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक ३ संमत झाले आहे.

---------

यानंतर श्री. बोर्डे....

असुधारित प्रत

**पृ.शी.** : मुंबई महानगरपालिका (सुधारणा) विधेयक.
L.A.BILL NO. IV OF 2022
(A BILL FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT.)

श्री.प्राजक्त तनपुरे (नगर विकास राज्यमंत्री ) : सभापती महोदया, मी आपल्या अनुमतीने विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक-४, मुंबई महानगरपालिका अधिनियम यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडतो.

**उप सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.प्राजक्त तनपुरे : सभापती महोदया, मी आपल्या अनुमतीने सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक-४ मुंबई महानगरपालिका अधिनियम यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

**उप सभापती** : आता विधेयक विचारात घेण्यासंबंधीच्या प्रश्नावर चर्चा होईल. तद्नंतर माननीय मंत्र्यांचे उत्तर झाल्यानंतर विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकला जाईल.

आता सन्माननीय सदस्यांनी विधेयकावरील भाषणास सुरुवात करावी.

असुधारित प्रत

श्री.चंद्रशेखर बावनकुळे (नागपूर स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदया, सन २०२२ चे वि.स.वि.क्रमांक-४ वर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदया, मी या विधेयकावर लांबलचक भाषण करणार नाही. या विधेयकातील "उद्देश व कारणे यांचे निवेदन" यामध्ये "कोणत्याही शासकीय अधिकाऱ्याची प्रशासक म्हणून नियुक्ती करण्यासाठी" असे नमूद आहे. मंत्री महोदयांनी एवढाच खुलासा केला पाहिजे की, प्रशासक म्हणून आयुक्त दर्जाचा, सचिव दर्जाचा किंवा अन्य कोणत्या दर्जाचा अधिकारी नियुक्त करणार आहात. आपण शिपायाला किंवा वर्ग-२ च्या अधिकाऱ्याला प्रशासक म्हणून नियुक्त करणार आहात काय ? आपण स्पष्टपणे नमूद करावयास पाहिजे की, प्रशासक म्हणून आयुक्त किंवा सचिव दर्जाचा अधिकारी असेल. मुंबई महानगरपालिकेच्या ठिकाणी प्रशासक नियुक्त करताना आपण कोणत्या दर्जाच्या अधिकाऱ्याची प्रशासक म्हणून नियुक्ती करण्यात येईल हे जर स्पष्ट करणार नसाल तर ते योग्य नाही. त्यामुळे आपण कोणत्या दर्जाचा अधिकारी प्रशासक म्हणून नियुक्त करणार आहात, याची स्पष्टता आणावी एवढीच माझी मागणी आहे.

श्री.महादेव जानकर : सभापती महोदया, मला अगोदरच्या विधेयकावर बोलावयाचे होते, परंतु आपण मला बोलण्याची संधी दिली नाही. अगोदरच्या विधेयकाच्या अनुषंगाने मला एवढेच विचारावयाचे आहे की, मालमत्ता करात सूट देण्यामध्ये पगडीच्या घरांचा सुद्धा समावेश आहे काय ?

श्री.प्राजक्त तनपुरे : होय.

श्री.महादेव जानकर : धन्यवाद.

श्री.प्राजक्त तनपुरे : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री.चंद्रशेखर बावनकुळे यांनी उपस्थित केलेल्या मुद्याच्या बाबतीत सांगू इच्छितो की, मुंबईसारख्या महानगरपालिकेच्या ठिकाणी वरिष्ठ आयएएस अधिकारी असलेले

अशुद्धित प्रत

श्री.प्राजक्त तनपुरे....

विद्यमान महानगरपालिका आयुक्त श्री.इकबाल सिंह चहल यांची प्रशासक म्हणून नियुक्ती केलेली आहे.

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदया, आपण प्रशासक नियुक्त करण्यासंदर्भातील विधेयक संमत करीत आहोत. या विधेयकामध्ये प्रशासक नियुक्त करण्याचा विषय आहे. आपल्याकडे आयएएस मध्ये सुद्धा वेगवेगळ्या दर्जाचे अधिकारी आहेत. आम्ही एवढेच जाणून घेऊ इच्छितो की, प्रशासक म्हणून जिल्हाधिकारी दर्जाचा, आयुक्त दर्जाचा, सचिव दर्जाचा, प्रधान सचिव दर्जाचा, अपर मुख्य सचिव दर्जाचा यापैकी कोणत्या दर्जाच्या अधिकाऱ्यांची प्रशासक म्हणून नियुक्ती करण्यात येणार आहे ?

श्री.प्राजक्त तनपुरे : सभापती महोदया, मुंबई महानगरपालिकेच्या विद्यमान आयुक्तांनाच तेथे प्रशासक म्हणून नेमलेले आहे.

श्री.प्रवीण दटके : सभापती महोदया, विधेयकाच्या उद्देश व कारणे यामध्ये "कोणत्याही शासकीय अधिकाऱ्याची" असा उल्लेख आहे. मी विचारु इच्छितो की, "कोणत्याही शासकीय अधिकाऱ्याची" म्हणजे नेमके काय ?

श्री.प्राजक्त तनपुरे : सभापती महोदया, कायद्यानुसार नियम तयार करताना सन्माननीय सदस्यांची सूचना विचारात घेण्यात येईल.

सभापती महोदया, मी सभागृहाला पुनश्च विनंती करतो की, सभागृहाने सदरहू विधेयक विचारात घ्यावे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उप सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड २ व ३ विधेयकाचे भाग झाले.

असुधारित प्रत

खंड १, संपूर्ण शीर्षक व हेतूवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.प्राजक्त तनपुरे : सभापती महोदय ा, मी आपल्या अनुमतीने सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक-४ संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उप सभापती** : सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक-४ संमत झाले आहे.

---------

असुधारित प्रत

**पृ.शी.** : नागपूर शहरातील मेयो रुग्णालयातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतन व अन्य आर्थिक लाभ न मिळणे

**मु.शी.** : नागपूर शहरातील मेयो रुग्णालयातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतन व अन्य आर्थिक लाभ न मिळणे, यासंबंधी श्री.चंद्रशेख बावनकुळे, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री.चंद्रशेखर बावनकुळे (नागपूर स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय‍ा, मी आपल्या अनुमतीने नियम ९२ अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो :-

"नागपूर शहरातील मेयो रूग्णालयात मागील पाच वर्षात वर्ग-२, ३ व ४ चे १०० कर्मचारी सेवानिवृत्त होवून तीन वर्षे झाल्यानंतरही त्यांना निवृत्तीवेतन, भविष्य निर्वाह निधी (जीपीएफ), मृत्यू-नि-उपदान (ग्रॅज्युएटी) आणि रजा रोखीकरणचे पैसे मिळालेले नसणे, काही कर्मचाऱ्यांचा मृत्यु होवूनही त्यांच्या कुटुंबियांना कुटुंब निवृत्तीवेतन न मिळणे, याबाबत सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी मेयो रूग्णालयासमोर साखळी उपोषण सुरू केलेले असणे, मागणीची पुर्तता न झाल्यास बेमुदत आमरण उपोषण करण्याची घोषणा केलेली असणे, मेयो रुग्णालयातील सेवानिवृत कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतन तसेच इतर अनुषंगिक लाभांचे पैसे मिळण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

सभापती महोदया, मेयो रुग्णालयातील कर्मचारी उपोषणावर बसलेले असून आंदोलन करीत आहेत. काही कर्मचारी मागील रविवारी माझ्याकडे आले होते. त्यांनी माझ्याकडे आत्महत्येची नोटीस दिल्यामुळेच मी ही अर्धा-तास चर्चा उपस्थित केली आहे. माननीय मंत्री यांचे व्यक्तिमत्त्व सकारात्मक आहे. मला वाटते या कर्मचाऱ्यांना तातडीने दिलासा द्यावयास पाहिजे. हे कर्मचारी सेवानिवृत्त झाले असून त्यांच्या घरची परिस्थिती हलाखिची आहे. या कर्मचाऱ्यांच्या मागण्या

असुधारित प्रत

श्री.चंद्रशेखर बावनकुळे....

सोडविण्यासाठी मंत्री महोदयांनी बैठक घ्यावी किंवा जर या कर्मचाऱ्यांच्या मागण्या त्यांच्याकडे आल्या असतील तर त्यावर सकारात्मक निर्णय घ्यावा. या अधिवेशन कालावधीत या विषयाच्या बाबतीत बैठक घेतली तर या कर्मचाऱ्यांचा प्रश्न मार्गी लागू शकेल.

-------

असुधारित प्रत

श्री.प्रवीण दटके (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदया, सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या अर्धा-तास चर्चेवर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदया, नागपूर येथे गोरगरीब लोकांसाठी इंदिरा गांधी वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय आहे. गेल्या दोन वर्षांपासून या सभागृहात विविध आयुधांच्या माध्यमातून अनेकदा तेथील विषय मांडले. त्या वैद्यकीय महाविद्यालयात कायमस्वरुपी अधिष्ठाता नसल्यामुळे प्रशासनाची स्थिती फार अडचणीची झाली आहे. कोविड काळात तेथील कर्मचाऱ्यांनी आपला जीव धोक्यात टाकून किमान १ हजार खाटांची व्यवस्था त्या ठिकाणी उभी केली होती. तसेच त्या ठिकाणी सर्व आरोग्य सेवा उभ्या केल्या होत्या. त्या कर्मचाऱ्यांनी कामाची शिफ्ट विसरुन २४-२४ तास सेवा दिली. तसेच संपूर्ण परिसराची स्वच्छता ठेवली. कोरोना काळात त्यांनी आपला जीव धोक्यात टाकला. तीन-चार कर्मचाऱ्यांची प्रकृती फार गंभीर झाली होती. त्या कर्मचाऱ्यांनी नागपूरमध्ये बेमुदत उपोषण सुरु केले होते, परंतु नंतर त्यांना समजाविण्यात आले. परंतु आता त्यांनी आत्महत्येची नोटीस दिली आहे.

सभापती महोदया, या अर्धा-चर्चेच्या अनुषंगाने सांगू इच्छितो की, त्या रुग्णालयात कंत्राटी पद्धतीवर मोठ्या प्रमाणात डॉक्टर काम करीत आहेत. त्यांनी आपला जीव धोक्यात टाकून सर्व आरोग्य सेवा दिल्या आहेत. कोरोना काळात कायमस्वरुपी कार्यरत असलेल्या डॉक्टरांची गरज असताना सुद्धा ते नव्हते. अशा वेळी कंत्राटी डॉक्टरांनी नागपूर येथील वैद्यकीय महाविद्यालय चांगल्याप्रकारे चालविले. एकप्रकारे कंत्राटी डॉक्टरांनी कोविड काळात शासनाला मदत केली. त्यांनी संपावर न जाता सर्व वैद्यकीय महाविद्यालय चांगल्या पद्धतीने चालविले. माझी विनंती आहे की, या रुग्णालयातील कर्मचाऱ्यांबरोबरच मंत्री महोदयांनी कंत्राटी डॉक्टरांचा प्रश्न मार्गी लावावा. जर आपल्या मागण्यांसाठी हे डॉक्टर उपोषणाला

असुधारित प्रत

श्री.प्रवीण दटके....

बसले किंवा संपावर गेले तर ते चित्र आपल्या पुरोगामी महाराष्ट्राच्या दृष्टीने योग्य राहणार नाही. माझी विनंती आहे की, कर्मचाऱ्यांप्रमाणेच कंत्राटी डॉक्टरांचा सुद्धा प्रश्न मार्गी लावावा.

नंतर श्री.कांबळे.....

असुधारित प्रत

श्री. अभिजीत वंजारी : सभापती महोदया, नागपूरच्या मेयो रुग्णालयामध्ये वर्ग २, ३, ४ यातील सन २०१६ मध्ये ७८ कर्मचारी निवृत्त झाले. सन २०१६ पासून सातत्याने ५ वर्षे अनेक वेळा त्यांनी पाठपुरावा केला. परंतु तेथील संबंधित अधिकाऱ्यांनी कोणत्याही प्रकारे लक्ष दिले नाही. अजुनपर्यंत त्यांच्या पेन्शनच्या केसेस तयार झालेल्या नाहीत. खरे म्हणजे कोणताही शासकीय कर्मचारी निवृत्त होण्यापूर्वी ६ महिन्यांच्या अगोदर त्याची पेन्शनची केस तयार करणे सुरु होते. परंतु या केसमध्ये असे झाले आहे की, ज्या क्लर्कजवळ या सर्व लोकांचे सर्व्हिस बूक ठेवले होते, त्याने असे सांगितले की, माझ्याजवळ सर्व्हिस बूक नाहीत. २ वर्षांपर्यंत त्याने सर्व्हिस बूक दिलेच नाही. त्यामुळे या सर्व कर्मचाऱ्यांची पेन्शन केस तयार करण्यात येऊ शकली नाही. माझी मागणी आहे की, संबंधित जबाबदार क्लर्क किंवा अधिकारी यांना निलंबित करण्यात यावे.

श्री. अमित देशमुख : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य सर्वश्री. चंद्रशेखर बानवकुळे, रामदास आंबटकर, प्रवीण दटके, अभिजीत वंजारी यांनी अर्धा तास चर्चेच्या माध्यमातून अतिशय महत्त्वाचा विषय मांडला आहे. मी सर्व सन्माननीय सदस्यंची मते ऐकली आहेत. मी त्यांच्या मताशी सहमत आहे. वैद्यकीय शिक्षण विभागाच्या मेयो या आयजीएमसीमध्ये वर्ग २, ३, ४ मधील एकूण कर्मचारी सेवानिवृत्त झाले आहेत आणि त्यांचे तात्पुरते निवृत्तीवेतन किंवा सेवापुस्तिकेमध्ये वेतन पडताळणी पूर्ण झाली नसल्यामुळे काही गोष्टी अशा अडचणींमुळे त्यांची देयके शासनाकडून, वैद्यकीय महाविद्यालयाकडून वेळेत देण्यात आलेली नाहीत. पेन्शन, ग्रच्युईटी, जीआयएस, जीपीएफ, लिव्ह एनकॅशमेंट अशा त्यामध्ये बाबी आहेत. आमच्यापुढे चर्चेद्वारे यामधील अशी कारणे आलेली आहेत की, सेवापुस्तिका तपासण्याचे काम बराच काळ पूर्ण झाले नाही, त्यामये विलंब झाला. ज्या अधिकारी व कर्मचारी याच्याकडून यामध्ये दिरंगाई, विलंब झाला, त्याच्यावर कारवाई करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे हे मी आपल्याला या संदर्भात येथे मुद्दाम सांगू इच्छितो. आता यामध्ये वर्ग २ च्या कर्मचाऱ्यांचा प्रश्न नाही.

असुधारित प्रत

श्री. अमित देशमुख ....

सभापती महोदया, वर्ग ३ चे १६ व वर्ग ४ चे ६२ अशा कर्मचाऱ्यांचा प्रश्न प्रलंबित आहे. वर्ग ३ च्या १६ कर्मचाऱ्यांची पडताळणी पूर्ण झाली असून ३१ मार्चपूर्वी सेवानिवृत्ती वेतन देण्याची कार्यवाही पूर्ण होईल. मात्र असे जरी असले तरी तात्पुरत्या स्वपरुपात सेवानिवृत्तीचे वेतन नियमानुसार शासन जे देते, ते देणे सुरु आहे. त्याला आर्थिक आधार देणे क्रमप्राप्त आहे. शासनाकडून त्यामध्ये कोणताही खंड आलेला नाही. त्यांचा एकूण हिशोब करायचा आहे आणि तो हिशोब केल्यानंतर अंतिम देयके द्यायची आहेत. आम्ही वर्ग ३ च्या १६ कर्मचाऱ्यांच्या संदर्भात ३१ मार्चपूर्वी निर्णय करु. वर्ग ४ चे ४० कर्मचारी आहेत. आम्ही त्यांनाही सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे नियमित पेन्शन देऊ करीत आहोत. वरील कर्मचाऱ्यांची सातव्या वेतन आयोगानुसार पडताळणी पूर्ण झाली आहे, त्यांना देखील त्यांची सुधारित पेन्शन ३१ मार्चपूर्वी देऊ करु आणि त्या व्यतिरिक्त १२ कर्मचारी राहिले आहेत, त्यांच्या हिशोबासंदर्भात विभागाकडून पडताळणीची कार्यवाही सुरु आहे. हा संपूर्ण प्रश्न चर्चेद्वारे उपस्थित केला आहे. आम्ही ३१ मार्चपूर्वी हा संपूर्ण प्रश्न निकाली काढू.

सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री. प्रवीण दटके यांनी मुद्दा उपस्थित केला आहे की, नागपूरमध्ये कोविडच्या काळात हजार बेड उभे केले. आपल्याकडून वैद्यकीय शिक्षण विभागाचे कौतुक होत आहे त्याबाबत मी आपले आभार व्यक्त करतो. विदर्भामध्ये नागपूर येथे कोरोना काळात अतिशय चांगली व्यवस्था उभी राहिली. नागपूरच नव्हे तर आजुबाजूच्या जिल्ह्यातील आणि राज्यातील देखील अनेक लोक कोविड काळात तेथे दाखल झाले, बरे झाले, कोणालाही तेथे खाट नाही म्हणून परत जाण्याची वेळ आली नाही. तेथे सर्वच डॉक्टरांनी उत्तम काम केले. कंत्राटी डॉक्टर असा मुद्दा उपस्थित केला आहे. हा विषय वेगळा आहे. वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथे कंत्राटी डॉक्टर घेण्याची संख्या मर्यादित आहे. आपल्याकडे सहायक प्राध्यापक, वैद्यकीय अधिकारी, वैद्यकीय शिक्षण घेणारे विद्यार्थी यांनी मुख्यत्वे ही सेवा दिली आहे.

असुधारित प्रत

श्री. प्रवीण दटके : सभापती महोदया, माझ्याकडून चुकून कंत्राटी असा शब्द निघाला आहे. ते सहायक प्राध्यापक आहेत.

श्री. अमित देशमख : सभापती महोदया, सहायक प्राध्यापक व वैद्यकीय अधिकारी या संदर्भात मुद्दा उपस्थित केला आहे. विभागामध्ये याची सविस्तर चर्चा झाली आहे. आम्ही शिफारशीसह सामान्य प्रशासन व अर्थ व नियोजन या विभागांकडे अभिप्रायासाठी दिले आहे. कोविड काळात या सर्वांनी अतिशय उत्तम काम केले म्हणून राज्याचे माननीय मुख्यमंत्री श्री. उद्धव ठाकरे यांनी, महाविकास आघाडी सरकारने नेहमीच आरोग्यसेवक, कोविड योध्दे यांना सढळ हस्ते मदत करण्याची भूमिका नेहमी घेतली आहे. सर्वोच्च न्यायालयाने सर्वच बाबींमध्ये काही निकाल यापूर्वी दिले आहेत, त्या निर्णयांमुळे नियमित करण्याबाबत थोडी अडचण होत आहे. आता वैद्यकीय शिक्षण विभागाने वर्ग १ ते ४ ची १० ते १५ हजार पदे मंजूर करुन बिंदुनामावली अशा सर्व गोष्टींना मान्यता देऊन एमपीएससी व विविध निवड मंडळांकडे पाठविले आहे, त्यांच्या जाहिराती निघाल्या आहेत. सहायक प्राध्यापक व वैद्यकीय अधिकारी यांना ती संधी उपलब्ध होणार आहे. एमपीएससीने जाहिराती दिल्या आहेत, तेथे त्यांना अर्ज करुन मुलाखती देऊन त्यातून नेमणूका मिळू शकतील असा पर्याय त्यांच्यासमोर खुला आहे. शासन स्तरावर जेवढे करणे शक्य आहे तेवढे करण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत. आपण मुद्दा उपस्थित केल्यामुळे मी हे सांगत आहे. विधानसभा व विधानपरिषद यांचे सन्माननीय सदस्य यांनी वेळोवेळी हा मुद्दा मांडला आहे आणि या शिफारशी केल्या आहेत. आम्ही देखील सकारात्मक दृष्टीकोनातूनच याकडे पाहिले आहे. सर्वोच्च न्यायालयात काही प्रकरणे निकाली निघाल्यानंतरच्या काही मर्यादा पुढे असताना विचारपूर्वक पावले उचलावी लागतील. मी आजही येथे सांगतो की, त्यातही काही मार्ग काढण्याची संधी उपलब्ध राहिली तर तोही मार्ग स्वीकारुन आणि यामध्ये निर्णय करु.

श्री. प्रवीण दटके : सभापती महोदया, माझी विनंती आहे. प्राध्यापकांची त्यांचा ज्येष्ठतेचा विषयासंदर्भात अडचण आहे. एमपीएससीमार्फत या परिक्षेमध्ये गेले तर त्यांची ज्येष्ठता त्यांना मिळेल की नाही अशी अडचण असून त्यांनी त्यांची ही अडचण वळोवेळी सांगितली आहे.

श्री. अमित देशमुख : सभापती महोदया, हा पदोन्नतीचा विषय आहे. विभागीय स्तरावर पदोन्नती वेळेत व्हायला हवी, ती करण्याच्या सूचना दिल्या आहेत. पदोन्नती झाल्यानंतर त्यांना ती जागा मिळेल. उर्वरित जागा एमपीएससी मुलाखतीद्वारे भरण्यात येतील.

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदया, माननीय मंत्र्यांनी समर्पक उत्तर दिले आहे. ३१ मार्चच्या आत सर्व निवृत्त कर्मचाऱ्यांना न्याय देण्याचा निर्णय घेतला आहे. मी त्यांचे आभार मानतो.

**उप सभापती** : खूप चांगली चर्चा झाली आहे. मला मेयो रुग्णालयाच्या संदर्भातील एक विषय मांडायचा आहे. त्यामध्ये त्वरित सुधारणा झालेली मला दिसली आहे. लसीकरणासाठी शिबिरे घेतली जात होती. मेयो रुग्णालयाच्या ठिकाणी वृध्द लोक ऊन्हामध्ये उभे होते. तेथे सावली शेड नाही अशा तक्रारी काहींनी माझ्याकडे नागपूरहून फोन करुन केल्या होती. मी आरोग्य संचालकांना कळविले आणि काही तासांत बदल झाला. कर्मचाऱ्यांवर झालेला अन्याय, दुरवस्था असेल तर त्याच त्रास सर्वसामान्य नागरिकांना होत असतो.

नंतर श्री. खर्चे ....

असुधारित प्रत

**उप सभापती...**

नागपूर महानगरपालिकेच्या सर्व हॉस्पीटलमध्ये सावलीसाठी शेडची व्यवस्था करण्यात आली होती. मेयो हॉस्पीटलमध्ये तशी व्यवस्था नव्हती अशी तक्रा माझ्याकडे आली होती. लस देण्यासाठी ज्यावेळी कॅम्प आयोजित करण्यात येतात त्यावेळी जेथे सोईसुविधा नाहीत तेथे शेड व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नागरिकांसाठी करण्याच्या सूचना आपण द्याव्यात अशी माझी विनंती आहे.

श्री.अमित देशमुख : सभापती महोदया, होय.

------

असुधारित प्रत

**पृ.शी.** : मुंबई शहर आणि उपनगरात बहूसंख्य झोपडपट्ट्यांचे पुनर्विकास प्रकल्प रखडले असणे

**मु.शी.** : मुंबई शहर आणि उपनगरात बहूसंख्य झोपडपट्ट्यांचे पुनर्विकास प्रकल्प रखडले असणे यासंबंधी सर्वश्री.सुनील शिंदे,विलास पोतनीस, डॉ.मनिषा कायंदे ,वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री. सुनील शिंदे (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय ा, मी आपल्या अनुमतीने नियम ९२ अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो :-

"मुंबई शहर आणि उपनगरात बहुसंख्य झोपडपट्टया गत अनेक वर्षांपासून पुनर्विकासाच्या प्रतिक्षेत असणे, सदरहू झोपडपट्टया केंद्र व राज्य शासनाच्या परवानगी अभावी रखडलेल्या असणे, यातील अनेक झोपडपट्ट्या बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या भूखंडावर असणे, त्या व्यतिरिक्त ज्या झोपडपट्टया रेल्वे, भूदल किंवा केंद्रीय प्राधिकरणाच्या भूखंडावर वसलेल्या आहेत त्या संबंधित विभागांच्या परवानग्या मिळवितांना अडचणी येत असणे, त्यामुळे झोपडपट्टया पुनर्विकास प्रकल्प रखडला असणे, सदर प्रकल्पांना गती मिळण्याकरिता तसेच झोपडपट्टीधारकांना घरे मिळण्याकरिता बृहन्मुंबई महानगरपालिका व एसआरए यांनी एकत्रित येऊन झोपडपट्टी पुनर्विकासाचा प्रश्न मार्गी लावण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

सभापती महोदया, अर्धातास चर्चेच्या माध्यमातून मी काही मुद्दे उपस्थित करणार आहे. १९९५ मध्ये युतीचे शासन असताना शिवसेना प्रमुख यांनी ४० लाख झोपडपट्टीवासियांना मोफत घर देण्याची योजना जाहीर केली होती. त्यानंतर अनेक पक्षाची सरकारे आली. बऱ्याच शासनाच्या कारकिर्दीमध्ये चांगल्या पध्दतीने ही

योजना राबविण्यात आली. केंद्र शासनाच्या बी.पी.टी.,नौदल, एअरपोर्ट ॲथॉरिटी, रेल्वे किंवा इतर काही खाजगी जागांवर जे झोपडपट्टीधारक आहेत त्यांना चांगली घरे

श्री.सुनील शिंदे...

मिळावीत असे त्यांचे स्वप्न आहे. एनओसी अभावी येथील घरे रिडेव्हलप होऊ शकली नाहीत. काही ठिकाणी रिडेव्हलपमेंट सुरु झाले असून ते प्रकल्प रखडले आहेत. अर्धातास चर्चेच्या माध्यमातून मला काही सूचना व मुद्दे शासनाला सांगायचे आहेत. वेगवेगळ्या ॲथॉरिटीकडून एनओसी घेणे हे अतिशय कठीण काम झाले आहे, येथील ॲथॉरिटींना एकत्र आणून वन विंडो करुन सर्व एनओसी एकाच ठिकाणी मिळतील अशी व्यवस्था शासनाकडून करण्यात येईल काय ? असे यापूर्वी करण्यात आले आहेत काय ? शिवशाही प्रकल्प ही शासनाची कंपनी आहे. त्या प्रकल्पाची सद्य:स्थिती काय आहे. त्यांच्याकडे रिडेव्हलपमेंटसाठी काही प्रकल्प आहेत काय ? रखडलेले काही प्रकल्प शासनाच्या माध्यमातून शिवशाही कंपनीला देऊन ते पूर्ण करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्यात येणार आहेत काय ? यासाठी मी ही चर्चा उपस्थित केली आहे. मला अशी आशा आहे की, याबाबत मंत्री महोदय सकारात्मक उत्तर देतील.

------

असुधारित प्रत

श्री. विलास पोतनीस (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदया, मंत्री महोदयांना माझी विनंती आहे की, मुंबईमध्ये रेल्वे लाईन लगत राहणारे झोपडपट्टीधारक ४० ते ५० वर्षापासून राहत आहेत. त्यांच्याकडे फोटो पास आहेत. त्यांच्याकडे आधारकार्ड आहे. सर्व प्रकारचे पुरावे आहेत. कोविडच्या काळात सातत्याने रेल्वे ॲथॉरिटीकडून झोपड्या पाडण्यात येत होत्या. तेथे बोर्ड लावले जात होते. मुंबईत एमएमआरडीए व एसआरएच्या काही योजना आहेत परंतु हे दोन्ही विभाग एकमेकांवर टोलवाटोलवी करीत असतात. त्यामध्ये गरीब लोक भरडले जातात. मी स्वत: अनेक ॲथॉरिटीबाबत बैठका घेतल्या आहेत. त्यांच्यासमोर कोणताही ठोस पर्याय नाही. माझा असा प्रश्न आहे की, रेल्वेच्या जागेवरील झोपडपट्टीधारकांना पर्यायी जागा शासन उपलब्ध करुन देणार आहे काय ?

-----

असुधारित प्रत

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदया, मुंबईत १० लाख झोपड्या आहेत, लोकलेखा समितीवर मी सदस्य म्हणून बरेच वर्षे काम करीत आहे. १० लाख झोपड्यांना पक्की घरे देण्याची मागणी मी सुरुवातीपासून करीत आहे. यासाठी एकदाच सर्व परवानग्या घ्याव्यात. माननीय पर्यावरण मंत्री सभागृहात आहेत. सरकारच्या प्रस्तावित प्रकल्पांना पर्यावणाची मंजुरी तातडीने घेण्याचा प्रयत्न करावा. त्यासाठी आम्हाला कधी तरी बैठकीला बोलवावे. त्यामध्ये किती अडचणी येतात त्याची माहिती आम्ही देऊ. आपण मंत्री म्हणून या सर्व बाबी करु शकता. प्रकल्प तयार झाल्यावर पर्यावरणाच्या मंजुरीसाठी बराचसा कालावधी जातो. काही वेळा २० वर्षे त्यामध्ये निघून जातात. त्यामुळे विकास जलद गतीने होत नाही. माझ्या छोट्या बंदरासाठी मला २० वर्षानंतर पर्यावरणाची परवानगी मिळाली. काही लोक न्यायालयात याचिका दाखल करतात, माहिती अधिकारात लोक माहिती मागवितात. शासनाचे प्रकल्प असल्यामुळे त्यासाठी वेगळी व्यवस्था केली तर एक इतिहास निर्माण होईल. कोस्टल रोड हा शासकीय प्रकल्प आहे तो अडकला आहे. आता जे प्रकल्प प्रस्तावित केले आहेत त्यांचे प्रस्ताव तातडीने पर्यावरणाच्या मंजुरीसाठी सादर करावेत. सर्व क्लीअरन्स तातडीने घेण्यात यावेत. असे झाले तर आपल्या प्रकल्पाचे ५० टक्के काम पूर्ण होईल व पुढील कामाला गती येईल. जो प्रकल्प एक वर्षात होणार होता तो सहा महिन्यात पूर्ण होईल. जो प्रकल्प १० वर्षात होणार होता तो दोन वर्षात पूर्ण होईल. असे केले तर जनतेचा पैसा वाचेल. जितका वेळ जास्त लागतो तेवढी प्रकल्पाची किंमत वाढते. कोस्टल रोड प्रकल्पाची किंमत वाढली आहे. हे प्रकार थांबायला पाहिजे असे मला वाटते. या सभागृहात अशा प्रकारची चर्चा झाली पाहिजे. शासनाचे पैसे कसे वाचतील व प्रकल्पाना गती कशी येईल याकडे शासनाने लक्ष देण्याची गरज आहे. आपल्या पाच वर्षाच्या कारकिर्दीत व आम्ही जीवंत आहोत तोपर्यंत आम्हाला मुंबई स्वच्छ झाल्याची बघू द्या. आम्ही आता किती वर्षे जगणार आहोत. मी १० वर्षे जगलो तरी भरपूर झाले. पर्यावरण मंत्री येथे आहेत हे त्यांचेच काम आहे. वातावरणीय बदल या विषया संदर्भातील माननीय सभापती यांच्या अध्यक्षतेखाली या सभागृहात आम्ही समिती घटित केली आहे. माननीय उप सभापती बैठकीला उपस्थित असतात. माननीय सभापती यांच्या

श्री.जयंत प्र.पाटील....

पुढाकाराने ही समिती घटित झाली आहे. त्या समितीचे काम चांगल्या प्रकारे सुरु आहे. आपण एक विषय निवडा मला त्यासाठी चर्चेला बोलवावे. त्यामुळे या विषयाला आपण गती देऊ. मला व सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना आमच्या आयुष्यात संपूर्ण मुंबई स्वच्छ झाल्याचे पाहायचे आहे. प्रत्येक झोपडीतील माणूस स्वत:च्या पक्क्या घरात राहायला गेला पाहिजे. अशी माझी विनंती आहे. पर्यावरणामुळे आपले किती नुकसान होते यासाठी मी हे मुद्दे मांडले आहेत.

-----

असुधारित प्रत

श्री.जितेंद्र आव्हाड (गृहनिर्माण मंत्री) : सभापती महोदया, अर्धातास चर्चेच्या निमित्ताने एका चांगल्या विषयाची चर्चा सभागृहात सुरु आहे. या सभागृहाचा अनुभव लक्षात घेता अर्धातास चर्चेला इतक्या लवकर सुरुवात होईल असे मला वाटले नव्हते. मला वाटले होते अर्धातास चर्चा म्हणजे यासाठी पाऊण तास तरी लागेल.

सन्माननीय सदस्य श्री.सुनील शिंदे यांनी काही महत्वाचे प्रश्न उपस्थित केले आहेत. मुंबईमध्ये केंद्र शासनाच्या जवळपास ५३८.२८ एकर जागेवर झोपडपट्ट्या आहेत. पहिली बाब म्हणजे केंद्र शासन कोणाचे आहे हे माहिती नाही. वर्षानुवर्षे केंद्र शासनाने अडेलतट्टू भूमिका घेतली आहे. एअरपोर्ट ॲथॉरिटी ऑफ इंडियाच्या जागेवर झोपड्या आहेत, बी.पी.टी., डिफेन्सच्या जमिनीवर झोपड्या आहेत. रेल्वेच्या जागेवर झोपडपट्ट्या आहेत. या झोपडपट्ट्या आज तयार झाल्या आहेत काय ? मागील पाच वर्षात तयार झाल्या आहेत काय तर त्याचे उत्तर नाही असे आहे. या झोपडपट्ट्यांचा विषय ७० वर्षे जुना आहे. या झोपड्या आपण काढू शकत नाही. तसे करायला गेल्यास २० ते ३५ मुडदे पडले तरी त्या झोपड्यांना कोणीही तेथून हलवू शकत नाही. मग यावर कधी तरी पर्याय काढावा लागेल. सुरतवरुन जळगाव येथे जाणाऱ्या प्रकल्पामध्ये काही झोपडपट्ट्या आल्या. हे प्रकरण सुप्रीम कोर्टात सुरु होते. सुप्रीम कोर्टाने सांगितले की, त्या झोपडपट्ट्या रेल्वे ट्रॅकच्या मध्ये आहेत.

या नंतर श्री.बोरले...

असुधारित प्रत

डॉ.जितेंद्र आव्हाड.......

त्या झोपडपट्ट्या रेल्वे ट्रॅकच्या बाजूला नव्हत्या. सुप्रीम कोर्टाने निर्णय दिला की, रेल्वे ट्रॅकच्या आतील झोपडपट्ट्या काढून टाकाव्यात आणि बाजूला झोपडपट्ट्या असतील तर त्यांना त्या राज्याच्या योजना असतील तर त्यामध्ये समाविष्ट करावे. आपल्याला माहिती आहे की, मागील दिड-दोन महिन्यांपासून रेल्वेचे अधिकारी झोपडपट्टीवासींयाना नोटीसा देतात. मी सभागृहात मंत्री म्हणून बोलत आहे. परंतु मी सभागृहाच्या बाहेर कार्यकर्ता म्हणून सांगितले होते की, आम्ही एकाही झोपडपट्टीवासीयांना काढू देणार नाही. शासन कोठून जागा देणार आहे ? आपण अपेक्षा करीत आहात की, शासनाने जागा द्यावी. त्यांच्या बुद्धी बद्दल मला काही बोलावयाचे नाही. आपण कधी तरी बांद्रा ब्रिजवरुन जाताना डावीकडे बघावे. तेथे एक खुले मैदान आहे आणि बाजूला संपूर्ण झोपडपट्टी आहे. रेल्वे ती झोपडपट्टी काढू शकते काय तर नाही. तुम्ही रेल्वेच्या बाजूला असलेल्या झोपडपट्ट्या काढू शकता काय तर नाही. मग सुप्रीम कोर्टाने सांगितलेले आहे की, राज्यात अस्तित्वात असलेली योजना लागू करावी. मग रेल्वेचा अट्टाहास कशासाठी ? मी माननीय सभापती महोदयांना सांगेन की, आपण आपल्या स्तरावर कधी तरी त्यांच्या समवेत बैठक आयोजित करावी. कारण ते ज्या पद्धतीने वागतात त्यामुळे आज ना उद्या कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल. गोरगरीब माणूस मुंबईत केवळ नोकरी व छत मिळविण्यासाठी आलेला आहे. तो हातचे कमवितो आणि घरी झोपडीत जाऊन राहतो. मग त्याची झोपडी काढून घ्यायची म्हटल्यानंतर त्याच्याकडे काय राहते ? तो मैदानात उतरेल. पूर्वी तुमच्या व आमच्या पक्षाचे सरकार सत्तेवर होते. परंतु आता परिस्थिती बिकट होत चालली आहे. ज्युडिशिअरी दिवसेंदिवस राज्य किंवा केंद्र शासनाच्या कारभारात हस्तक्षेप करीत आहे. रेल्वेने सुप्रीम कोर्टाने दिलेला निर्णय जसाच्या तसा लागू करावयाचे म्हटले तर मुंबईत कमीत कमी १४ हजार झोपडपट्टीयांचे संसार काढावे लागतील. ते कदापि शक्य नाही. आपण रेल्वेच्या जागेवरील पुनर्वसनाबाबत मुद्दा मांडलेला आहे. अनेक परवानग्यांमुळे एसआरए प्रकल्प लांबतात, ही गोष्ट मला मान्य आहे. एसआरए सरकारी जमिनींवर, म्हाडाच्या

डॉ.जितेंद्र आव्हाड.......

प्लॉटवर आणि खाजगी जमिनींवर देखील आहेत. मला असे वाटते की, कायदा करुन प्रत्येक वेळी त्यांची पात्रता तपासण्यापेक्षा एकदाच काय तो निर्णय घेऊन विषय संपवावा. कारण पात्रता चेक करण्यात डेप्युटी कलेक्टर To be, Not to be यामध्ये वर्षानुवर्षे काढतात. प्रोसेस फास्ट करावयाची असेल तर टेबल कमी करावे लागतील. आम्ही टेबल कमी केलेले आहेत. परंतु नोकरशहांवर म्हणावा तसा परिणाम झालेला नाही. कदाचित मी माझा पराभव देखील मान्य करील. परंतु तरी देखील आम्ही २ वर्षात होणारी कामे ३ महिन्यात करतो. एखाद्या उद्योजकाने पैसे गुंतविल्यानंतर प्रकल्पासाठी जेवढा विलंब होतो त्यावर जो टॅक्स लागतो, त्याला जे व्याज द्यावे लागते, ते स्वत:च्या खिशातून पैसे गुंतवितात असे नाही तर ते इकडून तिकडून जमवून फायनान्सरचे पैसे गुंतवितात. फायनान्सर व्याज घेतात. मुंबईतील अर्धे अधिक प्रकल्प डुबले. कारण व्याज देणे शक्य झाले नाही. झोपडपट्ट्या रिकाम्या करण्यात आल्या परंतु परवानग्याच मिळाल्या नाहीत. तो माणूस सुरुवातीचे दोन-तीन वर्षे भाडे देतो. परंतु तीन वर्षानंतर तो सुद्धा थांबतो. गरीबांना भाडे मिळत नाही. या सर्व गोष्टींचा विचार करुन एसआरएने वन अम्ब्रेला सिस्टीम आणण्याचा विचार केला होता. मुंबई महानगरपालिका, म्हाडा किंवा इतर विभागाकडून पात्रता आणावी असे सांगितले जाते. सर्व पात्रता ठरविण्याचा अधिकार एसआरए स्वत:कडे घेणार आहे. वेगवेगळ्या विभागातील अधिकाऱ्यांना ॲथॉरिटी म्हणून त्यांच्याकडे देण्यात मला तरी तथ्य वाटत नाही, त्यातून गती मिळेल असे वाटत नाही. त्यामुळे सर्व ॲथॉरिटी रद्द करुन एक छत्री अंमल केला तरच आपण विकासाला गती देऊ शकतो. सन्माननीय सदस्य श्री.विलास पोतनीस यांच्या भागातील बरेच प्रकल्प रखडलेले आहेत. जसे मार्केट चेंज होते तशी फिजिबिलिटी बदलते. ज्याने झोपडपट्टी घेतलेली असते तो म्हणतो की २ कोटी रुपये गेले तरी चालतील परंतु २० कोटी रुपयांचा तोटा होता कामा नये. त्यांच्या भागातील प्रकल्प ओबेरॉय रिॲलिटीने घेतला होता. तो प्रकल्प असाच गेला. सुरुवातीला त्या प्रकल्पाची जाहीरात करण्यात आली. तो प्रकल्प ओबेरॉय रिॲलिटीने घेतला. परंतु ज्यावेळी दोन वर्षांनी कॅल्क्युलेशन केले त्यावेळी प्रकल्प

असुधारित प्रत

डॉ.जितेंद्र आव्हाड.......

खड्डयात जाईल असे त्यांना दिसून आले. त्यामुळे त्यांनी ५ कोटी रुपये पाण्यात घातले आणि तेथून निघून गेले. आता सीआरझेडचे रुल्स थोडे अमेंड झालेले आहेत. त्यामुळे वरळी भागातील अनेक झोपडपट्टया क्लिअर झालेल्या आहेत. आपल्याला यामध्ये लवकर काही तरी करता येईल, अशी आपण अपेक्षा करु. मुंबई शहरातील परिस्थिती बघितली तर सीआरझेड-२ मुळे बाधित झालेले प्रकल्प १३, एन्व्हॉयरमेंट विभागाकडे प्रलंबित ४, डिफेन्स डिपार्टमेंटकडे ६, सिव्हिल एव्हिएशन ॲथॉरिटी ४ आणि ईडी विभागाकडे अडकलेले प्रकल्प २० आहेत. मी सांगू इच्छितो की, जे प्रकल्प ईडी विभागाकडे आहेत त्या नागरिकांनी माझी भेट घेतली होती. मी त्यांना सांगितले की, मी काहीही करु शकत नाही. तुम्ही ईडीकडे जाऊन त्यांना सांगावे की, आमचा प्रकल्प आहे, आमची जमीन आहे, ती जमीन आमच्या झोपडपट्टयाखालील आहे, आमच्या झोपड्यांचे पक्के घर होणार आहे, तुम्ही प्रकल्प अडवून ठेवला तर त्यामध्ये बिल्डरचे नुकसान होणार नाही, आमचेच नुकसान होईल. मी त्यांना सांगितले की, हे सर्व मी ईडीकडे जाऊन सांगणार नाही, तुम्ही ईडीकडे जाऊन त्यांना सांगावे. परंतु ज्या पद्धतीने हे केले गेले त्यामध्ये केंद्र शासनाने हस्तक्षेप करुन त्यांना न्याया द्यावा, अशी अपेक्षा आहे. कारण हे दिवसेंदिवस वाढत जाणार आहे. २० प्रकल्प कमी नाहीत. आपले ५२३ प्रकल्प आर्थिक मंदी, कडक कायद्यांमुळे विशेष करुन ज्यावेळी नोटाबंदी जाहीर झाली त्यानंतर एसआरएमध्ये खूप फरक पडला. एसआरएमध्ये चेकद्वारे भाडे देण्याची प्रथाच नव्हती. रोखीने भाडे दिले जात होते. त्यामुळे प्रकल्प रखडत नव्हते. परंतु हे सर्व झाल्यानंतर व्हाईट पैसा कोठून दाखविणार? मी ब्लॅक मनीचे समर्थन करतो अशातला भाग नाही. मी परिस्थितीचे समर्थन करतो. माणसाला व्यवहारानुसार, परिस्थितीनुसार वागावे लागते. या सर्व प्रकरणांमुळे आणि एकंदरीतच परवानग्या देण्यासाठी जो वेळ लागला त्यामुळे झोपडपट्टी पुनर्वसनाचा वेगच कमी झाला. आता तो कोठे तरी सुधारत आहे. ५२३ एसआरए प्रपोजल बंद पडलेले आहेत. माझी मुख्यमंत्री महोदयांसमवेत आजही चर्चा झाली आणि यापूर्वी सुद्धा अनेक वेळा चर्चा झाली की, आपल्याला यातून मार्ग

असुधारित प्रत

डॉ.जितेंद्र आव्हाड.......

काढावा लागेल. मी सभागृहाला सांगू इच्छितो की, आपण ८ दिवसात अशी योजना लागू करु की या ५२३ योजना सुरु होतील. आपल्याला विकास करताना X माणूस समोर दिसतो. परंतु त्या X झोपडपट्टीमध्ये लागलेला पैसा मागे उल्या असलेल्या Y चा असतो. ओव्हर ट्रेडिंगमुळे X डब्यात जातो आणि तेथून पळ काढतो. परंतु Y चा पैसा, हृदय त्यामध्ये लागलेले असते.

यानंतर श्री.सांगळे......

असुधारित प्रत

श्री.जितेंद्र आव्हाड .....

आम्ही "वाय"ला जाऊन असे सांगणार आहोत की, आम्ही तुम्हाला प्रकल्प देतो. त्यामधून तुम्हाला ३ वर्षे काढणार नाही याची आम्ही तुम्हाला हमी देतो. तुम्ही बाहेर गेलेल्या लोकांचे पुनर्वसन करण्यासाठी सुरुवात करावी. पुनर्वसन इमारतीचे दोन स्लॅब पूर्ण झाल्यानंतर आम्ही तुम्हाला तळमजल्यावरील फ्लॅटस् विकण्यासाठी परवानगी देतो. परंतु काही ठिकाणी आपण आपल्या नजरेतून त्याकडे व्यवस्थितपणे न पाहिल्यामुळे काही हुशार लोकांनी लोकांचे पुनर्वसन करीत असताना हळूहळू कार्यवाही केली. याउलट विक्रीसाठी असलेले फ्लॅट जलद गतीने बांधून तेथून ते पळून गेले. त्यामुळे पुनर्वसन इमारती तशाच राहिल्या. त्यामुळे अशा विकासकांच्या सर्व ओसी रद्द केल्या पाहिजेत. तसेच ते एक एलएलपी काढतात व प्रोजेक्ट हाती घेतात. हा त्या सर्वांचा धंदा आहे. परंतु ज्या ठिकाणी डायरेक्टर्स कार्यरत आहेत. त्यांना काळया यादीत टाकून भविष्यात त्यांना अशी कामे मिळणार नाहीत याची आता व्यवस्था केली जाणार आहे. मुंबईत गरीब लोकांना फसविण्याचे उद्योग रात्रंदिवस सुरु आहेत. त्याकरिता सर्व मर्यादा संपून गेली आहे. परंतु कोविडमुळे आपल्याला २ वर्षे यासंबंधी कोणतीही कारवाई करता आली नाही. मी करोनाचा स्वत: शिकार झालो होतो. तो किती भयानक आहे याची मला चांगली माहिती आहे. त्यामुळे आज देखील माझे खांदे व गुडघे दुखत आहेत. सभापती महोदया, आमचा असा प्रयत्न आहे की, उक्त कामांना जास्तीत जास्त गती द्यावी. न्यायालयामध्ये ११ प्रकल्पांची प्रकरणे प्रलंबित आहेत. मी या निमित्ताने ज्युडीशिअरीचे अभिनंदन करतो. कितीही मोठा वकील असो, न्यायालय सहसा एसआरए प्रकल्पांना स्थगिती देत नाही. न्यायालयांकडून असे सांगितले जाते की, न्यायालय यात कोणताही हस्तक्षेप करणार नाही. सदर प्रकरणी आपण आपल्या स्तरावर कार्यवाही करावी. काही प्रकल्प सीआरझेडकडे प्रलंबित आहेत. तसेच वित्तीय पुरवठा व तत्सम कारणांमुळे ५२३ प्रकल्प अडकलेले आहेत. मी आपल्याला सांगितले आहे की, मी माननीय मुख्यमंत्री यांच्यासमवेत चर्चा केली आहे. मी ही स्कीम प्रत्यक्षात आणू शकलो तर .... ही गोष्ट माननीय मुख्यमंत्री यांच्या मनात आहे. ते मुंबईचे एक वेगळे स्वप्न बघत आहेत. हौसिंगविषयी चर्चा करीत असताना मला आनंद वाटतो की, ३० वर्षांपासून बंद

असुधारित प्रत

श्री.जितेंद्र आव्हाड .....

पडलेला बीडीडी चाळ प्रकल्प आम्ही सुरु केला. गोरेगाव येथील २५ वर्षांपासून बंद पडलेला पत्रा चाळ प्रकल्प आम्ही सुरु केला. पंडित जवाहरलाल नेहरु यांनी उद्घाटन केलेल्या मोतीलाल नगरचा १४६ एकरचा प्रकल्प आम्ही सुरु केला. आता आम्ही असा निर्णय घेतला आहे की, लेआऊटमध्ये सिंगल परवानगी द्यायच्या नाहीत. माननीय मुख्यमंत्री माझ्या कामावर खुष असतील तर पुढील ८ दिवसांमध्ये मुंबईला अभिमान वाटेल  असा कामाठीपुरा पुनर्विकासाचा एक प्रकल्प मी घेऊन येत आहे. मुंबईतील मुंबईकर किंवा महाराष्ट्रातील एकही व्यक्ती असा नाही की, ज्याला कामाठीपुरा माहीत नाही. आपण कामाठीपुऱ्याचा उल्लेख केल्यानंतर ज्यांना याबाबतची माहिती नाही ते नाक मुरडतात. परंतु कामाठीपुऱ्याचा खरा इतिहास वेगळाच आहे. इंग्लंडच्या राजाला पोर्तुगीजची राजकन्या विवाहामध्ये दिली गेली. इंग्लंडच्या राजाला विवाहात हुंडा म्हणून माझगाव, सायन, शिवडी अशा प्रकारची ७ बेटं देण्यात आली. कालांतराने ही बेटं एकत्र करायची होती. त्यामुळे ब्रिटिशांना मोठा प्रश्न पडला होता. त्याकाळी मुंबईतील लोकसंख्या कमी होती. त्यात मुंबईत अनेक शेठ लोक राहत होते. आपल्याला आश्चर्य वाटेल की, मुंबईत पाठारे प्रभू, पाचकळशी, सीकेपी, मुसलमान, कोळी, आग्री, भंडारी आणि पारसी अशा ८-९ जातींशिवाय जाती नव्हत्या. त्यामुळे ही बेटं एकत्र करण्यासाठी हमाली काम कोण करणार, ती बेटं कोण बुजवणार ? याकरिता ब्रिटिशांनी तेलंगणामधील सर्वात काटक जात असलेल्या कामाठींना मुंबईत येण्याचे आमंत्रण दिले व त्यांना तेथून घेऊन आले. पूर्वी कामाठीपुऱ्याची जागा दलदलीची होती. त्यानंतर तेथे दगड व भराव टाकून ती सर्व जागा व्यवस्थित करण्यात आली. त्यानंतर कामाठयांनी तेथे झोपडया बांधल्या आणि मुंबईतील बेटं बुजविण्यास सुरुवात केली. आज उभी असलेली मुंबई हा संपूर्ण कामाठीपुरा आहे. ही सर्व मेहनत कामाठयांनी केलेली आहे. मुंबई महानगरपालिका, रेल्वे स्टेशन, स्ट्रेट लाईनमधील सर्व ग्राफीक स्ट्रक्चर्स त्याकरिता कारागीर कोण होते, ती सर्व दगडं फोडून बरोबर काटकोनात कोणी आणली ? ही सर्व कामे कामाठयांनी केली आहेत. ते माझ्या जातभाईंचे जातभाई आहेत. कालेवार नावाच्या मराठी

श्री.जितेंद्र आव्हाड .....

व्यक्तीने मुंबई महानगरपालिकेची इमारत बांधली. ते देखील तेलंगणामधील होते. त्यांचे चौपाटीला मोठे घर आहे. परंतु त्यांचे सर्व पूर्वज कामाठीपुऱ्यात राहत होते.

सभापती महोदया, धारावीच्या प्रकल्पासंबंधी सांगायचे झाल्यास मुंबईला मुंबई म्हणून दाखविणारा हा प्रकल्प आहे. आपण त्यात कधीही मागे राहणार नाही. आपण त्या प्रकल्पाला पुढे आणणार आहोत. सन्माननीय सदस्य श्री.चंद्रशेखर बावनकुळे यांचा केंद्रामध्ये मोठा वशिला आहे. मी आपल्याला सांगू इच्छितो की, राज्य शासनाने यापूर्वीच्या काळात रेल्वेला ८०० कोटी रुपये दिलेले आहेत. ही डील आपल्या काळात झालेली आहे. धारावीच्या प्रकल्पाकरिता ८०० एकर जमीन देण्याची बाब रेल्वेने कबुल केली होती. त्याकरिता राज्य शासनाने अत्यंत विश्वासाने रेल्वेला ८०० कोटी रुपयांची रक्कम दिली होती. परंतु अद्याप रेल्वेने राज्य शासनाला सदरहू कामासाठी एक इंच देखील जमीन दिलेली नाही. परिणामी संपूर्ण प्रकल्प अडकला आहे. मी ही बाब राग किंवा द्वेषाने बोलत नाही. अशाच प्रकारे आम्ही तुमच्या बुलेट ट्रेनच्या प्रकल्पाकरिता जागा अडविली तर...अशा प्रकारे अडवाअडवीच्या खेळामध्ये आपण राज्य आणि देशाचे नुकसान करीत आहोत असे माझे मत आहे. त्यामुळे आपल्या सर्वांचा केंद्र शासनामध्ये जो चांगला संपर्क आहे त्याचा उपयोग करुन घेणे गरजेचे आहे. मी मागील ५ वर्षांपासून कधीही दिल्लीला गेलो नाही. आपल्यापैकी कोणीतरी केंद्रीय रेल्वे मंत्री महोदयांना असे सांगावे की, साहेब, आमच्या काळात आम्ही आपल्याकडे धारावी प्रकल्पाकरिता पैसे दिलेले आहेत. यामुळे आमच्याकडे बोट दाखविले जात आहे. त्यामुळे आपण आम्हाला सदर प्रकल्पाकरिता जमीन उपलब्ध करुन द्यावी. मी सन्माननीय सदस्य श्री.चंद्रशेखर बावनकुळे यांना सांगू इच्छितो की, आपण आम्हाला सदर प्रकल्पाकरिता केंद्र शासनाकडून जमीन उपलब्ध करुन द्यावी. मी ज्याप्रमाणे बीबीडी चाळीचा प्रकल्प सुरु करुन दाखविला. त्याप्रमाणे मी आपल्याला धारावी प्रकल्पाचे काम ३ महिन्यांमध्ये सुरु करुन दाखवतो. दोष देणे, टीका करणे किंवा काही तरी खळबळजनक बोलायचे म्हणून मी येथे बोलणार नाही. राज्य शासनाने रेल्वेला ८००

असुधारित प्रत

श्री.जितेंद्र आव्हाड .....

कोटी रुपयांची रक्कम दिल्याची बाब आपल्या सर्वांना माहीत आहे. अशा प्रकारे आपण एकत्रित काम करुन प्रकल्पांना व्यवस्थित परवानग्या दिल्यास प्रकल्पांची कामे जास्त लांबणीवर पाडू शकत नाही. याकरिता आपण तातडीने कार्यवाही केली पाहिजे व प्रकल्प उभे केले पाहिजेत. आपल्याकडून गरीब लोकांना मोठया अपेक्षा आहेत. आपण त्या अपेक्षांना पुरुन उरलो नाही तर आपण कशासाठी जगत आहोत ? असा प्रश्न माझ्या सारख्याला पडतो. मी सन्माननीय सदस्य सर्वश्री सुनील शिंदे, विलास पोतनीस, जयंत प्र.पाटील यांना सांगू इच्छितो की, अशा प्रकारे एसआरए प्रकल्पाला सर्व परवानग्या देत प्रकल्पाच्या कामाला गती देण्याचा आमचा प्रयत्न आहे. स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या स्वप्नातील १९९५ मधील जी मुंबई होती ती आता त्यांना दिसली पाहिजे असे काम आम्हाला येथे करुन दाखवायचे आहे. महाविकास आघाडीच्या माध्यमातून मुंबईत जे घडलेच नाही ते आम्हाला येथे घडवून दाखवायचे आहे आणि त्या दृष्टीने आम्ही पावले टाकत आहोत, जय हिंद !जय महाराष्ट्र !

श्री.सुनील शिंदे : सभापती महोदया, मंत्री महोदयांनी अतिशय समर्पक उत्तर दिलेले आहे. मी मंत्री महोदयांना शिवशाही प्रकल्पाची सद्यस्थिती काय आहे व आपण त्या प्रकल्पाला गती देऊ शकतो का ? असा प्रश्न विचारला होता. मला मंत्री महोदयांकडून त्याबाबतचे उत्तर अपेक्षित आहे. त्यापूर्वी एक लहान कार्यकर्ता म्हणून मी मंत्री महोदयांना सूचना करु इच्छितो की, वरळी येथील बीडीडी चाळ सुरु करीत असताना माननीय मंत्री श्री.आदित्य ठाकरे यांची स्थानिक आमदार या नात्याने आपल्याला निश्चितच मदत झाली आहे. वरळीमधील काही महत्वाचे प्रकल्प केंद्रीय पर्यावरण विभागाकडे प्रलंबित होते. माननीय मंत्री श्री.आदित्य ठाकरे यांच्याकडे कोणती कला आहे, हे मला माहीत नाही. परंतु त्यांनी महत्त्वाच्या प्रकल्पांकरिता दिल्लीवरुन परवानग्या मिळवल्या. भविष्यात अशा प्रकारे काही महत्त्वाचे प्रकल्प रखडल्यास आपण त्यांची मदत घ्यावी. जेणेकरुन ती सर्व कामे ते आपल्याला सोपी करुन दाखवतील.

यानंतर श्री.गागरे....

अप्रकाशित प्रत

डॉ.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुनील शिंदे यांनी सांगितले की, मंत्री महोदय श्री.आदित्य ठाकरे यांचे दिल्लीमध्ये काय आहे. माझ्या छातीची धडधड वाढली आहे. वरळीबाबत माननीय श्री.आदित्य ठाकरे कायम सर्पोटीव्ह राहिले आहेत. एक गोष्ट सांगतो की, आम्ही दोघेही जागेवर गेलो. नायगावमध्ये जागेवर गेलो, वरळीमध्ये चाळीत गेलो, एनएम जोशी मार्गावर बैठका घेतल्या त्यांच्याशी प्रत्यक्ष बोललो. हयुमन रिलेशन्समुळे हे काम पुढे गेले. यापूर्वी त्यांच्याशी बोलायला कोणी तयार नव्हते. छोटे विषय होते. आज आम्हाला अभिमान आहे की, तेथे राहणाऱ्या २२०० पोलीस कर्मचाऱ्यांना जे तेथे राहात होते तेथे घर मिळाले. मी तडकाफडकी निर्णय घेतला की, सर्वांना बाहेर काढून टाका व बीडीडी चाळी आपल्या ताब्यात घ्या. एकदा मी श्री.डिग्गीकर व श्री.म्हैसकर एकत्र बसलो असताना पाच बायकांचे एक शिष्टमंडळ आले. त्यातील एका बाईने मला सांगितले की, माझा नवरा पोलिसात आहे व त्याचे आजोबा पोलिसात होते, आम्ही त्या दिवसापासून या घरात राहतो. सहज मोजले तरी ५०-६० वर्ष होतात. एवढी वर्ष राहिलेल्या माणसांना आपण घरातून खेचून बाहेर काढणे यापेक्षा दुसरे मोठे पापच नव्हते. त्याच क्षणी निर्णय घेतला की, २०११ पर्यंत जे रहिवासी बीडीडी चाळीत राहतात त्यांचे घर होईल. मुख्यमंत्री महोदयांनी व सर्वांनी एकत्रित मान्यता दिली व हा प्रश्न मिटला. म्हणजे लढाईचा जो मुख्य केंद्रबिंदू होता तो प्रश्न दोन मिनिटात संपवून टाकला. त्यांचा अॅग्रीमेंट वगैरेचा प्रश्न सर्व सोडविले. शिवशाही प्रकल्प म्हणावा तसा प्रगती करु शकला नाही. कर्ज त्यांनी दिली पण ती कर्ज लुटली व लुबाडली. एसआरएमधील अतिशहाणे विकासक खूप हुशार आहेत, बँकींगमधील मास्टर्स आहेत. माझी व मुख्याधिकाऱ्यांची चर्चा झाली की, मुख्यमंत्री महोदयांकडे एकदा घेऊन जाऊ की, शिवशाही प्रकल्प जिवंत ठेवणे आता काही शक्य नाही. कारण त्याचा फायदा व उपयोगच नाही. त्यापेक्षा त्याचे ५०० कोटी रुपयाचा निधी एसआरएमध्ये विलीन करुन तो वेगवेगळया कामासाठी वापरता येतो का हे पाहून त्याचे काम केले पाहिजे असे आमचे मत आहे. लवकरच ते आम्ही सभागृहापुढे व जनतेपुढे घेऊन येऊ.

असुधारित प्रत

**उप सभापती** : अर्धा-तास चर्चा संपली आहे.

सभागृहाची बैठक मी १५ मिनिटांसाठी स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक सायंकाळी ०६.०२ ते ६.२७ वाजेपर्यंत स्थगित झाली.)

------

असुधारित प्रत

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

**एसटी कर्मचारी संपावरील तोडग्यासंदर्भात शासनाचे धोरण जाहीर करण्याबाबत**

ॲड अनिल परब : माननीय उप सभापती महोदया, माननीय सभापती यांच्या निर्देशाप्रमाणे विधानपरिषदेतील सन्माननीय सदस्यांसमवेत एसटी संपावरील तोडग्यासंदर्भात आयोजित केलेल्या बैठकीमध्ये काही मुद्दयांवर चर्चा झाली होती. यासंदर्भातील सर्व मुद्दयांच्या संदर्भात आज वित्त विभाग, माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री यांच्यासमवेत बैठक झाली. परंतु या बाबतीतील काही आर्थिक बाबींची, कायदेशीर बाबींची तपासणी करण्यासाठी आम्हाला वेळेची गरज आहे. उद्या दिनांक ११ मार्च,२०२२ रोजी अर्थसंकल्प सादर होणार आहे, यामुळे वित्त विभागाचे अधिकारी अर्थसंकल्पीय कामामध्ये अडकलेले असल्यामुळे या संदर्भात आज निर्णय होऊ शकला नाही. मी सभागृहाला विनंती करीत आहे की, याकरिता आम्हाला आणखी थोडा वेळ द्यावा. हे अधिवेशन संपण्यापूर्वी याबाबत शासनाचा अंतिम निर्णय कळण्यिात येईल.

**उप सभापती :** सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील आपल्यासमवेत इतर सन्माननीय सदस्यांचे देखील बोलण्याकरिता हात वर आहेत. यावर चर्चा होऊ शकत नाही. त्यामुळे मी केवळ आपल्याला यावर बोलण्याची संधी देऊ शकत नाही.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदया, हा प्रश्न नाजूक असल्यामुळे येथे काही कोणता वादाचा मुद्दा नाही. उगाच गैरसमज नसावा. माझी मंत्रीमहोदयांनी एकच विंनती आहे की, काल दिनांक ०९ मार्च,२०२२ रोजी या विषयासंदर्भात आपण काही जाहीर केलेले नसले तरीही आपल्या बोलण्यामधून जी कमिटमेंट आपण दिलेली आहे, त्यामध्ये वित्त विभागाच्या माध्यमातून प्रत्यक्ष कार्यवाही करताना थोडाफार बदल जरी झाला तरी त्याबाबत आमचे काही म्हणणे नाही.

यानंतर श्री.सोनावणे......

असुधारित प्रत

श्री. जयंत प्र. पाटील.....

पण त्या कमिटमेंटपर्यंत संबंधित लोकांना सांगण्यात आले आहे. लोक आपल्या निर्णयाकडे वेगळ्या आशेने बघत आहेत. उद्या शुक्रवार, दिनांक ११ मार्च, २०२२ रोजी राज्याचा अर्थसंकल्प सभागृहात सादर केला जाणार आहे. हे काल झालेल्या मिटींगमध्ये आपल्याला माहीत नव्हते. अर्थसंकल्पात वित्त विभागातील अधिकारी खूपच व्यस्त आहे यात तीळमात्र शंका नाही. उद्या शुक्रवार, दिनांक ११ मार्च, २०२२ रोजी राज्याचा अर्थसंकल्प सभागृहात सादर केला जाणार असल्यामुळे या गोष्टीस अधिक कालावधी लागेल असे मला तरी वाटत नाही. त्यानंतर शनिवार आणि रविवारी सुट्टी आहे. माननीय परिवहन मंत्री महोदयांनी जी कमिटमेंट दिलेली आहे, त्यापासून ते बाजूला जाता कामा नये एवढीच आमची त्यांच्याकडून प्रामाणिक अपेक्षा आहे. लोकांना जे आश्वासन दिलेले आहे आणि लोकांनीसुध्दा दोन पावले मागे घेतलेली आहेत. त्यानुसार माननीय परिवहन मंत्री महोदयांनी कार्यवाही करावी, अशी माझी त्यांना विनंती आहे.

**उप सभापती** : काल गुरुवार, दिनांक ९ मार्च, २०२२ रोजी माननीय सभापती महाराष्ट्र विधानपरिषद यांच्याकडे आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत सामंजस्यपणा आणि विश्वास होता आणि तो सामंजस्यपणा आणि विश्वास आजसुध्दा आहे. त्यामुळे आपण थोडेसे थांबू या.

सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची बैठक उद्या शुक्रवार, दिनांक ११ मार्च, २०२२ रोजी दुपारी १२.०० वाजता पुन्हा भरेल.

(सभागृहाची बैठक सायंकाळी ०६ वाजून २१ मिनिटांनी, शुक्रवार, दिनांक ११ मार्च, २०२२ रोजीच्या दुपारी १२.०० वाजेपर्यंत स्थगित झाली.)

-----

असुधारित प्रत